आपत्कालीन परिस्थिती, कार्याचे स्वरूप, कालावधी, प्रश्नांचा, समस्यांचा प्रधान्यक्रम, मदत करणाऱ्या संघटना, मदतकार्य करणाऱ्या स्वयंसेवकांची परिपक्वता, आर्थिक परिस्थिती, सामाजिक रचना, राजकीय परिस्थिती इ. गोष्टींचा एकत्रित विचार करून निर्णय घेणे आवश्यक असते. तसेच निर्णय घेणे म्हणजे व्यवस्थापन म्हणूनच परिणामकारक नेतृत्त्वासाठी काही गुण आवश्यक असतात.

धैर्य :

आपत्तीकाळात येणाऱ्या कठीण प्रसंगांना धैर्याने सामोरे जाऊन, सहकाऱ्यांना सावरून निर्णय घेणे, सहकाऱ्यांच्या चुका दाखवून देणे, अफवांना बळी न पडता सहकाऱ्यांकडून काम करवून घेणे.

निर्णयक्षमता :

आपत्तीकाळात आवश्यक ती माहिती गोळा करून विचारपूर्वक तत्काळ निर्णय घेणे.

सहकाराची भावना :

आपल्या सहकाऱ्यांसोबत काम करतांना किंवा त्यांच्याकडून काम करवून घेतांना मुख्याध्यापकामध्ये सहकार्याची भावना असावी. यामुळे सोबतचे सहकारी जोमाने आणि उत्साहाने कार्य करू शकतील.

शारीरिक व मानसिक स्वास्थ्य :

आपत्तीला तोंड देण्यासाठी शारीरिक तसेच मानसिक स्वास्थ्य व्यवस्थित राहावयास हवे, जेणेकरून शरीर व मन दोघेही थकणार नाही आणि त्राणही येणार नाही.

समतेची भावना :

विविध व्यक्तीसोबत काम करीत असतांना त्यांच्यात कधीही विषमतेची भावना निर्माण व्हायला नको त्यामुळे कदाचित कामात व्यत्यय निर्माण होऊ शकतो आणि म्हणूनच प्रत्येक कर्मचाऱ्यांमध्ये समानतेची भावना रूजविण्याची भूमिका मुख्याध्यापकास पार पाडावी लागते.

प्रशिक्षण कार्य :

प्रशिक्षण कार्य चालू असतांना या प्रशिक्षणामध्ये फार बिकट समस्या किंवा आपत्ती कोणती ती किती परिणामकारक ठरू शकते याची जाणीव मुख्याध्यापकास असावयास हवी. त्यामुळे प्रशिक्षण देतांना ह्या गोष्टी लक्षात ठेवून प्रशिक्षण कार्य चालवावे.

आपत्ती व्यवस्थापन शिक्षकांची भूमिका व जबाबदाऱ्या :

शिक्षक हा केवळ वर्ग शिक्षक किंवा विषय शिक्षक नसतो तर तो समाजातील एक घटक असल्यामुळे किंवा त्याची समाजाशी एक बांधीलकी असल्यामुळे त्यालाही विविध जबाबदाऱ्या व भूमिका पार पाडाव्या लागतात. शालेय

अभ्यासक्रमातील आपत्ती व्यवस्थापन विषयाचा समावेश करण्यामागचे महत्त्व लक्षात घेऊन त्या दृष्टीने आपली भूमिका महत्त्वाची आहे.

आपत्ती व्यवस्थापनात शिक्षकांची भूमिका

१) आपत्ती म्हणजे अकस्मात उद्‌भवलेले संकट, त्याचा आर्थिक, जीवित, मानसिक, भावनिक परिणाम होतो. त्यामुळे मानवी क्षमतांचा विकास करणे गरजेचे आहे.

२) आपत्तीची तिव्रता कमी करून वैयक्तिक जबाबदारीला सामूहिक करण्याचा प्रयत्न करणे.

३) सर्वोत्तम सामाजिक उपक्रमांमध्ये तयारी, प्रतिबंध, सहाय्यता कुवत निर्माण करणे, बालपणापासूनच असंभाव्य आपत्तीशी लढा देण्याच्या दृकिोनातून शाळांच्या अभ्यासात फेर बदल सुचविणे.

४) शिक्षकाने विविध उपक्रमाद्वारे मानवी संकटाबाबत मत प्रकटन करीत राहिले पाहिजे. प्रसारमाध्यमाद्वारे त्याने लोकशिक्षणाचे कार्य केले पाहिजे.

५) शाळा, महाविद्यालये आणि समाजामध्ये विविध प्रकारच्या कार्यशाळा आणि उद्‌बोधनवर्ग, उपक्रम राबवून समाजात जाणीव निर्माण केली पाहिजे.

६) धोक्याची सूचना देणारी यंत्रणा उभी करणे, तसेच कोणत्याही आपत्तीचा धोका कमी करण्यासाठी योजना आखणे आणि हिंसेवर ताबा मिळवणे याबाबत प्रशिक्षण घेणे व इतरांना सहभागी करून घेणे.

आपत्ती विषयक लक्षात ठेवावयाच्या बाबी :

१. आपत्ती कोणत्या प्रकारची आहे? तिची तिव्रता कशी आहे.
२. प्रदेश, स्थान, आपत्तीचा विचार
३. पूर्वी आलेल्या आपत्तीचे सर्वेक्षण प्रशिक्षण इ.
४. आपत्ती काळात निर्माण होणारे निरनिराळे प्रश्न.
५. प्राधान्यानुसार तातडीने प्रश्न सोडविण्याची गरज.

➢ **मदत पोहचविणे :**

१. मदतकार्य पोहचविणे.
२. वैद्यकीय सेवा, औषध याबद्दलची माहिती घेणे.
३. अन्न, वस्त्र या गोष्टी मिळते कां ते बघणे.
४. तात्काळ राहण्याची सोय करणे.
५. मदत कार्य करण्याऱ्या प्रशिक्षण संस्थांची माहिती
६. सामाजिक संस्था, स्थानिक संस्था, युवापिढी, अनुभवी नागरिक, सेवादलाची मदत.

➢ **आर्थिक साहाय्य :**

१. स्थानिक पातळीवरून प्रदेशातून/देशातून, जागतिक स्तरावरून, जागतिक बँक, स्थानिक बँक यापैकी कुठून मदत किंवा आर्थिक सहाय्य मिळते याचा विचार करणे व त्याबाबतची माहिती संग्रही ठेवणे.

२. गरजू विद्यार्थ्यांना पैश्याच्या स्वरूपात, वस्तुच्या स्वरूपात औषध या प्रकारची मदत होतेय की नाही ते बघणे.

अशा प्रकारे शालेय पातळीवर विविध प्रकारचे उपक्रम राबवून तसेच शाळेच्या विविध स्तरावर विद्यार्थी शिक्षक तसेच सामान्य नागरिक यांना प्रशिक्षित व जागृत करून आपत्ती व्यवस्थापनाच्या माध्यमातून होणारी मनुष्यहानी तसेच वित्त हानी कमी करता येऊ शकते.

संदर्भ ग्रंथ सूची :

१. पाटील लीला, (१९७८) “आजचे शिक्षण आजच्या समस्या” पुणे, श्री विद्या प्रकाशन
२. शुक्ल, डॉ. उमाकांत व कुलकर्णी, एस. टी. (२००१) “सांख्यिकी तत्व आणि व्यवहार” पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर

३. अग्निशमन व सुरक्षितता विभाग (२००४) "आपत्कालीन व्यवस्थापन" रत्नागिरी, फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड

४. अहिरराव, अलिझाड, वराट, धापटे, भोस (१९९५) "पर्यावरण विज्ञान" पुणे, निराली प्रकाशन

५. तावाडे, स्नेहल, शिंदे, प्रतिमा (२००५) "माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण व्यवस्थापन, समस्या व उपाय" पुणे, डायमंड पब्लिकेशन

६. भारतीय शिक्षण (२००६) "आपत्ती निवारण व्यवस्थापन" (पृष्ठ ८९–९०) मुंबई, भारतीय शिक्षण प्रकाशन

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 4.374
UGC Approved Journal Sr. No.48455

ISSN No. 2394-8426
Mar – 2018
Issue–I, Volume–VII

नव्या सहस्त्रकातील प्राथमिक शिक्षण

प्राचार्य, डॉ. अशोक श्रीहरी जीवतोडे,
जनता शिक्षण महाविद्यालय, चंद्रपूर (महाराष्ट्र), ४४२४०१, भारत

सारांश :

आज प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे असले तरी बरेच विद्यार्थी अजूनही शाळेच्या बाहेरच आहे. त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणने हे जसे शिक्षकाचे कर्तव्य आहे त्यापेक्षा जास्त हे समाज व पालकांचे पण कर्तव्य आहे. तेव्हाच आपण सर्वांना खऱ्या अर्थाने प्राथमिक शिक्षणाच्या प्रवाहात आणू आणि पूर्ण साक्षरतेचे उद्दिष्टे पूर्ण करू.

मुख्य संबोध : सहस्त्रक, प्राथमिक शिक्षण

पार्श्वभूमी :

नव्या सहस्त्रकातील प्राथमिक शिक्षण म्हणजेच २१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर जी विविध प्रकारची आव्हाने आपल्या देशासमोर आहेत ती देशापुरतीच मर्यादित नसून जागतिक स्तरापर्यंत जाऊन पोहोचली आहेत. भारतीय समाजाचे परिवर्तनशील असे स्वरूप संपूर्ण जगाला मार्गदर्शक ठरावे असे आहे. त्यातील विविध वारसे आणि समोर येणाऱ्या समस्या या सर्वांना सामोरे जात असतांना केवळ शिक्षित पिढी निर्माण करून चालणार नाही तर याबरोबर विविध क्रांत्या, त्यानुसार झालेले बदल स्विकारून सांस्कृतिक संघर्ष टाळून भावनिक एकात्मतेकडे वाटचाल करावी लागेल. आर्थिक स्तर उंचावण्याचा प्रयत्न हा तर गरजेचा आहे. आधुनिकीकरणाबरोबरच जागतिकीकरणाचा विशाल दृष्टिकोन आपण स्विकारलेला आहे. चांगल्याचा स्वीकार करणे व निरूपयोगी टाकून देणे हे गरजेचे आहे.

विसाव्या शतकाअखेरीस शिक्षणावर परिवर्तनाचा परिणाम :

२१ वे शतक हे जसे संगणक युग अथवा तंत्रज्ञान युग म्हणून ओळखले जाईल त्याचप्रमाणे ते समस्या युग म्हणून ओळखले जाण्याचीही शक्यता आहे. एका बाजूला विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या वेगवान प्रगतीने जग जवळ येत चालले आहे पण त्याचवेळी माणूस मात्र माणसापासून दूर जात असल्याचेही दिसून येते. २१ व्या शतकात अवकाशामध्ये झेपावणाऱ्या अग्निबाणामुळे मानवी प्रगतीचे पंख शक्तिशाली होत आहेत. याचबरोबर संस्कृतीविषयी निर्माण होणारे प्रश्न मनाला अस्वस्थ करीत आहेत.

निरंतर शिक्षण :

आज जगात सर्व क्षेत्रात क्रांतीकारक बदल झाले आहेत. राजकीय, सामाजिक, बौद्धिक, व्यावसायिक, सैनिकी, प्रत्येक क्षेत्रात वैज्ञानिक शोधांनी प्रगती केली आहे. साधनांचे, पद्धतीचे, कौशल्याचे, आधुनिकीकरण झाले. त्यामुळे ज्ञानाच्या कक्षा विस्तारल्या, अपेक्षा वाढल्या त्यामुळे समाजातील प्रत्येक व्यक्तीला आपल्या व्यावसायिक उन्नतीसाठी व चांगले जीवन जगण्यासाठी आपापल्या क्षेत्रातील अद्ययावत ज्ञान प्राप्त करून घेण्याची गरज वाटू लागली आहे. अद्ययावत ज्ञान घेण्यासाठी प्रौढांनी सुद्धा आपले शिक्षण सातत्याने चालू ठेवावे असा नवीन विचारप्रवाह शिक्षणात वाढू लागला. अद्ययावत नवनवीन ज्ञान मिळविण्यासाठी शिक्षण हवे अशा लोकांच्या मागण्या, अपेक्षा वाढल्यामुळे आजीवन शिक्षण/निरंतर शिक्षण हा नवा विचारप्रवाह दृढ होऊ लागला.

शिक्षणक्षेत्रातील बदलाचे टप्पे :

१) मौखिक देवाण–घेवाण
२) लेखनाद्वारे
३) मुद्रणयंत्र
४) कॅमेरा : सद्य:स्थितीचा आभास निर्माण करणे शक्य
५) ग्रामोफोन व फोनोग्राफ : ग्रामोफोनमुळे मौखिक दळणवळणाचा संग्रह करणे शक्य.
६) आकाशवाणी
७) टेपरेकॉर्डर : श्राव्य अनुभवांचे मुद्रण
८) दूरदर्शन
९) दूरध्वनी
१०) शैक्षणिक चित्रपट
११) संगणक शिक्षण
१२) व्हिडिओ टेप्स
१३) इंटरनेट शिक्षण
१४) टेलिकॉन्फरस
१५) ई–मेल
१६) समाज माध्यम(Social media)

संदर्भ क्षमता :

पालक आणि समाज यांनी आपले प्रयत्न स्वीकृत केले पाहिजेत याबाबत प्राथमिक शिक्षकांनी वचनबद्ध असले पाहिजे आणि यासाठी शिक्षकांना सामाजिक आर्थिक, सांस्कृतिक, भाषिक व धार्मिक परिस्थितीचे, समस्यांचे ज्ञान हवे. कुटुंबचित्र ज्ञान हवे, समाजचित्र माहीत असणे आवश्यक आहे. समतेसाठी धोरणात्मक तरतुदी, सामाजिक न्याय, शैक्षणिक संधी याबाबत तत्व आणि व्यवहार या दोन्ही दृष्टिने त्याला जाणीव हवी. शिक्षकांचा व्यवसाय हा केवळ शिक्षण प्रक्रियेचाच अविभाज्य भाग आहे. असे नाही तर संपूर्ण समाज व्यवस्थेचा, सांस्कृतिकतेचाच तो भाग आहे. म्हणूनच राष्ट्रीय व राज्य पातळीवरील शिक्षण व्यवस्थेचे ज्ञान शिक्षकाला असणे आवश्यक आहे.

सर्वकष, व्यापक पातळीवर व स्थानिकदृष्ट्या या व्यवस्थेचे नाते कोणते याचेही ज्ञान त्याला आवश्यक आहे. संबंधित राज्य व संपूर्ण देश यामध्ये साक्षरता वाढीच्या कार्यक्रमातील अडथळे कोणते याचे ज्ञान त्याला हवे. त्यासाठी उपाय कोणते याचे ज्ञान शिक्षकाला हवे. प्रतिष्ठा, उन्नती, समता यावर आधारलेली नागरिक म्हणून आपली भूमिका कोणती याची जाणीव त्याला हवी.

प्राथमिक शिक्षण सद्य:स्थिती समस्या व उपाय :

प्राथमिक शाळांच्या संख्यात्मक विस्ताराबाबत आपण खूप यशस्वी ठरले आहोत यात शंका नाही. मुला–मुलींच्या पटनोंदणीचे प्रमाण वाढले आहे. मुलींच्या शिक्षणाबाबत हळूहळू का होईना जागृती होत आहे. अनौपचारिक शिक्षणाची उपयुक्तता वाढू लागली आहे. शाळामधील प्रशिक्षित शिक्षकांची संख्या वाढली आहे. प्राथमिक शिक्षणासाठी विविध प्रकारचे साहित्य निर्माण झाले आहे. प्राथमिक शिक्षणातील अध्यापन पद्धतीबाबत विविध पातळ्यांवर प्रयोग केले जात आहेत. पण प्राथमिक शिक्षणाकडे अजूनही पुढील शिक्षणाची तयारी म्हणून पाहिले जाते. प्राथमिक शाळांमधील अभ्यासक्रम अध्यापन पद्धती, पाठ्यपुस्तके, साहित्य याबाबतची परिस्थिती आपणास ज्ञान आहे. शिक्षणाचे ग्रामपातळीपर्यंत विकेंद्रीकरण होण्यासाठी ग्रामपातळीवर अशी तज्ज्ञता निर्माण होण्यास अजून वेळ लागेल. माध्यमिक विभागातील परीक्षा केंद्रीतपणा प्राथमिक शिक्षणातही शिरला आहे.

प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रीकरणाच्या उद्दिष्टापासून आपण फार दूर आहोत देशातील गरीबी, भौगोलिक रचना, रूढी, परंपरा यांचा पगडा ही त्यांची प्रमुख कारणे असली तरी प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ताही त्याला कारणीभूत आहे. औपचारिक शाळांमधील स्थानिक गरजांवर आधारित नसलेला अभ्यासक्रम, कंटाळवाण्या अध्यापन पद्धती, केवळ माहिती भरलेली पाठ्यपुस्तके आणि मर्यादित ज्ञान व क्षमता असलेल्या व त्याच जोडीला नोकरीची शाश्वती, कामाचा ताण, समाजाच्या अपेक्षा या चक्रात सापडलेला शिक्षक या सर्वांमुळेही प्राथमिक शिक्षण घराघरात पोहोचलेले नाही हे विसरून चालणार नाही.

प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रीकरणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी काम करावे लागेल आजपर्यंत विविध आयोग व समित्यांनी याबाबत शिफारशी मांडल्या. राष्ट्रीय स्तरावर योजना आखल्या, जिल्हा प्राथमिक शिक्षण कार्यक्रमासारखे कार्यक्रम राबविले, प्राथमिक शिक्षण कार्यक्रमासारखे कार्यक्रम राबविले, स्थानिक स्तरावर प्रयोग झाले. पण जोपर्यंत देशातील प्रत्येक सुशिक्षित नागरिक, मग तो कोणत्याही स्तरामधला, वर्गामधला असतो, हे मानीत नाही की प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रीकीकरण ही केवळ शासनाची किंवा शिक्षकांची जबाबदारी नसून माझीही जबाबदारी आहे. तोपर्यंत प्राथमिक शिक्षणाच्या सावित्रीकीकरणाचे उद्दिष्टे साध्य होईलच असे नाही.

संदर्भ ग्रंथ सूची

१) पाटील, लिला, (१९७४) : “आजचे शिक्षण आजच्या समस्या” पुणे, श्री विद्या प्रकाशन
२) मुळे, शा.शं. आणि उमाठे वि.तु. (१९७७) : “शैक्षणिक संशोधनची मुलतत्वे” नागपूर, साहित्य प्रसार केंद्र
३) खरात, आ. पा. (१९७४) : “प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र” पुणे, श्री. विद्या प्रकाशन
४) डॉ. करंदीकर, सुरेश (२००१) : “शैक्षणिक मानसशास्त्र” कोल्हापूर, फडके प्रकाशन

Websites :

5) http://www.doaj.org;
6) http://www.inflibnet.ac.in;
7) http://www.infolibrarian.com;
8) http://www.academicjournals.org/err/;

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 4.374
UGC Approved Journal Sr. No.48455

ISSN No. 2394-8426
Mar – 2018
Issue–I, Volume–VII

अपंग (दिव्यांग) बालकाचे पुनर्वसन आणि पालकाची भुमिका

प्रा. विवेक एस. गोर्लावार
फुले – आंबेडकर कॉलेज ऑफ
सोशल वर्क, गडचिरोली

प्रस्तावना :—

'A Life of Dignity and Respect
For
Differently Able Parsons
To optimize their ability, skill
And to enhance
Their participation in the
Min-stream of the society by
Utilizing that under-tapped asset'

अपंग माणूस हा एखाद्या परिपूर्ण माणसापेक्षाही विद्वान असू शकतो तो माणूस कोणत्या क्षेत्रात किती मोठा साधक असून शकतो अशी अनेक उदाहरणे इतिहासात आढळून येतात. या आधुनिक समाजातील संगीतकार रविंद्र जैन, महाकवी सुरदास यांनी एखाद्या डोळस माणसापेक्षा जास्त चांगल्या पद्धतीने संगीताची साधन केली आहे. माणसे मोठी झाली, त्यांना कोणीही आधार दिला नाही. सरकारने त्यांना आधार दिला नाही तरी ती मोठी झाली, पण असा क्षण सर्वांच्याच आयुष्यात येत नाहीत. अशी अनेक माणसे आहेत, ज्यांना शासनाच्या कायद्याची आधाराची गरज आहे. समाजाच्या प्रोत्साहनाची आवश्यकता आहे अपंग म्हणजे एखाद्याच्या दयेवर जगणारी अथवा याचना करणारी व्यक्ती नव्हे तसेच दान देऊन त्याचे पालनपोषण करण्याची त्यांची अपेक्षा नाही.

या संपूर्ण अपंगाची मागणी ''भीक नको पण संधी द्या, आम्हाला समानतेची वागणूक द्या'' आहे आणि ही मागणी घेऊन अपंग संघर्ष करीत आहेत. पारंपारीक कुटूंब व्यवस्थेमध्ये अपंग व्यक्तिचे योग्य समायोजन होउन अपंग व्यक्तीला कोणत्याही संकटाचा मुकाबला करावा लागत नव्हता. पण हळूहळू ही कुटुंब व्यवस्था बदलत गेली व विभाजीत कुटुंब व्यवस्था मोठया वेगाने उदयास येत आहे. त्यामुळे समाजात ''हम साथ साथ है'' यातून ''हम आपके है कौन'' असा प्रवास हेत आहे. यामुळे अशा अपंगांना अनंत अडचणींचा सामना करावा लागतो. त्यांना कोणीही मायबाप नसतात. कोणीही काळजी घेत नाही. अशा वेळी शासनावर या अपंगांचे पुनर्वसन करण्याची त्यांना सहकार्यायाची हात देण्याची जबाबदारी असते. 3 डिसेंबर हा दिवस आपण अपंग दिन म्हणून साजरा करतो. अपंगांच्या पुनर्वसनाच्या संदर्भात मोठमोठया घोषणा करतो पण त्या घोषणांची अंमलबजावणी मात्र झाली नाही.

अंपग(दिव्यांग) बालक म्हणजे कोण?

सर्वसाधारण पणे सर्वसामान्य मुलांचा शारिरीक, मानसिक व भावनिक विकास त्याच्या वयाच्या इतर मुलाप्रमाणेच होतो. त्यांच्या शरिरीची सर्व ज्ञानेंद्रिये व कमेद्रिये योग्य रितीने विकसीत होतात. ज्ञान संपादनात वातवरणाशी समायोजन करण्यात हि मुले पुर्ण पणे कार्यशिल व यशस्वी होतात. त्याच्या शरिराच्या सर्व भागांचा विकास व वाढ निट होते. काही मुलांच्या या ज्ञानेद्रियेपैकी काही ज्ञानेद्रिये किंवा कमेद्रिये पैकी काही अवयव आपली जिव शास्त्रीय कार्य पार पाडण्यास असमर्थ असतात. अशा मुलांचा विकासाचा वेग मंद असतो. समजाच्या विकास प्रवाहात ती मागे पडतात त्यांना अपंग असे म्हणतात.

" दिव्यांग (अपंग) म्हणजे अपंगत्व असलेली व्यक्ती अपंगत्व म्हणजे शारीरिक दोषामुळे आलेले असे पंगुत्व ज्या मुळे दैनंदिन जीवनात अडथळे निर्माण होतात."

World Health Organization

As per World Health Organization "Disability is a umbrella term, covering impairments, activitiy limitation and participation restrictions, impairment is a problem in body function or structure; an activity limitation difficulty encountered by an individual in execution a task or action; while a participation restriction is a problem experience by an individual in involvement in life situations. Thus disability is a complex phenomenon, reflection an interaction between features of a persons body and features of the society in which he or she live".

महाराष्ट्र राज्य अपंग कल्याण कृती आराखडा 2011 च्या सर्वेक्षणानुसार –

भारत देशाच्या सन 2001 च्या सार्वजनिक जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्यामध्ये अपंग व्यक्तीची लोकसंख्या खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	अपंगत्वाचा प्रकार	अपंग व्यक्तीची लोकसंख्या		
		पुरूष	स्त्रिया	एकुण
1.	अंध	32066	260464	580930
2.	मुके	62802	49241	113043
3	बहिरे	51789	40601	92390
4	अस्थिव्यंग	374671	195274	569944
5	मतिमंद	123139	90135	213274
	एकुण	**933867**	**635715**	**1569582**

सन 2001 च्या जनगणनेनुसार देशामध्ये अपंगाच्या संख्या 2.19 कोटी असुन महाराष्ट्रामध्ये 15.6 लक्ष एवढी आहे. मात्र प्रत्यक्षामध्ये अपंगाची संख्या एकुण लोकसंख्योच्या 10 टक्के असावी असा जागतीक आरोग्य संघटनेचा दावा आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात अपंग व्यक्ती या देशात उपेक्षीताचे जीवन जगत आहे.

❖ पुनर्वसन

पुनर्वसन म्हणजे व्यक्तीचे समाजात पुन्हा एकदा आपले स्थान प्राप्त करणे, आपले अधिकार प्राप्त करणे समाजात सामावून जाणे, स्वतःच्या मर्यादांना स्विकारणे, व्यक्तीचे समायोजन होणे होय.

इच्छा व निर्धार याच्या सहाय्याने व्यक्तीने घेण्यापेक्षा देण्याच्या स्थितीत येणे म्हणजे पुनर्वसन होय.

National Council of Rehabilitationus 1955 मध्ये पुनर्वसनाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. "Rehabilitation is the readaptation of life by restoration to fullest possible, physical, social, mental, vocational and economic usefulness of which handicapped are capable"

अपंग व्यक्तीमध्ये शारीरीक दृष्ट्या, सामाजिक व मानसिक दृष्ट्या व्यावसायीक व आर्थिकदृष्ट्या जास्तीत जास्त उपयोगी होण्याची जी क्षमता असते तिचा उपयोग करुन अपंगाचे पुन्हा स्थापना होणे, आणि जास्तीत जास्त उपयोगी होणे क्षमता जास्तीत जास्त प्रमाणात परत मिळणे व त्यामुळे जिवनाशी जुळवुन घेता येणे म्हणजेच पुनर्वसन होय

पुनर्वसन अपंगास समाजोपयोगी बनवते. कारण मानव संपत्तीचा नाश होणे कोणत्याही समाजाला परवडणारे नाही. पुनर्वसन ही मदत सेवा आहे. शक्य तितका जास्तीत जास्त विकास होण्यासाठी ही मदत दिली जाते.

अपंगांना स्वःपायावर जीवन जगता येण्याच्या दृष्टीने त्यांचे पुनर्वसन होणे अपेक्षित आहे. अपंगत्वाबाबत काही समज गैरसमज आहे. त्यामुळे समाजासोबत कुटुंबही त्यांना स्विकारत नाही.अशा वेळी त्यांना मानसिक आधार देवून त्यांना सन्मानाने जिवन जगता येणाची व्यवस्था करणे गरजेचे आहे. पुनर्वसन कार्याचे हे महत्वाचे तत्व आहे. या दृष्टीने विचार करतांना पुनर्वसन प्रक्रिया खालील तत्व प्रकारावर आधारीत आहे.

- शारीरीक पुनर्वसन
- मानसिक पुनर्वसन
- आर्थिक पुनर्वसन
- सामाजिक पुनर्वसन
- व्यावसायीक पुनर्वसन
- समुहाधारीत पुनर्वसन

असे विविध भाग पडतात. या उद्देशाने अपंगाना अनेक सेवा पुरविल्या जातात.

पुनर्वसनाची प्रक्रिया :–

पुनर्वसनाची प्रक्रिया ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. पहिल्या टप्प्यामध्ये अपंग व्यक्ती आपले अपंगत्वाचा प्रकार आणि परिणामाला पूर्णपणे समजुन घेतो. दुसऱ्या टप्प्यामध्ये तो आपल्या अपंगत्वाच्या प्रकारानुसार स्वतःला सक्षम बनवितो. यामध्ये तो आपल्यातील कमतरतेला आपल्या सक्षम बाजुवर प्रभावित होवू देत नाही.

1982 हे वर्ष जागतिक अपंग वर्ष म्हणून सर्वत्र साजरे केले गेले. या वर्षापासूनच अपंगाच्या विविध प्रश्नांवर जागतिक आणि राष्ट्रीय पातळीवर अनेक योजना कार्यन्वित झाल्या. दूरदर्शन, आकाशवाणी, वृत्तपत्रे, नियतकालिके, चर्चासत्रे परिसंवाद शिबिरे यांसारख्या विविध माध्यमांतून समाज प्रबोधन फार मोइयाप्रमाणातझाले हे नाकारता येणार नाही, प्रबोधनाचीही लाट पुढील वीस वर्षे (2001) चालू ठेवण्याचा निर्णय या क्षेत्रात काम करणाऱ्या आंतरराष्ट्रीय संघटनीली घेतला. भारत या चळवळीत सहभागी असल्याने अपंगांच्या पुनर्वसनाच्या अनेक योजना आखल्या गेल्या. त्यातील "भारतीय पुनर्वसन परिषद" 1992 आणि अपंग व्यक्ती (समान संधी, हक्क संरक्षण, संपूर्ण सहभाग) 1995 हयादोन कायद्यांच्या निर्मितीमुळे भारतातील अपंग पुनर्वसन चळवळीला वेगळेच वळण मिळाले.

विषयाचे महत्व :–

समाजात विविध समस्या असतात त्या समस्याच्या सोडवणुकीच्या व्यवसायिक गरजांतुन संशोधन केले जोते 21व्या शतकात सामाजिक न्याय, सामाजिक समता याचा विचार प्रगल्भ असला तरी समाजातील दुर्बल घटक म्हणून अपंगाकडे पाहण्याचा दृष्टीकाण दृयम प्रतिचा आहे.

अंपग बालकाच्या विकासाप्रती समाजाचा दृष्टीकोण हा करूणा, उपकार या स्वरूपाचा असुन कुटूंब देखील त्याच्याकडे या दृष्टीने पाहते. यशा स्थितीत अपंग बालकाचे समायोजन व पुनर्वसन या समस्येची तिव्रता जाणवते. या अपंग बालकांचा कियात्मक विकास होणे आवश्यक आहे. समाजाचा नकारात्मक दृष्टीकोणामुळे त्यांच्यावर अमर्थपणाचा ठपका ठेवला जातो. या सर्व कारणामुळे समाजामध्ये असलेल्या अपंग बालकाप्रती पालकांचा नकारत्मक दृष्टीकोण बदलविणे आवश्यक आहे. समाजातील या दुरलक्षीत अपंग बालकांच्या जिवनातील अंधकार दुर करणे आवश्यक आहे. अपंग बालकाकडे समाज ज्या दृष्टिने पाहतो तोच माहीसा दृष्टीकोण काहीसा पालकांचा बनतो. यशा स्थितीत त्यांचे पनर्वसन कसे होणार, अंपग बालकांचे पुढील जिवन समर्थपुर्ण स्वावलंबी बनविण्याकरीता पालकांची भुमीका महत्वाची ठरते. या दृष्टीने सदर विषयाचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

अध्ययनाचे उद्दिष्टे:–

संबंधित विषयाच्या अभ्यासाकरीता पुढील उद्दिष्टे निश्चीत करण्यात आली.

1. प्रस्तुत विषयाची पार्श्वभूमी समजुन घेणे.
2. अपंग बालकाच्या पुनर्वसनात येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे.
3. अपंग बालकाच्या पुनर्वसनात पालकाचा सहभाग व भुमिकेचा अभ्यास करणे.

अध्ययनाचे गृहितके:–

प्रस्तुत विषयाच्या दिशा निश्चीत करण्यासाठी पुढील गृहितके ठरविण्यात आली आहे.

1. अंपग बालकांच्या पुनर्वसनावर पालकांचा सकारात्मक दृष्टिकोन धनात्मक परिणाम करतो.
.2. पालकाची चांगली आर्थिक स्थिती अपंग बालकांच्या पुनर्वसनास प्रोत्साहीत करते.
3. अपंग बालकाचे पुनर्वसन पालकाची भुमिका सकारात्मक आहे.

❖ अध्ययनाचे क्षेत्र(Area of study)

प्रस्तुत विषयाचे अध्ययन क्षेत्र म्हणुन चंद्रपुर, गडचिरोली जिल्हा आहे. चद्रपुर, गडचिरोली जिल्हातील सामाजिक न्याय विभागा अंतर्गत येणाऱ्या 45 विशेष अंपग शाळा (मतिमंद, मुकबदीर, अंध, अस्थिव्यंग,शाळा/ कर्मशाळा) अध्ययन क्षेत्रामध्ये समावेश आहे.

अध्ययन विश्व(Universe of Study)

प्रस्तुत विषयाच्या अध्ययन विश्वामध्ये चद्रपुर, गडचिरोली जिल्हातील सामाजिक न्याय विभागा अंतर्गत येणाऱ्या 45 अपंग शाळेतील एकुण 2087 विद्यार्थ्यांचा समावेश असुन त्यातील 25 टक्के म्हणजे 250 अपंग बालकांच्या पालकांची नमुना निवड पध्दतीद्वारे एककांची निवड करण्यात आली.

नमुना निवड पध्दती(Sampling Method)

प्रस्तुत विषयाच्या अध्ययनाकरीता अपंग बालकाच्या पालकाचे निवड संभाव्यता नमुना निवड पध्दतीतील व्यवस्थाबध्द नमुना निवड पध्दतीचा वापर करुन नमुना म्हणून एककाची निवड करण्यात आली.

तथ्य संकलन पध्दती व साधने(Method & tools of the data collection)

प्रस्तुत अध्ययनाचे प्राथमिक तथ्य संकलनाकरीता मुलाखत अनुसुचीचा उपयोग करण्यात आला आहे.

अध्ययनाच्या दृष्टीने इतर महत्वपुर्ण माहिती संकलनाकरिता दुय्यम पध्दतीचा वापर करण्यात आला असुन विषया संदर्भात लिखीत साहित्य, अहवाल, मागील संशोधनाचा आढावा, सांख्यिकीय आकडेवारी, वर्तमानपत्रे, संगणकीय माहिती, प्रकाशित लेख, अपंग योजनाची माहिती, शासकिय तथ्य इत्यादीचा वापर दुय्यम तथ्य म्हणून उपयोग केलेला आहे.

माहीतीचे विश्लेषण :–

1) अपंग बालकाच्या पुर्नवसनावर कुटुंबातील वातावरणाचा परिणाम होतो याबाबत पालकांची सहमती दर्शविणारा तक्ता –

अ.क्र.	१)अपंग बालकाच्या पुनर्वसनावर कुटुंबातील वातावरणाचा परिणाम होतो याबाबत आपण सहमत आहात काय	वारंवारीता	शेकडा प्रमाण
1	पुर्णपणे सहमत	149	28.65
2	काही प्रामणात सहमत	307	59.04
3	सहमत नाही	64	12.31
	एकूण	520	100

वरील तक्तावरून स्पष्ट होते की, एकुण उत्तरदात्यापैकी 59.4% उत्तरदात्याच्या मते अपंग बालकांच्या पुनर्वसनावर कौटूंबिक वातावरणाचा काही प्रमाणात परिणाम होतो याबाबत सहमती दर्शविली आहे.

02) अपंग बालकास पालक सार्वजनिक कार्यक्रमात घेवून जाता काय हे दर्शविणारा तक्ता –

अ.क्र.	अपंग बालकास आपण सार्वजनिक कार्यक्रमात घेवून जाता काय	वरंवारीता	शेकडा प्रमाण
1	नेहमीच	124	23.85
2	कधी कधी	282	54.23
3	कधीच नाही	114	21.92
	एकूण	520	100

वरील तक्तावरून असे दिसु येते की, एकुण उत्तरदात्यापैकी 54.23% पालक अपंग बालकास कधी कधी सार्वजनिक कार्यक्रमात घेऊन जातात.

03) अपंग बालकामुळे आपल्या सामाजिक प्रतिष्ठेवर नकारात्मक प्रभाव पडतो याबाबत मत दर्शविणारा तक्ता –

अ.क्र.	विवरण	वारंवारीता	शेकडा प्रमाण
1	होय	109	20.96
2	नही	294	56.54
3	सांगता येत नाही	117	22.50
	एकूण	520	100

वरील तक्तावरून असे दिसुन येते की, एकुण उत्तरदात्यापैकी 56.54% उत्तरदात्यांच्या मते अपंग बालकामुळे त्याच्या सामाजिक प्रतिष्ठेवर नकारात्मक परिणाम पडत नाही.

04) चांगली आर्थिक स्थिती अपंग बालकाच्या पुनर्वसनास मदत करते याबाबत आपले मत दर्शविणारा तक्ता –

अ.क्र.	चांगली आर्थिक स्थिती अपंग बालकाच्या पुनर्वसनास मदत करते याबाबत आपले मत	वारंवारीता	शेकडा प्रमाण
1	अगदी बरोबर	103	19.81
2	अंशतः बरोबर	268	51.54
3	पुर्णतः चुक	84	16.15
4	अंशतः चुक	65	12.50
	एकूण	520	100

उपरोक्त सारणीवरून स्पष्ट होते की, 51.54% उत्तरदात्याच्या मते चांगली आर्थिक स्थिती अपंग बालकाच्या पुनर्वसनास अंशतः मदत करते.

05) अपंग बालकाच्या आर्थिक स्वावलंबनाकरीता पुनर्वसनाकरीता पालकाची प्रयत्न दर्शविणारा तक्ता –

अ.क्र.	विवरण	वारंवारीता	शेकडा प्रमाण
1	आर्थिक बचत करणे	336	64.62
2	स्वयंम व्यवसायाची उभारणी	48	09.23
3	शासकीय नोकरीकरीता प्रयत्न	62	11.93
4	व्यवसायीक प्रशिक्षण	21	04.04
5	कोणतेही नाही	53	10.19
	एकूण	520	100

प्रस्तुत तक्तापरून दिसुन येते की, अपंग बालकांच्या आर्थिक स्वावलंबनाकरीता सर्वाधिक म्हणजे 64.62% उत्तरदाते आर्थिक बचत करतात.

निष्कर्ष :–

प्रस्तुत अध्ययनावरून खालील निष्कर्ष मांडता येतात.

1)अपंग बालकांच्या पुनर्वसनावर कौटूंबिक वातावरणाचा काही प्रमाणात परिणाम होतो.

2) पालक अपंग बालकास आपल्या सोबत सार्वजनिक कार्यक्रमात घेऊन जात असले तरी त्याचे प्रमाण कमी आहे.

3)अपंग बालकामुळे पालकांच्या सामाजिक प्रतिष्ठेवर नकारात्मक परिणाम पडत नसले तरी याबाबत पुर्णतः सहमती अत्यल्प आहे.
4) पालकाची चांगली आर्थिक स्थिती अपंग बालकाच्या पुनर्वसनास अंशतः मदत करते.
5) अपंग बालकांच्या आर्थिक स्वावलंबनाकरीता पालक आर्थिक बचत करतात त्यासोबतच शासकीय नौकरी करीता प्रयत्न करतात.
6)अपंग बालकाप्रती कुटुंबाचा दृष्टीकोनात जरी सकारात्मक बदल होत असला तरी त्याची
गती मंद आहे.

सुचना/ शिफारशी –

अपंग बालकाचे पुनर्वसन योग्य दिशेने व गतीने होण्याकरिता पुढील सुचना/शिफारशी करता येतील.

1. ग्रामीण भागात विशेष शाळेत प्रवेश न झालेल्या अपंग बालकांच्या पालकांसाठी स्वतंत्र प्रशिक्षण कार्यक्रम राबवावे. त्यामुळे अपंग बालकाचे योग्य समायोजन व पुनर्वसन होण्यास मदत होईल.
2. अपंगाचे प्रशिक्षण आणि उदरनिर्वाहासाठी तसेच नौकरी व्यवस्थेकरीता मार्गदर्शन करतांना त्यांच्यातील अद्वितीय सामर्थ्य ओळखुन त्यावर रोजगार उभारणी करावी ज्यामुळे त्यांना आपल्यातील कमतरता ही एक शक्ती असल्याची जाणीव होवून आत्मसन्मान वाढीस मदत होईल.
3. शासनानी अपंग बालकांच्या पालकांसाठी कौटुंबिक सल्ला व मार्गदर्शन केंद्राच्या धरतीवर मोफत अपंग सल्ला व मार्गदर्शन केंद्र स्थापन करावे.
4. अपंग बालकाकरीता साहित्य व उपकरणे खरेदीकरीता लोकप्रतिनीधीचा निधी राखीव करावा यामुळे त्यांचे पुनर्वसन होण्यास मदत होईल.
5. अपंग बालकांना भावनिक पाठींबा म्हणून अपंग बालकास घरी येण्यासाठी निमंत्रण, इतर मुलात मिसळण्यासाठी प्रोत्साहन व जबाबदारीचे काम देवून त्यांचा आत्मविश्वास व आत्मसन्मान वाढविण्यसासाठी समाजाने मदत करावी. याकरीता शासनाने प्रोत्साहन द्यावे.
6. अपंगाकरीता असलेल्या योजनाची लोकजागृती करावी याकरीता समाजकार्याच्या सामाजिक क्रियापध्दतीचा अवलंब करावा.
7. अपंग बालकांना रोजगाराभिमुख करण्यासाठी प्रत्येक विशेष शाळेला अपंग कर्मशाळा सुरु करावी.
8. अपंग बालकांच्या पालकांनी अपंग बालकास सामान्य बालकाप्रमाणे सार्वजनिक कार्यक्रमामध्ये नियमित सहभागी करून घ्यावे यामुळे अपंग बालकांचा आत्मविश्वास वाढुन त्यांच्या सामाजिक पुनर्वसनास सहाय्यक ठरेल.
9. पालकांनी अपंग बालकांच्या आर्थिक स्वावलंबनाकरीता फक्त आर्थिक बचतीवर अवलंबुन न राहता बालकांन व्यवसायीक प्रशिक्षण देऊन स्वावलंबी करण्याच्या अनुषगाने प्रयत्न करावे.

संदर्भ ग्रंथ सुची –

1) डॉ. काळे प्रेमला – अपवादात्मक बालकाचे मानसशास्त्र (1990) मॅजेस्टीक प्रकाशन, मुंबई.
2) डॉ. भार्गव महेश – विशिष्ट बालक (1998) हर प्रसाद भार्गव, आगरा.
3) सौ. गणोरकर मिना – बालविकास आणि संबंधित क्षेत्र (1982) कॉन्टिनेस्टल प्रकाशन, पूणे.
4) मिश्र विनोदकुमार – विकलांगता समस्याएं व समाधान जगतराम ॲड सन्स, नयी दिल्ली.
5) प्रा. सौ. पाटे सुमन – भारतीय सामाजिक समस्या (1991) विद्या प्रकाशन, नागपूर.
6) विद्याराव/ हर्ष मंदर – जपणुक मानुसकीची–उपेक्षिताकरीता कार्यक्रम (1996) लाल बहादुर शास्त्री नॅशनल ऍकाडेमी ऑफ ॲडमिनिष्ट्रेशन मसुरी.
7) डॉ. सौ. नाकतोडे किरण – अध्यापन कर्त्याचा विकास व अध्यापन (2006) विद्या प्रकाशन, नागपूर.
8) समाज कल्याण विभाग – अपंगाचे शिक्षण, प्रशिक्षण आणि पुनर्वसन सुविधा महाराष्ट्र मंत्रालय मुंबई शासन निर्णय सारसंग्रह
9) हस्तपुस्तिका – अपंग समावेशित शिक्षण महाराष्ट्र प्राथ. शिक्षण परिषद मुंबई.
10) अपंग उद्योग केंद्र अपंग पुनर्वसन विषयक कायदे (1992/1995) प्रकाशक : अपंग उद्योग केंद्र

परेश अपार्टमेंटस पर्वती, पुणे
www.wikipidia.com
www.childlineindia.org.in
www.NCERTnic.in

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 4.374
UGC Approved Journal Sr. No.48455

ISSN No. 2394-8426
Mar – 2018
Issue–I, Volume–VII

महाराष्ट्रातील ऊस उत्पादन : एक भौगोलिक अभ्यास

प्रा. डॉ. व्ही. एन. लाखे
भुगोल विभाग प्रमुख
सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर

सारांश :

ऊस हे महाराष्ट्र पठारावरिल महत्वाचे नगदी पीक आहे ऊस हे उष्णकटिबंधीय झाड असुन लवकरात लवकर येणारे पीक आहे. महाराष्ट्र पठाराच्या पश्चिम व मध्यवर्ती भागात जेथे सिंचन सुविधा उपलब्ध आहेत तेथे ऊसाखालील क्षेत्रात लक्षणीय वाढ झाली आहे. ऊस उत्पादनामुळे व साखर कारखान्याच्या वाढीमुळे हा पट्टा आता साखर पट्टा म्हणून ओळखला जातो. (संदर्भ महाराष्ट्राचा भुगोल डॉ. सुभाषचंद्र सारंग) महाराष्ट्रात 1039000 हेक्टर क्षेत्र ऊस लागवडी खाली आहे. 2011–12 मध्ये ऊसाचे दर हेक्टरी उत्पादन 80.1 लाख हेक्टर झाले संपूर्ण देशात महाराष्ट्राचा ऊस लागवडीत दुसरा क्रमांक लागतो.

बीज शब्द : उष्णकटिबंधीय, साखरपट्टा

प्रस्तावना :

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेतीवर आधारित आहे. तांदुळ ज्वारी, बाजरी, तुर, मुंग सुर्यफुल तीळ कापुस व ऊस ही खरीप हंगामातील पीक आहेत ऊस या पिकाव्यतिरिक्त महाराष्ट्रातील पिकाची हेक्टरी उत्पादन क्षमता अत्यंत कती आहे. महाराष्ट्रातील ऊस पिकाच्या सुधारित जातीमध्ये को. 740 संजीवनी, संपदा या आहेत. देशाती 10 टक्के पेक्षा जास्त ऊस उत्पादन राज्यात होते महाराष्ट्रात सिंचित शेतीमध्ये ऊसाला महत्व आहे. ज्या भागात ऊसाचे पीक मोठया प्रमाणात घेतले जाते त्या भागात शैक्षणिक, औद्योगिक, सामाजीक व आर्थिक विकास दिसून येतो.

उद्देश :

- महाराष्ट्रातील ऊसाचे क्षेत्र व उत्पादन वर्ष निहाय पाहाणे.
- महाराष्ट्रातील ऊस लागवडीखालील क्षेत्राचे प्रादेशिक वितरण अभ्यासणे.
- जिल्हानिहाय ऊस उत्पादनातील बदल पाहणे.

अभ्यासक्षेत्र :

महाराष्ट्र हे ऐतिहासिक भौगोलिक व सामाजिक दृष्टया महत्वाचे क्षेत्र असुन भारताच्या एकुण क्षेत्रफळापैकी 9.36 टक्के भाग महाराष्ट्राने व्यापलेला आहे. महाराष्ट्राच्या पुर्व पश्चिम विस्ताराचा राज्याचा हवामानावर परिणाम झालेला दिसून येतो.

महाराष्ट्र राज्याच्या अक्षवृत्तीय विस्तार $15^0 44'$ उत्तर ते $22^0 6'$ उत्तर अक्षांश असुन रेखावृत्तीय विस्तार $72^0 46'$ पूर्व ते $80^0 54'$ पूर्व रेखांश आहे. राज्याचे क्षेत्रफळ 307762 चौ. कि. मी. असुन नद्यांच्या खो–यांच्या दृष्टीने हा भाग महत्वाचा असुन पठारावरील नद्या सिंचनाच्या दृष्टीने महत्वाच्या आहेत राज्याचे हवामान उष्ण असुन कोकणातील हवामान उष्ण व दमट आहे मराठवाडा व पश्चिम विदर्भात ते कोरडे आहे राज्याच्या एकुण क्षेत्रफळाच्या 25 ते 30 टक्के भाग मध्यम काळी व खोल सुपीक मृदेचा आहे.

अभ्यास पध्दती :

प्रस्तुत शोध निबंधासाठी माहितीचे संकलन सांख्यिकी विभागातील सामाजिक आर्थिक समालोचन महाराष्ट्र या संग्रहातुन घेतलेले आहे. सदर शोध निबंधासाठी घेतलेली आकडेवारी व्दितीय स्वरूपाची असुन ऊस वाढीचा दर, ऊस उत्पादकता याबद्दल माहितीचे विश्लेषण करण्यात आलेले आहे.

ऊस पीक लागवड व भौगोलिक परिस्थिती :

राज्यातील सुमारे 2.3 टक्के क्षेत्र ऊस लागवडी खाली आहे, देशातील ऊस क्षेत्राच्या सुमारे 15 टक्के क्षेत्र महाराष्ट्रात असुन 13 टक्के ते 14 टक्के ऊस उत्पादन राज्यात होते.

ऊस पिकाच्या वाढीसाठी सुमारे 10 ते 18 महिन्याचा कालावधी लागतो 20^0 ते 30^0 सेंटीग्रेट तापमान व 100 ते 150 सेमी पावसाची ऊसाला आवश्यकता असुन मध्यम मगदुराची सुपीक मृदा आवश्यक असते महाराष्ट्र पठाराचरिल लव्हापासुन बनलेली काळी मृदा उपयुक्त असुन नदी काठच्या मृदेमध्ये ऊसाचे उत्पादन फारमोठया प्रमाणावर होते या पिकाला सिंचनाची आवश्यकता असुन उसाच्या पिकाचे आडसाली पूर्व हंगामी आणि एक साली अथवा हंगामी असे तीन प्रमुख हंगाम आहेत.

ऊसाचे क्षेत्र व उत्पादन :

महराष्ट्रातील ऊसाचे क्षेत्र व उत्पादन पावसाचे प्रमाण, साखर कारखान्याचा गळित हंगामाचा कालावधी, ऊसाला मिळालेला दर, सिंचन सुविधा यावर अवलंबुन असते पुढील सारिणीमध्ये महाराष्ट्रातील ऊसाचे क्षेत्र व उत्पादन यांची आकडेवारी दिलेली आहे.

महाराष्ट्रातील ऊसाचे क्षेत्र व उत्पादन इ. सन 1960–61 ते 2001–2011

अ. क्र.	वर्ष	ऊस क्षेत्र 000' हेक्टरमध्ये	ऊस उत्पादन 000' टनामध्ये	उत्पादकता प्रति हेक्टर कि. ग्रॅ.
1.	1960–61	155	10404	66924
2.	1970–71	204	14433	86531
3.	1980–81	319	23706	91742
4.	1990–91	536	38154	86400
5.	1991–2001	687	49569	83267
6.	2001–2011	1041	85691	NA

आधार : कृषी आयुक्तालय महाराष्ट्र शासन





महाराष्ट्राच्या पठारी प्रदेशावर इ. सन 1960–61 मध्ये राज्यातील ऊसाखालील क्षेत्र सुमारे 155 लाख हेक्टर्स होते व उत्पादन 104 लाख मेट्रिक टन झाले त्यानंतर राज्यातील ऊसाखालील क्षेत्र व उत्पादन यामध्ये सातत्याने वाढ झाली ऊसाचे हेक्टरी उत्पादन इ. सन 161–61 मध्ये 66924 प्रति हे. कि. ग्रॅ होते तर 1991–2001 मध्ये 83267 प्रति हे. कि. ग्रॅ झाले.

महाराष्ट्र राज्यातील जिल्हानिहाय ऊस उत्पादन (टक्केवारीमध्ये)

जिल्हे		ऊसाचे वितरण टक्यां– मध्ये	जिल्हे		ऊसाचे वितरण टक्यांमध्ये
1.	हिंगोली	1.20	8.	सातारा	7.57
2.	जलना	1.71	9.	सांगली	8.51

3.	परभणी	2.01	10.	पूणे	12.54
4.	नाशिक	2.22	11.	अहमदनगर	13.40
5.	बीड	3.33	12.	कोल्हापूर	14.98
6.	लतुर	4.84	13.	सोलापूर	13.52
7.	उस्मानाबाद	4.92	14.	बाकी जिल्हे	4.25

महाराष्ट्र राज्यातील जिल्हानिहाय ऊस उत्पादन (टक्केवारीमध्ये)



वरील सारणीनुसार कमीत कमी ऊस उत्पादन घेणारे जिल्हे हिंगोली जालना परभणी असून यांची टक्केवारी 1 ते 3 टक्के पर्यंत दिसून येते द. पश्चिम महाराष्ट्राचा भाग 4 ते 8 टक्के पर्यंत ऊस उत्पादन म्हणजे मध्यम स्वरूपाचे असून 12 ते 15 टक्के पर्यंत उत्पादनात पूणे, अहमदनगर, कोल्हापूर, शोलापूरचा समावेश होतो. याचा फायदा साखर कारखान्यांचा सरासरी हंगाम, गळित हंगाम ऊस तोडणी कालावधी यासाठी होतांना दिसून येतो.

महाराष्ट्रातील प्रशासकिय विभागानुसार ऊस उत्पादन घेणारे जिल्हे :

ऊस पिकाचे विभाग निहाय उत्पादन पाहतांना पूणे विभाग अग्रेसर असुन राज्यातील सुमारे 56 टक्के ऊस उत्पादन होते यात सातारा, पूणे, सोलापूरचा समावेश असुन याला कारण उत्तर भागात कालवे व दक्षिण भागात विहिरी व उपसा सिंचनाचा विकास झालेला दिसुन येतो.

कोल्हापूर जिल्हयाचा ऊस उत्पादनात प्रथम कमांक लागतो या विभागात सांगली जिल्हयाचा समावेश होतो. वारणा, पंचगंगा, भोगावत्ती, दुधगंगा या नद्यांच्या खोऱ्यात धरणे व उपसा सिंचनाच्या विकासामुळे ऊस उत्पादन होते या जिल्हयात राज्यातील 17 टक्के ऊस क्षेत्र आहे.

अहमदनगर विभागात नाशिक जिल्हयाचा समावेश होतो. अहमदनगर जिल्हयात 14 टक्के ऊस क्षेत्र आहे. याव्यतिरिक्त खानदेशात तापी व तिच्या उपनद्यांच्या खोऱ्यांत ऊस उत्पादन होते.विदर्भात बुलढाणा, यवतमाळ, वाशिम, वर्धा, नागपूर भंडारा या जिल्हयाचा ऊस उत्पादनात समावेश होतो.

ऊस उत्पादनावर परिणाम करणारा घटक :–

जलसिंचन :

महाराष्ट्रामध्ये शेती हा प्रमुख व्यवसाय असुन शेती मोसमी पावसावर अवलंबुन आहे. मोसमी पाऊस अनिश्चित असल्यामुळे राज्यात जलसिंचन आवश्यक आहे. महाराष्ट्रातील सर्वाधिक सिंचन क्षमता पूणे विभागात असुन ऊस उत्पादन याच भागात अधिक आहे. 2017 मध्ये ऊसाखालील क्षेत्र 9.42 लाख पेक्षा जास्त असुन यापैकी 2.25 लाख हेक्टर क्षेत्रात टिंबक सिंचन योजना दिसून येते. सिंचन तीव्रतेत कोल्हापूर जिल्हयाचा राज्यात दुसरा कमांक लागतो.

खत :

महाराष्ट्रात नत्र, स्फुरद व पालाशयुक्त खताचा वापर केला जातो. महाराष्ट्राच्या ऊस उत्पादक पटटयात मात्र रासायनिक खंतांचा वापर वाढत आहे.

निष्कर्ष :

महाराष्ट्र राज्यातील ऊस उत्पादनाचा अभ्यास करतांना खालील तथ्य समोर आले.

- राज्यात ऊसलागवडी खाली 103लाख हेक्टर क्षेत्र दिसुन येते संपूर्णदेशात महाराष्ट्राचा ऊसलागवडीत दुसरा क्रमांकलागतो महाराष्ट्रात सिंचित शेतीत ऊसाला ठिंबकसिंचन योजनेअंतर्गत विशेषमहत्व दिसुन येते.
- वर्ष निहाय ऊस लागवडी खालील क्षेत्रात वाढ दिसुन यते.
- इ. सन 1960–61 मध्ये ऊस उत्पादन 104 लाख टन होते तर 2001–2011 मध्ये 856 लाख टन उत्पादन दिसुन येते.
- इ. सन 1970–71 पेक्षा 1991–2001 या वर्षी प्रति हेक्टर कि. ग्रॅ. उत्पादकता कमी दिसुन येते. याला कारण पावसाच्या अनियमितपणामुळे कधी–कधी दुष्काळग्रस्त स्थिती निर्माण होते याचा परिणाम ऊस उत्पादनावर दिसुन येतो.

उपाययोजना :

महाराष्ट्रातील कृषी व्यवसायात अनेक समस्या असुन महाराष्ट्राच्या जलसिंचित क्षेत्रात अनियोजित सिंचनामुळे कृषी क्षेत्रावर विपरित परिणाम दिसुन येतो.

ऊस हे बारामाही पीक आहे. त्यामुळे शेतात सतत पाणी राहते. मृदांच्या खालच्या थरांतील क्षार पृष्ठभागावर येतात क्षारांमुळे मृदेची उत्पादकता घटते. यासाठी तुषार सिंचन व ठिंबक सिंचन पध्दतीमुळे पाण्याची बचत करता येते. पीक संरचना वेगाने बदलत आहे. कोरडवाहू अन्नधान्य उत्पादनाचे क्षेत्र सिंचनामुळे ऊस उत्पादनाखाली येत आहे. काही क्षेत्र अवर्षन प्रवण आहे. म्हणुन राज्याच्या सिंचन क्षमतेचा योग्य प्रकारे वापर करणे आवश्यक आहे.

लघु व माध्यमपाटबंधारे प्रकल्पावर आठमाही पाणी पुरवठा तत्वाचा अवलंब केल्यास सिंचन क्षमता वाढेल अनेक ठिकाणी नियमित मृदा परिक्षण न करता खताची अधिक मात्रा दिली जाते म्हणुन मृदा परिक्षण करावे.

महाराष्ट्रातील दुष्काळ परिस्थितिमुळे ऊसाखालील क्षेत्राची जागा कडधान्या सारखे पीक घेत आहे. म्हणुन मराठवाडा क्षेत्रात Allied Industries LID (NSAI) सारख्या औद्योगिक संस्था काम करीत आहेत.

संदर्भ :

- www.mahaogi.gov.in
- www.chanda.nic.in
- सामाजिक आर्थिक समालोचन महाराष्ट्र शासन प्रा. सबदी ए. बी. महाराष्ट्राचा भुगोल पिंपळापुरे प्रकाशन नागपूर.
- डॉ. सारंग सुभाषचंद्र महाराष्ट्राचा भुगोल विद्या प्रकाशन रूईकर रोड, नागपूर.
- Singh Jasbir Agricultural Geography Tata McGraw-Hill Publishing Company limited new Delhi.

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 4.374
UGC Approved Journal Sr. No.48455
ISSN No. 2394-8426
Mar – 2018
Issue–I, Volume–VII

जागतिकीकरणाचा ग्रामीण समाजावर पडणारा प्रभाव

प्रा. डॉ. आर. बी. साठे
समाजशास्त्र विभाग प्रमुख
सरदार पटेल महाविद्यालय,चंद्रपूर

जागतिकीकरण, उदारीकरण हा ज्या आधुनिक सम्यतेचा अद्ययावत अविष्कार आहे ती आधुनिक पश्चिम सभ्यता हेच खरे तर आपल्या पुढील आव्हान आहे. ज्या प्रकारची जीवनरीती व समाजव्यवस्था माणसातल्या माणूसपणाच्या विकासासाठी बहरण्यासाठी उपकारक आहे त्यांची त्यांची निर्मिती करणे हे 'जागतिकीकरण' – 'उदारीकरण' चे मुळात उद्दिष्टच नाही. जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण या सर्व गोष्टींचा एकत्रित अर्थ उदारीकरण या शब्दात अलिकडे समावेशीत होतो म्हणून मुकुंद गोरे यांनी उदीकरण हाच शब्दप्रयोग जागतिकीकरणासाठी केला आहे. मुकुंद गोरे यांनी जागतिकरकाणाचे जे दुष्परिणाम होणार आहेत व होत आहेत हे लक्षात घेवून उपरोधिकपणे म्हटले आहे की, जागतिकीकरणाच्या अनेक पश्चिमात्य व्याख्या प्रचलित असल्या तरी प्रत्यक्ष अनुभवातून भारतीयासंमोर आलेली त्या प्रक्रियेची व्याख्या वेगळीच आहे. ती अशी की जागतिकीकरण म्हणजे वाढती बेकारी आणि गरिबी, वाढते प्रदुषण, वाढती महागाई, वाढती गुन्हेगारी, संपत्तीचे वाढते केंन्द्रीकरण आणि वाढते दारिद्रय, वाढती असुरक्षितता, वाढते शहरीकरण, वाढता आतंकवाद, वाढती विषमता, वाढता संघर्ष!अशा जागतिकीकरणाचा सर्वत्र सर्वकष विरोध करायलाच हवा.

वैश्विकरण – जागतिकीकरण याची नेमकी व्याख्या किंवा अधिकृत व्याख्या, सर्वसामान्य स्पष्टीकरण अजुनपर्यंत तरी उपलब्ध नाही. जागतिकीकरण या विषयावर साहित्य मात्र पुष्कळ उपलब्ध आहे. तरी काही व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत–

ओहमे यांच्या मते, ''भिन्न देशांच्या व्यापारात असलेल्या सीमा व प्रतिबंध यांचा अभाव म्हणजे जागतिकीकरण होय''

श्री.डिफन महोदय म्हणतात, ''आंतरराष्ट्रीय उत्पादन व व्यापार यांच्या परंपरागत आकृतिबंधनात आमूलाग्र बदल होय.''

रिन्हेसीन म्हणतात, '' जागतिकीकरणात काळ, अंतर, कार्यपध्दती, चालीरीती, श्रध्दा आणि मान्यमा व गृहितके यांच्या परंपरागत सर्व सीमा तोडण्याची शक्ती आहे.''

श्री. पार्कच्या मते, '' काळ, अंतर आणि राष्ट्र इत्यादींच्या परंपरागत सीमा ओलांडण्याची, तोडण्याची वाढलेली शक्ती म्हणजे जागतिकीकरण होय.

जागतिकीकरणाचा ग्रामीणसमाजावर पडणारा प्रभाव :

बेरोजगारी वाढेल

वाढती गरिबी व वाढती बेकारी हा जागतिकीकरणाचा परिणाम केवळ भारतात किंवा विकसनशील देशातच भासमान होतो असे नाही तर श्रीमंत देशांची स्थितीदेखील हेच सांगते. 1990 नंतर व विशेषतः विश्वव्यापार संघटनेच्या मदतीने आपल्या देशातील बेकरी श्रीमंत राष्ट्रांनी

गरीब राष्ट्रांमध्ये ढकलण्याचे शर्थीचे प्रयत्न चालविले आहेत. त्यामुळे त्यांच्या देशातील बेकारीचे प्रमाण अंशतः कमी झाले. परंतु रोजगार ज्यांना उपलब्ध आहे त्यांचे जीवनमान मात्र बरेच घसरले. रोजगारीची गुणवत्ता खालावली असे होवूनही बेकारी खूप कमी झाली असे दिसत नाही. जे विकसनशील देश आहेत त्या देशामध्ये बेकारी तर बेसुमार वाढत आहेतच. परंतु ती अधिक गतीने वाढणार आहे. उदारीकरणाची दशकपूर्ति बेकारीत वाढ होत राहणार हे स्पष्ट करीत आहे.

वाढती गरिबी :

बेकारीत जशी वाढ होते तशीच गरिबीत देखील वाढ होत जाते. भारतासारख्या देशात एकवेळेचे जेवण न मिळणे म्हणजे गरिबी तर अमेरीका वगैरे देशात देशाच्या सरासरी दरडोई उत्पन्नाच्या 50 टक्क्याहून ज्यांना कमी उत्पन्न मिळते त्यांना गरीब म्हणतात. ज्याला राहायला घरे नाहीत अशी माणसे श्रीमंत देशात वाढु लागलेली आहेत. न्यूयार्कसारख्या शहरात ज्यांना घरे नाहीत त्यामुळे सार्वजनिक निवासात राहावे लागते अशांची संख्या 3 टक्के आहे. न्यूयार्क हे एक कोटी बास्ट लाख लोकसंख्येचे शहर तेव्हा 3 टक्के म्हणजे 5 लाख लोक बेघर आहेत. लंडनमध्ये बर्फपडतो तेथे 4 लाख लोकांना व पॅरिस शहरात दहा हजार लोकांना घर नाही म्हणून त्यांनी सार्वजनिक निवासाचा आश्रय घेतलेला आहे. मुंबई कराची व ढाका या शहरामध्ये लोक फूटपाथवर राहत असतात. सर्व जगातच गरिबी प्रचंड वाढू लागलेली आहे. थोडक्यात, जागतिकीकरण म्हणजे वाढती बेकारी व वाढती गरिबी होय.

निसर्गाचाऱ्हास व वाढते प्रदूषण :

आज रोज प्रत्ययास येणारी अशी जर कोणती गोष्ट असेल तर ती म्हणजे वाढणारे प्रदूषण जगात अनेक पर्यावरण वादी आज जागतिकीकरणाच्या विरोधात, जी–7 च्या विरोधात आंदोलने दिसतात. अमेरीका 27 टक्के प्रदूषण करीत आहे.

पुण्या–मुंबईच्याच नव्हे तर कोणत्याही मोठया शहरात अडणारी वाहतूक आणि अनेकांना सुरू झालेले फुफ्फुसाचे रोग व श्वसोच्छ्वासाचे विकार व नाकाला बांधलेली फडकी आता नित्य दिसू लागली आहेत. ओझोन संपू लागल्याने पृथ्वीचे अस्तित्व धोक्यात आलेले आहे. पाण्यात निरनिराळी रसायने सोडण्यात आल्यामुळे नद्या–नाले किती प्रदूषित होत आहेत हे सर्वांना दिसत आहे. निरनिराळया खतांच्या वापरामुळे जमिनी नापिक होत आहेत, हेही उघड आहे. जंगलतोड तर मोठया प्रमाणात होत आहे. रस्तारूंदी व महामार्ग निर्मिती करतांना निसर्गाचे किती वेगाने शोषण होत आहे हे दिसतेच.

आरोग्याचा –हास :

10 ऑक्टोंबर 2001 च्या टाईम्स ऑफ इंडियात आलेले वृत्त सांगते की 2000 साली जगात विस लाख लोक क्षयाने (टीबीने) मेले. जागतिक बॅक व विश्व आरोग्य संघटनेने (WHOने) प्रकाशित केलेल्या निवेदनानुसार क्षयाच्या फैलावाने जगात धोक्याची पातळी ओलांडलेली आहे. भारतात प्रत्येक मिनिटाला एक माणूस क्षयाने मरतो आहे. जागतिकीकरण

सुरू झाले आणि 1979–80 मध्ये एच.आय.व्ही. एडस ची लागण सुरू झाली. HIV/AIDS हा शब्द तत्पूर्वी माहित नव्हता. नंतरच्या 18 वर्षात 1 कोटी 20 लाख लोक या रोगास पळी पडले. ज्यांना या रोगाची लागण झाली होती असे 1996 मध्ये जगात 2 कोटी 23 लाख लोक होते. आता दर दिवशी 16,000 लोकांना या रोगाची लागण होत आहे. पैकी 90 टक्के विकसनशील देशातील असतात. त्यात 40 टक्के महिला व त्यापैकी 50 टक्के या केवळ 15 ते 24 वयोगटातील असतात.

वाढती गुन्हेगारी

श्रीमंत देशातील 14 वर्षाखालील 8 टक्के मुले ही गरिबीत दिवस कंठणारी आहेत. बाल गुन्हेगारीचे प्रमाण जगभर वाढू लागले आहे. त्यात अनाथ किंवा अर्धअनाथ मुलांची टक्केवारी अधिक असते. अमेरिकेत 1992 मध्ये 7,000 लहान मुले पिस्तुलाच्या गोळीस बळी पडली म्हणजेच सरासरी रोज 20 मुले मेली. अमेरिकेतील शाळकरी मुले शाळेत येतांना कंपासमधून पिस्तुले का आणतात याची चौकशी करण्यासाठी आयोग नेमावा लागला. टी.व्ही. व चित्रपट याचा अति गंभीर परिणाम लहान मुलांच्या मनावर होतो व भिन्न–भिन्न वाहिन्या या जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण यामुळेच असे कुसंस्कार जगभर व भारतात देखील विस्तारीत हो आहेत. ही एक अत्यंत चिंताजनक बाब आहे. भारतात या चित्रपटांनी व टी. व्ही. वरील कार्यक्रमांनी होणा–या घटना याचे उदाहरण आहे. याचे प्रमाण थांबण्याऐवजी वाढण्याकडेच सध्यातरी कल दिसतो आहे.

वाढती विषमता :

जगतिकीकरणाने जगात संपत्तीचे केन्द्रीकरण होत आहे व दुस–या बाजूस अतिवेगाने गरिबी वाढत आहे. जगातील 210 कोटी लोकांच्या वार्षिक उत्पन्नइतकी मालमत्ता केवळ 358 व्यक्तीकडे केन्द्रीभूत झाली आहे. ही आकडेवारी 2000 च्या अहवालात आणखी चिंताजनक झालेली आहे. केवळ 200 व्यक्तींकडे 270 कोटी जनतेच्या वार्षिक उत्पन्नाएवढी मालमत्ता झालेली आहे. दुस–या बाजूला 170 कोटी लोकांना पिण्याचे शुध्द पाणी मिळत नाही तर 120 कोटी लोकांना दिवसात एक वेळा जेवायला मिळत नाही. जगात सरासरी अन्नधान्य निर्मिती जी होत आहे ती सर्वच्या सर्व लोकसंख्येस पुरून उरेल इतकी आहे. प्रतिवर्षी भारतातील अन्नसाठा वाढतो आहे आणि एका बाजूला भूकबळी पडत आहेत. ही उदारीकरणाची निर्मिती आहे. संपत्तीचे केंद्रीकरण व वाढणारे दारिद्रय हे उदारीकरणाचे दृश्य रूप आहे.

वाढते शहरीकरण

सर्वच जगात शहरीकरण वाढत आहे. जे देश औद्योगिक दृष्टया प्रगत आहेत व पूर्वीच ज्या देशांचे शहरीकरण झाले आहे त्यांच्या विचार न करता नव्या विकास नीतीचाच म्हणजे उदारीकरण इत्यादींचा स्विकार करून जे देश विकासासाठी धडपडत आहेत अशा विकसनशील देशातील शहरीकरण वाढत आहे. सर्व विकसनशील देशात शहरीकरणाने गती घेतलेली आहे व ती वेगाने वाढत आहे. महानगरांची संख्या गेल्या चाळीस वर्षात 460 टक्यांनी वाढली आहे.

लहान शहरे मोठी होवू लागली आहेत आणि वाहनांची संख्या 40 ते 50 वर्षात 35 ते 40 पट वाढलेली आहे. त्याचा अनुभव आपण घेतोच परिणामतः वाहनांची कोंडी, प्रदूषण, झोपडपट्यांची वाढ, अपघातात वाढ याचे प्रमाण देखील वाढते आहे. ही अति गंभीर चित्रे उभी करणारी बाब आहे. 2010 मध्ये यापेक्षाची भयावह स्थिती राहिल.

वाढता आतंकवाद :

11 सप्टेंबर 2001 रोजी पेंटॅगॉन व वर्ल्ड सेंन्टरवर झालेल्या हल्ल्यामुळे संपूर्ण जगालाच आंतकवादाचे अक्राळ–विक्राळ रूप दृग्गोचर झाले. परंतु 1975 ते 1999 या कालखंडात पाचशेहून अधिक आतंकवादी हमले झाले बॉम्बस्फोट ही नित्याची बाब झाली आहे. भर रस्त्यावर गोळया घालून ठार मारणे, बसेस पळवून प्रवाशांना वेठीस धरणे, गोळ्या घालून मारणे, सुरूंग लावणे याचे प्रमाण वाढतच आहे. 80 च्या दशकाची 90 च्या दशकाची तुलना इटली व पोर्तुगालमध्ये ही संख्या दुप्पट झाली तर जर्मनीत तिप्पट झाली. जपानमध्ये नशेच्या पदार्थाचे सेवन करणा–यांची संख्या दुप्पट झाली तर जर्मनीत तिप्पट झाली. जपानमध्ये नशेच्या पदार्थाचे सेवन करणा–यांची संख्या 1980 च्या दशकाशी तुलना करता 90 च्या दशकात तीसपट वाढली. अमेरिकेत नशिल्या पदार्थांच्या सेवनावर होणारा खर्च 80 गरीब देशाच्या एकूण वार्षिक उत्पन्नाएवढा आहे. सर्व जगाचे शोषण करण्याची राक्षसी मनोवृत्ती वाढत आहे. यातून अत्यंत विषमता वाढत आहे. ज्या काही घटना आहेत त्यावरून गरीब देशांची फार मोठी पिळवणूक आगामी काळात होणार आहे असे दिसते.

स्तत चालू असलेला श्रीलंका, एल. टी. ई. चा संघर्ष, रशिया–चेचन्या संघर्ष, काश्मीर संघर्ष, बोसनिया संघर्ष, पॅलेस्टिनी संघर्ष, या सर्वांवर कडी करणारी तालीबान–अमेरिका हा भयावह संघर्ष आज मोठ्या प्रमाणावर जगभर गाजतो आहे. मोठ्या प्रमाणावर काळयापैशाचे थैमान, तस्करी व नशिल्या पदार्थाचे सेवन व व्यापार यातून आतंकवादासाठी पैसा पुरविला जातो आहे.

शेतक–यांच्या विरोधी धोरण :

जागतिकीकरणामुळे शेतकरी वर्गाची फार मोठी हानी होणार आहे. विलास पाटील यांचे मते, ''आज शेतक-यांसाठी शेतीसाठी जागतिकीकरणाच्या नावाखाली संकटमालिका निर्माण केली जात आहे. यातून एडवर्ड गोल्डस्मिथ यांनी म्हटल्याप्रमाणे शेतकरी देशोधडीला लागल्याशिवाय दुसरे काही साध्य होणार नाही आणि खरोखरच असे घडणार असेल तर त्याची भरताला फार मोठी किंमत मोजावी लागेल. कदाचित देश उद्ध्वस्तही होवू शकेल. तेव्हा आजवरच्या अनुभवावरून काही धडे घेवून आता हे रोखण्याचा प्रयत्न व्हायलस हवा.'' दोन–तीन एकर शेती असलेले भारतातले शेतकरी जागतिकीकरणाच्या झंझावाला कसे तोंड देणार? ते जगूच शकणार नाहीत. शेतकरी जर असे देशोधडीला लागले तर त्यांच्यावर अवलंबून असणारे छोटे व्यावसायिकही आपल्या धंद्यातुन उखडले जातील याचा अर्थ 60 ते 70 कोटी लोक जीवनातून उडविले जातील. 70 कोटी लोकांना देशोधडीला लावण्याचा परिणाम काय हाईल याची सहजच कल्पना करता येवू शकते. जगाच्या इतिहासात असे कुणीही केलेले नसेल. परंतु

भारताच्या जागतिकीकरणाची जी अपरिहार्य परिणती असेल, त्याने भारत उद्ध्वस्त होईल. जाज आपली वाटचाल त्याच दिशेने आहे. मुक्त धोरणाचा स्वीकार केल्यापासून आजपर्यंतच्या भारतावर एक नजर टाकली तर देश प्रगतीपथाकडे जाण्याऐवजी अधिकाधिक अधागतीकडे निघाला आहे. विशेषकरून भारतीय कृषी व्यवस्थेवर या धोरणाचा अत्यंत प्रतिकूल परिणाम झालेला जाणवत आहे. सुरवातीच्या काळात जागतिकीकरणाचे, गॅटमध्ये सामिल होण्याचे जे फायदे सांगितले जात होते नेमके त्याच्या उलट परिस्थिती आज निर्माण झाली आहे. भारतीय शेतकरी या जागतिकीकरणाच्या माऱ्यामुळे गांगरून गेला आहे.

सारांश :–

खुल्या धोरणाचा भारतातील सर्वच शेतकऱ्यांना फटका बसत आहे. केवळ फटकाच बसतो आहे असे नाही तर त्यामुळे अनेक शेतकरी आणि शेतीची संबंधित व्यावसायिकांनी आत्महत्या केल्या आहेत. स्वातंत्र्याच्या 50 वर्षात कधी नव्हे ती आत्महत्या करण्याची वेळ शेतकऱ्यांवर यावी यासारखे दुर्देच ते कोणते असू शकते? अर्थात हा सारा प्रताप जागतिकीकरण किंवा उदारीकरणची सध्याची प्रक्रिया म्हणजे बहुराष्ट्रीय कंपन्यांनी आपले नफे वाढविण्यासाठी जगाची अर्थव्यवस्था बदलण्याचा, तिची पुनर्रचना करण्याचा चालवलेला एक कुटिल प्रयत्न आहे हे आता स्पष्ट झालेले आहे.

इतर वस्तू बरोबरच शेती मालाच्या खुले. करण्याचा एकूण शेतीवर अत्यंत प्रतिकूल परिणाम झाला जो भारतीय शेतकऱ्यांना नष्ट करणारा ठरू शकतो. भारताची बाजारपेठ खुली केल्याने मूळभरांना फायदा कमावता येईलही पण कोट्यावधीचे त्यात नुकसान आहे. पेटंट पध्दतीने शेतकरी परावलंबी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

संदर्भ ग्रंथ :–

1. जागतिकीकरण समस्या, आशय आणि अनूभव, सी. पी. खरे दिलीपराज प्रकाशन पूणे, मार्च 2002.
2. जागतिकीकरण परिणाम आणि पर्याय, गजानन खातू, अक्षर प्रकाशन मूंबई, 2001.
3. जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने, प्रा गजानन क-हाडे, डायमंड पब्लिकेशन सदाशिव पेठ पूणे, 14 जाने 2008.
4. जागतिकीकरण शाप नव्हे वरदान, डॉ. मुकूंद गायकवाड कॉन्टिबेटल प्रकाशन पूणे,2001.
5. वनराई 2006, जागतिकीकरण आणि शेती विशेशांक, पूणे

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 4.374
UGC Approved Journal Sr. No.48455

ISSN No. 2394-8426
Mar – 2018
Issue–I, Volume–VII

महाराष्ट्रातील आदिवासी विकास कार्यक्रम

श्री. मनोज के. सरोदे,
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
आर्टस कॉलेज, सिहोरा,
ता. तुमसर, जि. भंडारा.
manojsarode76@gmail.com

प्रस्तावना :

भारतीय संविधानाच्या मार्गदर्शक तत्वानुसार राज्यातील दुर्बल घटक विशेषत: अनुसूचित जाती व जमातीच्या लोकांच्या शैक्षणिक व आर्थीक हितसंबंध जपण्यासाठी विशेष काळजी घ्यावी आणि त्यांचे सामाजिक अन्याय व इतर पिळवणुकींपासून संरक्षण करण्याची जबाबदारी राज्य शासनावर टाकण्यात आली आहे. भारतीय संविधानातील या मार्गदर्शक तत्वास अनुसरुन पंचवार्षिक योजनामध्ये मागासवर्गीयांच्या शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक सुधारणांच्या कार्यक्रमावर भर देण्यात आला आहे. त्यानुसार आदिवासी विकास विभाग विकास योजना राबवित आहे.

क्षेत्र व लोकसंख्या :

महाराष्ट्राचे भौगोलिक क्षेत्र ३,०७,७१३ चौ. कि. मी. एवढे असून त्यापैकी ५०,७५७ चौ. कि. मी. क्षेत्र आदिवासी उपयोजनेखाली येते. याचे प्रमाण १६.५ टक्के एवढे होते. गेल्या तीन दशकांतील राज्याची लोकसंख्या व आदिवासी लोकसंख्या यांची तुलनात्मक आकडेवारी खाली देण्यात आली आहे.

जनगणना वर्ष	राज्याची एकूण लोकसंख्या (लाखांत)	आदिवासी लोकसंख्या (लाखांत)	टक्केवारी
१९७१	५०४.१२	३८.४१	७.६२
१९८१	६२७.८४	५७.७२	९.१९
१९९१	७८९.३७	७३.१८	९.२७
२००१	९६८.७९	८५.७७	८.८५
२०११	११२३.७४	१०५.१०	९.३५

१९८१–१९९१ या दशकातील राज्याची एकूण लोकसंख्या व आदिवासी लोकसंख्या यांची तुलना केल्यास असे दिसून येते की, आदिवासी लोसंख्येच्या वाढीची ही टक्केवारी कमी अधिक प्रमाणात सातत्याने ९.०० ते ९.२० टक्के एवढी राहिलेली आहे. तथापि,२००१ च्या जनगणनेनुसार प्रथमच ९.०० टक्केपेक्षा आदिवासी लोकसंख्या कमी झाल्याचे दिसून येते. महाराष्ट्रात भिल्ल, गोंड, महादेव कोळी, पावरा, ठाकूर, वारली या प्रमुख आदिवासी जमाती आहेत. कोलाम (यवतमाळ जिल्हा), कातकरी, (मुख्यत: रायगड व ठाणे जिल्हा) आणि माडिया गोंड (गडचिरोली जिल्हा) या केंद्र शासनाने आदिम जमाती म्हणून अधिसूचित केलेल्या अशा तीन जमाती आहेत. राज्यात एकूण ३६ जिल्हे आहेत आणि आदिवासींची संख्या मोठया प्रमाणात धुळे, नंदूरबार, जळगांव, नाशिक व ठाणे (सहयाद्री प्रदेश) चंद्रपूर, गडचिरोली, भडारा, गोंदिया, नागपूर, अमरावती व यवतमाळ (गोंडवन प्रदेश) या पूर्वेकडील वनाच्छादित जिल्हयांमध्ये मुख्यत: अधिक आहे)

२००१ च्या जनगणेनुसार राज्यातील आदिवासीपैकी एकूण समारे ४९ टक्के आदिवासी आयएडीपी, माडा आणि मिनीमाडा क्षेत्रात राहतात व उर्वरित ५१ टक्के आदिवासी या क्षेत्राबाहेर राहतात.

आदिवासी उपाययोजना तयार करण्याची पध्दती :

१९७५–७६ या वर्षी भारत सरकारने निर्देश दिल्याप्रमाणे ज्या गावातील आदिवासी संख्या एकूण लोकसंख्येच्या ५० टक्याहून अधिक असेल त्या गावाचा समावेश एकात्मिक आदिवासी प्रकल्पामध्ये (आयटीडीपी) करण्यात आला. भारत सरकारने मान्यता दिलले अशाप्रकारे १६ प्रकल्प आहे नंतर ज्या गावामधील आदिवासींची लोकसंख्या ५० टक्यापेक्षा

किंचीतशी कमी होती. त्या गावाचा समावेशही अशा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प क्षेत्रामध्ये करण्यात आला आणि अशी क्षेत्रे अतिरिक्त आदिवासी उपाययोजना(एटीएसपी गट प्रकल्प) म्हणून ओळखण्यात येऊ लागली. राज्य शासनाची मान्यता मिळालेली अशी ४ अतिरिक्त आदिवासींची संख्या लक्षात घेऊन आणि त्या ठिकाणी चालविण्यात येणाऱ्या शैक्षणिक सस्थांचा विचार करुन मुंबई, औरंगाबाद आणि अकोला यासाठीही प्रकल्प मंजूर करण्यात आला. तसेच जव्हारा–मोखाडा भागातील आदिवासींची मृत्यूची संख्या लक्षात घेऊन आरोग्य पोषण आणि सेवायोजना याकडे बारकाईने लक्ष देण्याच्या गरजेचा विचार करुन ठाणे जिल्हयातील आदिवासी क्षेत्राची २ प्रकल्पाऐवजी ३ प्रकल्पामध्ये विभागणी करण्यात आली. आदिवासी क्षेत्रातील योजनाचा तेथील आदिवासींना प्रत्यक्ष लाभ्ज्ञ उपलबध करुन देण्यापेक्षा केवळ सांख्यकीय आकडेवारीवरच भर देण्यात येत असे. त्यामुळे आदिवासी उपाय योजना ही राज्य योजनेचा केवळ एक घटक असण्याची भावना निर्माण झाली. परिणामत: आदिवासी क्षेत्रातील कामामध्ये पुरेशा प्रमाणात गुंतवणूक करण्यात आलेली नाही.

आदिवासी उपाययोजनेमध्ये त्रुटी लक्षात घेता राज्यशासनाने सदर बाब राज्य नियोजन मंउळापुढे मांडली या बाबींचा अभ्यास करण्याकरीता श्री. द. म. सुकथनकर यांच्या अध्यक्षतेखाली जानेवारी १९९१ मध्ये राज्य नियोजन मंउळाने एक उपसमिती नियुक्त केली या उपसमितीने १९९२ मध्ये सादर केलेल्या शिफारशी राज्य शासनाने स्विकारला या शिफारशीपैकी एका शिफारशी नुसार नियोजन विभाग आदिवासी विकास विभागाला नियतव्यय उपलब्ध करुन देतो. यापैकी ६०% नितव्यय जिल्हा योजनासाठी जिल्हा नियोजन समितीला व उर्वरित ४०% आदिवासी लोकांच्या गरजा विचारात घेऊन मागासवर्गीय कल्याण व इतर संबंधित विभागात उपलबध करुन देतो याचा ५ वर्षाचा नियतव्यय पुढील प्रमाणे दिला आहे.

वर्ष	राज्य योजना नियतव्यय	बजेटेबल नियतव्यय	बजेटेबल नियतव्ययाची टक्केवारी	आ. उ. योजनेचा नियतव्यय	टादिवासी उपयोजनेच्या नियतव्याची टक्केवारी	खर्च
१९९३–९४	३८०४.००	३२८४.४४	८६.३४	२६५	८.०७	२६६
१९९८–९९	११६००.७३	६४००.००	५५.१७	५६१	८.७७	५२०
२००३–०४	१२०५२.५०	७५७८.३८	६२.८८	५५५.७३	७.३३	४५०.२२
२००९–१०	२६०००.००	२६०००.००	१००.००	२३१४.००	८.९०	२३२३.१५
२०१४–१५	५१२२२.५४	५१२२२.५४	१००.००	४८१४.९२	९.४०	–

आदिवासी विकास विभागातर्फे जिल्हास्तरीय तसेच राज्यस्तरीय योजना राबविण्यात येत आहे. तथापी सन २००९–१० या आर्थीक वर्षात आहे. डिसेंबर २०१० पासुन आदिवासी विकास शासन निर्णय क्र.टिएसपी–२००८/प्र. क्र. ६/का–६ १६ डिसेंबर २००९ नुसार आदिवासी उपाययोजना या निधीतील कामाला प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची सुधारीत कार्यपध्दती अमलात आली आहे.

आदिवासी उपाययोजने अंतर्गत खालील शिर्षकाखाली आदिवासी जनतेकरीता वैयक्तिक व क्षेत्रविकासाच्या योजना राबविण्यात येतात.

शिक्षण :

अ) प्राथमिक शिक्षण :–

१९८६ च्या शिक्षण विषयक राष्ट्रीय धोरणात मान्य करण्यात आले की आदिवासी लोक उर्वरीत लोक संख्येच्या तुलनेत फार मागे आहे. महाराष्ट्र शासनाने विशेष प्रयत्नाचे क्षेत्र म्हणून आदिवासी शिक्षणाचा विचार केला आहे. आदिवासी क्षेत्रामध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी ज्या महत्वाच्या योजना करण्यात येत आहे त्या खालीलप्रमाणे

- **प्राथमिक शाळा इमारतीचे बांधकाम करण्यासाठी जिल्हा ग्रामीण विकास प्राधिकरणास अनुदान–**

प्राथमिक शिक्षण ही स्थानिक संस्थाची जबाबदारी आहे. म्हणून पुरेशा शाळा इमारतीचे बांधकाम करणे ही सुध्दा त्यांची जबाबदारी नाही. त्यामुळे बऱ्याच शाळा आरोग्य व स्वास्थ या दृष्टिकोनातून योग्य नाही. स्थानिक संस्थाना मदत करण्यासाठी राज्यशासन १९६२ पासून प्राथमिक शाळा इमारत बांधकामाला निधी मंजूर करीत आहे. खडूफळा मोहिम योजनेखाली आदिवासी उपाययोजना क्षेत्रातील प्राथमिक शाळांचे दोन वर्ग खोल्याचे युनिट व एक वर्ग खोली यांचे बांधकाम करावयाचे आहे.

- **नैसर्गिक वर्ग वाढीनुसार प्राथमिक शिक्षकांच्या भरती** :– प्राथमिक शाळेमध्ये ४० विद्यार्थ्याकरीता एक शिक्षक ४१ ते ८० करीता दोन शिक्षक, ४१ ते १२० करीता तीन शिक्षक नियुक्त करण्यात येतात तथापि 'केंद्र' सरकारच्या निर्देशानुसार एक शिक्षकी प्राथमिक शाळा द्विशिक्षकी करण्यासाठी विद्यार्थी संख्या १ ते ८० करीता दोन शिक्षक सन २००८–०९ पासून देण्याचे निकष आहेत.

ब) माध्यमिक शिक्षण :–

महाराष्ट्रात माध्यमिक शिक्षण हे सर्व साधारणपणे खाजगी संस्थेद्वारे चालविल्या जाते सुधारित अनुदान सूत्रानुसार १९९४–९५ परवानगी माध्यमिक शाळांना १००% अनुदान प्राप्त होते. आदिवासी उपाययोजनातंर्गत शाळा आणि मुलींच्या शाळांना चौथ्या वर्षापासून १०० टक्के अनुदान प्राप्त होते.

१०० टक्के अनुदान रु. ९.५० लक्ष अदांजे
८० टक्के अनुदान रु. ७.६० लक्ष अदांजे
६० टक्के अनुदान रु. ५.७० लक्ष अदांजे
४० टक्के अनुदान रु. ३.८०लक्ष अदांजे
२० टक्के अनुदान रु. १.९० लक्ष अदांजे

क) शासकीय आश्रमशाळा :–

अतिदुर्गम व डोंगराळ भागात राहणाऱ्या अनुसूचित जमातीच्या लोकांच्या आर्थीक , शैक्षणिक व सामाजिक विकास जलदगतीने घडवून आणण्यासाठी सन १९७२–७३ पासून शासनाने निवासी आश्रमशाळा समूह योजना कार्यान्वित केली आहे. ही योजना अतिदुर्गम, डोगराळ व पाडयातील आदिवासी मुला/मुलीमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करुन शैक्षणिकदृष्टया त्यांना सुशिक्षित करणे व त्या योगे त्यांचे जीवनमान उंचावणे या उद्देशाने राबविण्यात येते. शिक्षणाची ज्ञानगंगा दऱ्याखोऱ्यात, दुर्गम भागात पोहचविण्याचे काम शासकीय आश्रमशाळे मार्फत होत आहे. अनुसुचित जमाती क्षेत्रात ५००० ते ७००० लोकसंख्येच्या क्षेत्रात एक आश्रमशाळा हा सर्वसाधारण निकष ठरविण्यात आला आहे.

ड) कन्याशाळा :–

शासकीय आश्रमशाळामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनीच्या संदर्भात सुरक्षिततेच्या दृष्टीने काही वेळा अडचणी उद्भवतात त्यामुळे ५५२ शासकीय आश्रशाळा पैकी काही आश्रमशाळांचे कन्या शाळेत रुपांतर करण्याचे शासनाने ठरविले व त्यानुसार एकुण २६ आश्रम शाळांचे कन्या शाळेमध्ये रुपांतर करण्यात आले.

इ)कनिष्ठ महाविद्यालय :–

आदिवासी विकास विभागा अंतर्गत आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून ज्या शासकीय आश्रमशाळा इ. १० पर्यंत पोहचल्या आहे. त्या शाळापैकी एकूण १२६ ठिकाणी कनिष्ठ महाविद्यालयाचे मंजूर केलेली आहेत. सद्यास्थितीला सदर कनिष्ठ महाविद्यालय कार्यान्वित आहेत.

ई) परदेशी शिष्यवृत्ती :–

३१ मार्च २००५ नुसार शासनाने राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशातील विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या १० विद्यार्थ्यांना पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्याची योजना २००५–०६ या वर्षापासून मंजूर करण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा जास्तीत जास्त रुपये २.५० लक्ष पर्यंत.

अ.क्र.	अभ्यासक्रमाचे नांव	स्तर	शिष्यवृत्ती संख्या		
			पदवी	पदव्युत्तर	एकूण लाभार्थी
अ)	एम. बी. ए.	पदव्युत्तर	–	२	२
ब)	वैद्यकीय अभ्यासक्रम	पदवी / पदव्युत्तर	१	१	२
क)	बी. टेक (इंजिनिअरिंग)	पदवी / पदव्युत्तर	१	१	२
ड)	विज्ञान	पदवी / पदव्युत्तर	–	१	१
ई)	कृषी	पदवी / पदव्युत्तर	–	१	१
इ)	इतर विषयांचे अभ्यासक्रम	पदवी / पदव्युत्तर	–	२	२
	एकूण		२	८	१०

कामगार आणि कामगार कल्याण :–

१. शिल्प कारागीर प्रशिक्षण कार्यक्रम :–

कौशल्य व ज्ञान देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी अत्यंत महत्वाचे घटक आहेत. कामगारांच्या कौशल्य क्षमतेनुसार देशाची आर्थिक स्थिती जास्त उत्पादनशिल नाविन्यपूर्ण स्पर्धात्मक होते. वेगवेगळे रोजगार व त्यांचे स्तर रोजगार क्षमतेत वाढ, रोजगाराच्या नवी संधी हे आर्थिक विकासाचे केंद्र आहे. यासाठी शिल्प कारागीर प्रशिक्षण योजना व शिकाऊ उमदेवारी योजना या योजनेची कौशल्ययुक्त मनुष्यबळ निर्मितीची योजना व त्यात जागतिक स्तरावर लागणारे कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी ११ व्या पंचवार्षिक योजनेत अधिक भर देण्यात आलेला आहे. यासाठी मा. पंतप्रधान व मा. केंद्रिय वित मंत्री यांनी जागतिक स्तरावर कौशल्य निर्मितीच्या तसेच असंघटीत क्षेत्रातील रोगजार निर्मितीसाठी प्रशिक्षणाच्या विविध योजना सुरु करण्याची घोषणा केली आहे. शिल्प कारागिर प्रशिक्षण योजना यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी मोठया प्रमाणात खर्च करावा लागतो. यामध्ये इमारत बांधकाम यंत्रसामुग्री, कर्मचारी यांचा अधिक खर्च आहे. राज्यात आदिवासी उपयोजनेतर्गत एकूण ५६ औद्योगिक प्रशिक्षण संस्था कार्यरत असून त्यामधील विद्यार्थी प्रवेश क्षमता १०१८८ एवढी आहे. तसेच २८ आदिवासी आश्रमशाळा सुरु करण्यात आल्या असून त्याची प्रवेशक्षमता २३१२ इतकी असून, यामध्ये ६ जिल्हयाचा ३० तालुक्यांचा समावेश आहे. शिल्प कारागिर प्रशिक्षण योजनेतर्गत राबविण्यात येणाऱ्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थासाठी केंद्रशासनाने ठरवून दिलेल्या मानकाप्रमाणे इमारत बांधकाम, यंत्रसामुग्री व निदेशक यांची आवश्यकता असते, एन. सी. व्ही. टी. ने निर्देशित केलेल्या व्यवसायात प्रशिक्षण दिले जाते.

(रु. लाखात)

अ.क्र.	योजना	नियतव्यय
	राज्यस्तर	
१	व्यवसाय शिक्षणाचे सार्वत्रिकरण + बांधकाम	३००.००
	जिल्हास्तर	
१	विद्यमान औ. प्र. संस्थेतील उपरकणांच्या त्रुटी भरुन काढणे	१०५४.५६
२	नवीन औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन करणे	४९५.९८
३	कमी मागणीच्या व्यवसाया ऐवजी जादा मागणी असलेले व्यवसाय अभ्यासक्रम	३५.००

	सुरु करणे.	
४	मुलभूत प्रशिक्षण केंद्र स्थापना करणे	०.००
५	औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकरीता कार्यशाळा/प्रशासनिक इमारतीचे बांधकाम	२७७७.८९
६	चालू औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये जादा जागा सुरु करणे	१०१.४३
७	रोजगारभिमुख व्यवसाय शिक्षणाचे सार्वत्रिकरण	१८८४.५५
८	एकूण नवीन योजना	१५.५४
	एकूण जिल्हास्तर	६३६४.१५

२. **कमी मागणीच्या ऐवजी जादा मागणीचे व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करणे**

औद्योगिककरणाच्या गरजेनुसार आधारित प्रशिक्षण कार्यक्रमाची व्यवस्था करणे व रोजगाराच्या संधी यांची सांगड घालण्याकरीता औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील विद्यमान व्यवसाय अभ्यासक्रमांचा आढावा घेण्यात येतो व आवश्यक तेथे जुने व्यवसाय अभ्यासक्रम बंद करुन नवीन व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यात येतात. आदिवासी उपयोजनेंतर्गत कार्यरत असलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील अशा व्यवसाय अभ्यासक्रमांचा आढावा घेतल्यानंतर कमी मागणी असलेले व्यवसाय बंद करुन नवीन व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.

वने :

राज्यातील बहुसंख्य आदिवासी विशेषत: ठाणे, नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगांव, पुणे, नांदेड, अमरावती, गडचिरोली आणि चंद्रपूर या जिल्हयातील आदिवासी हे वन क्षेत्राभोवती व जवळपास राहतात. राज्यात एकूण ६३८६७ चौ. कि.मी. भूभाग वनव्याप्त असून हा भाग राज्याच्या भौगोलिक क्षेत्राच्या २१ टक्के एवढा आहे व यापैकी ३१२७७ कि.मी. म्हणजे ४९ टक्के क्षेत्र आदिवासी उपयोजना क्षेत्रात येते. सबब, आदिवासींच्या आर्थिक व सामाजिक विकासात वनविषयक कामे महत्वाची भूमिका बजावतात. हया कामामध्ये मुख्यत्वेमुख्य व गौण वनोत्पादने घेणे, वनीकरण आणि रोपांची लागवड, वन्य पशुजीवन आणि निसर्ग संवर्धन, संरक्षण इत्यादी कामाचा समावेश होतो. वनात मोठया प्रमाणात उपलब्ध असलेली वनोत्पादने वन विभाग, जंगल कामगार सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, वन विकास महामंडळ इत्यादी मार्फत पुरविला जाणारा रोजगार इत्यादीद्वारे उपलब्ध होणाऱ्या रोजगारावर आदिवासींची आर्थिक परिस्थिती मोठया प्रमाणात अवलंबून आहे. म्हणून आदिवासी निरनिराळया वन विषयक योजनांवर कामे करुन मजुरी कमवितात. तसेच वन विभागामार्फत लाकूड कटाई संदर्भात देण्यात येणारे प्रशिक्षण घेऊन आदिवासी आपल्या कौशल्यात व मिळकतीत भर घालतो.

आदिवासी उपयोजना, २०१४–१५ मध्ये वेगवेगळया वनविषयक योजनांसाठी एकूण रु. १०९४५.९९ लाख इतक्या नियतव्ययाची तरतूद करण्यात आली आहे. राज्यात अमलबजावणी हेात असलेल्या वन विकासाच्या योजनाद्वारे आदिवासी वातावरण कायम राखणे व आदिवासींना दारिद्रय रेषेच्यावर आणण्यासाठी त्यांच्या मिळकत क्षमतेत वाढ करणे अशा दुहेरी उद्देशाची पूर्ती होते. आदिवासी उपयोजना क्षेत्रात कार्यान्वित होत असलेल्या महत्वाच्या योजना पुढीलप्रमाणे आहेत. वन कायद्यातील तरतूदी विचारात घेवून नियतव्यामध्ये वाढ करण्यात येत आहे.

१. **औद्योगिक व व्यापारी उपयोगासाठी लागणाऱ्या प्रजातीची वृक्ष लागवड** :

औद्योगिक व व्यापारी उपयोगासाठी आवश्यक असणाऱ्या इमारती लाकूड, बांबूचा पुरवठा करण्याकरीता त्या प्रजातीची वृक्ष लागवड करणे, आदिवासींना रोजगाराची संधी उपलबध करुन देणे तसेच कमी प्रतीच्या वनाचे आर्थिकदृष्टया सबळ वनामध्ये परिवर्तन करणे ही या योजनेची उद्दिष्टये आहेत.

२. **किरकोळ जंगल उत्पन्नाचा विकास :**

वनक्षेत्रात फळझाडांचे (बागायती फळझाडाव्यतिरिक्त) प्रमाण वाढविणे, वनक्षेत्रात हिरडा, चंदन, खैर इत्यादी प्रजातीच्या वृक्षाची लागवड करुन औषधी वनस्पतीचे प्रमाणे वाढविणे तसेच वनक्षेत्रांतर्गत असलेल्या वनवासींना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देणे ही या योजनेची उद्दिष्टये आहेत. जिल्हा नियोजन व विकास मंडळाने सदर योजनेसाठी आदिवासी क्षेत्र उपयोजनेतंर्गत व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनेकरीता रु. ५८.४७ लक्ष असा एकूण रु. ७९७.९३ लक्ष इतका नियतव्यय मंजूर केला आहे.

३. **संयुक्त वन व्यवस्थापन :**

लोकांच्या सहभागने वनांचे संरक्षण, संवर्धन करणे, वनांचा दर्जा वाढविणे, लोकांना यासाठी उद्युक्त करण्याकरीता लोकोपयोगी कामे घेणे ही योजनेची उद्दिष्टये आहेत. सदर योजनेसाठी जिल्हा नियोजन व विकास मंडळाने आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनेकरीता रु. ६८.७३ लक्ष नियतव्यय मंजूर केलेला आहे.

४. **वन दळणवळण :**

रस्त्याअभावी किंवा दळणवळण योय रस्त्या अभावी वनवासींचा वर्षातून साधारण: ५—६ महिने शहराशी /गांवाशी संपर्क विस्कळीत राहतो. वन रस्ते हे वाहतूक व दळणवणाकरीताच आवश्यक नसून वनांचे संरक्षणाकरीता अत्यावश्यक आहेत. नवीन योजना राबविण्यासाठी वारंवार भेटी देण्यासाठी वनरस्ते असणे गरजेचे आहे. रस्त्याचे जाळे आणि लांबी हे सुध्दा प्रगतीचे एक परिणाम आहे.

महिला व बालविकास :

समाज कल्याण या शीर्षकाखाली महिला व बालकल्याण विभागाच्या योजना खालीलप्रमाणे आहेत :—

- **महिला व बाल कल्याण समिती :—**

विकासामध्ये महिलांचा सहभाग असण्याच्या दृष्टीने शासनाने ग्रामीण भागामध्ये महिला व बाल कल्याणसाठी निरनिराळया योजना सुरु केल्या आहेत. शासनाने जिल्हा परिषदामध्ये महिला व बाल कल्याण समिती नावाची एक समिती स्थापन केली आहे. एकात्मिकृत बाल विकास योजना (आय. सी. डी. एस.)एकात्मिककृत ग्राम विकास कार्यक्रम (आर. आर. डी. पी.) (४० टक्के महिला क्षेत्र) ग्रामीण भागामध्ये महिला व बाल विकास (डावाक्रा) स्वयंरोजगारासाठी ग्रामीण लाकांना प्रशिक्षण (ट्रायझेम महिला क्षेत्र) शिवणकाम योजना इत्यादी योजना शासनाने या सितीकडे सोपविल्या आहेत. या योजना व्यतिरिक्त समिती आपल्या योजना देखी तयार करत असते. शासनाने ग्रामीण भागामध्ये महिला व बालकल्याण विकासाशी संबंधित संबंधित कही नवीन योजना देखील तयार केल्या आहेत. त्या योजना खालीलप्रमाणे आहेत.

- इ. ५ वी ते १० त शिकणाऱ्या विद्यार्थींनींना सायकली देणे.
- नवीन बालवाडया सुरु करणे
- आर्थिकदृष्टया कमकुवत घटकांना विनामूल्य शिवणयंत्रे देणे.
- महिला मंडळानी ग्रंथालये व प्रौढ शिक्षण शिबिरे चालविणे.
- ग्रामीण महिला व बालकांसाठी रोगनिदान शिबिरांची व्यवस्था करणे.
- ग्रामीण महिलांसाठी शौचाकुपाचे बांधकाम करणे
- आदर्श अंगणवाडया/बालवाडया मधील सेविकांना पुरस्कार देणे
- अंगणवाडया/बालवाडया यांना साधनसामुग्री/साहित्य सामुग्री देणे
- महिला व बालकांना उत्तेजन देण्यासाठी ग्रामस्तरावर निरनिराळया स्पर्धांचे आयोजन करणे
- पंचायत संस्था या संबंधात महिला प्रतिनिधींना प्रशिक्षण देणे

- महिला व बालकल्याण समितीमार्फत चालविण्यात येणाऱ्या बालवाडयामधील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक व क्रीडा विषयक साधन सामुग्रीची खरेदी करणे.
- महिला प्रतिनिधीसाठी अभ्यास दौरे आयोजित करणे
- अपंग मुले/स्त्रिया यांचे पुनर्वसन करणे व त्यांना कृत्रिम अवयवारोप करणे
- विद्यार्थ्यांना गणवेष पुरविणे.
- आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील स्त्रियांना साडया पुरविणे.
- गाई/म्हशी/शेळी इत्यादी खरेदी करण्यासाठी (स्वयंरोजगारासाठी) गरजू महिलांना वित्तीय सहाय्य देणे.
- आर्थिकदृष्टया कमकुवत घटकातील मुलींच्या लग्नासाठी रु. २०००/– पर्यंत वित्तीय सहाय्य देणे.
- औद्योगिक प्रशिक्षणाच्या प्रयोजनासाठी महिला मंडळे/स्वेच्छा वित्तीय सहाय्य देणे.
- आर्थिकदृष्टया कमकुवत घटकांतील मुलांना तंत्रशिक्षणासाठी वित्तीय सहाय्य देणे.
- आर्थिकदृष्टया कमकुवत घटकांतील महिलांना बालसंगोपनासाठी वित्तीय सहाय्य देणे.
- आर्थिकदृष्टया इतर जिल्हयातील शिक्षणासाठी ठोक अनुदान देणे

नव संजीवनी योजना :

आदिवासी लोकांसाठी असलेल्या पाणी पुरवठा, आरोग्य सुविधा इत्यादी सारख्या निरनिराळया योजनांची एकात्मिकपणे व समन्वयाने अमलबजावणी करणे आणि त्यांना बळकटी देणे हे नव संजीवन योजनेचे उद्दिष्ट आहे. या योजनेचा योग्य त्या रितीने समन्वय सुनिश्चित न करताच पूर्वी विविध स्तरावर निरिनिराळया अभिकरणामार्फत अमलबजावणी करण्यात येत असे. सध्या नवसंजीवन योजनेमध्ये खालील योजनाचां समावेश करण्यात आलेला असून त्याची एकाच अधिपत्याखाली अमलबजावणी करण्यात येत आहे.

१. <u>रोजगार कार्यक्रम</u>

अ) रोजगाकर हमी योजना

ब) केंद्र सहाय्यित संपुर्ण ग्रामिण रोजगार योजना

२. आरोग्य सेवा

अ. प्राथमिक आरोग्यविषयक सुविधांची तरतूद करणे

ब. शुध्द व स्वच्छ पिण्याचे पाणी पुरविणे

३. पोषण कार्यक्रम

अ. एकात्मिकृत बालविकास योजना

ब. शालेय पोषण कार्यक्रम

४. अन्नधान्याचा पुरवठा

अ. रास्त भावाच्या दुकानामार्फत अन्नधान्याचे वितरण

ब. सुधारित सार्वजनिक वितरण पध्दती

क. द्वार वितरण पध्दती

५. खावटी कर्ज योजना धान्य बॅक योजना

(अ) अलिकडेच दुर्गम म्हणून घोषित करण्यात आलेली गांवे

(ब) गतकाळात ज्या गावांमध्ये /क्षेत्रामध्ये मोठया प्रमाणावर कुपोषण झाले आहे ती गांवे

क) पावसाळयात दळणवळणाचा संपर्क तुटणारी गांवे

ड) ज्या गावांमध्ये शुध्द आणि स्वच्छ पाण्याचा पुरवठा हेात नाही अशी गांवे

ई) प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्रपासून खूप लांबवर असलेली गांवे

फ) ज्या गावामध्ये रास्त भाव दुकाने नाहीत अशी गांवे किंवा अशा रास्त भावांच्या दुकानाच्या ठिकाणापासून लांब असलेली गावे.

ग) पावसाळयात ज्या गावामध्ये रोजगार मिळणे अवघड काम असते अशी गावे

आरोग्य सेवा:

प्रादेशिक संस्थेच्या दृष्टीने आदिवासी क्षेत्र साधारणपणे दुर्गम भागात मोडते. त्यामुळे असे क्षेत्र वेळच्या वेळी आणि पुरेशा आरोग्य सुविधा मिळण्यापासून वंचित राहून जाते. असे दिसून येते. विशेषत: पावसाळयाच्या मौसमांत जेव्हा दळणवळणाच्या सेवांमध्ये खंड पडतो. त्यावेळी अति दुर्गम भागात आरोग्य सुविधा पुरविता येत नाही या बाबींवर मात करण्यासाठी अशा दुर्गम भागात सन १९९६–९७ पासून पावसाळयाच्या कालावधीत खालीलप्रमाणे आरोग्य सुविधा पुरविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. तसेच सन २००३–०४ या वर्षापासून मेळघाट पॅटर्न अंतर्गतच्या सर्व आरोग्यविषयक/पोषणविषयक योजना आदिवासी क्षेत्रातील सर्व जिल्हयात राबविण्याबाबतचा शासनाने निर्णय घेतला आहे.

१. <u>मानसेवी बालरोग तज्ञांची नियुक्ती करणे</u>

ही योजना अमरवती जिल्हयातील फक्त धारणी आणि चिखलदरा तालुक्यासाठी आहे. धारणी आणि विखलदऱ्यातील मुलांची तपासणी करण्यासाठी आलेला बालरोग तज्ञांना प्रति भेटी रु. ३००/– इतके /मानधन देण्यात येणार आहे.

२. <u>दाईच्या मासिक सभा :</u>

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पामध्ये दायांकडून प्रसुतीची को केली जातात. बाळंतपणाच्या १०० टक्के नोंदी होण्यासाठी आणि अति जोखमीच्या माता आणि नवजात शिषु यांचे सर्वेक्षण व सनियत्रण करण्यासाठी ही योजना राबविण्यात येत आहे.

<u>३.ग्रामीण रुग्णालयात पेडीयाट्रीक आय.सी.युनीटची स्थापना करणे :</u>

बालमुत्यू कमी करण्यासाठी नंदूरबार जिल्हयासाठी पेडीयाट्रिक आय.सी. सुनीटची स्थापना करण्यात येणार आहे. यासाठी नंदूरबार जिल्हयांकरीता सन २०१४–१५ साठी आदिवासी उपयोजनेतन रु. ४०.०० लाख इतका नियतव्यय ठेवण्यात आला आहे.

पोषण:

अमरावती जिल्हयातील धारणी, चिखलदरा तालुका आणि ठाणे, नाशिक, धुळे व गडचिरोली जिल्हयातील अति दुर्गम आदिवासी भागातील १५ एकात्मिक बाल विकास प्रकल्पांतर्गत आदिवासीसाठी वाढीव पूरक पोषण आहार पुरविण्यात येणार आहे.

वाढी पूरक पोषण आहाराचा सुधारीत दर खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आहे.

अ.क्र.	लाभार्थीचा प्रकार	वाढीव पूरक पोषण आहाराचा दर
१	० ते ६ महिने वयोगटासाठी मुले	रु. १.५०
२	१ ते ३ वर्षे वयोगटातील मुले	रु. २.२५
३	३ ते ६ वर्षे वयोगटातील मुले	रु. ४.५०
४	गर्भवती महिला आणि स्तनदा माता	रु. ४.५०
५	श्रेणी ३ व श्रेणी ४ मधील कुपोषित बालके	रु. ४.५०

निष्कर्ष :–

भारतातील केंद्रसरकार व राज्य सरकार यांनी आदिवासींच्या विकासासाठी विविध योजना तयार करुन त्याची अमलबजावणीही केली आहे. आदिवासींच्या उध्दारासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजे हा विचार आज सर्वमान्य झाला आहे. गेली कित्येक वर्ष अंधारात राहिलेल्या आदिवासीना वाट दाखविण्याचे कार्य, त्यांच्या जुन्यापुराण्या तसेच कालबाहय व एकूणच समाजप्रगतीला घातक ठरलेल्या रुढी–परंपरा बदलण्याचे कार्य अत्यंत दक्षतेने करणे ही आजच्या काळाची गरज आहे. भारत सरकार विशेषत: महाराष्ट्र राज्य याबाबत अधिक जागरुक असल्याचे प्रचितीला येते. आदिवासी कल्याणाच्या एवढया योजना राबवून अदयापर्यंत अपेक्षित यश का प्राप्त होत नाही? याचाही विचार करणे आवश्यक आहे. आदिवासी कल्याण कार्यक्रमाला अजिबात यश लाभलेले नाही असा याचा अर्थ नाही पण कोटयावधी रुपये खर्च करुन व विविध तऱ्हेच्या सवलती देऊन जे कल्याण आदिवासींचे साधले पाहिजे ते साध्य झाले नाही. हे मात्र अमान्य करता येत नाही. बरेचदा आदिवासी विकास कार्यक्रमाचा लाभ ज्या गरजूंना मिळाला पाहिजे होता तो लाभ त्यांना मिळाला नाही. आदिवासी विकास योजना फक्त कागदोपत्रीच राहतात अनेकदा या कामासाठी दिलेला पैसा दुसऱ्या कामासाठी खर्च केला जातो असे उलट–सुलट मतप्रवाह या कार्यक्रमाच्या संदर्भात आहे.

*****

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 4.374
UGC Approved Journal Sr. No.48455

ISSN No. 2394-8426
Mar – 2018
Issue–I, Volume–VII

''चंद्रपूर जिल्हयातील भुजल पातळी व पीक प्रारूप'' एक अभ्यास

दिपाली भा. दांडेकर
सरदार पटेल महाविद्यालय,चंद्रपूर
E Mail: Deepalidandekar12@gmail.com

डॉ. दिगांबर पारधी
(उपप्राचार्य)
नेवजाबाई हितकरणी महाविद्यालय, ब्रम्हपुरी

सारांश :

मानवी जिवन ही गतिमान प्रणाली आहे. या प्रणालीमध्ये मानव साधनसंपत्तीचा अतिरिक्त वापर करत आहे. त्यामुळे पृथ्वीतळावर अनेक समस्या निर्माण झालेल्या आहे. त्यापैकीच भु–जल सांधन संपत्ती मोठया प्रमाणात वापरण्यात येत असल्यामुळे अनेका विंध समस्या निर्माण झालेल्या आहेत. प्रस्तुत लघुशोध निबंधामध्ये ''चंद्रपूर जिल्हयातील भुजल पातळीचा पीक प्रारूपावर होणारा परिणाम'' हा विषय निवडलेला आहे अति प्राचीन काळापासुन भारतात भुजलाचा वापर शेती करीता केला जातो. विहिरी म्हणजे भुजल वापरण्याचे महत्वाचे साधन आहे हया साधनाचा वापर मोठया प्रमाणात पीक प्रारूपावर होतांना दिसुन येतो.

बीजशब्द :

भुजल, संसाधन, पिक प्रारूप–कृषी पिकांचा आकृती बंध

प्रस्तावना :

भारत हा कृषीप्रधान देश आहे. त्यामुळे भारतीय शेतकरी प्रामुख्याने पावसाच्या पाण्यावर शेती करतांना दिसुन येतो. देशातील पिकाखालील एकुण 48 टक्के क्षेत्रातील 30 टक्के क्षेत्रातच पुरेसा पाऊस पडतो 70 टक्के क्षेत्रात अपुरा पाऊस पडत असल्याने मानवाच्या दृष्टीने उपयोगाचा नाही. भुपृष्ठाखालील अस्तित्वात असलेल्या पाण्याच्या साठयापैकी भुपृष्ठाखालील अस्तित्वात असलेल्या पाण्याच्या साठयास भुजल म्हणतात भुजल हे खडकात असलेल्या छिद्रे, भेगा साधे तंडे यामध्ये साचलेले असते त्यात 30–40 टक्के पर्यंत पाण्याचा साठा असतो सर्व भुमीगत पाणी पृथ्वीवर 150–200 मीटर पर्यंत पाण्याचा साठा पसरवु शकते. भुमीगत पाण्याचे तीन प्रमुख स्त्रोत आहेत पहीला पर्जन्याचे पाणी हयाला आकाशीय जल (Meteoric Water) म्हणतात दुसरा स्त्रोत म्हणजे गाळाचे खडक होय. हयाला सहजात जल (Connate Water) असे म्हणतात. तिसरा स्त्रोत ज्वालामुखीच्या कियेत लाव्हारसाबरोबर अतिशय खोल भागातुन वर आलेले पाणी होय. याला मॅग्या (Magnetic Water) असे म्हणतात.

कमी पर्जन्य असणाऱ्या प्रदेशात शेती आर्थिक दृष्टया कायदेशीर ठरविण्याविषयी भुपृष्ठीय व भुजलीय स्त्रोतांचा वापर करणे आवश्यक असते. चंद्रपूर जिल्हा हा विषय हवामान प्रदेशात मोडणारा असुन (AW) हवामान प्रदेशात मोडतो. उन्हाळयात अतिउष्णतेमुळे पाण्याची पातळी खोल जाते. चंद्रपूर जिल्हयात वार्षिक जमिनित पुरणाऱ्या भुजलाचे प्रमाण हे 11675.11 हेक्टर मिटर असुन केवळ 4 टक्के पाण्याचा उपसा होतो.

"Ground water is one of the earth's most widely distributed resources and its role in the very existence of life on the planet needs hardly any elaboration"

अभ्यासक्षेत्र :

अभ्यास क्षेत्राचे स्थान निश्चित करतांना पंदरा ही तालुक्याचा समावेश करण्यात आलेला आहे. जिल्याचे एकुण क्षेत्रफळ 114.43 स्के. मि. आहे. आणि हा जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या दक्षिण–पुर्व भागात असुन यांचा अंक्षाक्षीय विस्तार $78^0 52'$ ते 8^0 62′ पुर्व रेखांश एवढा आहे. हया जिल्हयाची पुर्व सिमा वैनगंगा नदीने तर पश्चिम सिमा वर्धा व पैनगंगा नदीने दक्षिण सिमा माणिकगड टेकडयांनी सिमांकित केलेली आहे. कोपेनच्या हवामान प्रदेशानुसार हया जिल्हयाचे हवामान (AW) प्रकारचे असुन हयात मोठया प्रमाणात कृषीचा विकास होतो.

उद्देश :

1. चंद्रपूर जिल्हयातील भुजल पातळीचा तालुका निहा अभ्यास करणे.
2. भुमिगत जल पातळीमध्ये होणारा बदल अभ्यासणे.
3. भुमिगत जल पातळीच्या बदलामुळे कृषी पिक प्रारूपांवर होणारा बदल अभ्यासणे
4. भुमिगत जल संपत्ती व जलसिंचन व्यवस्था हयाचा अभ्यास करणे.

अभ्यास पध्दती :

प्रस्तुत शोध निबंधासाठी आवश्यक असणारी आकडेवारी (प्राथमिक व दुय्यम) असुन जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन जिल्हा अधिकारी कार्यालयातुन संकलीत केलेली आहे. ''चंद्रपूर जिल्हयातील भुजल पातळीचा पीक प्रारूपावर होणारा परिणाम हा लघुशोध निबंधाचा विषय असुन जल संसाधन व कृषी व्यवस्थापनाच्या दृष्टीकोनातुन माहीतीचे विश्लेषण करून निष्कर्ष प्राप्त करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

विषय विवेचन :

कृषी व्यवसायात जल संसाधन अतिशय महत्वाचे संसाधन असते. पाणी ही पृथ्वी वरील सर्वात मौल्यवान व विस्तृत प्रमाणात वितरीत झालेली नैसर्गिक साधन संपत्ती आहे. पृथ्वीवरील एकुण उपलब्ध पाण्याच्या साठयापैकी 97.2 टक्के सागरी व खारट पाणी आहे 2.8 टक्के पाणी साठा गोडया पाण्याचा आहे. 0. 6 टक्के भुजल असुन त्यापैकी केवळ मात्र 0.2 टक्के पाणी उपलब्ध तंत्रज्ञानाच्या माध्यमातुन भुपृष्ठावर खेंचता येते. म्हणुन भुजल ही मौल्यवान व महत्वाची साधन संपत्ती आहे. चंद्रपूर जिल्हयात विविध तालुक्यामध्ये भुजलाचे प्रमाण विविध प्रकारचे आहे. पाचव्या भुजल मुल्यांकानुसार वार्षिक मुरणा–या भुजलाचे प्रमाण 116754. 11 मिटर इतके असुन त्यातुन 3659.45 हेक्टर मिटर्स म्हणजेच 313 टक्के पाण्याचा उपसा करण्यात येतो. त्यात ही प्रामुख्याने जिल्हयात एकुण 13726 विहीरीव्दारे उपसा करण्यात येतो व 14700 हेक्टर म्हणजेच 3 टक्के कृषी क्षेत्र भिजविले जाते.

चंद्रपूर जिल्हयातील तालुकानिहाय भुजल पातळी सन 1996–2000

अ.क्र	तालुका	भूजल पातळी (M मध्ये) 1996–2000		पाण्याच्या पातळीतील वाढ / घट (+)(-)
1.	चंद्रपूर	2.98	3.87	–0.89
2.	मुल	1.96	2.96	–1.00
3.	सावली	1.57	2.57	–1.00
4.	गोंडपिपरी	2.97	4.75	–1.78
5.	वरोरा	2.76	3.44	–0.68
6.	भद्रावती	2.09	2.53	–0.44
7.	चिमुर	1.99	2.77	–0.78
8.	ब्रम्हपुरी	2.89	3.66	–0.77
9.	नागभिंड	2.47	3.61	–0.84
10.	सिंदेवाही	2.19	3.14	–0.95
11.	राजुरा	2.78	2.72	–0.06
12.	कोरपणा	2.13	2.79	–0.66
13.	पोंभुर्णा	2.56	3.65	–1.09
14.	बल्लारपुर	3.57	6.35	–2.78
15.	जिवती	––	––	––

(आधार–भुजल सर्व्हेक्षण यंत्रणा चंद्रपूर)



वरील साख्यकीय माहीतीचे वाचन केले असता जिल्हयातील 15 ही तालुक्यात सरासरी पर्जण्याचे प्रमाण मध्यम स्वरूपाचे असुन जमिनीत पाण्याचा निचरा होण्याचे प्रमाण फार कमी आहे. चंद्रपूर तालुक्यात सरासरी निचरा होण्याचे प्रमाण फार कमी आहे. चंद्रपूर तालुक्यात सरासरी 1996 ला 2.98 लिटर भुजल साठा होता तो 2000 ला 3.87 इतका वाढला व त्याचा भुजल पातळीत सरासरी –0.89 मिटर्स इतकी घट झालेली दिसुन येते. कारण वर्धा नदिच्या खो–यात असणा-या हया तालुक्यात भुजल निचरा मोठया प्रमाणात होतो.

- भुजल पातळीचा पिक प्रारूपावर होणारा परिणाम :
- भूजलाव्दारे ओलिताखालील क्षेत्र

(क्षेत्र हेक्टर मध्ये)

अ.क्र.	तालुका	वर्ष (1997–98)	वर्ष (1999–2000)	
1.	चंद्रपूर	2901	1509	
2.	भद्रावती	191	2723	
3.	वरोरा	740	2242	
4.	चिमुर	7744	10763	
5.	नागभिंड	14084	13951	
6.	ब्रम्हपुरी	3820	4692	
7.	सिंदेवाही	13142	13907	
8.	मुल	12831	13604	
9.	सावली	15745	15172	
10.	गोंडपिपरी	4023	1828	
11.	राजुरा	2554	3376	
12.	कोरपणा	1502	161	
13.	बल्लारपुर	––	––	
14.	पोंभुर्णा	––	––	
	एकुण	79277	85380	

वरील सारणीचे निरीक्षण केले असता भुपृष्ठाच्या ओलिताखालील क्षेत्रात वाढ होत असल्याचे दिसुन येते सन 1997–98 मध्ये भुपृष्ठीय ओलीताखालील एकुण क्षेत्र 79277 हेक्टर होते तर सर्वाधिक क्षेत्र हे सावली तालुक्यात असुन 15745 इतके आहे (19.86 टक्के)

सन 1999–2000 या वर्षात भुपृष्ठीय ओलित क्षेत्राचे प्रमाण वाढले असुन यावर्षी एकुण 85380 हेक्टर क्षेत्र भुपृष्ठीय जल ओलीताखालील क्षेत्रात वापरण्यात आले. त्यापैकी सर्वाधिक जलाचा वापर हा सावली तालुक्यात 15172 हेक्टर (17.76 टक्के) करण्यात आला.

भुजल पातळी व पिक प्रारूप :

पिकांच्या मुळांच्या क्षेत्राजवळील मृदा–रंध्रे (Soil-Pors) जेव्हा पाण्याने संपृप्त होतात त्यावेळी कृषीची जमिन जलरोधी होण्याचे प्रमुख कारण भुजल पृष्ठाच्या पातळीच्या पातळीत होणारी वाढ ही होय. भुजल पृष्ठ प्रत्यक्ष जरी मुळापर्यंत येवु शकले नाहीत तरी भुजलाची कोशिकीय सिमा (Capliary Fringe) मुळापर्यंत येवुन जमिन संपृप्त होते. म्हणुन जलरोधाचा विचार करतांना कोशकीय सिमा भुपृष्ठापासुन खाली कोणत्या पातळीपर्यंत होवु शकेल यांचा विचार करणे आवश्यक आहे. भुजलाचे कोशिकीय उत्थान, मृदा, सुक्ष्य कणीय मृदेमध्ये कोशिकीय हे सर्वसाधारण पणे शेती करण्यात येणा–या जमिनीत हे कोशिकीय उत्थान 100 मी ते 1. 5 मी इतके घेतात व पिकप्राप्ती चांगली होण्यासाठी ही सिमा 0.5 मी पेक्षा वर येता कामा नये.

- **भुपृष्ठीय जलाची अनुज्ञेय खोली :**

अ. क्र.	पीक Cropping Pattern	भुपृष्ठीय अनुज्ञेय खोली (मिटर मध्ये)
1.	तांदुळ	0.6
2.	गहु	0.9 ते 1.2
3.	कापुस	1.5 ते 1.8
4.	ऊस	0.3
(आधार–जलसिंचन) अभियांत्रिकी लेखक ना. स. लाटकर पेज नं. 435		

Cropping Pattern म्हणजे ''विशिष्टय क्षेत्रात विशिष्टय वेळेला वेगवेगळया पिकाखालील असलेले क्षेत्राचे प्रमाण म्हणजेच पिक प्रारूप होय''

Proportion of area under various crops at point of space and time" जिल्हयात सन 1999–2000 हया काळात वेगवेगळया पिकाचे क्षेत्रातील प्रमाण म्हणजे पिक प्रारूप होय. एकुण 490737 हेक्टर क्षेत्र विविध पिकांच्या लागवडी खली असुन त्यापैकी खाद्य पिकाकरिता 309233 हेक्टर 63 टक्के क्षेत्र वापरण्यात आले अखाद्य पिकाचे क्षेत्र 181504 हेक्टर होते. (37 टक्के)

तांदुळ :

जिल्हयात एकुण पिकाखालील क्षेत्रापैकी तांदुळ पिकासाठी 134677 हेक्टर क्षेत्र (27.44 टक्के) उपयोगात आणले जाते 1999–2000 या वर्षात सर्वाधिक तांदुळाची लागवड नागभिड तालुक्यात करण्यात आली. यात 73.52 टक्के क्षेत्र उपयोगात आणण्यात आले त्यानंतर अनुक्रमे सिंदेवाही 88.39 टक्के, सावली 67.77 टक्के व चिमुर 26.62 टक्के क्षेत्रात तांदळाचे उत्पादन घेण्यात आले. तांदळाच्या पिकांसाठी 0.6 मिटर अनुदेयाच्या इतकी भुजल पातळी आवश्यक असते.

गहू :

गहू पिकांच्या लागवडीसाठी भुजल पातळी ही 0.9 ते 1.2 मीटर पर्यंत लागते जिल्हयात 31475 हेक्टर (6.41टक्के) क्षेत्रात गव्हाची लागवड करण्यात येते. गव्हाचे सर्वाधिक क्षेत्र चिमुर तालुक्यात असुन 6632 हेक्टर 10.28 टक्के इतके आहे. तर सर्वात कमी क्षेत्र चंद्रपूर तालुक्यात5.52 टक्के असे दिसुन येते.

कापुसः

कापुस पिकाच्या लागवडीसाठी लागणारी भुजलपातळी ही 1.5 ते 1.8 मिटर हेक्टर च्या दरम्यान लागते हि पातळी जिल्हयात उपलब्ध असल्याने वरोरा तालुक्यात हया पिकांचे सर्वाधिक क्षेत्र 23802 हेक्टर 33.33 टक्के इतके आहे तर कमी क्षे. मुल तालुक्यात 5 हेक्टर इतके दिसुन येते. हया पिकासाठी भुजल पातळी फार खोलीवर असली तरी त्याचा फारसा परिणाम पिकाच्या उत्पादनावर पडत नाही.

ऊस :

ऊस पिकासाठी 0.3 मीटर भुजल पातळी लागते आणि तिही अतिशय जवळ हे रोखीचे पिक आहे. जिल्हयात केवळ मात्र 132 हेक्टर म्हणजे (0.02 टक्के) क्षेत्रातच हे पिक घेण्यात येते. त्यात वरोरा (0.15 टक्के) व सिंदेवाही (0.02 टक्के) ब्रम्हपुरी 4 हेक्टर क्षेत्रात उत्पादन घेण्यात येते. जिल्हयात साधारण पणे भुजल पातळी खाली असल्याने हया पिकाचे उत्पादन घेण्यात येत नाही.

निष्कर्ष :

1. वर्धा व वैनगंगा खो-यातील भुजल साधन संपत्तीची पातळी सर्व साधारणगटात मोंडणारी दिसुन येते.
2. चंद्रपूर जिल्हयातील तालुका निहाय भुज–पातळीच्या अभ्यास करता राजुरा ताजुक्यात सर्वाधिक भुजल पातळी (+0.06 टक्के) इतकी दिसुन येते. कारण हया तालुक्याचे हे वर्धा नदिच्या खो–यात आहे. इतर तालुक्यात सरासरी भुजल पातळी (–0.06 ते –2.78) च्या दरम्यान आहे.
3. पर्जन्याच्या अनियमितपणा व विहीरीची खालावलेली पातळी यामुळे कुपनलिकाचे व कोरडवाहु पिकाचे प्रमाण वाढत आहे.

उपाय योजना :

1. भुजल पातळीत होणारी घट लक्षात घेता भुजलाचा अतिरीक्त उपसा यावर प्रतिबंध घालुन भुजल पातळीत वाढ करण्यासाठी प्रयत्न करणे अगत्याचे आहे. त्यामुळे वार्षिक उत्पादनाचे योग्य व्यवस्थापन करता येईल.
2. शेतक–यांनी शेतात शेत तळयाची व्यवस्था करावी तसेच मोठया वृक्षाच्या लागवडीस प्रोत्साहन देण्यात यावे. त्यामुळे पाणी जमिनीत मुरण्यात मदत होते.

3. पिकांच्या आकृती बंधानुसार भुजलाचा वापर करण्यात यावा तसेच शासनाच्या पाणी अडवा पाणी जिरवा योजनेचा फायदा घेण्याचा प्रयत्न करावा.

संदर्भ ग्रंथ :

1. Latkar N. S. Irrigation Engineering –continental Prakashan Uijayanagar Colony Poona - 411030.
2. वरिष्ठ भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा कार्यालय,चंद्रपूर
3. जिल्हा सांख्यकीय कार्यालय,चंद्रपूर
4. शेतकरी मासिक – मे 1997 –कृषी आयुक्तालय, कृषी भवन शिवाजी नगर पुणे – 411005

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 4.374
UGC Approved Journal Sr. No.48455

ISSN No. 2394-8426
Mar – 2018
Issue–I, Volume–VII

ग्रामीण साहीत्याचे सैध्दांतीक आधार

प्रा. यादवराव रा. गहाणे
फुले — आंबेडकर कॉलेज ऑफ
सोशल वर्क, गडचिरोली

ग्रामीण साहित्याची प्राचीन चित्र ''गाथासत्पशती'' या सातवाहन राजाच्या ग्रंथात दिसते. हा राजा स्वत: कवी असल्यामुळे ह्याच्या ग्रंथामधील काही ओव्यामध्ये ग्रामीण साहित्याचा उल्लेख येतो. तर 'दृष्टांत पाठ' या ग्रंथामधील काही कथामधूनही ग्रामीण साहित्याचा उल्लेख येतो.

सर्वसाधारनपणे ग्रामीण साहित्य निर्मीतीस १९२० नंतर प्रारंभ झाला असे मानले जाते. आपल्या भारतात अधिकांश जनता खेड्यात राहते. भारतीय संस्कृतीची खरी ओळख आणि जपवणूक खेड्यातच होते. ग्रामसंस्थेच्या केंद्रस्थानी असणारा शेतकरी व त्याचे जीवन हा कुतूहलचा विषय होता. खेड्याच्या विकास प्रगती आदी गोष्टींचा जीवनानुभव घेतला पाहीजे. या भावनेतूनच ग्रामीण साहित्य खेड्याकडे वळते.

ग्रामीणत्व म्हणजे काय?

प्राचीन काळापासुन झालेली खेड्यांची घडण लक्षात घेतल्यास या घडणीतूनच जीवन जगण्यासाठी एक वेगळी रीत साकारत गेली. ही रीत म्हणजेच ग्रामीणत्व असे आपणाला म्हणता येईल. रूढीप्रीयता हे ग्राम्यतेचे लक्षण व कृषीजीवन हेच ग्रामसंस्कृतीच्या केंद्रस्थानी आहे. म्हणूनच कृषी जीवनाला केंद्रस्थानी ठेऊन इथले सण, रूढी, उत्सव, परंपरा निर्माण झाल्या आहेत. कृषीकेद्रीत गावगाडा निसर्गसन्मुख आहे. म्हणजेच निसर्ग ग्रामीण साहित्याच्या केंद्रस्थानी आहे. त्यामुळेच खेड्याकडे चला हा दिलेला नारा ग्रामीण साहित्याचा प्रेरणास्त्रोत दिसतो.

ग्रामनिष्ठ जाणिव प्रकट करणे म्हणजेच ग्रामीण मानसाचे त्याच्या काळ्या आईवडील, पीकावरील, झाडावरील, पशुधनावरील, घनिष्ठ प्रेम आणि जिव्हाळा लक्षणीय असतो.

स्वांतत्र्योत्तर काळात साहित्याच्या क्षेत्रात झालेला बदल, त्याकडे बघण्याचा दृष्टीकोन कसा बदलत गेला आणि स्वातंत्रानंतरच्या १५ ते २० वर्षाच्या काळात मराठी साहित्याच्या प्रवाहात घडून आलेले बदल यांचा विचार केल असता त्यामध्ये झालेले स्थित्यंतर हे काही एकाएकी घडलेले नाही, त्यामागे वैचारिक बैठक होती. हे वैचारिक बैठक सामाजीक चळवळीतून निर्माण झालेली होती. या चळवळीच्या प्रभावाने संदेशनशील आणि सृजनशील तरून पिढी लिहू जगली. ही पिढी संस्कारीत झालेली होती. काही प्रमाणात शिक्षीतही झाली होती.

या नवशिक्षीतांना असे जगवू लागले की शिक्षण घेत असतांना आपन जे वाचतो आहोत त्यातून येणारे जीवन व प्रत्यक्षातले आपले जीवन वेगळे आहे. ते फार वरवरचे व आपल्या समाजावर अन्याय करणारे आहे. आणि म्हणून त्यांना आपण थांबविले पाहिजे. असे त्यांना वाटु लागले. कारण ग्रामीण समाजाचे चित्रन करणारी ही बहुशंशी मंडळी समजाच्या वरच्या वर्गातून आलेली आहेत. त्यांना ग्रामीण जीवनाचे अनुभव नाहीत. आणि त्याविषयी गांभीर्याने लिहावे असे कधीही त्यांना वाटले नाही. म्हणून जाणत्या, संवेदनशील व निर्मीतीक्षम मनाला हे एक आव्हान होते. त्यांचे मन आपल्या ग्रामीण समाजाविषयी बचैन होते. याबेचैनितूनच त्यांना असे जाणवू लागले की या सर्व पार्श्वभूमीत शोषणाचा एक संदर्भ आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धाचा जर विचार केल तर एकूनच मराठी साहित्यावर तत्कालीन सुधारणा वाद्यांच्या विचारांचा परिणाम झालेल आपल्याला पहायला मिळतो. भारत हा खेड्यांचा देश

आहे. आणि या देशातील जनता बहतांशी खेड्यापाड्यातुन दऱ्याखोऱ्यातून आणि रानावनात राहते. या लोकांचे प्रश्न इतर उच्चवर्णिय लोकांच्या प्रश्नापेक्षा वेगळे आहेत. कारण ते शहरी माणसापेक्षा अधिक कष्टमय, दु:खभोगी व अनेक अनेक पटिने अभावग्रस्त असे आहे. आणि म्हणून सर्वप्रथम महात्मा फुले यांनी या प्रश्नांकडे लक्ष वेधले त्यांच्या मते ग्रामीण जीवनाच्या केंद्रस्थानी शेतकरी आहे. कारण शेती हाच मुख्य व्यवसाय असून ती जर पिकली नाही तर सर्वत्र बरबादी होते. हे ग्रामजीवनाचे सुत्र आहे. अशा शेतकऱ्यांच्या शोषणाला त्यांचे अज्ञानच कारणीभूत आहे. अशी त्यांची ठाम धारणा होती त्यामुळे त्यांच्यात आत्मभान निर्माण करण्याची आवश्यकता आहे. आणि यासाठीच म. फुले यांनी ''शेतकऱ्यांचा आसूड'' हा ग्रंथ लिहीला. त्यात त्यांनी शेतकऱ्यांच्या दैनावस्थेचे, हतलि मनोवस्थेचे, वास्तवदर्शी व चित्रमयी वर्णन म. फुल्यांनी केलेले आहे. आणि यातच खऱ्या अर्थाने आधुनिक ग्रामीण साहित्याची बीज आपल्याला पहायला मिळते.

कालातंराने महाराष्ट्रात पुन्हापुन्हा येणारा दुष्काळ आणि या दुष्काळातही स्वत:च्या स्वार्थासाठी कष्टकरी शेतकऱ्यांची अमलदाराकडुन होणारी पिळवणूक व छळ याचे चित्रण केलले दिसुन येते. तसेच अज्ञानी दारिद्रय, धर्मभोळ्या, कष्टकरी ग्रामीण माणसांच्या लुबाडणूकीचे चित्रणही केलेले दिसून येत. परंतू या दोन्ही घटना जाणिवपूर्वक निर्माण केलेल्या नव्हत्या. तात्पर्य या काळात निर्माण झालेले साहित्य एक म. फुलेचा अपवाद वगळला तर खऱ्या अर्थाने ग्रामीणांच्या संवेदनाशी निगडीत असे साहित्य नव्हतेच. निम्म स्तरावरचे जीवन जगणारा एक मोठा समाज आहे. याकडे कोणीही लक्ष दिले नाही.

परंतू १९२० ते १९२५ च्या दरम्यान उद्याला आलेल्या ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा एकूनच मराठीसाहित्यापेक्षा वेगळ्या आहेत. किंबहूना गांधीवाद ही ग्रामीण साहित्याची प्रेरणा आहे. असा परिणाम इतर साहित्यावर दिसत नाही. भारत हा खेड्याचा देश असल्यामुळे खेड्यातील जनता कष्ट करते. हाल सोसते. व शेतीतून पीक काढते. त्यांनी पिकविलेल्या शेतीवर, शेतीच्या अनधान्यावर शहरे जगतात. खरी संस्कृती खेड्यातच आहे. आणि म्हणूनच खेड्यातील जीवनानुभव घेतला पाहिजे. या जाणिवेतून गांधीजींनी सर्वांनाच खेड्याकडे चला अशी हाक दिली. सर्वच मंडळीनी खेड्याकडे लक्ष द्यायला सुरवात केली. ग्रामीण जीवनातील विषमता, दारिद्रय, अनिष्ठ रूढी आणि परंपरानिष्ठता, अभिमानशून्यता इ. नष्ट करून त्यांची अस्मीता जागृत करण्याचे, आत्मभान देण्याचे प्रयत्न सुरू झाले. सर्वच विचारसरणीच्या मंडळीनी आपला मोर्चा खेड्याकडे वळविल त्यामुळे एकूणच ग्रामोध्दाराचेच वातावरण निर्माण झाले.

या बदलाचा परिणाम साहित्यावर झाल, खेडे, त्यातील परिसर, निसर्ग या साहित्य सिध्दांताचे दर्शन घडवून नानिन्याचा प्रत्यय देणारा व वाचकांचे कुतूहल जगविणारा एक लेखकवर्ग निर्माण झाला. तर दुसऱ्या लेखकवर्गाने ग्रामीण जीवनासंबंधाने काही नविन अंदाज बांधून समस्या निश्चित केली. तेथील ग्रामजिवन, निसर्गरम्य वातावरण, लेखक मनाला जाणवणाऱ्या समस्या या साहित्य सिध्दांतांना घडून लेखक करावयास प्रारंभ केल.

१९२५-४० या काळात निर्माण झालेल्या ग्रामीण साहितकडे बघीतले तर १९२०-२५ च्या काळात जी साहित्य सिध्दांत दिसतात त्याचा साहित्य सिध्दांताना धरून साहित्याची निर्मीती झाल्याचे दिसते. या सुमारास जी जनपदगीते किंवा ग्रामीण गीते लिहील्या गेली ती नाविन्यापोटी लिहीली गेली. त्यात ग्रामीण जीवनाचे वस्तुनिष्ठ दर्शन घडविले आहे. तसेच ते साहित्य आत्मप्रत्ययातून व रचानुभवातून अवतरलेले होते.

१९४०-४५ या काळात नजरेत भरावी अशी ग्रामीण कविता निर्माण झाली नाही. या पूर्वीच्या लेखकांनी केवळ ग्रामीण समाजाच्या सहानुभूतीपोटी परंतू शहरी मानसांच्या चष्म्यातून ग्रामीण जीवनाकडे बघीतले होते. त्यांना खऱ्या ग्रामीन जीवनाचे आकलनच झालेले नव्हते. परंतू भारताच्या कथासंग्रहाच्या क्रांतीमुळे ग्रामीन पातळीवरचा संघर्ष, ग्रामीन माणसाचा रांगडेपणा, रानदांउगेपणा, जुलूम, जबरदस्ती, रंगेलपणा आदी साहित्यासिध्दांताचा आधार केंद्रवर्ती ठेऊन कथा लिहील्या गेल्या. हळहळू या साहित्यसिध्दांतांमध्ये आणखी काही साहित्य सिध्दांत डोळ्यासमोर ठेऊन दिघे व ठोकड यांनी निसर्गाचे वर्णन, व्यक्तिवर्णन आदीच्या अनुषंगानी साहित्याची निर्मीती केली.

याच काळात कांदबऱ्यामधूनही ग्रामीण जीवनाचे साहित्यसिध्दांच्या अनुंषंगाने चित्रन करण्यात आले आहे. या माध्यमातुन ग्रामीण जीवनाच्या विवीधांगांना स्पर्श करणारे ग्रामीण खेडून माणसाबरोबरच ठाकूर, वारली, कातकरी आदीवासी जमातीचेही चित्रन करणारे लेखन करण्यात आले. परंतू ग्रामीण साहित्य सिध्दांताच्या चौकटीत स्वप्नरंजन, तत्वज्ञान, अद्‌भूतता इ. च्या मुक्त वापराने कमी अधिक प्रमाणात तडा देऊन डागाळण्याचा प्रयत्न केला. तसेच काहींच्या लेखनातून ग्रामीण माणसाची होणारी उपेक्षा त्यांच्या हालअपेष्टांचे चित्रण करण्यांचा प्रयत्न केला त्यामुळे साहित्य सिध्दांताच्या स्पर्शाने लेखन केले गेले असे म्हणता येईल.

ग्रामीण साहीत्याची प्रेरणा व स्वरूप यात १९२५ च्या दरम्यानातील ग्रामीण साहीत्याच्या प्रेरणा व स्वरूपाशी साम्य दिसते. ग्रामीण जीवनातून फुलणारे, ग्रामीन वास्तवातून सादर होणारे साहित्य म्हणजेच ग्रामीन साहीत्य असे म्हणता येईल. काळ व परिस्थिती बदली तरी आजही ८० टक्के जनता खेड्यापाड्यात म्हणजे ग्रामीण भागात राहते. तेव्हा या ग्रामीण भातून सर्व दुर परसरलेल्या समाजाची स्वत:ची अशी एक संस्कृती निर्माण झालेली दिसते. म्हणजे आज ग्रामीण भागातून एकत्र कुटूंबपध्दती मोडतांना दिसतो आहे. त्याला कारणेही तशीच आहेत. पण जातीव्यवस्था नष्ट झाली नाही तीची स्वतंत्र संस्कृती दिसते. म्हणजेच या पार्श्वभूमीवर एकूणच ग्रामीण साहित्यात परिवर्तन झालेले दिसते. जीवनातील वास्तव सूक्ष्म व विवीधांगानी मांडले जाऊ लागले. या वस्तुनिष्टतेबरोबरच अनुभवनिष्ठ विचारात घेऊन लेखन केले जाऊ लागली. मानवी मनाच्या दर्शनाला तानतणावाला भाववस्थेला महत्व देऊन निर्मीती होऊ लागल्यामुळेच अंतर्गुख व आत्मनिष्ठ, शुध्दकलवादी साहित्य निर्माण होऊ लागले. यात ग्रामीण माणसाचे मन त्याचे चालणे, बोलणे वागणे, भोवतालचा परिसर, त्याची संस्कृती या सैध्दांतीक आधारावर ग्रामीण कथा निर्माण होऊ लागली. त्यात मानवी मनाची गुंतागुत व त्यांची ग्रामीण जीवनाशी जूळलेली पदर व त्यातून त्याच्या जीवणाला प्राप्त झालेले परिणाम याचे भान व आकलन झालेले ग्रामीण साहित्य निर्माण केल्या गेले.

१९६०-१९७० सर शतकात लोकप्रीय ग्रामीण साहित्याचे दशक मानले जाते. कारण या काळात ग्रामीण वातावरणात बरेच बदल घडून आले. त्यामुळे या दशकातील लेखकांनी ग्रामीण वास्तवाबरोबरच ग्रामीण मानसाच्या मूलभूत जाणिवा व्यक्त करू लागले. याशिवाय यंत्र व विज्ञान यामुळे खेड्यात झालेल्या सुधारणा बदल, बदल व त्यातून निर्माण नविन समस्या ग्रामीण मनावर झालेल परिणाम आदी सैध्दांतीक आधारांना समोर ठेऊन ग्रामीण साहित्याची निर्मीती होऊ लागली.

काही लेखक नव्या जोमाने व विचाराने साहित्य निर्मीती करू लागले. या काळात खऱ्या अर्थाने ग्रामीण साहित्याची चळवळ सुरू झाली. ग्रामीण जीवनातील दु:ख आणि समस्या यांचे स्वरूप बदलत होते. व याच बदलचे दर्शन ग्रामीण साहित्यामध्ये होऊ लागले. म. फुले राजर्षी शाहु महाराज, वि. रा. शिदे, डॉ. आंबेडकर, कर्मविर भाऊराव पाटील इ. च्या विचारांशी ग्रामीण साहित्याची बांधीलकी असून याच बांधीलकीतून सावकार, धरणग्रस्तांचे प्रश्न, दुष्काळामुळे होणारी होरपड,

शासकीय योजनामधून घडणारे अपहार आणि ग्रामीण माणसाला त्यापासून वंचीत ठेवणारी वृत्ती, शैक्षणिक संस्थामधील, गैरव्यवहार इ. चे चित्रण बदलत्या परिस्थीतीनुरूप लेखक करू लागले.

१९८० नंतर मात्र माणसाच्या शोषणयुक्तीसाठी महाराष्ट्रात घळणाऱ्या घटनांचा परिणाम ग्रामीण साहित्याच्या लेखनावर दिसू लागले. नविन व जुन्याही लेखकांनी या गोष्टीची दखल घेतलेली आहे. तसेच कथा कांदबरीकारांनी आजच्या ग्रामीण समाजाचे निकडीचे प्रश्न आणि ग्रामीण भागातील राजकारण, ग्रामीण माणसाच्या अपेक्षाभंगाचे दु:ख, तरूण ग्रामीण मनाचा उद्रेक आपल्या ग्रामीण साहित्यातून प्रकट केलेले आहे. तसेच नव्या ग्रामीण साहित्यीकांनी ग्रामीण साहित्याची भूमी खऱ्या अर्थाने संपन्न करण्याचे कार्य केले आहे.

वरील सर्व विवेचनावरून सर्व साहित्यनिर्मीतीत ग्रामीण साहित्य सिध्दांताचा स्पर्श झालेल आहे. यात एकूणच ग्रामीण माणसाच्या शोषणात सहभागी असणाऱ्या वृत्ती-प्रवृत्तीचा, घटकांचा विरोध करण्यासाठी कष्टकरी शेतकरी, शोषीत समाजात कसा संघर्ष करावा लागला यासाठी ग्रामीण साहित्यीकांनी आपली लेखनी झिजविली आहे. अर्थात ग्रामीण साहित्यांच्या चळवळींने जून्या थोर समाज सेवकांचे व विचारवंताचे विचार जसेच्या तसे न स्विकराता जेवळे आणि जे आवश्यक वाटते तेच काळाच्या पातळीचा विचार करून आपल्या साहित्यातून मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

पूर्वीच्या शोषणकर्ता बदलू लागला तो आता तेवढा समर्थ राहलेला नाही. परंतु परिस्थिती बदलत गेली. आणि आता लोकशाहीच्या नावाखाली राजकारण करून सत्तास्थाने व अर्थस्थाने बदलविणारा शोषणवर्ग निर्माण झाला. या शोषकवर्गा कडून ची पिळवणूक थांबविणे हे तेवढे सोपे काम नाही. कारण घरातून माणूस अन्याय करीत असेल तर दाद कुठे मागायची असा प्रश्न निर्माण झाला.

पण स्वातंत्र्योत्तर काळात जन्मलेली व तारूण्यात पदार्पण केलेली पीढी दिशाहीन झाली होती. या उद्रेकाचा स्वर १९७५ नंतरच्या ग्रामीण साहित्यात उमटू लागल आणि आता १९९०-९२ च्या काळात ग्रामीण साहित्याने विद्रोहाचा सुर गांभीर्याने आवळायला सुरवात केली आहे.

सांराश —

ग्रामीण साहित्याचा विचार करता ज्या ज्या सामाजीक वाड़:मयीन व सांस्कृतीक वातावरणात ते तयार झाले ते वातावरण काळानुरूप, परिस्थितीनुरूप बदलत गेले. कारण या सगळ्या परिस्थितीचा प्रभाव ग्रामीण साहित्याच्या सैध्दांतीक आधारावरही पडत होता. त्या त्या अनुषंगाने सैध्दांतीक आधाराचे स्वरूप व व्यापकता बदलत गेली. कारण प्रत्येक कालखंडात उद्यास येणाऱ्या ग्रामीण साहित्यीकांनी त्या त्या काळाचे, युगभान व आत्मभान ओळखले आहे. व जसा जसा बदल होत गेला त्या त्या बदलाकडे बघण्याचा दृष्टीकोण त्यांच्या वाड़:मयात पहायला सापडतो. म्हणजेच म. फुले या थोर विचारंवतानी तयार केलेल्या ग्रामीण साहित्यापासून ते आजपर्यंतच्याच ग्रामीण साहित्यापर्यंत वाड़:मयीन सामाजीक व सांस्कृतीक नैसर्गिक साहित्य सिध्दांतामध्ये बदल घडत गेलेले आहेत.

संदर्भ :—

१. ग्रामीण साहित्य, वासुदेव मुलाटे
२. ग्रामीण साहित्य स्वरूप शोध, नागनाथ कोथापल्ले, मेहता पब्लिकेशन हॉउस सदाशिव पेठ पुणे

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 4.374
UGC Approved Journal Sr. No.48455

ISSN No. 2394-8426
Mar – 2018
Issue–I, Volume–VII

इतिहासाची सहाय्यकारी शास्त्रे (AUXILIARY SCIENCES OF HISTORY)

प्रा.डॉ.महेंद्र गायकवाड

प्रास्ताविक –इतिहास लेखनात ज्या विद्याशाखाची मदत होते. अशा विद्याशाखांना इतिहासाची सहाय्यकारी शास्त्रे म्हणता येईल. इतिहास लेखन करत असतांना आपण अशा काही विद्याशाखांना टाळू शकत नाही. त्याचे सहाय्य घ्यावेच लागते. इतिहासाचे सर्वांगीण दृष्टीकोनातून लेखन करतांना इतिहासाच्या सहाय्यकारी शास्त्राची जान असली पाहिजे. तेव्हाच सर्वांगीण दृष्टीकोनातून इतिहास लेखन होईल. इतिहास हा एक विषय नसून सर्व विषयांना समाविष्ट करणारे वसतीगृह आहे असे म्हटले जाते. इतिहास मानवी जीवनाच्या सर्व घटकांचा अभ्यास करणारा विषय आहे. त्यामुळे इतर सामाजिक शास्त्रांशी इतिहासाचा संबंध येणे अपरिहार्य आहे. प्रत्येक ज्ञानशाखा कितीही स्वतंत्र म्हटली तरी इतर ज्ञानशाखांशी थोड्या फार प्रमाणात संबंधीत असते तसेच ती इतर ज्ञानशाखांना काही प्रमाणात प्रभावितही करीत असते. इतिहासाचा इतर ज्ञानशाखांशी केवळ मानसशास्त्राशीच नव्हे तर भौतिक शास्त्रांशीही निकटचा संबंध आहे. सर्वार्थाने परिपूर्ण इतिहास संशोधक निर्माण व्हावयाचा असेल तर त्याच्या ज्ञानाच्या कक्षा रूंदावल्या पाहिजेत. विविध ज्ञानशाखांमध्ये त्याने प्राविण्य मिळविले पाहिजे. इतिहासकार जॉन्सनच्या मते, इतिहास सर्व सामाजिक शास्त्रांची पार्श्वभूमी किंवा संगम आहे.

शब्दबीज :कालगणनाशास्त्र,पुरातत्वशास्त्र, नाणेशास्त्र, भाषाशास्त्र, शिलालेखशास्त्र, मानववंशशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र,समाजशास्त्र मानसशास्त्र ई.

इतिहासाची सहाय्यकारी शास्त्रे पुढीलप्रमाणे आहेत.

1) कालगणनाशास्त्र (Chronology)

इतिहास लेखनात काळाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. इतिहासकाराने कालगणनेचे भान ठेवले पाहीजे. काळाशिवाय इतिहासाची चौकट तयार होत नाही. एखादी घटना केव्हा घडली हे सांगणे इतिहास लेखनात महत्त्वाचे असते. डॉ. शांता कोठेकर कालगणनेचे महत्त्व सांगतांना लिहितात की, ''घटनांचा समर्पक अन्वयार्थ लावण्यासाठी घटनांची नोंद कालक्रमानुसारच करावी लागते, अन्यथा कालविषर्यासाचा दोष निर्माण होतो.''[1]

इतिहासात काळ हा घटक महत्वाचा असतो मानव कसा उत्क्रांत होत गेला? मानवाची प्रगती व संस्कृतीचा उदय आणि विकास याचे वर्णन करत असतांना त्यासाठी लागलेला काळ निश्चित करण्याचे कार्य कालक्रमशास्त्र ही शाखा करते. प्रा. गफूर शेख लिहितात की, ''या पद्धतीमुळे भुतकालीन घटनांचा काळ निश्चित करून त्याची सुसंगती लावली जाते त्यामुळे कालक्रमानुसार, सुसंगतवार आणि वास्तववादी स्वरूपाचा इतिहास लिहिणे शक्य होते.''[2] काळाची माहिती उपलब्ध करून देणारे कालगणनाशास्त्र इतिहासाचे सहाय्यकारी शास्त्र आहे. कालक्रमाचे महत्त्व सांगतांना प्रा. सुहास राजदेरकर लिहितात की, ''कालक्रमाचे महत्त्व हे मानवी डोळ्याप्रमाणे आहे. डोळे असल्याशिवाय आपल्याला काही दिसणार नाही म्हणजे डोळ्यांचे महत्त्व बघण्याशी संबंधीत आहे तसे कालक्रम व इतिहास यांचे आहे.''[3] कालक्रम नसेल तर त्या घटनांना काही अर्थच राहणार नाही. कालक्रमामुळे इतिहास अथपूर्ण होतो. एखादी घटना केव्हा घडली हे इतिहास लेखनात महत्त्वाचे असते घटनांचा समर्पक अर्थ लावण्यासाठी घटनांची नोंद कालक्रमानुसारच लावावी लागते.

2) पुरातत्वशास्त्र (Archeology)

लेखनकलेच्या उदयापूर्वीच्या काळाची माहिती पुरविणारे शास्त्र म्हणून पुरातत्वशास्त्राला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. प्राचीन संस्कृतीतील अवशेषांचा शोध या शास्त्राच्या मदतीने घेता येतो उत्खननात मिळालेल्या अवशेषांवर शास्त्रीय प्रक्रिया करून इतिहासाला माहिती पुरविण्याचे कार्य पुरातत्वशास्त्राला करावे लागते. या विद्येचा उपयोग सर्व प्रकारच्या प्राचीन अवशेषांच्या मानवी इतिहासाच्या बांधणीसाठी करावयाचा असतो. पुरातत्वशास्त्राच्या कार्याविषयी प्रा. गफूर शेख लिहितात की, ''भुपृष्ठाखाली गाडल्या गेलेल्या वस्तुंचा शोध घेऊन त्या ठिकाणी उत्खनन करणे, सापडलेल्या वस्तुंचा संशोधनात्मक स्वरूपाचा अभ्यास करणे आणि प्राचीन काळाविषयी ऐतिहासिक माहिती प्रसिद्ध करणे इत्यादी प्रकारचे कार्य पुराणवस्तुशास्त्र या विद्याशाखेमार्फत केले जाते.''[4]

प्राचीन संस्कृतीच्या अभ्यासासाठी आवश्यक साधने पुरातत्वशास्त्र शोधुन काढते. पुरातत्वाने इतिहासाला महत्त्वाची माहिती देऊन इतिहासातील वर्णन वाढविले आहे. पुरातत्वाच्या सामुग्रीशिवाय लिहिलेला इतिहास अपूर्ण व अप्रासंगिक असतो. डॉ. प्रभाकर गद्रे लिहितात की, ''पुरातत्वाची सामुग्री आणि समन्वेषण इतिहासाचा फार मोठा खजिना आहे याच साधनाच्या आधारे इतिहासाला प्रागैतिहासिक, आद्यैतिहासिक व ऐतिहासिक अशा तीन विभागात विभागता येते.''[5]

पुरातत्वाचे कार्य मानवी संस्कृतीचा विकास सादर करणे असतो ते इतिहासाला पुरकच आहे. पुरातत्वाने मिळणाऱ्या माहितीने इतिहासातील अनेक अंधविश्वासाचे खंडण होते. जगातील अनेक संस्कृत्यांचा परिचय पुरातत्वशास्त्रामुळे आपल्याला झाला आहे. सिंधू संस्कृती हे पुरातत्वशास्त्रातील एक अमोल वैशिष्ट्यपूर्ण संशोधन आहे. पुरातत्व विद्येचा मुख्य हेतू प्राचीन मानवी संस्कृतींचा अभ्यास करणे हे आहे. अलिखित संदर्भ साधनातील सर्वांत महत्त्वाचे साधन म्हणजे पुरातत्व विद्या होय. पुरातत्वशास्त्राच्या मदतीने इतिहासकार इतिहासाची निर्मिती करीत असतात.

डॉ. खुराना व डॉ. बंसल लिहितात की, "पुरातात्वीक जानकारीने इतिहास को ठोस आधार प्रदान किया है जिस पर तत्कालीन एवं बाद के इतिहासकारोंने अपने ऐतिहासिक ग्रंथों की रचना की है।"[6]

3) नाणेशास्त्र (Numismatics)

पूर्वीच्या काळी राज्यरोहण किंवा युद्ध विजय या प्रसंगाच्यावेळी नवी नाणी तयार केली जात. नाण्यांवर कोरलेल्या शब्दामुळे किंवा प्रतिमांमुळे त्या काळातील समाज जीवनाची माहिती मिळत आहे. नाणे कोणत्या धातूचे आहे यावरुन आर्थिक स्थितीचा अंदाज काढता येत असतो. नाण्यांवरून नाण्याचा काळ ते नाणे कोणत्या राज्यातील आहे इत्यादी माहिती प्राप्त होते. नाण्यांवरील राज्यकर्त्यांचे नाव, नाण्याचा आकार व ते नाणे कोणत्या प्रसंगी पाडले इत्यादी माहिती नाण्यांचा अभ्यास करून मिळविली जाते. नाण्यांच्या सहाय्याने काही कालखंड निश्चित करण्यात येतो. प्रा. गायकवाड डॉ. सरदेसाई आणि प्रा. हनमाने लिहितात की, "नाण्यांच्या सहाय्याने एखाद्या देशाचा इतिहास लिहिणे शक्य होते नाण्यांमुळे राजांची नावे, त्याचा कालखंड व त्यांनी कोणत्या प्रदेशावर राज्य केले याची माहिती मिळू शकते."[7] नाण्यांवरून त्या राज्याचा विचार व दृष्टीकोन समजत असे राजाचा कालखंड ठरविणे हे ही काम प्रामुख्याने होत असे. बऱ्याच वेळी त्या राज्याचा प्रदेश, विस्तार किंवा व्यापारी संबंध ठरविण्यासाठी नाण्यांची मदत होत असे.

4) भाषाशास्त्र (Philology)

आज वापरात असलेली भाषा, शब्द, वाक्यरचना यांचा विकास कसा झाला? त्या विकासाचे टप्पे कोणते यांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे भाषाशास्त्र होय. हे शास्त्र समाजाच्या विकासावरही प्रकाश टाकते. यामुळे गतकालीन मानवी समाजाच्या बौद्धीक उत्क्रांतीचा आलेख मांडता येतो. भाषाशास्त्राने इतिहासाला खुब मदत केली आहे. परंतु त्याचे महत्त्व अजूनही अभ्यासकांच्या लक्षात आले नाही. इतिहासाच्या अभ्यासकाला भाषाशास्त्राचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

भाषांचा अभ्यास करणारी विद्याशाखा म्हणून भाषाशाखाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. प्रा. गफूर शेख भाषाशास्त्राविषयी लिहितात की, "भाषाशास्त्राचे इतिहासावर अनेक परिणाम होतात ते म्हणजे सामाजिक उत्क्रांती होते. सांस्कृतिक विकास होतो. भाषेचा राजकारण व प्रशासनावर प्रभाव पडतो."[8] भाषेमुळे साहित्य निर्मिती होते ऐतिहासिक घटनांचा साहित्यात प्रवेश होतो. भाषाशास्त्राची इतिहास लिहिण्यास मदत होते. कारण ऐतिहासिक कागदपत्रे विविध भाषेतील असतात. इतिहासकाराला भाषाशास्त्राच्या मदतीने अनेक घटनांवर नव्याने प्रकाश टाकता येतो. भाषेतील त्या काळातील शब्दप्रयोग माहित असणे आवश्यक असते. डॉ. प्रभाकर गद्रे लिहितात की, "कोणता शब्द कोणत्या भाषेतून आलेला आहे. याची माहिती आपणास भाषाशास्त्रामुळे होतो."[9] त्यामुळे इतिहासकारांकडून अशी अपेक्षा असते की तो भाषाशास्त्रात पारंगत असावा.

5) शिलालेखशास्त्र (Epigraphy)

शिलालेख व ताम्रपट ही इतिहासाची उपयुक्त साधने होय. शिलालेखांवरील अंकीत मजकूर वाचण्याचे कार्य शिलालेखशास्त्र करते. शिलालेख अनेक लिपींमध्ये लिहिलेली असतात. प्राचीन राजे–राजवाड्यांनी त्यांच्या कारकिर्दीतील महत्त्वाच्या घटनांची माहिती शिलालेखावर कोरून लिहिलेली आहे. प्रा. गफूर शेख लिहितात, "अशा आलेखांचे वाचन करणे आणि त्यांचा उचित अर्थ लावणे हे कठीण कार्य असते त्यासाठी आपणास शिलालेखशास्त्राची मदत घ्यावी लागते."[10]

आलेखांचे संशोधन करणे, वाचन करणे हे काम शिलालेखशास्त्राद्वारे केल्या जाते. शिलालेखांच्या वाचनामुळे ऐतिहासिक माहिती मिळते. संक्षिप्त भाषेत लिहिलेले शिलालेख वाचणे हे कठीण काम हे शास्त्र करते. प्रा. सुहास राजदेरकर लिहितात की, "शिलालेखांच्या शोधामुळे प्राचीन इतिहासात मोलाची भर पडते यात शंका नाही."[11]

6) मानववंशशास्त्र (Anthropology)

मानवाच्या शारीरिक रचनेत कस कसे परिवर्तन होत गेले याचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे मानवशास्त्र होय. शारीरिक बदलास कोणती परिस्थिती कारणीभूत झाली असेल याचा विषयीचा अंदाज बांधता येतो. मानववंशशास्त्राविषयी डॉ. शांता कोठेकर लिहितात की, "माणसाच्या कवटीचा आकार, कपाळाची ठेवण, डोळ्यांचा व नाकांच्या हाडांचा आकार यांचे परीक्षण करून हे शास्त्र मानवाच्या शारीरिक उत्क्रांतीचे सर्व साधारण निष्कर्ष काढते. मानवाचे वेगवेगळे वंश कोणते होते. त्यांची शारीरिक वैशिष्टये कोणती याचा अभ्यास वंशशास्त्र करते."[12]

मानव वंश शास्त्रात मानवाच्या उत्पत्तीपासून आजपर्यंतच्या शारीरिक व सांस्कृतिक विकासाचा अभ्यास केला जातो. मानवाची उत्क्रांती होत असतानाच्या सर्व स्थित्यंतरांचा अभ्यास या शास्त्रात केला जातो. या शास्त्राच्या अभ्यासामुळे इतिहास लेखनासाठी अभ्यासयुक्त माहिती उपलब्ध होते.

7) राज्यशास्त्र (Political Science)

इतिहास म्हणजे गतकालीन राजकारण व वर्तमानकालीन राजकारण म्हणजे भावी इतिहास होय असे इतिहास व राज्यशास्त्राविषयी म्हटले जाते. इतिहास व राज्यशास्त्र यांचा एवढाच संबंध नाही तर राज्यशास्त्र आणि इतिहासाचा संबंध जवळचा आहे. इतिहास भुगोलाइतकेच हे दोन्ही विषय एकमेकांशी निगडित आहेत. राज्यशास्त्रामध्ये महत्त्वाचे घटक म्हणजे भुप्रदेश, लोकसंख्या, सरकार व सार्वभौमत्व हे घटक जेव्हा एकत्र येताच तेव्हाच राज्य अस्तित्वात येते. इतिहास व राजकारण यांचा परस्पर संबंध आहे.

राजकारण हे राज्यशास्त्र आणि इतिहास यांच्या अभ्यासाचे मुख्य स्त्रोत आहे. इतिहास मुळ आहे तर राज्यशास्त्र हे फळ आहे. राज्यशास्त्राचे ज्ञान असल्याशिवाय इतिहासकाराला भुतकालीन राजकीय घटनांचे ऐतिहासिक मुल्यांकन करता येणार नाही. राजकीय संकल्पना व राज्य संस्थांचे ज्ञान असल्याशिवाय राजकीय इतिहास लिहिता येणार नाही. डॉ. प्रभाकर गद्रे लिहितात की, ''राजकीय संस्थांच्या अभ्यासासाठी राज्यशास्त्राचा कच्चा माल इतिहासातूनच मिळतो.''[13]

राज्यशास्त्र इतिहासावर आणि इतिहास राज्यशास्त्रावर अवलंबून असतो इतिहास अनुभवाने शिक्षण देणारे राज्यशास्त्र आहे तर ज्या दर्शनाचे हे शिक्षण आहे ते बहुतांश राजकीय दर्शन आहे. राजकीय समस्या, राजकीय विचार व राजकीय चळवळीचाच इतिहास बनतो. राजकीय घटना इतिहासाचा मार्ग बनवतात. अनेक ऐतिहासिक घडामोडी व समस्यांची उत्तरे राज्यशास्त्रातून सापडतात याचप्रमाणे राज्यशास्त्राच्या अभ्यासाला इतिहासाची मदत होते. राजकारण इतिहासाला विषय पुरविले तर इतिहास गत राजकारणाला उजाळा देतो. डॉ. खुराना व डॉ. बंसल लिहितात की, ''इतिहास का राजनितिक विज्ञान के बिना कोई अस्तित्व नही है और राजनीतिविज्ञान बिना इतिहास जग विहीन है।''[14]

8) अर्थशास्त्र (Economics)

आर्थीक व्यवहार मानवी जीवनाचे अतिशय महत्त्वाचे अंग आहे. अनेक इतिहासकारांनी आर्थिक व्यवहारांवर विशेष भर देऊन गतकालीन मानवी जीवनाचा अन्वयार्थ लावला आहे. व्यापारवाद, वसाहतवाद आणि साम्राज्यवाद यामागेही अर्थकारण असते हे कार्लमार्क्सने शास्त्रीय पद्धतीने सिद्ध केले. त्यामुळे ऐतिहासिक घटकांचे आर्थिक दृष्टीकोनातून स्पष्टीकरण होऊ लागले. सामाजिक व्यवहारामागील आर्थिक हेतु मुलकता समजण्यासाठी अर्थकारणाची जाण आवश्यक असते. अर्थशास्त्रीय सिद्धांत जाणून घेणे आवश्यक असते. ऐतिहासिक प्रश्नांची उत्तरे आर्थिक माहितीचे संख्यात्मक विश्लेषण करणाऱ्या शास्त्राचा वापर करून मिळतात. डॉ. बी. एन. सरदेसाई लिहितात की, ''अर्थशास्त्र इतिहासाचा अभ्यास करून व्यक्तीचे दैनंदिन प्रश्न कोणते आहेत याचा विचार करते. अर्थशास्त्रीय सिद्धांत तपासण्यासाठी इतिहासाचा उपयोग होतो. इतिहासामध्ये व्यक्ती समाज यांच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करणे आवश्यक असते अन्यथा इतिहासाला पूर्णत्व येत नाहीत.''[15]

मार्क्सने मानवी समाजाच्या इतिहासाच्या विकासाचे नियम शोधून काढले यालाच ऐतिहासिक भौतिकवाद असे म्हणतात. मार्क्सने विरोध विकासाची पद्धती भौतिक वादाला व शेवटी इतिहासाला लावली हाच मार्क्सचा ऐतिहासिक भौतिकवाद होय. भुतकालीन मानवी घडामोडीवर आर्थिक घटकांचा प्रभाव पडलेला असतो. आर्थिक घटक इतिहास घडवतात. इतिहास जर वर्गकलह आहे व आर्थिक समस्या त्याचे मुख्य कारण आहे तर अशा इतिहासाचा अभ्यास करतांना आणि इतिहासाचा अभ्यास करतांना आणि इतिहास लेखन करत असतांना अर्थशास्त्राची मदत घ्यावीच लागते. कोणत्याही कालखंडाचा इतिहास लिहितांना तत्कालीन उद्योग, व्यापार आणि विनिमयाचे माध्यम तसेच आर्थिक व्यवहाराचा मागोवा घ्यावा लागतो. अशावेळी इतिहासाला अर्थशास्त्राची मदत होते.

मार्क्सच्या मते, संपूर्ण इतिहास आर्थिक संघर्षाचा इतिहास आहे. वैज्ञानिकांसाठी जशी प्रयोगशाळा तसेच अर्थशास्त्रासाठी इतिहासाचे महत्त्व आहे. इतिहासातील अनेक घटना आर्थिक पार्श्वभूमित होत असतात. मानवी जीवनावर आर्थिक घडामोडीचा परिणाम होत असतो परिणामी ऐतिहासिक घटनांवर त्याचा प्रभाव पडलेला दिसतो. समाजातील अनेक व्यक्ती आर्थिक हितसंबंधाने जोडलेल्या असतात. डॉ. खुराना आणि डॉ. बंसल लिहितात की, ''एक इतिहासकार के लिए अत्यन्त आवश्यक हो गया है कि वह अपने युग के आर्थिक ज्ञान को भली प्रकार जानकारी रखे ताकि वह तत्कालीन समाज की आर्थिक दशाओं का सही वर्णन कर सके।''[16]

9) समाजशास्त्र (Sociology)

समाजशास्त्र समाजाच्या घडणीचे शास्त्रीय दृष्टीने अभ्यास करणारे शास्त्र आहे. सामाजिक इतिहास लिहिणाऱ्याला ज्याप्रमाणे समाजशास्त्राचे मुलभूत ज्ञान आवश्यक असते त्याखेरीज लिखाणाला अचुकपणा येत नाही. मानवी समाजाचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करतांना इतिहासाकडे वळावे लागते. सामाजिक आंतरक्रियांचा सविस्तर अभ्यास करणे हाच समाजशास्त्राचा विषय असतो. इतिहास आणि समाजशास्त्र एकमेकांशी संबंधीत असते. त्यांची अभ्यासपद्धती सारखीच आहे. दोन्ही विषयाचा वर्णविषय एकच आहे. इतिहासात अद्वितीय घटनांचा क्रमवार अभ्यास करण्यावर भर दिला जातो तर समाजशास्त्रात वर्तमानातील मानवी संबंधाचा अभ्यास केला जातो. इतिहास वर्णनात्मक तर समाजशास्त्र विश्लेषणात्मक शास्त्र आहे. समाजशास्त्रास तुलनात्मक अभ्यास करतांना इतिहासाची मदत होते. समाजशास्त्राला काही वर्षांपूर्वीचा अभ्यास

करावयाचा असेल तर इतिहासाची मदत घ्यावी लागते. समाजशास्त्रात व्यक्तीचे महत्त्व सांगतात तर इतिहासामध्ये असामान्य व्यक्तीच्या चरित्रावर भर दिला जातो. प्रो. इ. जी. हॉवार्ड म्हणतात की, इतिहास म्हणजे भुतकालीन समाजशास्त्र तर समाजशास्त्र म्हणजे वर्तमानकालीन, भुतकालीन समाजशास्त्र तर समाजशास्त्र म्हणजे वर्तमानकालीन इतिहास होय. याचाच अर्थ असा की, इतिहास आणि समाजशास्त्र एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

संस्कृतीच्या उदयास्ताचे मुल्यांकन इतिहास व समाजशास्त्राच्या सहकार्याने शक्य आहे. इतिहासामध्ये कारण–मिमांसा ही समाजशास्त्राप्रमाणे केली जाते. इतिहास समाजशास्त्राला तथ्य पुरवितो त्याची समाजशास्त्रज्ञ व्याख्या करतात आणि समाजशास्त्रज्ञ इतिहासाच्या अभ्यासाला सामाजिक पार्श्वभूमी देतो. समाजशास्त्र व इतिहास एकमेकांपासून वेगळे करता येत नाही. दोन्हीची कार्यपद्धती सारखीच आहे. डॉ. खुराना व डॉ. बंसल लिहितात की, ''समाजशास्त्र समाज के अध्ययन में इतिहास की अत्याधिक सहायता कर रहा है जो केवल सामाजिक अध्ययन तक सिमित नही है अपितु निरन्तर सामाजिक परिवर्तन एवं विकास को भी प्रस्तुत करता है।''[17]

10) मानसशास्त्र (Psychology)

गतकालीन व्यक्ती किंवा घटनांचा अभ्यास करतांना त्या व्यक्ती किंवा घटनांचे मानसशास्त्र माहित असावे लागते. सामाजिक चळवळीचा इतिहास लिहिण्यासाठी मानसशास्त्राची मदत होते. महान व्यक्तींच्या कार्याचा आढावा घेतांना त्या व्यक्तिची मानसिकता समजून घ्यावी लागते. मानसशास्त्राच्या अभ्यासाचे इतिहास लेखनात महत्त्व वाढले आहे. ऐतिहासिक व्यक्तींची चरित्रे लिहिणाऱ्यांना मानवी मनाच्या व्यवहारांचे सुक्ष्म बारकावे समजण्यासाठी मानसशास्त्राची मदत घ्यावी लागते.

ऐतिहासिक घटनांचा मानवी मनाशी जवळचा संबंध असतो. ऐतिहासिक लेखनामध्ये व्यक्ती चारित्र्याला महत्त्व होते तेव्हा व्यक्ती व कार्य या सदराखाली संशोधक त्या व्यक्तीच्या मानसशास्त्राचाच अभ्यास करीत होता. इतिहासकाराने मानसशास्त्राच्या आधारे त्या घटनाक्रमामध्ये मनाने शिरून त्या घटना कशा घडल्या असतील त्याचे चित्र आपल्या लेखनीने उभे करणे आवश्यक आहे. आधुनिक काळात मानसशास्त्रीय निष्कर्षांचा आधार घेऊन इतिहासलेखन केले जाते. मानवी घटना क्रियेमुळे घडते. व्यक्तीकडून क्रिया होतात. क्रियेसाठी व्यक्ती प्रेरणेमुळे प्रेरीत होतो. प्रेरणा मिळविण्यासाठी प्रेरक घटक महत्त्वाचे असतात. घटना घडविणारी व्यक्ती घटना घडविण्यासाठी मानसशास्त्रीय प्रक्रियेतून जात असते म्हणून मानसशास्त्राचा इतिहासावर प्रभाव पडतो. इतिहासकाराला व्यक्तीरेख उभी करतांना व्यक्तीची मनोवृत्ती, व्यक्तीची मानसिकता याची कल्पना करतांना मानसशास्त्राची मदत होते.

इतिहास भुतकाळातील मानवी व्यवहाराचा व मानसिक हालचालींचा अभ्यास आहे. ऐतिहासिक घटने मागील व्यक्तींची प्रतिक्रिया काय होती याचा विचार इतिहासकाराला करावा लागतो. मानसशास्त्राच्या प्रभावामुळे ऐतिहासिक घटनेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. ऐतिहासिक घटना घडविणारी व्यक्ती एका विशिष्ट मानस शास्त्रीय प्रक्रियेमधून जात असते व्यक्तींची मनोवृत्ती साक्षात उभी करण्याचे काम मानसशास्त्राच्या मदतीशिवाय होणे शक्य नाही. मानसशास्त्राच्या प्रभावामुळे ऐतिहासिक घटनेकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला ही गोष्ट सिद्ध होते.

11) तत्वज्ञान (Philosophy)

इतिहासाला शैक्षणिक मुल्य असल्यामुळे गतकालीन घडामोडीतून काही सारभूत तत्वे मांडता येतात. मानवी जीवनाचे सैद्धांतीक दर्शन घडविणारे शास्त्र म्हणजे तत्वज्ञान होय. फ्रेंच तत्त्वज्ञ व्हाल्टेअरने इतिहासाचे तत्वज्ञान ही संकल्पना मांडली आहे. गतकालीन समाज जीवनांचा व्यापकपणे अभ्यास करून त्यातून काही सार्वकालीन सिद्धांत इतिहास क्षेत्रातील विचारवंतांनी मांडले तत्वज्ञांनाही भुतकाळात प्रतिपादन करण्यात आलेल्या सिद्धांताचा, विचारांचा मागोवा घ्यावा लागतो. जीवनदर्शन घडविण्यास त्यांची मदत होते.

भारतात वैदिक, जैन, बौद्ध, इस्लाम, शिख आणि ख्रिश्चन तत्वज्ञान भारतात बहरले या तत्वज्ञानाचा आणि इतिहासाचा फार जवळचा संबंध आहे. हे दोन्ही विषय धर्मनिरपेक्ष आहे. दोन्ही धर्मांचा अभ्यास करतात. धार्मिक प्रेरणा हा एक अभ्यासाचा विषय आहे. ही प्रेरणा वेगवेगळ्या पद्धतीने कसे कार्य करते हा इतिहासाचा एक अभ्यास विषय आहे. डॉ. खुराना व डॉ. बंसल लिहितात की, ''आधुनिक समय में विद्वानोंने मानव के क्रियाकलापो के साथ–साथ उसके परिवेश को जानकर मानव–मस्तिस्क की विचारधारा को भली प्रकार जानने के जो प्रयास किये, उसके आधार पर इतिहास धिरे–धिरे दर्शन का स्वरूप ग्रहण करता जा रहा है।''[18]

12) साहित्य (Liturature)

सुरूवातीला इतिहास हे साहित्याचे अंग होते. मानवी जीवन दोन्ही विषयाचा अभ्यास विषय आहे. साहित्यीक मानवी जीवनाचे चित्र रेखाटतो तो इतिहासकार मानवी जीवनाचे दर्शन घडवितो. इतिहास साहित्याला वर्ण्यविषय देतो. इतिहासकाराला काही साहित्यीक गुणांची गरज असते. रांकेच्या इतिहास लेखनातही कल्पनेचा वापर झाल्याचे दिसून येते. साहित्यातील भाषाप्रभूत्व इतिहासकारात असणे उपयुक्त ठरते.

इतिहासकाराचे भाषा प्रभूत्व, शब्दार्थांच्या सुक्ष्म छटांची जान हे गुण लेखन प्रभावी करण्यासाठी आवश्यक ठरतात. ऐतिहासिक घटनांचा साहित्यावर व साहित्याचा इतिहासावर परिणाम होत असतो. ऐतिहासिक घटनांचा साहित्यामध्ये प्रवेश होतच असतो. साहित्यामध्ये ऐतिहासिक संदर्भ असतात. ऐतिहासिक कादंबऱ्या आपल्याला इतिहास व साहित्य यांचा संबंध सांगतात.

इतिहास जीवनाचा हिशेब आहे तर साहित्य जीवनाचे प्रतिबिंब आहे. इतिहासाला शास्त्रीय स्वरूप दिल्यावरही साहित्याशी इतिहासाची नाळ तोडता आलेली नाही. इतिहास मानवाच्या कार्याचा हिशेब आहे तर साहित्य मानावाचा विचार व भावनाचा आरसा आहे एका शिवाय दुसऱ्याचा अभ्यास अशक्य आहे. इतिहास ज्या वस्तुंचे वर्णन करतो. त्याचेच साहित्य चित्रण करते. ऐतिहासिक कादंबऱ्यांशी इतिहासला रूचकर बनवून त्याची लोकप्रियता वाढविली तसेच इतिहास समजण्याचा नव दृष्टीकोन दिला. इतिहासाच्या अंधकारमय युगात साहित्व आपला खरा मार्गदर्शक आहे. त्यामुळेच आपण भुतकाळाचे अंधूक दर्शन घेऊ शकतो. इतिहासातील अनेक बदल साहित्यामुळे झाले आहे.

इतिहास साहित्याला वर्ण विषय देतो गतकाळातील महान व्यक्तींची चरित्रे, ऐतिहासिक प्रसंगावर आधारीत कादंबऱ्या लघूकथा, नाटक हे लोकप्रिय साहित्य प्रकार आहेत. इतिहासकाराला काही साहित्यीक गुणांची गरज असते. ऐतिहासिक सत्यकथन रंजकपने केल्यास तो परिणामकारक ठरते.

13) भुगोल (Geography)

भुगोलाच्या अभ्यासाशिवाय इतिहासाचा अर्थ कळणे दुर्लक्ष असते. इतिहासातील स्थळ भुगोल स्पष्ट करीत असतो. भौगोलिक घटक मानवी जीवनाचे स्वरूप ठरवितात. गतकालीन मानवी समाजाचा इतिहास अध्ययनासाठी भौगोलिक स्थितीचा अभ्यास आवश्यक ठरतो पर्यावरणाच्या अभ्यासातून जटिल वाटणाऱ्या अनेक ऐतिहासिक समस्यांची उत्तरे हाती येतात. भुगोलाच्या अभ्यासकालाही इतिहासाची कास धरावी लागते. नैसर्गिक आपत्तींची नोंद इतिहास घेत असतो.

इतिहासाला अतिशय जवळचे शास्त्र भुगोल आहे. ऐतिहासिक घटना भुपृष्ठावर घडत असल्याने भुगोलाचा इतिहासाशी जवळचा संबंध आहे. प्रत्येक राष्ट्र आपल्या देशाच्या भवितव्याचा विचार भुगोलाच्या संदर्भात करीत असतो. ऐतिहासिक वर्णन काल या संकल्पनेशी निगडित असते तर भुगोलाचे वर्णन स्थळ या संकल्पनेशी संबंधीत असते. अनेक ऐतिहासिक ग्रंथाची सुरूवात भौगोलिक माहितीने होते. इतिहास कथन करीत असतांना प्राकृतीक भुगोलाचे वर्णन आवश्यक असते. भुगोलाचा इतिहासाशी असलेल्या संबंधाविषयी डॉ. बी. एन. सरदेसाई लिहितात की, "भौगोलिक वर्णनाशिवाय इतिहास म्हणजे निव्वळ कथाकथन होय. स्थळ व काळ यांच्या संबंधामध्येच इतिहासाचे लेखन झाले पाहिजे. स्थळ म्हणजे भुगोल व काल म्हणजे इतिहास असे सोपे समिकरण आपल्याला जोडता येते."[19]

भुगोलाचा व रणभूमीचा जवळचा संबंध आहे. युद्धे ही भुगोलावरच होत असल्याने भौगोलिक परिस्थितीवर राष्ट्रांचे भवितव्य अवलंबून असते. भौगोलिक परिस्थितीचा प्रभाव मानवी जडण–घडणावर पडत असतो. जशी सभोवतालची परिस्थिती असेल तसा माणूस घडत जातो. कोणत्याही देशाच्या जडण–घडणीत भुगोलाचे योगदान अत्यंत महत्वाचे असते. भौगोलिक परिस्थितीनुरूप मानव घडत जातो. स्थळ आणि काळ या मानवी गरजा पूर्ण करण्याचे कार्य भुगोल आणि इतिहास संयुक्तपणे करतात. भौगोलिक चढ–उतारांचा प्रभाव इतिहासावर पडतो. भुगोलाशिवाय इतिहास घडूच शकत नाही.

भुगोलाच्या रंगमंचावर इतिहासाचे नाटय घडत असते. भुगोल आणि कालक्रम हे इतिहासाचे दोन डोळे असतात. काळ आणि स्थळामुळेच इतिहासाला योग्य संदर्भ मिळतो. दोन्ही विद्याशाखांची एकमेकांशिवाय कल्पना करणे अशक्य आहे. कोणत्याही समाजाचा किंवा देशाचा इतिहास भुगोलाच्या संदर्भाशिवाय अपूर्ण आहे. इतिहास आणि भुगोल एकमेकांना पुरक आहेत. भुगोलाच्या अध्ययनाशिवाय इतिहासाचे अध्ययन अपूर्ण आहे. भुगोलामुळे इतिहास आणि इतिहासामुळे भुगोल घडतो. भुगोलाच्या सर्वांगीण ज्ञानाशिवाय इतिहासाचे अध्ययन परिपूर्ण होत नाही. जर आपल्याला विशिष्ट प्रदेश किंवा देशाचा इतिहास समजून घ्यायचा असेल तर त्या प्रदेश किंवा देशाचा भुगोलाचे ज्ञान आवश्यक आहे.

14) मुर्तीकलाशास्त्र (Iconography)

भारतात अनेक देवी–देवतांची मंदिरे आहेत. या मंदीरामध्ये अनेक प्रकारच्या मुर्ती आहेत. त्या मुर्ती कोणत्या देवतांच्या आहेत. मुर्तीचे आकार व त्यांचे भाव आणि त्या घडविण्याची पद्धती यावरून विविध धर्माच्या उपास्य देव–देवतांची माहिती मिळते तसेच समाजातील धार्मिक रूढी व चालीरिती आणि परंपरा इत्यादी विषयी माहिती त्या मुर्तीमुळे मिळते अशी माहिती काढणे आणि तिचा व्यवस्थित संदर्भ लावणे ही कामे मुर्तीकलाशास्त्र करते या माहितीमुळे तत्कालीन समाजाचा इतिहास लिहिता येतो.

मुर्तीकलाशास्त्राद्वारे मुर्तीचा काळ ठरविता येतो. त्या काळातील देव, धर्म, उपास्य देवता व त्यांच्याबद्दल समाजात संमत असलेल्या रूढी आणि परंपरा याची कल्पना करता येते. मुर्तीच्या हावभावावरून मुर्ती निर्माण कलेचा अंदाज येतो. कोणती मुर्ती कोणत्या दगड प्रकाराची आहे हे समजू शकते. या शास्त्राच्या आधारे तत्कालीन समाजातील सांस्कृतिक व सामाजिक परंपरा समजू शकतात.

15) मुद्राशास्त्र (Sigillography)

प्राचीन काळातील मुद्रांचा आकार व त्यावरील मजकुर किंवा चित्राकृती यांचा अभ्यास मुद्राशास्त्र करते. या शास्त्रामुळे मुद्रा कोणत्या राजाची आहेत. राजाचा काळ कोणता आहे हे आणि ते राज्य मांडलिक आहे का सार्वभौम आहे. संबंधीत अधिकारी व सरदार कोण होता ही माहिती समजते. मुद्रांवरील चित्रावरून किंवा मजकुरावरून राज्यकर्त्याचा धर्म व आराध्य दैवत याची माहिती मिळते. या माहितीचा इतिहास लेखनात उपयोग होतो.

मुद्राच्या अभ्यासावरून राजाचा एकूण सर्वसाधारण दृष्टीकोण समजण्यास मदत होते अनेक वेळा राजाची आर्थिक परिस्थिती देखील समजते. ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये अनेक लोकांच्या अनेक मुद्रा उठवलेल्या असतात त्यावरून त्या व्यक्तीचा उद्देश समजतो. मुद्रेवरून जसे धोरण समजते तसेच त्यांचा दृष्टीकोणही समजतो बऱ्याच वेळा राज्याची आर्थिक परिस्थिती समजते. मुसलमानी आमदानीत प्रत्येक कागदपत्रावर मुद्रा उठवत असत त्यामुळे कागदपत्रांची सुसंगती लावणे शक्य होते तसेच त्या राज्याचा सांस्कृतिक दर्जासुद्धा स्पष्ट होतो.

16) हस्ताक्षरशास्त्र (Pluology)

हस्तलिखिताचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे हस्ताक्षरशास्त्र होय. प्रत्येक शब्दाचा कसा बदल झाला. अक्षरात कसा बदल होतो याचा अभ्यास केला जातो. ऐतिहासिक कागदपत्रांचा अभ्यास करतांना त्याचा अर्थ समजून घेण्यासाठी हस्ताक्षरशास्त्राचे मदत होते. हस्ताक्षरशास्त्र आणि इतिहासाचा खुब जवळचा संबंध आहे. हस्ताक्षरशास्त्रात स्थल, कालप्रमाणे हस्ताक्षरात बदल कसा होत जातो. त्याचा विचार केला जातो. हस्ताक्षर तज्ञ हा जुनी कागदपत्रे, शिलालेख, भुर्जपत्रे वाचतो व त्याचबरोबर प्रत्येक अक्षराचा विकास कसा झाला हे सांगू शकतो. हस्ताक्षर शास्त्राच्या अभ्यासाने संशोधकाची बुद्धी जास्त तिष्ठा बनते तसेच अनेक गुढ प्रश्न सुटतात हस्ताक्षरावरून व्यक्तीचा स्वभाव धर्म समजू शकतो. हस्ताक्षर तज्ञ ही जुनी कागदपत्रे वाचतो असे नव्हे तर प्रत्येक अक्षराचा विकासाविषयी माहिती देतो. एखाद्या व्यक्तीचा पत्रांचा संग्रह तपासला असता त्या व्यक्तीचा स्वभाव समजू शकतो.

17) नीतिशास्त्र (Ethics)

इतिहासलेखन करतांना ते नीतिशास्त्रास अनुसरून केल्यास असा इतिहास समाजाला वर्तमानकालीन समस्या सोडविण्यासाठी उपयोगी पडतो. नीतिशास्त्र इतिहासाचे महत्त्वाचे सहाय्यकारी शास्त्र आहे. नीतिशास्त्र समाजाला मार्गदर्शन करणारे शास्त्र आहे. इतिहास समाजिकशास्त्र असल्यामुळे हा विषय समाजाला मार्गदर्शन करतो. प्रा. गायकवाड, डॉ. सरदेसाई व प्रा. हनमाने नीतिशास्त्राविषयी लिहितात की, ''इतिहासाने सुद्धा घटनांचे वर्णन करीत असतांना काही नीतितत्वे सांगावित अशी अपेक्षा होती.''[20]

प्राचीन काळापासून काही इतिहासकारांनी घटनांचे वर्णन करून मानवी स्वभाव दर्शविणारी काही विधाने नीति बोधाच्या स्वरूपात लोकांच्या समोर मांडली.

18) जनगणनाशास्त्र (Demography)

अनेक ऐतिहासिक घटनांचा अभ्यास करण्यासाठी आणि त्याचा अर्थ समजावून घेण्यासाठी तसेच योग्य निष्कर्ष काढण्यासाठी जनगणनाशास्त्राची मदत होते त्यामुळे उत्कृष्ठ प्रकारे इतिहासलेखन करता येते. त्यामुळे जनगणनाशास्त्रसुद्धा इतिहासाचे महत्त्वाचे सहाय्यकारीशास्त्र आहे.

जनगणनाशास्त्र हे अनेक बाबींचा विचार करून निष्कर्ष काढत असते. या निष्कर्षांच्या आधारावर इतिहास संशोधक आपले निष्कर्ष पडताळून पाहतो.

19) संख्याशास्त्र (Statistics)

इतिहास संशोधन आणि लेखन करीत असतांना समाजशास्त्र आणि अर्थशास्त्र यांचा विषयीचा संख्यात्मक स्वरूपाचा प्रश्न उपस्थित झाल्यास तो प्रश्न सोडविण्यासाठी इतिहासकाराला संख्याशास्त्राची मदत घ्यावी लागते. इतिहासाने आपले लेखन प्रभावी करण्यासाठी संख्याशास्त्राचा वापर केल्यास त्याविषयी हरकत नसावी.

20) भौतिकशास्त्र (Physics)

इतिहास संशोधनात अलिकडे नव्या समस्या निर्माण होत असल्याने त्या समस्या सोडविण्यासाठी भौतिकशास्त्राची मदत घ्यावी लागते. कार्बन डेटिंगचा उपयोग करून ऐतिहासिक अवशेषांचे कालमान ठरविता येते. हाडांची शास्त्रीय परिक्षणे करून त्यावरून हाडे कोणाची आहे. याचा शोध घेतला जातो.

21) रसायनशास्त्र (Chemistry)

रसायनशास्त्रातील कार्बन डेटिंगचा उपयोग करून उत्खननात सापडलेल्या पुरातन ऐतिहासिक अवशेषांचा काळ निश्चित करता येतो. काळ इतिहासातील महत्त्वाचा घटक आहे. काळ निश्चिती केल्यानंतर त्या ऐतिहासिक अवशेषांच्या आधारे तत्कालीन घडामोडीचे अनुमान करता येते. अनुमान व तर्क यांच्या आधारे निष्कर्ष काढून इतिहासलेखन करता येते म्हणून रसायनशास्त्र हे इतिहासाचे अत्यंत महत्वाचे सहाय्यकारी शास्त्र आहे.

22) जिव विज्ञान (Biology)

जातीय आणि वांशिक वैशिष्ट्यांचा अभ्यास करतांना इतिहासाला जीव विज्ञानापासून उसणे घ्यावे लागते भारतातील जातीव्यवस्था, दक्षिण आफ्रिका, अमेरिका वगैरे देशातील रंगभेद हे सारे ऐतिहासिक तथ्य वंशशास्त्रावर आधारलेले आहे या पैलुंना जीवशास्त्राच्या मुलभूत अभ्यास केल्याशिवाय समजू शकत नाही.

23) लोकप्रशासन (Public Administration)

लोक प्रशासनात ज्या समस्यांचा अभ्यास होतो त्यांचाही स्वतःचा इतिहास असतो. इतिहास समजल्याशिवाय समस्या सुटू शकत नाही. भारतीय इतिहासात मौर्य गुप्त मोगल व ब्रिटिश काळात कोणते प्रशासन होते प्रशासन कोणत्या समस्या उत्पन्न झाल्या, समस्यांचे निराकरण कसे झाले याचा अभ्यास करता येतो. इतिहास प्रशासकांना भविष्याचा मार्ग दाखवितो. इतिहास पूर्वीच्या राजांच्या चुका व परिणाम सांगतो. डॉ. प्रभाकर गद्रे लोकप्रशासनाविषयी लिहितात की, ''महमद तुघलक, औरंगजेब सारख्या राज्यकर्त्यांनी काय चुका केल्या आणि सम्राट अशोक आणि अकबरने किती कौशल्याने लोकप्रशासन चालविले हे इतिहासावरून कळते इतिहास प्रशासकासाठी केवळ प्रयोगशाळाच नव्हे तर उपदेशक सुद्धा आहे.''[21]

निष्कर्ष–

इतिहास लेखन करत असतांना आपण अशा काही विद्याशाखांना टाळू शकत नाही. त्याचे सहाय्य घ्यावेच लागते. इतिहासाचे सर्वांगीण दृष्टीकोनातून लेखन करतांना इतिहासाच्या सहाय्यकारी शास्त्राची जान असली पाहिजे. तेव्हाच सर्वांगीण दृष्टीकोनातून इतिहास लेखन होईल. इतिहास हा एक विषय नसून सर्व विषयांना समाविष्ट करणारे वसतीगृह आहे असे म्हटले जाते. इतिहास मानवी जीवनाच्या सर्व घटकांचा अभ्यास करणारा विषय आहे. त्यामुळे इतर सामाजिक शास्त्रांशी इतिहासाचा संबंध येणे अपरिहार्य आहे. प्रत्येक ज्ञानशाखा कितीही स्वतंत्र म्हटली तरी इतर ज्ञानशाखांशी थोड्या फार प्रमाणात संबंधीत असते तसेच ती इतर ज्ञानशाखांना काही प्रमाणात प्रभावितही करीत असते. इतिहासाचा इतर ज्ञानशाखांशी केवळ मानसशास्त्राशीच नव्हे तर भौतिक शास्त्रांशीही निकटचा संबंध आहे. सर्वार्थाने परिपूर्ण इतिहास संशोधक निर्माण व्हावयाचा असेल तर त्याच्या ज्ञानाच्या कक्षा रूंदावल्या पाहिजेत. विविध ज्ञानशाखांमध्ये त्याने प्राविण्य मिळविले पाहिजे.

संदर्भग्रंथसूची

1) कोठेकर डॉ. शांता 'इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान' श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती 2005, पृष्ठ क्र. 29
2) शेख प्रा. गफूर, इतिहास लेखन शास्त्र, प्रितम पब्लीकेशन्स, जळगाव, प्रथमावृत्ती 2007, पृष्ठ क्र. 55
3) राजदेरकर सुहास, इतिहास लेखनशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती 1998, पृष्ठ क्र. 25
4) शेख प्रा. गफूर, इतिहास लेखन शास्त्र, प्रितम पब्लीकेशन्स, जळगाव, प्रथमावृत्ती 2007, पृष्ठ क्र. 52
5) गद्रे डॉ. प्रभाकर, इतिहास लेखनाच्या परंपरा, श्री मंगेश प्रकाशन नागपूर, प्रथमावृत्ती 2004, पृष्ठ क्र. 38
6) खुराना डॉ. के. एल व बंसाल डॉ. आर के., इतिहास लेखन धारणाएँ तथा पद्धतीयाँ, लक्ष्मीनारायण अग्रवाल प्रकाशन, आगरा, सहावी आवृत्ती, पृष्ठ क्र. 33
7) गायकवाड, डॉ. सरदेसाई व हनमाने, इतिहास लेखनशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती 1996 पृष्ठ क्र. 69
8) शेख प्रा. गफूर, इतिहास लेखनशास्त्र, प्रितम पब्लीकेशनन्स, जळगाव, प्रथमावृत्ती 2007, पृष्ठ क्र. 57
9) गद्रे डॉ. प्रभाकर, इतिहास लेखनशास्त्र, सर साहित्य केंद्र, नागपूर, प्रथमावृत्ती 2013, पृष्ठ क्र. 54
10) शेख प्रा. गफूर, इतिहास लेखनशास्त्र, प्रितम पब्लीकेशनन्स, जळगाव, प्रथमावृत्ती 2007, पृष्ठ क्र. 53

11) राजदेरकर प्रा. सुहास, इतिहास लेखनशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती 1998, पृष्ठ क्र. 27
12) कोठेकर डॉ. शांता 'इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान' श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती 2005, पृष्ठ क्र. 32
13) गद्रे डॉ. प्रभाकर, इतिहास लेखनाच्या परंपरा, श्री मंगेश प्रकाशन नागपूर, प्रथमावृत्ती 2004, पृष्ठ क्र. 43
14) खुराना डॉ. के. एल व बंसाल डॉ. आर के., इतिहास लेखन धारणाएँ तथा पद्धतीयाँ, लक्ष्मीनारायण अग्रवाल प्रकाशन, आगरा, सहावी आवृत्ती, पृष्ठ क्र. 32
15) सरदेसाई डॉ. बी. एन, इतिहास लेखन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, तृतीय आवृत्ती 2011, पृष्ठ क्र. 78
16) खुराना डॉ. के. एल व बंसाल डॉ. आर के., इतिहास लेखन धारणाएँ तथा पद्धतीयाँ, लक्ष्मीनारायण अग्रवाल प्रकाशन, आगरा, सहावी आवृत्ती, पृष्ठ क्र. 29
17) कित्ता पृष्ठ क्र. 31
18) कित्ता पृष्ठ क्र. 34
19) सरदेसाई डॉ. बी. एन, इतिहास लेखन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, तृतीय आवृत्ती 2011, पृष्ठ क्र. 58
20) गायकवाड, डॉ. सरदेसाई व हनमाने, इतिहास लेखनशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती 1996 पृष्ठ क्र. 75
21) गद्रे डॉ. प्रभाकर, इतिहास लेखनाच्या परंपरा, श्री मंगेश प्रकाशन नागपूर, प्रथमावृत्ती 2004, पृष्ठ क्र. 49

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 4.374
UGC Approved Journal Sr. No.48455

ISSN No. 2394-8426
Mar – 2018
Issue–I, Volume–VII

घरेलु कामकरी स्त्रियांच्या समस्या

प्रा.डॉ. माया बी. मसराम
शरदराव पवार कला व वाणिज्य महाविद्यालय,
गडचांदूर जि. चंद्रपूर

सारांश – स्त्री शिवाय मानवी समाजाची निर्मीती होऊ शकत नाही. प्राचिन भारतीय समाजात स्त्रियांचा दर्जा मानाचा,सन्मानाचा होता परंतु वेदकाळ किंवा मनुस्मृतीच्या काळात स्त्रियांना कोणतेही अधिकार नव्हते ती परावलंबित होती. भगवान बुध्दाच्या काळात स्त्रियांना पुन्हा समानतेचा दर्जा मिळाला. 20 व्या शतकात भारतीय संविधानाने स्त्रियांना पुरूषाच्या बरोबरीचे अधिकार दिले. स्त्री शिक्षणही घेऊ लागली, पण अजुनही स्त्रियांकडे पाहण्याची दृष्टि बदललेली नाही. आधुनिक काळात खालच्या वर्गातील स्त्रियांच्या कुटुंबातील उत्पन्न आणि मध्यम तथा उच्च वर्गातील स्त्रियांच्या कुटुंबातील उत्पन्न यात फार मोठा फरक आहे. खालच्या वर्गातील स्त्रिया आपल्या कैटुंबिक गरजा पुर्ण करण्यासाठी त्या मध्यम तथा उच्च वर्गातील कुटुंबात घरेलु काम करावे लागते. हे घरेलु काम करतांना आणि आपल्या कुटुंबातील गरजा पुर्ण करतांना त्यांच्या पुठे अनेक अनेक समस्या निर्माण होतात. जसे दारिद्र, उपासमार, आरोग्य, लैंगीक शोषन, वेठबिगारी, मुलांचे शैक्षणिक, सामाजिक सुरक्षिततेची समस्या चोरीचा आरोप अशा विविध समस्यांनी त्यांना ग्रासले असुन या विविध समस्यातुन बाहेर येण्याकरीता त्यांच्यात संघटन आणि खंबिर नेतृत्व निर्माण करावे लागेल.

बिज शब्द – प्राचिन, गुलामगीरी, मनुस्मृती, बुध्दकाळ, संविधान, खालच्या वर्गातील स्त्रिया, समस्या, नेतृत्वाचा अभाव, शासनातर्फे अर्थ सहारूय्य.

स्त्री ही मानवी उत्पतीची जननी आहे. तसेच स्त्री पुरूशाची अर्धांगीनी आहे. भारतात प्राचिन समाज व्यवस्थेमध्ये स्त्रीयांना मानाचे, समानतेचे, प्रतिश्ठेचे स्थान होते. बुध्द धम्माच्या तत्वज्ञानात तर स्त्रीला पुरेपुर समानतेचे अधिकार, स्वातंत्र, प्रतिश्ठा दिली जात होती. परंतु वेदकाळापासून मनुस्मृतीच्या निर्मितीमधून भारतीय स्त्रियांच्या अवनतीला गती प्राप्त झाली व त्यामध्ये अनेक प्रकारचे प्रतिबंध स्त्रीयांवर जाणिवपुर्वक सार्वत्रिक क्षेत्रामध्ये लावण्यात आले आहे. त्यामुळे भारतीय स्त्रियांची सार्वत्रीक क्षेत्रात पिछेहाट होवून अनेक सामाजिक समस्यांची निर्मिती झाली आहे.

भारताचा इतिहास सांगतो की प्राचीन काळात ब्राम्हणी धर्माने बंधनाची व गुलामगीरीची जी साखळी निर्माण केली होती ती बुध्द धम्माने नष्ट केली आहे. त्यामुळे भारतातील स्त्रीयाना भ.बुध्दाच्या धम्मानुसार बुध्दाने स्त्रीयांना पुरूषाच्या समवेत समानतेच्या दृष्टीकोनातुन समान दर्जा देवून भिख्खु संघामध्ये प्रवेष दिला. आणि पुरूषाच्या बरोबरीने त्यांना ज्ञान प्राप्त करण्याचा समान अधिकार दिला.

प्राचिन काळात स्त्रीयांना राजकीय सत्तेमध्ये तसेच अधिकारामध्ये राज्यभिषेक समारंभामध्ये राज्य रोहणामध्ये राजदरबारात पुरूषाच्या बरोबरीने समानतेचा दर्जा होता. व त्या प्रसंगी राजा देखील आपल्या पत्नीला सोबत घेऊन राज्याभिषेक करीत असे. व त्यामध्ये राज्यातील सर्व जनता स्त्रीयांना साष्टांग नमस्कार करीत. ज्यावेळी जगाातील कोणत्याही देशात इतका मानसन्मान मिळत नव्हता. त्यावेळी भारतातील स्त्रीयांना तो मिळत होता. त्यानंतर अवणती झाली. मनुने निर्माण केलेली मनुस्मृती व त्यामध्ये अनेक प्रकारचे लावलेले धार्मीक कायदे आणि जाचक निर्बंध यामुळे भारतातील स्त्रीयांची सार्वत्रीक क्षेत्रात अवनती झाली.

2011 च्या जनगणनेनुसार देशातील एकूण लोकांख्येत स्त्रियांचे प्रमाण 48.56 टक्के आहे. शेती तसेच सेवा क्षेत्रात, उद्योग व कारखाने यामध्ये स्त्रियांचे भरीव योगदान आहे. संविधानात स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने दिलेल्या अधिकाराचाच हा परिणाम आहे. भारतीय समाजाचा विचार केल्यास या समाजात स्त्रियांचा सामाजिक दर्जा वेगवेगळ्या कालखंडात वेगवेगळा दिसून येतो. प्राचिन काळापासून आजपर्यंत स्त्रियांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीत कशाप्रकारे बदल होत गेले व आजची स्थिती यावर विचार मंथन होणे आवश्यक आहे. भारताचे भवितव्य घडविण्यात प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे स्त्रीचे महत्वपूर्ण योगदान आहे. व हे सुर्यप्रकाशाइतकेच सत्य आहे.

अजूनही परंपरागत भारतीय समाजाची स्त्रीकडे पाहण्याची दृश्टि हिणकस आहे., असमानतेची आहे व स्त्रिला पुरूषापेक्षा कमी लेखण्याची आहे. पुरूषांपेक्षा स्त्रिचे स्थान दुयम आहे, तिला मिळणारी वागणूक निम्न प्रकारची आहे. घटनेच्या 15 व्या कलमानुसार स्त्री, पुरूष समानता मिळाली असली तरी दैनंदीन व्यवहारात मात्र तिच्याा वाटयाला असमानता आणि अन्याय येतो.

समाजातील खालच्या वर्गातील स्त्रियांचे अर्थांजन व समाजातील मध्यम वर्गीय, उच्च मध्यम वर्गीय स्त्रीचे अर्थांजन यांच्या दर्जात ही फरक आहे. कष्टकरी दलीत वर्गाचे अर्थाजन हे केवळ तिच्या कुटूंबाच्या पोश्नाकरीता असते. बऱ्याच मागासवर्गीय स्त्रियांच्या नवऱ्यांची कमाई केवळ दारू, जुगार यामध्ये खर्च होतो. तर स्त्रियांची कमाई अन्न, वस्त्र, निवारा सारख्या

मुलभुत गरजा यांच्यावर खर्च होते. तिला घरात व घराबाहेर दोन्ही ठिकाणी खस्ता खाव्या लागतात. मध्यम वर्गीय स्त्रिला अर्थजंनामुळे जे एक सामाजिक स्थैर्य व दर्जा प्राप्त झाला आहे. ते कामकरी स्त्रिच्या वाट्याला फारच कमी आलेले आहे. स्त्री–पुरूष समानता व आर्थिक स्वातंत्र ह्या शब्दांचे अर्थही अधिकतर काम करी स्त्रीयांना समजलेच नाहीत. कष्टाचा अतिरेक व त्या मूळे शारिरीक ऱ्हास अत्याच्याराची शिकार हि मोठया प्रमाणात काम करी स्त्रीच होतांना दिसते. समाजव्यवस्थेच्या तळाला असलेल्या काम करी स्त्रीच्या वाटयाला श्रमाचा मोटा वाटा व कमाईचा छोटा वाटा येतो. आर्थिक स्थितीचे वास्तव आहे तिच्या भाकरीचे तत्वज्ञान इतर स्त्रियांच्या भाकरीच्या तत्वज्ञानापेक्षा निच्छितच वेगळे आहे.

पुरूषप्रधान समाजव्यवस्था आणि पारंपारिक समाजातील बंधने तसेच धार्मिक निर्बंध यामधून आजही भारतीय मानूस बाहेर पडलेला दिसत नाही. त्यामूळे स्त्रियांना अनेक प्रश्नांना सामोरे जावें लागत आहे. त्याही पेक्षा आधूनिक समाजातील घरेलू स्त्रियांची स्त्रिती अत्यंत बिकट आहे. त्यांचा थोडक्यात आढावा पुढीप्रमाणे घेता येईल.

1) दारिद्रय–

भारतीय समाजात दारिद्रयांचे प्रमाण हे जवळपास 40 टक्के असून भारतातील कामकरी स्त्रीया या दारिद्रयात अनेक पिढयापासून खितपत पडलेले आहे.

2) उपासमर–

धरेलू कामकारी स्त्रीयांचे कामच मुळात वेठबिगार म्हणून समजल्यामुळे त्या कामाचा मोबदला अत्यंत कमी मिळतो. त्यामूळे त्यांच्या उदरर्निवाहच्या गरजाही योग्य प्रमाणात भागत नाहीत. भारतातील बहूतांश घरेलू कामगार स्त्रीया हया दैनंदिन स्वरूपात अर्धपोटी, उपवासी जीवन जगत आहे तसेच कुटूंबातील मुलांना देखील उपवास व कुपोषीत जिवन जगण्याच्या दृश्टीने भाग पडत आहे.

3) आरोग्य विशयक समस्या–

उत्पन्न अत्यंत कमी असल्यामुळे त्यांना आपल्या आरोग्याची काळजी घेणे शक्य होत नाही. भारतातील काम करी स्त्रीयांना कोणत्याहि प्रकारची आरोग्यविषयक सोयी सुविधा मोफम स्वरूपात मिळत नाही. त्यामूळे या महिला रक्तक्षय, टि. बी,कर्करोग, मधूमेह, हृदयरोग, मलेरिया, पिलीया या सारखा अनेक रोगानी मूत्युमुखी पडत आहेत.

4) लैगिक षोशण व अत्याचार–

धरकाम करणाऱ्या बहूतांश स्त्रिंयांवर घरमालक तसेच त्यांच्या कुटूबांतील अनेक व्यक्तीकडून दैनंदिन स्वरूपात बलात्कार, लैगिक शोषण, व अनेक प्रकारचे अत्याचार घडून येत नाहीत. उदा. उत्तर नागपूर मधील जरिपटका भागातील मनोरमा कांबळे अत्याचार.

5) वेठबिगारी व अत्याचार–

घरेलू कामाकरी स्त्रीयांना कामाच्या मोबदल्यात योग्य त्या प्रकारचे वेतन किंवा मजूरी दैनंदिन स्वरूपात पर्याप्त स्वरूपाची नाही. तसेच त्यांना वेठबिगारासारखे , हमालासारखे, विकृतीने व अमानवतेने जाणिवपूर्वक वागविल्या जात आहे. उदा – 50 ते 60 रूपये प्रति महिना. कामाचे तास सकाळी दोन तास सायंकाळी दोन तास.

6) मुलांचे शैक्षणिक नुकसान–

कामकरी स्त्रीयांचे पती हे व्यसनी तसेच अनेक व्यसनांनी ऐतखाऊ जीवन जगत असतात. त्यामूळे अशा कुटूबांतील महिलांना मुलांचे शिक्षण पालनपोशण करण्याकरीता बाहेर कामावर जावे लागते. तर दुसरीकडे कुंटूबातील मुलांकडे दुर्लक्ष होते. तसेच सोबत काम करण्यासाठी लहान अल्पवयीन मुला मुलीना देखील धूने भांडे करण्याकरीता घेवून जावे लागते. त्यामूळे कुटूबांतील मुलांकडे दुर्लक्ष होते त्यामूळे अषा कुटूंबातील मुले जवळपास 75 टक्के हे षिक्षणापासून वंचित होत आहे.

7) सामाजिक सुरक्षेची समस्या –

घरेलू कामगार स्त्रीयांना शासनातर्फे अधिकृत अशी कोणत्यही प्रकारची सामाजिक सुरक्षा अजून पर्यत प्रदान करण्यात आलेली नाही. त्यामूळे अनेक कामकरी स्त्रीया हया आजारी असतांना, अपघात असतांना, त्यांना कोणत्याही प्रकारची साप्ताहिक सूटट्री , आरोग्य लाभ, विमा, आणि सामाजिक सुरक्षा प्राप्त होवू शकत नाहि.

8)चोरीचा आरोप लावणे–

काम करी स्त्रियांना बहुतांश घरमालकाकडून अनेक प्रकारच्या चोरीच्या आरोपामध्ये समाविष्ट केल्या जात आहे. की ज्यामध्ये पैशाची चोरी दागदागिण्यांची चोरी, भांडे बर्तनाची चोरी, कपड्यांची चोरी व अन्य वस्तुंची चोरी करण्याचा आरोप निरपराध महिलांवरती लावल्या जात आहे.

9) संघशक्ती आणि नेतृत्वाचा अभाव–

घरेलु कामगार स्त्रियांच्या संदर्भात भारतीय समाजात राष्ट्रीय स्तरावर खंबीर नेतृत्व नाही. तसेच या कामगाार स्त्रियांचे राष्ट्रीय स्तरावर संघटन नाही. सत्ता व प्रशासनात यांचे प्रतिनीधी नाहीत. त्यामुळे त्यांच्या समस्यांना कोणीही प्रतिसाद देत नाही. आणि त्यांच्या समस्या सोडविल्या जात नाही. उदा. घरेलु कामगार विधेयक हे जवळपास 26 ते 27 वर्शाच्या दिर्घ कालावधीनंतर महाराष्ट्रात पारीत करण्यात आले.

निष्कर्ष व उपाय–

1) आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरावर महिला कामगार आयोग निर्माण करावे लागेल.

2) सत्ता व प्रशासनामध्ये त्यांचे प्रतिनीधी राखीव जागांपासून पाठविण्यात यावे.

3) जगातील सर्व घरेलु कामगार स्त्रियांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यात यावी.

4) महिलांनी घरेलु कामगार स्त्रियांच्या संदर्भात संघश्क्ती निर्माण करूण आपल्या न्यायीक हक्क व अधिकारांकरीता अविरत संघर्ष व लढा द्यावा.

5) घरेलु कामगार स्त्रियांना समानतेची, न्यायाची, तसेच मानवतेची सार्वत्रीक वागणुक द्यावी.

6) घरेलु कामगारांना उद्योग निर्मीतीकरीता व अनेक प्रकारच्या कार्याकरता शासनातर्फे अनूदान तत्वावर अर्थ सहाय देण्यात यावे.

संदर्भ

1) डॉ. अश्रु जाधव – ग्रामिण विकासातील आव्हाणे – सर साहीत्य केंद्र प्रकाशन नागपूर

2)डॉ. बि.एम. कऱ्हाडे – भरतीय समाज प्रश्न आणि समस्या – पिपळापुरे ॲन्ड कंपनी पब्लीशर्स नागनूर,2009

3) डॉ. गौतम मुन्शीलाल – बुध्दाचा मानवतेला संदेश – प्रकाशन सिध्दार्थ गौतम शिक्षण व सस्कृती समिती अलीगड,1987

4) कमलेशकुमार गुप्ता – महिला सशक्तीकरण – प्रकाशन बुक इनक्लेव जयपूर 2005

5) डॉ. सुभासचंद्र गुप्ता – कार्यशिल महिलाए एंव भारतीय समाज– अर्जून पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली, 2004

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 4.374
UGC Approved Journal Sr. No.48455

ISSN No. 2394-8426
Mar – 2018
Issue–I, Volume–VII

सर्व शिक्षा अभियानांतर्गत सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पध्दतीविषयी शिक्षकांची भुमिका

डॉ. राजेश शंकरराव पत्तीवार
सहाय्यक प्राध्यापक,
जनता शिक्षण महाविद्यालय, चंद्रपूर

प्रस्तावना :–

प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणासाठी व विस्तारासाठी तसेच गुणवत्ता वाढीसाठी केंद्र सरकारच्या सहाय्याने सर्व शिक्षा अभियानाची सुरूवात २००१–२००२ या कालावधीत झाली. हा उपक्रम अनेक कार्यक्रमाचे एकत्रिकरण आहे. सर्व शिक्षा अभियानात प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाचा कालबध्द कार्यक्रम असुन संपुर्ण देशभरातील विद्यार्थ्यांना दर्जेदार प्राथिमिक शिक्षण देण्याचा मानस होता. त्यामुळेच प्राथमिक शिक्षणाव्दारे सामाजिक न्याय वृध्दींगत करण्याची संधी मिळणार होती. या अभियानांतर्गत सर्व राज्यांना स्वत:च्या दृष्टिकोनातून प्राथमिक शिक्षणाचा विकास करण्याची संधी मिळणार होती. त्यानुसारच राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ आणि बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अन्वये महाराष्ट्र शासनाने ऑगस्ट २०१० साली सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पध्दतीचा अंगिकार केला.

शैक्षणिक मूल्यमापन म्हणजे विद्यार्थ्यांचे शिक्षण कितपत योग्य दिशेने झाले हे शोधणे. शैक्षणिक उद्दिष्टये किती प्रमाणात साध्य झाली हे तपासण्यासाठी योग्य ती संख्यात्मक आणि गुणात्मक माहिती गोळा करणे व त्याआधारे अभिप्राय देणे. या संपूर्ण प्रक्रियेला मूल्यमापन म्हणता येईल. सर्वसाधारणपणे मूल्यमापन म्हणजे लेखी परिक्षा. त्याव्दारेच विद्यार्थ्यांची संपादणूक कळते व त्याची गुणवत्ता ठरविली जाते असे मानले जाते. परंतु या प्रचलित मूल्यमापनामध्ये परिक्षा हे साधन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाच्या विविध पैलुंचा विकास तपासण्यासाठी व त्यांच्या सर्वांगिण विकास तपासण्यासाठी व अधिक प्रगतीबाबत मार्गदर्शन करण्यात अपूरे ठरते. परिक्षेचा भर फक्त स्मरण तपासण्याबर राहतो. त्यावर आधारित परिक्षा घेऊन त्याला पास अथवा नापास ठरविले जाते.

सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनात केवळ माहितीची ओझी न वाहता त्याचे वेळोवेळी मूल्यमापन होते. त्यांना येणाऱ्या अडचणींची दखल घेऊन त्यातून मार्ग काढता येतो. तसेच केवळ स्मरणाचा नव्हे तर आकलन, उपयोजन, सर्जनशिलता, कल्पकता या क्षमतांचा परिपूर्ण विचार होऊन बौध्दीक विकासाबरोबर शारिरिक कौशल्याचा विकास व भावनिक विकासाचे मूल्यमापन या सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनात होतो. या मूल्यमापन पध्दतीमूळे विद्यार्थ्यांवरील दडपण कमी होईल. प्रयोगशिलतेला वाव मिळेल. मूल्यमापन सातत्याने होत असल्याने शिक्षकांनाही आपल्या यअध्यापनातल उणीवा लक्षात येईल.

सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाचे दोन प्रकार आहेत.

१)आकारीक मूल्यमापन :– आकारीक मूल्यमापनात विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व आकार घेत असतांना नियमित करावयाचे मूल्यमापन होय. विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व आकार घेत असतांना ते आपल्या अपेक्षेप्रमाणे घडत आहे किंवा नाही याची नियमित पडताळणी अनेक साधनांव्दारे व तंत्रांव्दारे करतात.

२)संकलित मूल्यमापन :– संकलित मूल्यमापन म्हणजे ठराविक काळानंतर एकत्रित स्वरूपात करावयाचे मूल्यमापन. प्रथम व दुसऱ्या सत्रांच्या अखेरीस विषयाच्या उद्दिष्टानुसार लेखी, तोंडी, प्रात्यक्षिक प्रश्नांचा समावेश करून त्यांच्या प्रगतीचे मूल्यमापन करतात.

आवश्यकता व महत्व :–

सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची उद्दिष्टये जरी विद्यार्थी केंद्रीत व त्यांचा सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने ठरविण्यात आली असली तरी त्याची अंमलबजावणी व यश ही सर्वस्वी त्या विद्यार्थ्यांना शिकविणाऱ्या शिक्षकांवरच अवलंबून आहे. या संपूर्ण प्रक्रियेत शिक्षकांची भूमिका व त्यांचे मत काय आहे ? त्यांच्या पुढे कोणत्या अडचणी येतात ? अंमलबजावणी करतांना कोणत्या समस्या निर्माण होतात ? विद्यार्थ्यांच्या दडपण कमी करण्याचे उद्दिष्टे असल्यामूळे त्याचा विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर

कसा परिणाम होतो या विषयी माहीती आवश्यक ठरते. तसेच सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाबाबत शिक्षकांना त्याविषयी किती माहीती आहे या विषयी जाणून घेणे महत्वाचे ठरते. अन्यथा सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाचे उद्दिष्टय पूर्ण होणार नाही. या करीता प्रस्तूत संशोधन महत्वाचे आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :–

१) सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पध्दती बाबत माहीती जाणून घेणे.

२) सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पध्दती विषयी शिक्षकांची मते जाणून घेणे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :–

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती चंद्रपूर तालुक्यातील प्राथमिक स्तरावर सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन राबविणाऱ्या शिक्षकांपुरती असून प्रस्तुत संशोधन प्राथमिक स्तर वर्ग १ ते ८ वी पर्यत शिकविणाऱ्या शिक्षकांपूरते मर्यादित राहील.

संशोधन पध्दती :–

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षणात्मक संशोधन पध्दतीचा वापर सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाचा अवलंब करीत असतांना शाळा स्तरावर शिक्षकांची मते जाणून घेण्याकरीता करण्यात आला आहे.

न्यादर्श निवड :–

संभाव्यता पध्दतीतील सुगम यादृच्छिक न्यादर्श निवड पध्दतीप्रमाणे सातत्यपूर्ण सर्वंकष मुल्यमापन राबवित असणाऱ्या १०० शिक्षकांचा समावेश करण्यात आला.

संशोधनाची साधने व तंत्रे :–

प्रस्तुत संशोधनासाठी स्वत: तयार केलेल्या प्रश्नावलीचा वापर करण्यात आला. त्यात महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाने वेळोवेळी तयार केलेल्या माहिती हस्तपुस्तिकांचा वापर करून एकूण ४५ प्रश्न तयार करण्यात आले. प्रश्नावलीची अचूकता व विश्वसनियता पडताळून पाहण्यासाठी शिक्षकांकडून प्रश्नावली सोडवून घेतली व त्यातील असंबध्द, अयोग्य, संदिग्ध प्रश्न वगळण्यात आले.

संशोधनाची कार्यवाही :–

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीची निवड करण्यात आली होती त्यात चंद्रपूर तालुक्यातील संशोधनासाठी निवडलेल्या १०० शिक्षकांना नियोजनानुसार प्रश्नावली सोडविण्यस देण्यात आली. आलेल्या प्रतिसादावरून शेकडेवारी हे सांख्यिकीय तंत्र वापरून अन्वयार्थ लावण्यात आला व निष्कर्ष काढण्यात आले.

माहितीचे विश्लेषण :–

प्रस्तुत संशोधनामध्ये शिक्षकांसाठी तयार केलेल्या प्रश्नावलीला दिलेल्या प्रतिसादावरून प्रतिचाराचे गुणांकन करून शेकडा प्रमाण सरासरी टक्केवारी काढण्यात आली. उद्दिष्टनिहाय विभागणी करून त्याचे स्पष्टीकरण व निष्कर्ष काढण्यात आले. सामान्य स्वरूप तथ्य संकलन तक्त्यानुसार वर्गीकरण करण्यात आले.

संशोधनाचे निष्कर्ष :–

१) ७२ टक्के शिक्षकांच्या प्रतिसादावरून सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन म्हणजे विद्यार्थ्यांचे सतत वर्षभर केलेल मूल्यमापन होय असे मानतात.

२) आकारीक मूल्यमापन म्हणजे विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व आकार घेत असतांना करावयाचे मूल्यमापन होय असे म्हणणारे ७१ टक्के शिक्षक आढळून आले.

३) आकारीक मूल्यमापन करीत असतांना आठ साधनतंत्राचा वापर करण्यात आले असे म्हणणारे ६७ टक्के शिक्षक आहेत.

४) सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची अंमलबजावणी ही ६५ टक्के शिक्षकांच्या मतानुसार बालकाच्या मोफत व सक्तीचा अधिकार अधिनियम २००९ च्या आधारे करण्यात आली असे दिसून येते.

५) ६५ टक्के शिक्षकांच्या मते विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करतांना निरिक्षणातील गुणवत्ता, अचूकता व शास्त्रशुध्दता इत्यादी बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

६) शैक्षणिक मूल्यमापन प्रक्रिया अध्ययन अध्यापनावर, विद्यार्थ्यी व्यक्तिमत्व विकासावर, संपूर्ण शिक्षण प्रक्रियेवर प्रतिसाद करते असे मानणारे शिक्षक ५६ टक्के आहे.

७) ५६ टक्के शिक्षकांच्या मतानुसार विद्यार्थ्यांची संपादनुक पातळी तपासण्याकरिता संकलीत मूल्यमापनाची आवश्यकता आहे असे आढळून आले.

८) विद्यार्थ्यांमध्ये स्वयंअध्ययनाची सवय लागावी या करीता ५२ टक्के शिक्षक स्वाध्याय व गृहकार्य हे साधनतंत्र वापरावे या मताचे आहेत.

९) ५७ टक्के शिक्षकांच्या मते नोंदवहीची आवश्यकता विद्यार्थ्यी विषयक वस्तुनिष्ठ नोंदी मिळविण्याकरिता आहे.

संदर्भ :–

१) मुळे, रा.भ. आणि उमाठे वि.तु. (२००१) शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, नागपूर महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ,

२) महाराष्ट्र शासन (२००९) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधि.२००९

३) महा. शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग (२०१०) सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन कार्यपध्दती, मुंबई

४) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (२०१०) गटसाधन केंद्र शहरी साधन व समुह केंद्र भुमिका व कार्य.

५) www.kapilsankhe.com

6) www.pdshinde.in.>blogpost13

7) www.mhschoolteacher.blogpost.com

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 4.374
UGC Approved Journal Sr. No.48455

ISSN No. 2394-8426
Mar – 2018
Issue–I, Volume–VII

GSTनव्या करप्रणालीचा उदय — एक आव्हान आणि समस्या

प्रा. हितेश मा. दडमल
सहाय्यक प्राध्यापक
अर्थशास्त्र विभाग,
रा.तु.म.ना.वि. नागपूर

शोधनिबंधाचा सारांश —

सध्याच्या अप्रत्यक्ष कर प्रणालीचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, उत्पादक वस्तुबाबत प्रस्तुत कर प्रणाली जटील आणि उत्पादक अधिकारानुसार गुंतागुंतीची आहे. म्हणून यावर १ जुलै २०१७ रोजी नव्या अप्रत्यक्ष करप्रणालीचा उदय झाला. यात GSTएकमुश्त कर याप्रमाणे वस्तु व सेवाकर आधारीत एक देश, एक कर या धोरणाचा स्विकार करून GSTनावाचा नवा कर लावण्यात आला. प्रस्तुत शोधनिबंधात नव्या कर प्रणालीची संकल्पना आणि पार्श्वभूमी समजून त्याची वैशिष्टे, नवी करसंरचना अभ्यासण्यात आला आहे. त्याचबरोबर GSTची आवश्यकता,GSTदराचे तुलनात्मक अध्ययन आणि कृषी आणि उद्योग क्षेत्रावरील परिणामाचा अभ्यास करून गुण—दोष व अडचणीचा अभ्यास करण्यात आला आहे. Cascading effectम्हणजे कराचा धबाधबा परिणामाचा सुद्धा अभ्यास करण्यात आला आहे.

शोधनिबंधाची उद्दीष्टे —

१) GSTकर व्यवस्थेची पार्श्वभुमी आणि संकल्पना अभ्यासुन घेणे.
२) GSTची करनिती अभ्यासणे
३) GSTकरधोरणांची सद्य:स्थितीची उपयुक्तता अभ्यासणे
४) GSTमध्ये समाविष्ट अप्रत्यक्ष कर अभ्यासणे
५) GSTची इतर राष्ट्रानुसार तुलनात्मक ओळख अभ्यासणे
६) GSTची कर प्रणाली समजणे
७) धबाधबा परिणाम (Cascading effect) अभ्यासणे

संशोधन पद्धती —

प्रस्तुत शोधनिबंध प्रामुख्याने वर्णनात्मक आणि प्राप्त समंकावर आधारीत आहे. त्याचबरोबर यासाठी तथ्य संकलन व माहिती संकलनासाठी पुर्णपणे दुय्यम साधनाचा वापर करण्यात आला आहे. प्रस्तुत शोधनिबंध GSTया विषयावर आधारित असुन सदर शोधनिबंधासाठी शासकीय पत्रिका, पुस्तके, वर्तमान पत्रे, आणि इतर संशोधन लेखाचा आधार घेण्यात आला आहे. त्याचबरोबर मासिके, संदर्भग्रंथ, वेबसाईट्स आणि प्राप्त सांख्यिकीय माहितीचा वापर करून शोधनिबंध लिहण्यात आला आहे.

GSTची प्रवासपुर्ण पार्श्वभुमी —

संपूर्ण देशामध्ये अप्रत्यक्ष कराच्या एकसमान पद्धतीकरिता GSTप्रणालीचा केंद्र राज्य यांच्या संयुक्त निर्णयाने अवलंब करण्यात आला. १ जुलै २०१७ रोजी GST(Goods & Srvices Tax)संपुर्ण देशात अंमलात आणण्यात आले असली तरी GSTकरप्रणाली ची पार्श्वभुमी जाणणे तितकेच गरजेचे आहे.

भारतात कर संरचनेत आणि करसुधारणामधील विश्वसनीयता आणि पारदर्शकता आणण्यासाठी (सुसुत्रीकरण) १९९४ मध्ये डॉ. अमरीश बाग यांच्या अध्यक्षतेखाली 'नॅशनल इस्टिटयुट ऑफ पब्लिक फायनान्स ॲन्ड पॉलिसी' या संस्थेखाली समिती नेमुन अहवाल सादर करण्यात आला. यानंतर याच उद्दिष्ट व दृष्टीकोनाच्या आधारावर नव्याने डॉ. असिमदास गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली एम्पावर्ड स्टेट

फायनान्स मिनिस्टरने निर्णय घेऊन VAT (Value Added Tax) 'वॅट' नावाची नवी संकल्पना समोर मांडली. सरते शेवटी १ एप्रिल २००५ रोजी VATनव्या कराची सुरूवात झाली. या प्रणालीत सुद्धा विशिष्ट कालावधीनंतर करप्रणालीत त्रुटी आणि दोष दिसुन आले. शेवटी GSTच्या नव्या पर्वाची सुरूवात म्हणून डॉ. अमरीश बाग यांनी सुचविलेल्या प्रमाणे दुसऱ्या नव्या टप्प्याकडे पुढचे पाऊल घेण्यात आले. यावर विशेष भर देण्यासाठी पहिले पाऊल २००६ साली तत्कालीन वित्तमंत्री पी. चिदंबरम यांनी GSTया नव्या जगभरात स्विकार केलेल्या नव्या कराचा उल्लेख केला. तत्पुर्वी २००३ मध्ये करसुधारणा संबंधी नेमण्यात आलेल्या "टास्कफोर्सने" म्हणजेच डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने वस्तु व सेवासंबंधी कराबाबत आपला अहवाल मांडला आणि 'एक देश एक कर' या अप्रत्यक्ष कर सुधारणा धोरणाची रूपरेषा ठरविण्यासाठी नियोजन आणि निर्णयात्मक पाऊल उचलण्यात आले. GSTच्या प्रथम उल्लेखानंतर अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी GSTबिल मांडून लागु करण्याचा प्रयत्न केला शेवटी ते संसदेच्या स्थायी समितीकडे पाठविण्यात आले. यासंबंधी याचा अहवाल २०१३ मध्ये प्राप्त झाला. त्याबरोबर १३ व्या वित्त आयोगाद्वारा सुद्धा GSTलागू करण्यासाठी शिफारसी सुचविल्या परिणामत: २०१४ मध्ये सार्वत्रिक निवडणुकामुळे विधेयक मागे पडले. परंतु २०१४ च्या नव्या NDAसरकारच्या स्थापनेनंतर GSTबिल राष्ट्रहिताच्या दृष्टीने अधिक महत्वपुर्ण असल्याचे असे उल्लेख केला व यासंबंधी ६ मे २०१५ मध्ये लोकसभेत आणि ३ ऑगस्ट २०१६ रोजी राज्यसभेत १२२ वी घटना दुरूस्ती करून १९८ पानाचे GSTविधेयक पास झाले. पुढे ३६८ व्या कलमेनुसार देशातील एकुण घटकराज्यापैकी निम्म्याराज्याची सुद्धा मंजुरी आवश्यक होती त्यानुसार त्या पद्धतीने सुद्धा GSTबिल मंजुर करून १ जुलै २०१७ रोजी GSTकर संपुर्ण देशात लागु करण्यात आला.

GSTची संकल्पना —

जी.एस.टी. म्हणजे वस्तु आणि सेवा कर (Goods & Services Tax) हा अप्रत्यक्ष स्वरूपाचा कर आहे. जो राष्ट्रीय स्तरावर कोणत्याही वस्तुची व सेवांचे उत्पादन, विक्री आणि वापरावर एकात्मिक पद्धतीने लावून आकारला जातो. भारत देशात GSTकर १ जुलै २०१७ रोजी संपुर्ण देशात लागु करण्यात आला. 'एक देश—एक बाजार—एक कर' यानुसार संपुर्ण देशात करसुधारणा पद्धतीतील क्रांतिकारक पाऊल उचलण्यात आले आहे. जुन्या करपध्दतीतील दोष आणि करचुकवेगिरी बाजुलासारून कर महसुलात वृद्धी घडवुन आणणारी सुधारणा म्हणजे GSTकर सुधारणा होय. GSTमध्ये राज्याचे व केंद्राचे अनेक अप्रत्यक्ष कर समाविष्ट असल्यामुळे कोणत्याही राज्यावर त्याचा प्रतिकुल परिणाम होऊ नये यासाठी समप्रमाणात कर वा महसुल वाटपाच्या विभागणी करण्यात आल्या. या कर सुधारणेनुसार राज्यासाठी SGST, केंद्रशासनासाठी CGST, केंद्रशासीत प्रदेशासाठी UTGST आणि केंद्र राज्य यांच्या एकत्रीत व्यापारावरील कर महसुलावर IGSTयानुसार GSTची कर विभागणी करण्यात आली. परिणामत: करप्रणालीत विश्वसनीयता, पारदर्शकता आणि कर आकारणीपासुन ते कर भरणाच्या अंमलबजावणीपर्यंत सोयीस्कर अशी कर सुधारणा करण्यात आली आहे.

GSTमुळे सर्वाधिक फायदा उपभोकत्याला होणार आहे. कारण वस्तुवरील कराची करवरील पद्धत संपुष्ठात येऊन म्हणजेच कराचा 'धबाधबा परिणाम' (Cascading Effect) नाहीसा होऊन वस्तु व सेवांच्या किंमतीत घट होणार आहे. त्याचबरोबर उत्पादक आणि व्यापारी यांच्या सुद्धा व्यापारात व करभरणेत वृद्धी होणार आहे. सर्वात महत्वाची सुचना अशी की, GSTहा कर २० लाखापेक्षा जास्त असणाऱ्या वार्षिक उलाढाली व्यवहारावर लावण्यात आला आहे. त्यामुळे नव्या संघटकाचा वा

उत्पादकावर त्याचा प्रतिकुल परिणाम होणार नाही. सोबतच शासनाच्या आर्थिक व्यवहार व पारदर्शक महसुल व्यवहारात वृद्धी होऊन राज्य आणि केंद्र शासनाच्या महसुलात वृद्धी होणार आहे. म्हणुन सुरूवातीला अल्पकाळात जरी त्याचे परिणाम वैशिष्टपुर्ण अथवा मात्रात्मक दृष्टया फायदेशीर दिसुन येत नसली तरी एका विशिष्ट कालावधीनंतर त्यात निरंतर वृद्धीच प्राप्त होणार आहे.

GSTची संरचना –

वस्तु व सेवाकराची साधनाद्वारे तीन प्रकारची संरचना तयार करण्यात आली.

१) CGST(Central Goods & Services Tax)**केंद्रीय वस्तु व सेवा कर**–

यानुसार केंद्रशासनाद्वारे आकारण्यात येणाऱ्या GSTकराला CGSTअसे म्हणतात.

२) SGST(State Goods & Services Tax) **राज्य वस्तु व सेवा कर**–

यानुसार राज्यशासनाद्वारे आकारण्यात येणाऱ्या GSTकराला SGSTअसे म्हणतात.

३) IGST(Integrated Goods & Services Tax)**एकत्रीत वस्तु व सेवा कर** –

आंतरराष्ट्रीय एकतर्फी वस्तु व सेवावर (पुरवठयावर) लावण्यात येणाऱ्या GSTकराला IGSTअसे म्हणतात.

यासोबतच केंद्रशासीत प्रदेशासाठी UTGST(Union Teritory Goods–Services Tax)नियोजित करून ठेवण्यात आला आहे.

वरील प्रस्तुत GSTसंरचनेनुसार वस्तु व सेवावर ५०:५० टक्के याप्रमाणे वाटा राज्य व केंद्रशासन यांना समप्रमाणात करण्यात येणार आहे. त्यामुळे GSTएकप्रकारे फायदयाच्या स्वरूपात असलेली करसुधारणा प्रणाली आहे.

GSTची आवश्यकता का बर !

भारतात पुर्वीपासून चालत आलेल्या अप्रत्यक्ष कर प्रणालीच्या दोषांमुळे GSTची अधिक आवश्यकता निर्माण झाल्याचे स्पष्ट होते. परंतु हा दोष कोणता? यासाठी दोष समजावुन घेणे अधिक गरजेचे आहे. GSTपूर्वी केंद्र आणि राज्य शासनाद्वारे उत्पादित वस्तुवर विभिन्न प्रकारचे कर अप्रत्यक्ष स्वरूपात लावून आकारण्यात येत होते. त्यामुळे अशा व्यापार व्यवहार कराच्या परिस्थितीत करावरील कराची नवी गुंतागुंतीची समस्या निर्माण झाली. म्हणजेच थोडक्यात असे म्हणता येईल की, एका उत्पादक वस्तुंवर करांवर कर लावल्यामुळे वस्तुची किंमत वाढत असे त्यामुळे या करावरील कर पद्धतीला "Cascadig Effect" 'धबाधबा परिणाम' असे म्हणतात.

यावरून अशा मुल्यवर्धित कराच्या अप्रत्यक्ष कर प्रणालीवरील परिणाम प्रत्यक्ष पुरवठा मुल्यवर्धनावर होत असतो. म्हणुन भविष्यातील व्यापार दृष्टीकोन अधिक सुलभ आणि पारदर्शकतेचा विचार करून अप्रत्यक्ष कराची एकमुश्त करसंकल्पना अवलंबविण्यात आली आणि व्यापार दोष आणि गुंतागुंतीची समस्या दूरसारून GSTया नव्या अप्रत्यक्ष करप्रणालीची आवश्यकता निर्माण झाली.

GSTकरदराची संरचना, वस्तु व सेवा नोंद आणि वस्तु अनुसुची

इतर राष्ट्राप्रमाणे GSTमध्ये जरी एक देश एक कर धोरणाचा स्विकार करण्यात आला असला तरी भारताने GSTची जगभरात करबाबतची संकल्पना विभिन्न वेगवेगळया वस्तु व सेवांच्या उपयोगिता आणि गरजेच्या आधारावर कराची संरचना ही चार (४) वेगवेगळया स्तरावर मांडली आहे. म्हणजेच वस्तुच्या उपयोगितेनुसार कराच्या दराचे ४ प्रकारात विभाजन करण्यात आले. अशाप्रकारे वस्तु व सेवांची अनुसुची तयार करून त्या त्याप्रमाणे GSTकर लावण्यात आला. त्याचबरोबर अत्यावश्यक वस्तुवर ०%GSTकर सुद्धा लावण्यात आला आहे. सध्याच्या परिस्थितीत करदाते आणि इतर

भागधारकांच्या मार्गदर्शन आणि मदतीकरीता www.cbec.go.inया वेबसाईटवर वस्तु व सेवा सुची आणि माहिती उपलब्ध आहे.

GSTकर दर संरचना (Table)

GSTनुसार केंद्र आणि राज्य शासनाचे वस्तु आणि सेवा संबंधित अप्रत्यक्ष कर एकत्रित केले जातील. लक्षात घेण्यासारखी महत्वाची गोष्ट अशी की इतर राष्ट्राप्रमाणे कराची एक समान संरचना निर्माण न करता वस्तु व सेवाच्या प्रकारानुसार GSTकराची संरचना करण्यात आली आहे. यामध्ये वस्तु व सेवांच्या गरजेनुसार प्राधान्य देऊन कर दर ठरविण्यात आले.

कर दर संरचना

प्रकार	कराचा दर	वस्तु व सेवा वर्गीकरण
शुन्य आधारित	०%	जीवनावश्यक वस्तु (अन्नधान्यासह)
निम्नकर	५%	सर्वसाधारण वापराच्या वस्तु व सेवा
दोन प्रमाण दर	१२%	ग्राहकोपयोगी वस्तु व सेवा (मोठया प्रमाणात समावेश)
उच्चतम दर	२८%	लक्झरी ओवर, तंबाकु उत्पादणे व शीलपेये
अतिरिक्त सेस	४%	लक्झरी मोटार, तंबाखु उत्पादने, शीतपेये व इतर.

GSTनुसार कर दाराची संरचना अथवा वर्गीकरणासोबतच वस्तुनुसार कराची सुद्धा विभागणी करण्यात आली याची वेळोवेळी शासनाद्वारे सुची प्रसार माध्यमाद्वारे प्रसारित सुद्धा करण्यात आले. या प्रसारित सुची प्रसार करण्यामागे मुळ उद्देश उपभोग्य वस्तु व सेवा वर दिल्या जाणाऱ्या कराची प्रत्यक्ष जाणीव आणि ओळख स्पष्टपणे लक्षात आणुन देणे आहे.

GSTनुसार कराचे वर्गीकरण —

GSTकर दर संरचने बरोबरच वस्तु व सेवांची नोंद सुद्धा अनुसुचीनुसार विभागणी करण्यात आली आहे. यामध्ये प्रसारीत अनुसुचीमध्ये वस्तु व सेवांची नोंद करण्यात आली आहे. यामुळे कोणती वस्तु कोणत्या अनुसुचीत मोडते याची नोंद सुद्धा करण्यात आली आहे.

प्रस्तुतGSTRateनुसारRate Classification for Good सूची पुढील प्रमाणे

GSTदर अनुसूची नुसार वस्तु व सेवांची नोंद

१) अनुसूची I	५	२६४
२) अनुसूची II	१२	२४२ नोंदी
३) अनुसूची III	१८	४५३ नोंदी
४) अनुसूची IV	२८	२२८ नोंदी
५) अनुसूची V	३	१८ नोंदी (सेस)
६) अनुसूची VI	०.२५	३ नोंदी

GST दरानुसार वस्तुसूची

0%	Food grain, cereals, Milk, common salt, education, healthcare, residential, accommodation, Hotel/Lodges with tariff below INR 100
5%	Coal, sugar, tea & coffee, drugs & Medicine, eddies oil, goods transport, Rail Tickets, (Other than sleeper class), air tickets of Economic class, cab, selling

	space for advertisements boards & media.
12%	Fruit Juice, vegetable juice, Beverages, containing milk, jams, works contract, business class Air travels, Telecom services, Financial receives, Restaurant services, Hotel/Lodges with tariff between INR 1000 to 7500.
28%	Air conditioner, refrigerators, Cinema Tickets, betting, gambling, Hotels/Lodges with tariff above INR 7500.
28% + Cess	small cars (1% / 3% cess), luxury cess (15% cess)

GSTअंतर्गत समावेषित अप्रत्यक्ष कराची सुची —

भारतात १ जुलै २०१७ पूर्वी केंद्र राज्य शासनाद्वारे संयुक्त आणि विभक्त (स्वतंत्र) पद्धतीने वस्तु व सेवावर अप्रत्यक्ष कर लावण्यात येत होते. यामध्ये असे अनेक कर होते जे स्वतंत्रपणे राज्य व केंद्राच्या महसुलात भर देत होते. परंतु आता हे सर्व कर GSTया करात एकमुश्तपणे समाविष्ट करण्यात आले आहे. यामुळे केंद्रापेक्षा राज्यशासनाच्या महसुलात अधिक त्याची घट होणार हे स्पष्ट म्हणुन GSTची संरचनाSGST, CGST, UTGST, and IGSTयानुसार करण्यात आली आणि योग्य पद्धतीचे समप्रमाणात महसुलाचे विभाजन करण्यात आले.

GSTमध्ये समावेशित अप्रत्यक्ष कराचे वर्गीकरण —

CGST	SGST	IGST
सेवाकर	खरेदी कर	सीव्हीडी (CVD)
उत्पादन शुल्क	व्हेट(VAT)	आणि एसएडी (SAD)
अधिमार व उपकर	करणमुक व मनोरंजनकर	केंद्रीय विक्रीकर
अतिरिक्त उत्पादन शुल्क	जकात, एलबीटी व इतर प्रवेश कर	
	जाहिरात कर	
	ऐष—आराम कर	
	लॉटरी बेटींग व गॅम्बलींग कर	

GSTचे फायदे—

१) GSTकराचा सर्वात मोठा फायदा म्हणजे करावरील कराचा बोजा म्हणजे धबाधबा परिणाम (Cascading Effect) नाहिसा होणार.

२) एक देश, एक बाजार आणि एक कर यानुसार संपुर्ण देशभरात वस्तु व सेवा कर (GST) एकसमान पातळीवर भरला जाणार आहे.

३) एकच कर असल्यामुळे करात पारदर्शकता विश्वासाचे वातावरण निर्माण होईल.

४) व्यापारांना वस्तु व सेवाकर अनेकप्रकारचे करावरील कर न देता GSTएकच कर दयावा लागेल.

५) देशात GSTमुळे वस्तुची किंमत आणि सेवा एकसमान पातळीवर राहील त्यामुळे राज्याराज्यानुसार वेगवेगळी किंमत राहणार नाही.

६) व्यापारी वर्गात करभरणाबाबत अनेक प्रकारचे प्रश्न नसल्यामुळे व्यापार कारभारात देशभरात एकसंघ बाजारपेठ तयार होईल.

७) एक वस्तु एक कर अथवा समान किंमतीमुळे उपभोक्ता अथवा ग्राहकामध्ये कोणताही भेदभाव केला जाणाार नाही.

८) शासनाच्या महसुलात अधिक प्रमाणात भर पडणार कारण उत्पादकापासून ते उपभोक्त्याचे कर आकारणी आणि कर भरणाची जाळे GSTद्वारे अधिक विस्तृत होणार असल्यामुळे.

९) केंद्र शासनाद्वारे पहिली तीन वर्षे १००%भरपाई नंतरचा चौथा वर्ष ७५%आणि पाचव्या वर्षी ५०%भरपाई दिली जाईल.

१०) GST उद्योगांची वार्षिक उलाढाल आणि उत्पादकता २० लाखापेक्षा अधिक आहे. अशांना GSTकराचा भरण भरावा लागणार आहे. २० लाखापेक्षा कमी व्यवहारांना यात सुट देण्यात झाली आहे.

११)GSTकरानुसार राज्यासाठीSGST, केंद्रासाठी CGSTआणि केंद्र राज्यासाठी IGSTतसेच केंद्रशासित प्रदेशासाठी UTGSTनुसार कर प्राप्तीनुसार विभागणी करून देशात महसुलाबाबत समानता व समता प्रस्थापित झाली आहे.

GSTतोटे (आव्हाने)

१) GSTमुळे सर्वात मोठा तोटा म्हणजे केंद्र राज्याच्या महसुलात प्रचंड प्रमाणात घट होणार आहे. कारण केंद्र राज्याद्वारे जवळपास २५—३० प्रकारचे कर नाहिसे होणार आहे.

२) GSTकर भरणापद्धत इंटरनेट ऑनलाईन असल्यामुळे तसेच तांत्रिक व्यवहाराची कोणत्याही पद्धतीचे प्रशिक्षण व्यवस्था नसल्यामुळे व्यापारी वर्गाला GSTप्रणाली अडचणीची होणार आहे.

३) GSTकर भरणाबाबत नवा प्रश्न असा की प्रतिदिवसाचे आणि महिन्या अखेरपर्यंत व्यवहार हाताळुन करभरणा करणे हा आहे त्यामुळे करभरणाबाबत सदोषता दिसुन येत नाही.

४) GSTबाबत करधारणा व व्यापारी आणि उद्योगी वर्गावर अनावश्यक ताण निर्माण करणारा आणि अनावश्यक खर्च वाढिस प्रेरणा देणारा आहे.

५) ऑनलाईन तांत्रिक अडचणी आणि सर्च्वर प्रणाली निकामी पडल्यामुळे अनावश्यक वेळ वाया जातो परिणामी नफा आणि आर्थिक व्यवहारावर त्याचा परिणाम होतो.

६) GSTचा महत्तम दर २८: आहे त्यामुळे मध्यम सर्वसामान्य कुटुंबाबाबत चैनीच्या वा ऐशोआरामाच्या वस्तु व सेवांच्या उपभोागपासुन वंचित राहणार आहे.

७) भारतासारख्या कृषी तसेच मागास तांत्रिक विकास झालेल्या देशात ग्रामीण भागांतील निरक्षर व अज्ञानी लोकांना व्यवहार आणि ऑनलाईन कर भरणा अशक्य आहे.

GSTदराची इतर राष्ट्रनुसार तुलना—

GSTही आधुनिक जगातील नव्या पध्दतीची सक्षम, पारदर्शक आणि विश्वसनीय अशी करप्रणाली आहे. सर्वप्रथम फ्रान्ससारख्या देशाने GSTकरप्रणाली स्विकारली. या करप्रणालीमुळे विकास आणि व्यापार वृद्धी घडून आली आहे. आजपर्यंत १४० देशांनी या GSTकरप्रणालीचा स्विकार केला आहे. भारत देशाने एक देश एक कर प्रणाली या तत्वावर आधारित व्यवस्थेचा स्विकार केला आहे. एक कर व्यवस्था जरी अंमलात आणली असली तरी कराचे वर्गीकरण ४ प्रकारात करण्यात आले आहे. म्हणजेच GSTचे वर्गीकरण हे शुन्य टक्के, ५%, १२%, १८%आणि २८%या पद्धतीने केली आहे. सोबत महत्वाच्या वा संवेदनशील वस्तुवर सेसचा भार सुद्धा लावण्यात आला आहे. २०१८—१९ च्या अंदाजपत्रकीय धोरणानुसार सेसचा दर ३%वरून ४%करण्यात आला आहे. यात वस्तुनुसार GSTकराचा भरणा लावण्याचे धोरण स्विकारण्यात आले आहे. भारतात गुणवत्ता, दर्जा आणि उपयोगितेच्या आधारावर वस्तुवर GSTदराचे वर्गीकरण करण्यात आले आहे. तरी सुद्धा इतर

राष्ट्राच्या तुलनेत GSTदराची एक आगळी वेगळी करप्रणाली मांडण्याचे श्रेय भारतालाच दयावे लागेल. येणारे भविष्य आणि व्यापार व्यवहारच GSTचे महत्व स्पष्ट करणार आहे. त्यामुळे लक्षात घेण्यासारखी महत्वाची गोष्ट अशी की सध्याची नवीन करप्रणाली महसुलात वृद्धी किती प्रमाणात वृद्धी घडवून आणेल. या GSTकर भरणाऱ्या वृद्धीमुळे विकास वृद्धींगत होत असतो. त्यामुळे GSTदर किती असावा हे जाणणे अधिक महत्वाचे आहे.

GSTदर विभिन्न राष्ट्रानुसार —

देश	GSTदर
ऑस्ट्रेलिया	10.9%
फ्रान्स	10.9%
कॅनडा	5%
जर्मनी	19%
जापान	5%
थ्संगापुर	7%
स्विडन	25%
न्युझिलॅन्ड	15%
भारत	28%

स्त्रोत : Economic Times newspaper2017

समारोप —

सध्याच्या कर सुधारणा परिस्थितीतील GSTहे अप्रत्यक्ष करातील एक क्रांतीकारी पाऊल असे आहे. अगोदरच्या कर रचनेत गुंतागुंतीची पद्धत आणि करचोरीचा प्रभाव अधिक असल्यामुळे जुनी करप्रणाली निकामी तसेच शासनाच्या करमहसुलात अपेक्षित वृद्धी घडवुन आणणारी नव्हती. उपभोक्ते, व्यापारी, उत्पादक, मध्यस्थ आणि शासन यांच्या दृष्टीने कर आकारणी आणि करभरणेच्या प्रक्रिये दरम्यान GSTयोग्य सुशासन करधोरणाच्या दिशेने योग्य असा निर्णय आहे. त्याचबरोबर करावरील कर प्रभाव (Cascading Effect) म्हणजेच धबाधबा परिणाम नाहिसा झाल्यामुळे वस्तु व सेवा वरील किंमतीत घट झाली आहे. उत्पादक व व्यापारी दृष्टीने विचार केल्यास कर भरणाच्या बाबतीत पारदर्शकता आणि सुलभ अशी करभरणा पद्धतीची व्यवस्था निर्माण झाली आहे. सर्वाधिक फायदा शासनाला झालेला दिसुन येत आहे कारण करचुकवेगिरीला आळा बसल्यामुळे शासकीय महसुलात तसेच प्रशासकीय प्रक्रियेत गती निर्माण झाली आहे. परिणामत: राज्य—केंद्र महसुल वाटपाची समस्यसा संपुष्टात येऊन समप्रमाणात करविभागणी करण्यात आली आहे. तसेच कोणत्याही पद्धतीचा अप्रत्यक्ष करव्यवस्थेतील करभरणा हा 'एक देश एक कर' स्तरावर असल्यामुळे GSTचे परिणाम भविष्यात उचित व योग्यच असे राहणार आहे.

संदर्भसूची :—

१. देसले किरण (२०१५), अर्थशास्त्र भाग — १ (स्पर्धा परिक्षा) दीपस्तंभ, प्रकाशन, जळगाव.
२. वस्तु व सेवाकर एक दृष्टीक्षेप, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई (२०१७)
३. मिश्र व पुरी, "भारतीय अर्थव्यवस्था, "हिमालया पब्लिकेशन, मुंबई
४. Dhirendra Kumar, "Understanding Indian Economy" Unique Academy Pune.
५. अर्थसंवादन नियतकालिक, मराठी अर्थशास्त्र परिषद, July –Sep २०१७

६. Journals of The Indian Economics Journals Special Issue, DEC 2017
७. रायखेलकर आणि दामजी, "औद्योगिक अर्थशास्त्र विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.
८. वस्तू व सेवा कर एक दृष्टीक्षेप : वित्त विभाग महाराष्ट्र शासन
९. योजना मासिक ऑगस्ट २०१७
१०. अर्थसंवादन नियतकालिक, मराठी अर्थशास्त्र परिषद, Oct.–Dec. २०१७
११. योजना मासिक, २०१७, प्रधान संपादक—दिपीका कच्छल, लोधी रोड, नवी दिल्ली, पृ. १७

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 4.374
UGC Approved Journal Sr. No.48455

ISSN No. 2394-8426
Mar – 2018
Issue–I, Volume–VII

धान उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन

प्रा. अभय श्रीहरी लाकडे
फुले — आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क,
गडचिरोली

प्रस्तावना :—

आर्थिक विकासाच्या प्राथमिक अवस्थेत अन्नधान्यासाठी प्रामुख्याने शेतीवर अवलंबून राहावे लागते. आर्थिक विकासाच्या प्राथमिक अवस्थेतील देशात म्हणजे अप्रगत देशात भांडवलाची टंचाई असते. म्हणून या देशातील आर्थिक विकासात मर्यादित भांडवल व विद्युत श्रमशक्ती याचा वापर करणे योग्य ठरते. अप्रगत देशात अशी परिस्थिती असल्यामुळे शेती व्यवसायावर अधिक भर दिला पाहिजे. अप्रगत देशात परकिय तुटवडा अधिक असतो. शेतीत तयार होणाऱ्या कच्चा मालाची निर्यात करून ते असे चलन मिळवू शकतात.

शेती व्यवसाय हा औद्योगीकरणाचा कणा आहे. शेती सूधारली व येथील उत्पन्न वाढले तर कारखान्यात तयार होणाऱ्या मालाला बाजारपेठ मिळू शकते. औद्योगिकरण जसजसे होते तसतसे अन्नाची मागणी वाढते. अप्रगत देशात वाढती लोकसंख्या व अन्न मागणीची उत्पन्न लवचिकता अधिक असते. त्यामुळे अन्नोत्पादन वाढविण्यासाठी शेती सुधारणा जरूरी असते. जसजशी आर्थिक प्रगती होत जाते. तसतसे औद्योगीक विकासासाठी आवश्यक कच्चा मालाचा पुरवठा व बाजारपेठा मिळविण्यासाठी ही शेतीविकास होणे अपरिहार्य असते. म्हणजे देशाच्या अधिक प्रगतीत शेतीचे स्थान महत्वाचेच आहे. काही वर्षापूर्वी एखाद्या देशाच्या आर्थिक विकासासाठी औद्योगिक प्रगतीचा मार्ग सुचविला जाई व शेतीचे महत्व दुर्लक्षिले जाई पण अनुभवाने असे दिसून येते की शेतीकडे दुर्लक्ष केल्यामुळे औद्योगीकरणवर व त्याच्या विकासावर मर्यादा येते. आताच औद्योगिक विकास की शेती विकास हा वैचारिक संघर्ष मोठा असून अर्थशास्त्रज्ञांच्या मते औद्योगिक व शेती विकास हे दोन्ही सारख्याच महत्वाचे आहेत.

शेतकऱ्यांच्या समस्येचा सामना करण्यासाठी दुहेरी उपाययोजना करणे आवश्यक आहे. अशी तातडीची मदत तर द्यायलाच हवी पण दिर्घमुदतीचे उपाय अधिक महत्वाचे ठरतात. त्याकरीता काही संरचनात्मक बदलाची आवश्यकता आहे. कर्जमुक्ती, व्याज माफी योग्य पतपरवठा या उपायांनी शेतकऱ्यांना तातडीची मदत उपलब्ध करून देता येते. पण पुन्हा तोच प्रश्न उपस्थित होऊ नये या करता उपाय योजना आवश्यक आहे. अभ्यासातून असे लक्षात आले आहे की, शेतकरी पिकाची योग्य निवड करत नाहीत. त्यांच्या क्षेत्रात लागवडीस योग्य नाहीत, अशी पिके घेतात पाणी टंचाईच्या क्षेत्रात अधिक पाणी लागणारी पिके घेतात, त्यामुळे जोखीम वाढते.

कृषी उत्पादन व त्याची विक्रय व्यवस्था या दोन्ही बाबी कृषी अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याच्या दृष्टीने स्वातंत्र्योत्तर काळात सतत ऐरणीवर राहिल्या आहेत. त्यासंदर्भात केंद्र तथा संबंधित राज्य सरकारनी वेळोवेळी कृषी विकास सापेक्ष विविध सुधारणा तथा क्रियाशील उपाय योजनांचे धोरणात्मक निर्णय हे घेतलेले. कृषी उत्पादन वृध्दी साठी विकासात्मक संसाधनांची आपूर्ती अनुदानाच्या कवचकुंडला खाली करण्याचे धोरणही अवलंबण्यात आले. परंपरागत ढाचाच्या कृषीपध्दती पासून शेतकरी या पध्दतीला अलविदा करीत कृषीतंत्रज्ञानाकडे वळावा म्हणून सतत प्रयत्न सुरू राहीलेत. या प्रयत्नांचे आज बदलत्या स्वरूपात काळाची गरज म्हणून अंमलबजावणी साठी नवे संदर्भ तयार होत आहेत. तथापी कृषीउत्पादन वृध्दीचे नवे निकष हा आजचा विषय नसल्याने त्यावर या ठिकाणी भाष्य

करणे अप्रस्तुत आहे. सबब कृषी उत्पादनासंदर्भात विपणनाच्या नव्या कायद्याच्या संबंधात विचार प्रवर्तन आहे.

विषयाची निवड : (Topic Selection)

भारतासारख्या कृषीप्रधान देशात धानाची शेती प्राचीन काळापासून केली जात आहे. धानाची शेती म्हटली की, पर्जन्यमानाशी जुगार खेळण्यासारखे असते. दरवर्षी होणाऱ्या पर्जन्यसृष्टीवरच धानाचे उत्पादन उवलंबून आहे. पीक लागवडीत दरम्यान अनियंत्रित पाऊस आणि सिंचनाच्या सोई . सुविधा नसणे, शेतमजुरांचा नियमित तुटपडा पडण्याने शेतीची कामे सुरळीत होत नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांना फार नुसकान होते. अल्पभुधारक शेतकरी, विखुरलेली शेतीमुळे उत्पादनामध्ये कमतरता येते. सेंद्रीय व रासायनिक खतांच्या शिफारशीपेक्षा कमी व असंतुलित वापराने शेतकऱ्यांना नुकसान जास्त होते.

आधुनिक व अधिक उत्पादन देणाऱ्या धान लागवड प्रक्रियेकरीता शेतकऱ्यांना अडचणी येतात. त्यांना शास्त्रोक्त माहिती उपलब्ध न झाल्याने त्यांच्या उत्पादनात कमतरता येते. प्रमाणीत बी.बीयाणे, खते, किटकनाशके शेतकऱ्यांकडे उपलब्ध न झाल्याने त्यांच्या उत्पादनात वाढ होत नाही. नविन तंत्रज्ञान कृषी मध्ये वापरण्यात शेतकऱ्यांना अडचणी असल्याने ते व्यवस्थित शेती करीत नाहीत. व्यापारीवर्गाचे बाजारपेठांवरचे वर्चस्व असल्यामुळे शेतकऱ्यांना योग्य प्रमाणात मुल्य/दर मिळत नाही. पर्यायाने व्यापारी श्रीमंत व शेतकरी गरीब असे चिन्ह आपल्याला बघावयास मिळतो. करीता सदर विषयामध्ये शेतकऱ्यांच्या विविध समस्यांची गांभीर्यता लक्षात घेऊन विषयाची निवड संशोधकाने केली आहे.

संशोधनाचे महत्व व उपयोगिता : (Importance of Subject)

भारतीय अर्थव्यवस्थेत कृषीक्षेत्राचे महत्व अनन्यसाधारण आहे. कृषीक्षेत्र भारतीय अर्थव्यवस्थेचा गाभा आहे. मागील दोन दशकांपेक्षा जास्त कालावधीपासून औद्योगिककरणाच्या उन्नतीचा संघटीत प्रयत्न होऊन कृषीक्षेत्राने भारतीय अर्थव्यवस्थेत गौरवपूर्ण स्थान प्राप्त केले आहे. कृषी व्यवसाय हा देशातील सर्वात प्रमुख व्यवसाय असल्यामूळे ७०: पेक्षाही जास्त लोकांचा उदरनिर्वाह कृषीक्षेत्रावर आधारीत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत कृषीक्षेत्राचे महत्व समजून घेण्याकरीता ह्या विषयाची निवड केली.

कृषीक्षेत्राचे न्यून उत्पादनाचे महत्वपूर्ण कारण उत्पादनाच्या निम्न स्तराच्या तांत्रीक पध्दतीचा आणि तंत्रज्ञानाचा वापर न करणे होय. जोपर्यंत शेतकऱ्यांना सुधारीत उपकरणे, सुधारीत बि.बीयाणे यांचा उपयोग आणि मात्रेत खतांचा वापर तसेच सुपीकता राखणे आणि विनाशकारी किड्यांचा व रोगांचा प्रभावशाली पध्दतीने नायनाट करण्याची प्रेरणा दिली जाणार नाही. तोपर्यंत कृषी उत्पादन वाढणार नाही.

अध्ययन विषयाची उद्दिष्ट्ये : (Objective)

१) धान उत्पादक शेतकऱ्यांच्या कौटुंबिक स्थितीचे अध्ययन करणे.
२) धान उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन करणे.
३) धान उत्पादक शेतकऱ्यांच्या सामाजिक स्थितीचे अध्ययन करणे.
४) धान उत्पादक शेतकऱ्यांच्या शैक्षणिक स्थितीचे अध्ययन करणे.

अध्ययन विषयाचे गृहितकृत्य : (Hypothesis)

१) धान उत्पादन शेतकऱ्यांची कौटुंबिक व सामाजिक स्थिती दुय्यम स्वरूपाचीआहे.
२) धान उत्पादन शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती दुय्यम स्वरूपाची आहे.
३) धान उत्पादन शेतकऱ्यांना शेतकार्यासाठी शेतमजुराची कमतरता दिसून येते.
४) सिंचनाच्या अभावामुळे धान उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पादनात घट झालेलीआहे.

५) धान उत्पादन शेतकऱ्यांना शेती काम करतांना आरोग्यविषयक समस्या उद्‌भवत असल्याचे दिसून येते.

६) धान उत्पादन शेतकऱ्यांचा शासकीय योजनामुळे काही प्रमाणात विकास झालेला दिसून येतो.

अध्ययन क्षेत्र व विश्व : (Area And Univers of Study)

प्रस्तुत शोधनिबंधाच्या अध्ययनाकरिता महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्यातील अधिकांश १० तालुक्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांचा अंतर्भाव करून संशोधनाचे विश्व निश्चित माणले आहे. अध्ययनाकरिता वेळ, श्रम व पैसा याच्या अभावाने चंद्रपूर जिल्ह्यातील फक्त १० अधिकांश धान उत्पादन घेणाऱ्या तालुक्यांचा समावेश केलेला आहे. काहीच शेतकऱ्यांना नमुना अध्ययनाकरीता निवडण्यात आलेले आहे

नमुना निवड पध्दती : (Sampling Method)

प्रस्तूत अध्ययनात संशोधनाकरिता संशोधनाचे उद्‌देश समोर ठेऊन काही एकाकांची निवड केली व ही निवड करतांना सहेतूक नमुना निवड पध्दतीचा वापर करण्यात आला त्यामध्ये समस्यांची सर्व लक्षणे व एकाकांची निवड विस्तारपूर्वक करून तसेच गावाची निवड व उत्तरदात्यांची निवड सुध्दा सहेतूक नमुना निवड पध्दतीने (Purposive sample Method) ५०० उत्तरदात्याची निवड संशोधनामध्ये करण्यात आलेली आहे.

तथ्ये संकलन पध्दती : (Method Of Deta Collection)

प्राथमिक पध्दती :

प्रस्तुत शोध प्रबंधात तथ्यांचे संकलन करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम अशा दोन्ही पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. या संशोधनात प्राथमिक पध्दतीमधील मुलाखत अनुसूचीचा एक प्रमुख तंत्र म्हणून उपयोग करण्यात आला आहे. कारण जेव्हा नमुण्याचा आकार मोठा असतो तेव्हा तथ्यांच्या संकलनासाठी संशोधकाने प्रश्नावली पध्दतीचा उपयोग करणे सर्व दृष्टीने योग्य ठरते. परंतू उत्तरदात्यांना सुध्दा समाजशास्त्रीय संकल्पना व प्रश्नांचे गांभीर्य कळत नसल्यामुळे सर्वच उत्तरदात्यांकडून मुलाखत अनुसूचीच्या माध्यमातून तथ्ये संकलनाचे कार्य संशोधकाने पूर्ण केले.

१) शेतकरी लोकांविषयी माहिती असणाऱ्या व त्यांच्या विषयी ज्ञान असणाऱ्या व्यक्तींशी संबंध प्रस्तापित करून माहितीचे संकलन केले.

२) निरीक्षणाद्वारे धान उत्पादक शेतकऱ्यांच्या क्रिया प्रतिक्रिया तसेच जीवनासंबंधी अनेक आवश्यक माहिती संकलीत केली.

द्वितीयक पध्दती

'जी तथ्ये संशोधकाची असून अन्य व्यक्ती किंवा संस्था यांच्याद्वारे संकलित केली जातात आणि ती त्यांच्या मालकीची असतात त्यांना द्वितीयक तथ्ये असे म्हणतात.'व त्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पध्दतीला द्वितीयक पध्दती असे म्हणतात. या पध्दतीमध्ये

१) व्यक्तिगत कागदपत्रे — लेख

२) सार्वजनिक कागदपत्र — शासकीय व निमशासकीय संस्थांचे अभिलेख, अहवाल जणगणना अहवाल, वर्तमानपत्र यांचा समावेश केला.

३) ग्रंथालय —साप्ताहिके, पुस्तके, मासिके यांचा समावेश करण्यात आला.

अशा प्रकारे उपलब्ध लिखित साहीत्याचा अवलंब करून संशोधकाने संशोधन कार्य पुर्ण केले आहे.

संशोधन आराखडा :

प्रस्तुत विषयाचे संशोधन कार्य पुर्ण करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा व अन्वेषणात्मक संशोधन आराखड्याची निवड केली. विशिष्ट व्यक्तीच्या समुहाचे, वैशिट्यांचे व वास्तविक तथ्यांचे वर्णन करणे हा वर्णनात्मक अध्ययनाचा हेतू असतो. त्याचप्रमाणे शोध प्रवृत्तीने महितीचे संकलन करण्यासाठी अन्वेषणात्मक संशोधन आराखड्याचा वापर करण्यात आला. त्यानुसार जी काही नविन तथ्य संशोधकाने संपादन केली त्यानुसार संशोधनकर्त्याने निष्कर्ष मांडलेले आहेत.

❖ **प्रमुख निष्कर्ष** :

- सर्वाधीक ४१.२०% उत्तरदात्याकडे १ ते ५ एकर शेती आहे म्हणजेच ते अल्पभूधारक शेतकरी यांचे प्रमाण अधीक आहे.
- शेती ओलीतांचा साधने मध्यम प्रमाणात आहेत असे ३२.२०% शेतकरी आहेत. त्यामुळे शेती सिंचन व्यवस्थेत कमतरता आहे. त्यामूळे त्यांना पाहीजे त्या प्रमाणात उत्पादन घेता येत नाही.
- सर्वाधीक ७०.४०% शेतकरी खरीब व रब्बी असे दोन्ही पिकांचे उत्पादन घेतात. खरीब मध्ये धानाचे उत्पादन व रब्बी मध्ये हरभरा, तूळ, लाखोळी, मुंग, उळीद असे उत्पादन घेतात.
- शेतकऱ्यांना दुबार पिक न घेण्याच्या कारणामध्ये सिंचन साधनाच्या अभावाने २१.२०% शेतकरी दुबार पीक घेत नाही. त्यामुळे त्यांना आर्थिक नूकसान सहन करावा लागतो.
- शेतकऱ्यांकडे पुरेशा प्रमाणात विजजोडणी न झाल्यामुळे दूबार पीक घेत नाहीत.
- शेतमजूर उपलब्धतेचे प्रमाण हे ग्रामीण भागात कमी होत आहे.
- लोकसंख्येचे शहरी भागाकडे कल दिसून येत आहे. नापीकी, दुष्काळ, महागाई यामूळे शेतमजूर शहराकडे रोजगारासाठी जात आहे. त्यामूळे
- शेतकऱ्यांना शेती करण्यात अडचणी येतात असे २५.८०% उत्तरदात्यांचे मत आहे.
- शेतकऱ्यांचा कल अजुनही परंपरागत शेतीकडे दिसून येतो त्यामुळे देशी लागवड पध्दतीनेच ४२.८०% उत्तरदाते शेती करतात.
- शेतकरी आपले पारंपारीक खताच्या आधारे उत्पादना सोबतच रासायनिक खताचे वापर करणारे ६७.६०% उत्तरदाते आहेत.
- शेतकरी परंपरागत बियाणा सोबत संकरीत बियाणे सुध्दा वापरत आहे त्यामूळे संकरीत बियाणेमूळे उत्पादनात वाढ आहे असे ४२.८०% उत्तरदात्यांचे मत आहे.
- बदलत्या साधनाचा वापर शेतकरी करतो आहे. शेतमजूर, वेळेचा अभाव, खर्चात बचत या करीता आधूनिक शेती अवजारे ३७.६०% शेतकरी वापरतात.
- आधूनीक साधनामध्ये टॅक्टर, धान मळणीयंत्र, कापणी यंत्र अशा पध्दतीचे आधूनीक अवजारे शेतकरी अधीकांशपणे वापरतात.
- शेतकऱ्यांना आजतागायत काही बाबी करता येत नाही आहेत ते म्हणजे माती परिक्षण याची पाहीजे त्या प्रमाणात जाणीव जागृती झालेली नाही त्या कारणाने शेतकऱ्यांनी माती परीक्षण केले नाही.
- शेतकऱ्यांना पाहीजे त्या प्रमाणात मार्गदर्शक ग्रामीण भागात उपलब्ध होत नाही, सर्व यंत्रणा तालुका स्तरावर, जिल्हा स्तरावर काम करते त्यामूळे शेतकऱ्यांनी शेतीच्या संदर्भात कोणत्याही तज्ञ व्यक्तीकडून मार्गदर्शन घेतलेले नाही.

- सिंचनाचा बराच अभाव शेतकऱ्यांकडे आहे त्यामुळे त्यांना हमखास उत्पादन घेता येत नाही त्यामूळे सिंचन साधने २९.६०% शेतकऱ्यांकडे नाही आहेत ते निसर्गाच्या पावसावर शेती करतात.
- शेतकरी स्वत:च्या मालाचे उत्पादन घेतल्यानंतर त्याची साठवणुक घरीच ५२.८०% शेतकरी करतात. त्यामूळे त्याठिकाणी शेतकऱ्यांना बरीच जोखीम स्वीकारावी लागते.
- शेतकऱ्यांकडे उत्पादनाची क्षमता आहे पण बाजारपेठेचा अभाव ग्रामीण भागात नाही त्यामुळे ४१.२०% शेतकरी बाजारपेठेच्या अभावाने मोठे नूकसान होत आहे. जिल्हा व तालूका स्तरावर बाजारपेठ उपलब्ध आहे. तिथे नेणे त्यांना शक्य होत नाही. त्यामूळे ग्रामीण भागातच दलालाच्या सहाय्याने मालाची विक्री केली जाते. दलालाच्याच सहाय्याने त्याना बाजार भावाची माहीती होत असते त्यामूळे दलालाच्या हाताखाली मालाची विक्री शेतकरी करतो त्यामूळे मोठे नुकसान शेतकऱ्यांना सहन करावा लागतो.

❖ **सुचना व शिफारशी :**

- सिंचन क्षेत्रामध्ये वाढ करावी.
- शेती संलग्न व्यवसायाला अनुदान द्यावे ज्यामुळे शेतकरी दुय्यम व्यवसायास चालना देईल.
- शेतकरी शेतमजुरावर अवलंबुन आहेत. त्याकरीता मजुराची संघटना निर्माण करून सगळ्यांच्या कामाकरीता मजुर उपलब्ध होईल यासाठी प्रयत्न करावेत.
- शेतकऱ्यांना सुधारीत बियाणे त्यांच्या बांधावर उपलब्ध करून द्यावे.
- शेतकरी—ग्राहक ह्यांमध्ये प्रत्यक्ष माल विक्री होईल ह्यासाठी प्रक्रिया उद्योग निर्माण करावे. त्यामुळे शेतकऱ्यांची व्यापारी व लाल यांच्या जाचातून सूटेल व शेतकऱ्यांना अधिकचा नफा मिळेल.
- शेतकऱ्यांना संकरीत बियाणांचा पुरवठा माफक दरात त्यांच्या ग्राम स्तरावर उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.
- शेतकऱ्यांना बाजारपेठांची व्यवस्था करून देऊन त्यांना उचीत भाव मिळण्यास प्रयत्न करायला पाहीजे.
- शेतकऱ्यांना प्रक्रिया उद्योग निर्मितीसाठी प्रोत्साहन देऊन त्यांना सवलतीच्या दरामध्ये यंत्रसामुग्री शासनाने उपलब्ध करून द्यायला पाहीजे.
- शेतकऱ्यांना पुरक उद्योगासाठी अल्पव्याजदरावर कर्ज/अनुदान उपलब्ध करून देवून उद्योग सुरू करण्यास प्रोत्साहन द्यावे.
- कृषी उत्पादनाची किंमत ठरवितांना सरकारने शेतकऱ्यांचा लागवडी खर्च व नफ्याचा विचार करून कृषी मालाला योग्य बाजारभाव मिळण्यास प्रयत्न करणे.
- शेतकऱ्यांच्या उत्पादीत मालाला साठवणूकीसाठी वखार महामंडळ व ग्रामीण गोदामामध्ये वाढ करावी.
- ग्रामसभेच्या उपस्थितीत वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना मानधान देण्यात यावे त्यामुळे शेतकरी अधीक ग्रामसभेस उपस्थित होतील.
- शेतकऱ्यांना शेती संदर्भात प्रशिक्षण देण्यात यावे. प्रशिक्षण ग्रामीण स्तरावर देण्यात यावे ज्यामूळे शेतकऱ्यांना सहभागी होता येईल.

❖ **संदर्भ सुची :**

- अहिरे प्रतिभा — समाजशास्त्र संकल्पना, श्री. साई प्रकाशन पूणे २५०
- आगलावे प्रदिप — समाजशास्त्र परिचय श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर— २००१
- बोधनकर सूधीर — सामाजीक संशोधन पध्दती श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर
- भालेराव श्रीनिवास — चंद्रपूर जिल्ह्यातील पार्श्वभूमी जिल्हा परिषद चंद्रपूर१९९५
- भांडारकर पु.ल. — सामाजिक संशोधन पध्दती
- बोकारे दिवाकर — शेतकऱ्यांच्या आत्महत्या कशा थांबवायच्या डायमंड प्रकाशन पुणे २००८
- चव्हान एल. एल. — भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास प्रंशांत पब्लीकेशन्स २००४
- चौधरी ए.एम — आपत्ती व्यवस्थापन श्री. प्रशांत पब्लीकेशन २००६
- देशपांडे सुधाकर — योजना मासीक कृषी माल विपणन मॉडेल २००७
- गायकवाड ज्योती — गृह व्यवस्थापन श्री. मंगेश प्रकाशन प्रथम आवृत्ती २००१
- गोयल सुधिरकुमार — शेतकरी मासिक २०१४ पुणे ०१
- ठोबरे शिवाजी — भातशेती कॉन्टीनेनटल प्रकाशन विजयनगर पूणे १९९०, २००५
- मेश्राम प्रदिप — भद्रावती पुरतत्वीय वैभव संकेत प्रकाशन नागपूर
- मेश्राम सुरेश — समाजकार्यासाठी समाजाशास्त्र यश प्रकाशन नागपूर २००५
- कुंडले म. वा. — शैक्षणीक तत्वज्ञान व शैक्षणीक समाजाशास्त्र श्री. विद्या प्रकाशन पूणे १९९०
- कटमूसरे एल.बी. — समाजवादाची वाटचाल सर साहीत्य केंद्र नागपूर २०१३
- कूलकर्णी पी.के. —सामाजीक विचार प्रवाह श्री. मंगेश प्रकाशन नागपूर१९९१
- के. शंकर नारायणन — शेतकऱ्यांच्या हितासाठी लोकराज्य मासीक जून२०१२
- कारंडे रमेश —महाराष्ट्राच्या शेतीवरील एक दृष्टीक्षेप योजना जानेवारी २०१०
- काटोले रविंद्र मधूकर — भात शेती प्रक्रिया आणि उद्योग गोडवा प्रकाशन पूणे
- करूलकर रा. प. — अर्थव्यवस्था विद्याप्रकाशन नागपूर प्रथम आवृत्ती १९९५
- पन्धे अरून — सेंद्रिय शेती व प्रमाणीकरण सौरभ प्रिटर्स संस्करण २००८
- पाटील हषवर्धन — कराराची शेती म.रा. कृषीपणन मंडळ पूणे जूलै २००५
- पाटील एस. अर्जुन — शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती व शिवार्थ आत्महत्या सद्यस्थिती डिसेंबर २०१६
- साबळे निवृती रामचंद्र — कृषीघटक अनमोल प्रकाशन पूणे ०२

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 4.374
UGC Approved Journal Sr. No.48455

ISSN No. 2394-8426
Mar – 2018
Issue–I, Volume–VII

"कसायाच्या तावडीत सापडलेले लोकशाहीचे जितराब"

युगमुद्रेतील विचारशिल्प

डॉ.इंद्रजीत ओरके
सहयोगी प्राध्यपक व मराठी विभागप्रमुख
डॉ.मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस.महाविद्यालय,नागपूर

प्रस्तावना :

डॉ. यशवंत मनोहर हे मराठी साहित्य विश्वातील एक बहुपेढी व्यक्तिमत्त्व असून या व्यक्तिमत्त्वाच्या नावावर बरेच कवितासंग्रह आहेत. १९७५च्या दशकात 'उत्थानगुंफा' या विद्रोही कवितेने त्यांना लोकप्रियतेच्या आणि यशाच्या शिखरावर बसवले. प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध त्यांनी पुकारलेला 'एल्गार' या कविता संग्रहातून प्रकटला. त्यांच्या सततच्या कविता लेखनातून २०१६ साली सायन पब्लिकेशनने 'युगमुद्रा' या कवितासंग्रहाला मराठी साहित्य विश्वात दाखल केले. या संग्रहातून अनेक विषयाला त्यांनी कवितेच्या माध्यमातून प्रकाशित केले. याच संग्रहातील 'कसायाच्या तावडीत सापडलेले लोकशाहीचे जितराब' या पहिल्या कवितेतून वैचारिकतेचा शोध घेण्याचा माझा मानस आहे. मानवी मन, भारतीय संविधान, वर्तमान वास्तव, मूलतत्त्ववाद, भगिनीभाव, देशातील असामाजिक घटना, आटलेली माणूसकी, अमर्याद वासना, इत्यादी घटकांनी व घटनांनी त्यांचे मन अस्वस्थ होते.

प्रस्तूत लेखातून कवीवर्य यशवंत मनोहर यांच्या कवितेतील विचार जाणिवांचा वेध घेण्याचा हेतू आहे. कवितेतील वैचारिक जाणिवांचा काव्यमूल्यांशी काही संबंध असतो का? की वैचारिक जाणिवेमुळे काव्यमूल्य लोप पावते किंवा काव्यमूल्यांना काही बाधा पोहोचते. हेही तपासता येईल. ते तपासण्यापूर्वी 'विचार' संकल्पनेचा आधी विचार करू.

विचार संकल्पना :

१) कल्पनाशक्ती, बुद्धी यांचा व्यापार
२) शोध, अभ्यासपूर्ण चिंतन
३) खलबत, चर्चा, तारतम्य, तर्क, विवेक, मनन
४) विवेक, चिंतन, मनन करून केलेला निश्चय, निर्णय, निकाल, मत
(महाराष्ट्र शब्दकोश, विभाग ६)

वरील अर्थाच्या अनुषंगाने विचार या संकल्पनेचे विभिन्न अर्थ आपणापुढे उभे राहतात.[१]

कविवर्य यशवंत मनोहर यांच्या कवितेतील ओळीतून वैचारिकतेचा वेध घेता येईल.

"लोकांच्या जगण्याची विरचना
करते लोकशाही
लोकशाही करते पुनर्रचना लोकांची
लोकच असतात नायक
लोकशाहीच्या महाकाव्याचे
उजेडाने वागावे उजेडाशी
तसे वागतात लोक परस्परांशी
समतेने समतेशी, स्वातंत्र्याने स्वातंत्र्याशी
बंधुतेने बंधुतेशी
आणि भगिनीत्वाशी भगिनीत्वाने वागावे
भगिनीत्वाशी
तसे वागतात लोक परस्परांशी

आणि या वागण्यातच शहाणे लोक
लोकशाही म्हंणतात." (युगमुद्रा पृ.११)

आधुनिक युगात लोकशाही आणि विशेष म्हणजे सांसदीय लोकशाही ही लोककल्याण साधणारी राजकीय व प्रशासकीय यंत्रणा आहे, पद्धती आहे. भारतासारख्या दूरवर विस्तारलेल्या देशातील लोकशाही यंत्रणा ही जगात सर्वात मोठी यंत्रणा मानली पाहिजे. 'लोकशाहीला केंद्रवर्ती' मानून कवी लोकशाहीच्या अंगाने आपला विचार व्यक्त करतो.

लोकशाहीत निवडणुका होतात, मतदानाद्वारे लोकप्रतिनिधी निवडले जातात. राष्ट्रपतीची निवड, लोकसभा, विधानमंडळे करतात. पंतप्रधानाची निवड लोक करीत नसून सांसद करतात. ही सर्व वाक्ये लोकशाहीत घडणाऱ्या घटना आहेत. ती तथ्ये किंवा वस्तुस्थिती आहे, यात विचार आहे असे मात्र आपणास म्हणता येत नाही.

कविवर्य यशवंत मनोहर यांना लोकशाहीतील घटनांची वर्णने रेखाटायची नसून त्यांना लोकशाहीच्या अंगाने विचार व्यक्त करायचा आहे.

'लोकांच्या जगण्याची विरचना करते लोकशाही'

वरील ओळीतून लोकांचे प्रकाशमान जगणे आणि लोकशाही असा नातेबंध कवी बांधतो. भारतात लोकशाहीपूर्व काळात बहुसंख्य माणसांची जी सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय व्यवस्था होती ती रूढी, परंपरा, धर्माधता व फॉसिस्ट अशा प्रवृत्तींनी मजबूत झालेली राजकीय व्यवस्था होती. तिलाच आपण वर्णव्यवस्था म्हणतो. या वर्णव्यवस्थेच्या चौकटीलाच विस्कळीत करून नव्या समतामय, स्वातंत्र्यमय समाजरचनेचे स्वप्न कवी पाहतो. 'विरचना' या शब्दातून जुनी भंगलेली, पडकी, सडकी, कुजकी समाजव्यवस्थेला अग्नी देवून भारतीय संविधानाने अधोरेखीत केलेल्या समाजाचे चित्र तो लोकशाहीच्या माध्यमाद्वारे रेखाटू पाहतो. हे त्याचे भाबडे स्वप्न नाही, की भावनाही नाही, तो त्याचा विचार आहे. कारण संविधानाने निर्माण केलेली लोकशाही ही भावना नाही. ती रूढी–परंपरा नाही, तो एक क्रांतदर्शी विचार आहे. पुढील कडव्यातून आणखी विचारावर प्रकाश पडतो.

लोकशाही करते पुनर्रचना लोकांची
लोकच असतात नायक
लोकशाहीच्या महाकाव्याचे

भारतीय लोकशाहीत 'लोकांनाच नायक' संबोधले गेले आहे. वास्तवात भारतीय लोक (बहुसंख्य) कंगाल, दरिद्री, संपत्तीहिन, अज्ञानी आहेत आणि हा बहुसंख्य समूह लोकशाहीतील संविधान व राजकीय साक्षरता यापासून कित्येक मैल दूर आहे. निवडणुकीच्या काळात पसरणाऱ्या अफवा, जाती, धर्म यांचे प्राबल्य, काही रुपयांना विकली जाणारी मते यांचा कमालीचा प्रभाव अशा बहुसंख्य लोकांवर स्वाभाविकपणे, अभावितपणे पडतो. त्यामुळे तोच लोकशाहीचा पर्यायाने स्वत:च्या जीवनाचा हत्याराही ठरतो, परंतु हे विवरण कवीला करावेसे वाटत नाही, तो थेट सर्वसामान्यांना त्यांच्यातील नायकत्वाची आठवण करून देतो. राजकीय प्रक्रियेत सर्वसामान्यातील नायकाचा शोध घेणे हा विचारच क्रांतीकारी म्हणावा लागेल.

येथे लोकशाही आणि माणूस याविषयीचा विशिष्ट्य मूल्यभाव किंवा विशिष्ट्य क्रांतकारी दृष्टीकोन कवी टोकदारपणे मांडतो. येथे विचारांचा बौद्धिकतेशी, विचारांचा विवेकाशी, विचारांचा चिंतनाशी संबंध दाखवला आहे. विवेकशीलता, वैज्ञानिकता, विशिष्ट्य जीवन प्रणाली इत्यादी बाबी वैचारिकतेशी निगडीत आहेत. यशवंत मनोहर कवी आहेत हे खरेच परंतु ते केवळ भावनांचा उद्रेक व्यक्त करणारे (Spontinious overflow of feelings) कवी नाहीत. या कवीच्या कवितेतेतून प्रकटणारे मूळ बीज त्यांच्या विचारात आहे. भावनेत नाही. जगातील आणि देशातील थोर क्रांतकारी विचारप्रवाहाचे ते प्रवासी असल्यामुळे भावनात्मकतेपेक्षा वैचारिक परिघ घेवून त्यांची कविता त.बुद्ध, कबीर, म.फुले, आगरकर, लोकहितवादी, डॉ.आंबेडकर प्रेरणा मानते. त्यांच्या प्रेरणेने, सामाजिक, राजकीय, आर्थिक, वास्तव बदलण्यासाठी ते कवितेच्या प्रत्येक ओळीतून (तासातून) विचारांचे बीज पेरत आहेत. जसे लोकहितवादी यांनी त्यांच्या शतपत्रातून पेरले होते. "मुंबईच्या प्रभाकर पत्रातून १८४८ मध्ये येवू लागलेली त्यांची शतपत्रे राजकीय, सामाजिक जागृतीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरली आहेत. आमच्या लोकांच्या रिती अगदी बदलल्याशिवाय या देशाचे हित होणार नाही. व या लोकास स्वत: राज्य चालविण्याचे सामर्थ्य असल्याखेरीज इंग्रज लोक या

देशातून गेले तरी उपयोग होणार नाही, हे लोकहितवादी यांच्या एकंदर लेखनाचे सूत्र होते."[२] लोकहितवादींच्या लेखनाचे जे सूत्र होते, त्या सूत्रात जो विचार गुंफला गेला होता तसाच विचार प्रस्तुत कवीच्या कवितेतून व्यक्त होतो. आपल्या सामाजिक, कौटुंबिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक परिस्थितीचे भान प्रत्येक नागरिकास यावे, व ती अंधारलेली परिस्थिती बदलण्यासाठी लोकशाहीचा आधार घेवून नव्या आनंदीदायी व वैभवी समाजाची निर्मिती व्हावी. हा कवीचाही हेतू आहे. लोकहितवादींनी तो निबंधातून व्यक्त केला, कवी यशवंत मनोहर यांनी तो 'युगमुद्रा' कवितेतून प्रकट केला.

"विचारांना फुटणाऱ्या नक्षत्रांच्या मोहोरावर
बसवले जातात पहारे
अशा वेळी कोसळतो वर्तमान
अंतराळ कोसळावे तसा.
दैववादाचे दाटून येतात ढग काळेकुट्ट
मूलतत्त्ववादाची नागडी हिंस्त्रता
फिरते वस्त्यांमध्ये अतिरेक्याप्रमाणे मोकाट" (युगमुद्रा, पृ.१०–११)

विश्वाला आकार देण्यात विचारांची फार मोठी भूमिका आहे. विचाराशिवाय विश्व निर्माण होवूच शकत नाही. निसर्ग हा जंगल, नदी, समुद्र, डोंगर–दऱ्या, ज्वालामुखी इत्यादी निर्मिती करतो परंतु विचारवंत, तत्त्ववेत्ते सुंदर सृष्टीच्या निर्मितीत स्वत:ला झोकून देतात व मानवी विश्वाशी संवाद साधण्याचा व परिवर्तन घडवून आणण्याचा चिरंतन प्रयत्न करतात.

यशवंत मनोहर हे विश्वातील आधुनिक मूल्यांचा वारसा जपणारे व हा वैचारिक वारसा कवितेच्या रूपाने पुढे नेऊ पाहतात. विचारांचा विधायक परिणाम रूढी, प्रथा, कालबाह्य मूल्यपरंपरा, सनातन प्रवृत्ती, फॅसिस्ट प्रवृत्ती कर्मकांडे, विविध दंभ, पाखंडीपणा, अज्ञान इत्यादींना उघडे पाडतो. त्यामुळे विचारांवर पहारे बसवले जातात. असे कवी म्हणतो. आणि एकदा का विचारांना नियंत्रित करणाऱ्या व विचारांचे खून पाडणाऱ्या प्रवृत्तींचे रान माजू लागले की, वर्तमानच व्यवस्थेच्या कोठडीत जेलबंद होतो. विचारांची जेव्हा मुस्कटदाबी होते तेव्हा दैववाद थैमान घालू लागतो. परिणामी मुलतत्त्ववादी अतिरेक्यांचे रूप घेऊन वस्त्या वस्त्यावर जुलूम करू लागतात ही हत्या वस्त्यांची नाही, वस्तीतील लोकांचीच नाहीतर लोकशाहीच्या मृत्यूची पूर्वसूचना कवीला त्यांच्या प्रतिभेने मिळते.

"माणसाऐवजी उगवतात बंदुकीची झाडे
आणि कसायाच्या तावडीत सापडलेल्या
जितराबासारखी होते
लोकशाहीची गत..." (युगमुद्रा पृ.११)

सध्या तर लोकशाहीचे संपूर्ण शरीरच कसायाच्या हातात बंदिस्त झाले आहे. कसाई कोण? हे भारतीय नागरिकांवर कवीने सोपवले आहे. वाढत्या धर्मांधतांना, गुडांच्या अरेरावीला व मुजोर राज्यकर्त्यांना तर कधी अध्यात्माचा आधार घेत घेत लोकमनावर ताबा मिळवित चालणाऱ्या आध्यात्मिक उद्योगपतींना, पाखंडी बुवाबाबांना अतिरेक्याप्रमाणे मोकाट सोडले तर 'लोकशाहीचा मृत्यू' कसायाच्या सर्वोच्च हातात सध्या तरी दिसतो आहे. हे चिंतेचे आणि चिंतनाचे आलेख कवी आपणापुढे मांडतो. "तृतीयरत्न नाटकातून (१८५५) फुल्यांनी देवाच्या व धर्माच्या नावावर अज्ञान माळी, कुणबी इ. शुद्रजातींना लबाड्या व हूलथापा देवून लूबाडून खाण्याचा भटाब्राह्मणांचा कावा उघड करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचबरोबर विद्या शिकण्याचे महत्त्वही बिंबवले आहे."[३] (इथे भट ब्राह्मण म्हणजेच अलीकडील सर्वच धर्मातील अशा प्रवृत्तींना अभ्यासकांनी समजावे.) म.फुले यांनी 'तृतीयरत्न' या नाटकातील शूद्रांना व भोळ्याभाबड्या जनतेला जागृत करण्याचा जो हेतू होता तोच हेतू कवी यशवंत मनोहरांचा दिसून येतो.

यावरून म्हणजेच लोकहितवादी म.फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हा "'विश्वातील गतीमान' असा विचार वारसा आहे. आणि कवी यशवंत मनोहर हा वारसा कवितेतून व्यक्त करतात. केवळ नजरेने दिसणाऱ्या घटनाच आपण टिपत असतो. त्यांनाच खरे मानत असतो. परंतु अतिंद्रिय तत्त्वाचा अर्थ लावण्याचा ते जाणण्याचा प्रयत्न विचारांच्या सहाय्याने केला जातो. हे अतींद्रिय

तत्त्व आपल्या ज्ञानाचा विषय होत नाही, परंतु त्याविषयी 'विचार' मात्र करता येतो."[४] इथे रा.भा.पाटणकरांनी व्यापक व समग्र अर्थाने वैचारिक संकल्पनेचा वेध घेतला आहे. धर्म, जाती, प्रांत, प्रदेश, जुनाट सांस्कृतिक मूल्ये इत्यांदींचा विळखा लोकशाहीच्या मळ्याभोवती पडला आहे. त्यामुळे तिचा प्राण जातो की काय? अशी परिस्थिती विचारवंताना दिसू लागली. कवीलाही ही परिस्थिती अस्वस्थ करते आहे, ते खालील कडव्यातून –

"धर्माचा व जातीचा कॅन्सर झाला नाही
ते वर्तनच लोकशाही वर्तन असते.
दोन धर्मामधील संबंध धर्मशाही
दोन जातीमधील संबंध जातशाही
या शाह्या एक व्यक्ती एक मूल्यांची
करतात हत्या." (युगमुद्रा पृ. १२)

'एक व्यक्ती एक मत' डॉ.बाबासाहेब आंबेडकर ज्या घटनेचे शिल्पकार आहेत. त्या संविधानाने दिलेला हक्क आहे. आंबेडकरांच्या विचारांचे बिंब प्रतिबिंब या निर्णयात आहे. या निर्णयाला बाधीत घटक म्हणजे जात व धर्म! कारण जात व धर्म ह्या समूह भावना आहेत. ह्या समूह भावना बरेचदा व्यक्ती मूल्यांची अवहेलना करताना दिसतात. इथे भारतीय संविधान व भारतातील जाती, धर्म या संकल्पनाच वेगवेगळ्या आहेत. संविधानात व्यक्तीला मूल्य प्राप्त झालेले तर जातीत, धर्मात व्यक्तीला मूल्य प्रदान न होता ते समूहांना प्राप्त होते. ते झुंडशाहीला व जमातवादाला महत्त्व व मूल्य प्राप्त होते. म्हणून कवीला वरील कडव्यातून सुचवावेसे वाटते की, या 'शाह्या' एक व्यक्ती एक मूल्यांची हत्या करणाऱ्या आहेत आणि हे खरेच आहे. देशात या दशकात ज्या विचारवंताच्या हत्या झाल्यात त्या कुप्रसिद्ध अतिरेकी संघटनांनी केलेल्या नसून व्यक्ती मूल्य न मानणाऱ्या व संघभावनेला व पुराणमूल्यांची आरती ओवाळणाऱ्या दहशतवाद्यांनी केलेल्या आहेत. या दहशतवाद्यांना केंद्र व राज्य सरकारी पोलिस यंत्रणा कंठस्थान तर सोडा, खून्यांना पकडू शकली नाही, प्रभावी खटलाही चालवू शकली नाही, ही एक शोकांतिकाच म्हणावी लागेल. जोपर्यंत वैचारिक क्षमता मतदात्यात निर्माण होत नाही तोपर्यंत त्याच्या मनाला फारसा अर्थ नसतो. असे एरिक फ्रेम म्हणाला होता.

'युगमुद्रा' या कवितासंग्रहातून लोकशाहीच्या विविध अंगोपांगाचे कवीवर्य यशवंत मनोहर यांनी चिंतन मांडले आहे. एक गतीमान विचार प्रागतिक दृष्टीकोनातून विश्वातील वैचारिक वारसांचा प्रवाह गतीमान करण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे. या विचारातील व्यापकता, विभिन्न बाबींना स्पर्श करीत लोकशाहीच्या समग्र विचारांचा परिप्रेक्ष उभा करण्याचा प्रयत्न 'लोकामधील कोणीही, परस्परांना पर मानत नाहीत.' या लोकशाहीलाच शहाणे लोक लोकशाही मानतात. अशा उत्कट शब्दातून लोकशाहीचे ते मूल्य जपतात. तद्वतच

'लोकशाही म्हणजे सौंदर्याची नीती
आणि नीतीचे सौंदर्य
हे सौंदर्य असते विज्ञाननिष्ठेचे आणि समतानिष्ठेचे (पृ.१२)

अशा सौंदर्यसर्जक भाषेतून ते लोकशाहीच्या सौंदर्याचा गौरवही करतात.

यशवंत मनोहर हे प्रतिमा आणि प्रतिकांचा बेमोसमी पाऊस पाडणारे विचारकुळातील श्रेष्ठ व ज्येष्ठ कवी आहेत. परंतु 'युगमुद्रा' या कवितासंग्रहातील 'लोकशाही' वर लिहिलेल्या कवितेला त्यांनी प्रतिमा व प्रतिकांचा कुठलाही साज चढवला नाही, वर्णनातही खेळवले नाही. विचारांच्या प्रकटीकरणासाठी प्रतिमा व प्रतिकांची फारसी गरजही नसते. जेव्हा थेट विचार वाचकापुढे ठेवायचा असतो तेव्हा प्रतिमांचे व प्रतिकांचे आधार कवितेला न देताही काव्यमूल्य त्यांनी जपले आहे.

कवी यशवंत मनोहर लोकशाहीच्या विविध अंगाचा विचार कवितेतून व्यक्त करतात.

लोक म्हणजे लोकायतातील लोक
बुद्ध ज्यांच्या दु:खांनी आरपार
कळवळला ते लोक

पारदर्शकता नको असते
नको असते पुनर्रचना
त्या वर्चस्वतृष्णा होत नाहीत लोकशाही
आणि लोकशाहीतले लोकही ते होत नाहीत. (युगमुद्रा पृ.१३,१४)

ज्ञानक्षेत्रात लोकायत प्रणालीचा एक स्वतंत्र असा दबदबा आहे. लोकायत विचारप्रणाली ही मानवी विकासाला माणसातील ज्ञानतत्त्वांना समृद्धता मिळवून देणारी प्रणाली म्हणून तिच्याकडे पाहिले जाते. तत्कालात मानवी समाजात आणि मानवी मनात थैमान घालणाऱ्या प्रश्नांचे, सृष्टीविषयक विकराल घटनांचे मूल्यमापन आपल्या वैचारिक पण कृतीशील कार्यकारण भावातून त.सिद्धार्थ बुद्ध करीत असे. आपल्या आवाक्याबाहेर असणाऱ्या अनिवार वासना यामुळे माणूस चिंताग्रस्त होतो. असा त्याने 'सिद्धांत' मांडला. २१व्या शतकाच्या पूर्वार्धात त्याने व्यक्त केलेला विचार श्रेष्ठ वाटण्याचे कारण म्हणजे अतिरेकी वासनेमुळे माणूस वासनांच्या जाळ्यात अडवून पडतो व वासनेचा शिकार होतो. म्हणजेच तो स्वत:चा मृत्यूच ओढवून घेतो असे नाही तर माणूस म्हणून तो स्वत:चे अस्तित्व कमावतो. कवीला यात त.सिद्धार्थ बुद्धाचे स्मरण त्यासाठी येते परंतु विचारवंत, दार्शनिक बुद्धापेक्षा समाजाच्या डोक्यात सिद्धार्थ बुद्धाऐवजी भगवान बुद्ध जेव्हा विराजमान होतो. तेव्हा सिद्धार्थ बुद्धाची समग्र क्रांतकारी प्रक्रिया बाधित होते. "विचाराला आवाहन करणाऱ्या विवेकवादी बुद्धाचा एकदा भगवान करुन टाकला आणि या क्रियेला यश आले म्हणजे हितसंबंधियांच्या हितसंबधांना मरण नसते. विष्णू हा तर राजाच तेव्हा त्यांची वैभवशाली मंदिरे पुरोहितांच्या राजविलासाचा आधार होतो, पण शंकर स्मशानगामी आहे म्हणून काय झाले? त्यांच्याही नावाने संस्थाने उभी करता येतात. बुद्धाचा भगवान झाल्यावर पुरोहितशाहीला मरण नसते"[५] डॉ. नरहर कुरूंदकर या विचारवंताचे भाष्य लोकशाहीचे संवर्धन करू पाहणाऱ्या अभ्यासकांना बळ देतात तर विवेकी बुद्धाचा भगवान बुद्ध करू पाहणाऱ्यांच्या प्रवृत्तीलाही उघडे पाडतात. ज्यांचे हितसंबंध भगवान बुद्धाशी जुळले आहेत, ते सारे संबंध केवळ गरजा कमी व्हाव्यात म्हणून हितसंबंधियांनी भगवान बुद्धाला कवटाळले नाही तर त्या कवटाळण्यामागे एक सुप्त ईच्छाशक्ती व वासनांचा विलास आहे. पण तो सुप्त आहे. सुप्ततेचा अर्थ उलगडल्यास ते हितसंबंध आर्थिक असल्याचे दिसून येतील. भगवान बुद्धाच्या नावाने विशेष वस्त्रपरिधान करणाऱ्यांचे व्यवहार काय दर्शवते?

माणूस तो कुठल्याही काळातील असो त्याला त्याच्या जैविक गरजा असतात आणि अस्तित्वासाठी गरजांची पूर्ति करावी लागते. मानवी व्यवहाराला प्रत्येक काळात सुरळीत व्यवहार करणारे 'चलन' असते. सध्या जगात वेगवेगळ्या नावानं चलन ओळखलं जातं. ज्याला इंग्रजीत 'करंसी' असं नाव आहे. म्हणजेच सर्व व्यवहार हे 'करंसी'तून होतात. म्हणजेच जीवन व्यवहार पार पाडण्यासाठी व माणून म्हणून दर्जा प्राप्त करण्यासाठी 'चलनी' नाणे फार महत्त्वाचे आहे. ही सारी प्रक्रियाच वर्गव्यवस्थेशी व वर्गीय जाणिवांशी जुळलेली आहे. मंदिरातील पुरोहित असो की आध्यात्मिक गुरु, अलिकडे आध्यात्मिक गुरु हे अध्यात्म उद्योजक म्हणूनच पुढे येवू पाहत आहेत. त्यांची सुप्त इच्छाही अर्थकारणाशी निगडीत आहे. भोळ्या जनतेला भ्रमात ठेवण्यासाठी अध्यात्म अशा शब्दांचा ते आधार घेतात आणि अयव्यवस्थेशी संबंध नाहीच असे दाखवतात. मुळात समाज रचना ही अर्थावरच उभी असते. "कौटिल्याने एकेकाळी प्रस्थापितांची आर्थिक परिस्थिती भक्कम करण्यासाठी अर्थाचा शोध घेतला तर आधुनिक काळात वंचितांची परिस्थिती बदलण्यासाठी कार्ल मार्क्स या विचारवंताने अर्थाचाच आधार घेतला. सर्वांना स्वतंत्र आणि समता हवी असेल तर अर्थरचना बदलावीच लागेल."[६] नरहर कुरूंदकर विवेकी, विचारवंत सिद्धार्थ बुद्धाच्या वैचारिक भूमिकेचा वरीलप्रमाणे विचार करतात. हा विचारच अभिनव म्हणावा लागेल.

"ह्या वर्चस्वतृष्णा होत नाही लोकशाही" कवीचे हे म्हणणे बरोबरच आहे. अमर्याद तृष्णेने लोकशाहीच काय संपूर्ण पृथ्वीच संकटात सापडली आहे. पुरोहित, मंदिर, उद्योग, अध्यात्म उद्योग आणि या सर्वांच्या मुळाशी असलेली 'धर्म' ही संस्था, हिची कोटेकोर चिकित्सा जगभरातील विचारवंतांनी, वैज्ञानिकांनी केली, परंतु भोळाभाबडा माणूस या चिकित्सेपासून दूर राहिला. त्यामुळे तो दारिद्र्यातच बंदिस्त झाला. व ज्याला धर्माचा मतलबी अर्थ कळला अशांनी भांडवलाच्या बळावर व धर्माच्या नावावर कमालीचा लोकसंग्रह वाढवला. हा लोकसंग्रह म्हणजे 'सुरक्षित मतपेटी' ही सुरक्षित मतपेटी लोकशाहीचा गळा आवळू पाहते. म्हणूनच कवी म्हणतो, ''आणि लोकशाहीतले लोकही ते होत नाहीत.''धर्म' हा शब्द गोंडस एखाद्या कोवळ्या बाळासारखा. पण

किती विनाशाचा थरार त्यात अन्युस्यूत आहे, हे इतिहास सांगतो. महाभारताच्या अभ्यासावरून ते उलगडेल. "धर्म म्हणजे संस्कृतीचा जप! किती मोठं थोतांड, महाभारतात अर्थाची महती अनेक ठिकाणी स्पष्ट केली आहे. भीष्माने युधिष्ठिराला उपदेश करताना म्हटले की, सर्व धर्माचा आधारकोश म्हणजे धन हाच आहे. धनाच्या सहाय्याने इहलोक आणि परलोक सिद्ध होतात. हे धर्मवचन आहे धनहीन पुरूष हा असून नसल्यासारखा आहे. युधिष्ठिरानेही वनवास संपल्यानंतर श्रीकृष्णाला आपली व्यथा बोलून दाखवताना म्हटले होते. कृष्णा, धनहीन मनुष्य जिवंत असला तरी तो मेल्यासारखा आहे. धन हा श्रेष्ठ धर्म आहे. असे म्हणतात. "[७] धन आणि धर्म यांच्या अंत:संबंधावर मराठीतील थोर समीक्षक, विचारवंत डॉ.निर्मलकुमार फडकुले यांनी स्पष्ट प्रकाशच टाकला आहे. हा प्रकाश आपल्या मनातील काळोखाला अज्ञानाला ज्याक्षणी नष्ट करेल तेव्हाच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित आणि भारतीय संविधानाला अपेक्षित लोक हेच राजकीय सत्तेचे नायक ठरतील. नाहीतर आयुष्यभर काही करता येत नाही म्हणून फक्त मतदानच करत राहतील.

काही निरीक्षणे–

- कविता केवळ प्रतिमा, प्रतिके यामुळे निर्माण होत नसून शब्दबंधाचे महत्त्वाचे कार्य आहे.
- वैचारिकतेची कसदार मांडणी कवितेतून प्रकट होते.
- कवितेतून वैश्विक विचारप्रणालीचे दर्शन घडते.
- लोकशाहीला केंद्रस्थानी ठेवून कवितेला व्यापक परिघ प्राप्त झालेला आहे.
- अमर्याद वासनांनी लोकशाहीला बाधा पोचते हा विचार कवितेतून प्रकटतो.
- विभूतीकरण व विवेक यातील स्पष्ट अंतर कवितेतून दिसून येते.
- लोक हेच लोकशाहीतील नायक असतात असा विचार प्रवाह कवितेतून वाहतो.
- कवितेतून विचार व्यक्त होत असतानांही काव्याला बाधा पोचत नाही.
- कविची जीवननिष्ठ जाणिव कवितेतून साकारते.

'कसायांच्या तावडीत सापडलेले लोकशाहीचे जितराब' या कवितेतून वेगवेगळ्या अनुभवाच्या स्तरावरून कवीला आलेला अनुभव सरळ व थेट पद्धतीने त्यांनी शब्दबद्ध केला. ती वैचारिक विधानेच आहेत, पद्यशैलीतून व्यक्त झालेली, मात्र काव्यमूल्य कवीने जपले व जोपासले.

यशवंत मनोहर यांची कविता विद्रोह, बंडखोर प्रवृत्तीची, सामाजिक जाणिवेची कविता म्हणूनच आजवर लोकप्रिय झालेली कविता आहे. प्रस्तुत कविता पुढे पाऊल टाकते व ती अत्तुच्य विचारांची उंची गाठते व समग्र विचारांचे दर्शन घडविते. कवितेतून व्यक्त होणाऱ्या विचारांना वैश्विक व चिरंतन असा वारसा देवून ती विद्यमान शतकातील व वर्तमानातील लोकशाहीच्या सौंदर्याचा वारसा जतन करते यात कुठेही अतिशयोक्ती नाही. 'कसायाच्या तावडीत सापडलेले लोकशाहीचे जितराब' या कवितेतून कविने संवेदनशीलतेने रेखाटलेले चित्र हे 'युगमुद्रेतील विचारशिल्प' ठरावे.

प्रकरण टिपा

१) वसंत पाटणकर, कवितेचा शोध, मौज प्रकाशन गृह, मुंबई, २०१५ पृ.१७७
२) वसंत आबाजी डहाके : मराठी साहित्य इतिहास आणि संस्कृती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई पृ.८
३) तत्रैव पृ. ८२
४) रा. भा. पाटणकर, उद्धृत कवितेचा शोध पृ. १७७
५) नरहर कुरूंदकर : भजन, इंद्रायणी साहित्य प्रकाशन २००० पुणे पृ.१००
६) तत्रैव पृ. ९५
७) निर्मलकुमार फडकुले, चिंतनाच्या वाटा, मेहता पब्लिसिंग हाऊस, मुंबई, २०००, पृ. ७७

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 4.374
UGC Approved Journal Sr. No.48455

ISSN No. 2394-8426
Mar – 2018
Issue–I, Volume–VII

चंद्रपूर जिल्ह्याशी संबंधीतकृषी उद्योग

प्रा.डॉ. सौ. शरयु मनिष पोतनुरवार
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
सरदार पटेल महाविद्यालय,
चंद्रपुर

सारांश :–
शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना तसेच शेतीला विविध साधनांचा पुरवठा करणाऱ्या उद्योगांना कृषी उद्योग असे म्हटले जाते. चंद्रपूर जिल्ह्याचा सर्वांगिन विकास साध्य करण्यासाठी गतीमान औद्योगिकरणाची आवयकता आहे. जिल्हा कृषिप्रधान आहे. जिल्ह्यात औद्योगिकरण अल्प प्रमाणात झालेले आहे. अनेक जिल्ह्यांच्या तुलनेत चंद्रपूर जिल्हा थोडा आघाडीवर आहे, परंतु येथील नैसर्गिक संसाधनांचा विचार केल्यास जिल्ह्याचे जे औद्योगिकरण झाले आहे ते मुळीच पुरेसे नाही.
एखादया वस्तूला उपभोक्त्याच्या उपभोगासाठी योग्य रूप देऊन अधिक टिकाऊ करण्यासाठी वेगळे रूप देणे याला श्प्रक्रिया असे म्हणता येईल. शेतीमधील उत्पादनाचे स्वरूप जर पाहिले तर बहुतेक मालाला कमी–अधिक प्रमाणात प्रक्रियेची गरज असते असे दिसून येईल. भारतात एकूण औद्योगिक उत्पादनात कृषि औद्योगिक वस्तुंचे उत्पादन ३३ टक्के आढळते.

दुसऱ्या प्रकारामध्ये, नाशीवंत माल अधिक टिकविण्यासाठी त्यावर प्रक्रिया आवश्यक ठरते. केळावर प्रक्रिया करून पावडर करणे, संत्र्यांचा रस, आंब्याचा रस तसेच वाटाण्यांवर प्रक्रिया करून त्यांना बारमाही उपयोगिता प्रदान करणे इत्यादी गोष्टी वस्तुच्या टिकाऊपणातील वाढ दर्शवितात. म्हणजे प्रक्रिया केल्यामुळे त्या वस्तुची उपयोगिता वाढले. भारतासारख्या अर्थव्यवस्थेत जेथे ७० टक्के लोकसंख्या ग्रामीण आहे तेथे ओद्योगिकरण ही महत्वाची आवश्यकता आहे. शेतमाल मुळ रूपात विकण्यापेक्षा प्रक्रिया करून विकल्यामुळे अधिक किंमत मिळते. प्रक्रिया करणारे उद्योजक त्यांच्या सेवेच्या मोबदल्यापेक्षा कितीतरी अधिक पटीने नफा कमावितात.

कृषी क्षेत्राच्या विकासाला चालना देण्याच्या दृष्टिने अशा प्रक्रिया उद्योगांची स्थापना करण्यासाठी श्शासनाने विविध उपाय योजना आखल्या आहेत. या योजनांच्या माध्यमातून कृषि क्षेत्राचा विकास व्हावा हा उद्देश आहे. सध्याच्या शेतीची अवस्था पाहता शेतीला पूरक उद्योगाची जोड देणे अपरिहार्य आहे.शेती विकास आणि ग्रामीण अर्थ व्यवहारात गतिमानता निर्माण करण्याचे सामर्थ्य कृषीशी निगडीत उद्योगामध्ये आहे.विकसनशील देशांच्या विकास प्रक्रियेत विशेषत: ग्रामीण विकासाच्या संदर्भात, कृषी उद्योगांची भूमिका अतिशय महत्वाची आहे. विशेषत: ग्रामीण भागात हे उद्योग सुरू होऊ शकतात.
भांडवलाची कमतरता, संघटनांचा अभाव, कौशल्याचा अभाव, श्रम शक्तीचा ज्यादा पुरवठा इत्यादी घटकांमुळे आधुनिक मोठे उद्योग ग्रामीण क्षेत्रात जाण्याबाबत उदासीन असतात. परंतु कृषी उद्योग मात्र हे अडथळे पार करून विकसित होऊ शकतात.

बीजशब्द :–सर्वांगिन विकास,गतीमान औद्योगिकरण, संसाधनांची उपलब्धता, व्यवस्थापक सल्लागार इत्यादी.

उद्देश :–सर्वांगिन विकास साध्य करण्यासाठी कृषी उद्योग अधिक उपयुक्त ठरु शकतो.

अशा आशेतुन ,गरजेतुनअभ्यास करण्याचा मानस निर्माण झाला.

प्रस्तावना :–चंद्रपूर जिल्ह्याचा सर्वांगिन विकास साध्य करण्यासाठी गतीमान औद्योगिकरणाची आवयकता आहे. जिल्हा कृषिप्रधान आहे. जिल्ह्यात औद्योगिकरण अल्प प्रमाणात झालेले आहे. अनेक जिल्ह्यांच्या तुलनेत चंद्रपूर जिल्हा थोडा आघाडीवर आहे, परंतु येथील नैसर्गिक संसाधनांचा विचार केल्यास जिल्ह्याचे जे औद्योगिकरण झाले आहे ते मुळीच पुरेसे नाही. नैसर्गिक संसाधनांच्या उपलब्धते बरोबरच जिल्हा कृषिप्रधान आहे. त्यामुळे
कृषीवर आधारित उद्योगधंदयाच्या निर्मितीतून जिल्हाचा औद्योगिक विकास अधिक गतीने करणे शक्य आहे.

शोधनिबंध

भारतात एकूण औद्योगिक उत्पादनात कृषि औद्योगिक वस्तुंचे उत्पादन ३३ टक्के आढळते. श्कृषिवर आधारित उद्योगांचे उत्पादन एकूण औद्योगिक उत्पादनाच्या ३२.९९ प्रतिशत आहे, असे अभ्यासपूर्ण विधान श्री. निर्मल गंगुले, व्यवस्थापक सल्लागार, प्रसिध्दी विभाग, दिल्ली यांनी केले आहे. कृषी उद्योग स्थापन केल्यामुळे शेतीचेही व्यावसायीकरण करण्यास प्रोत्साहन मिळते.

शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना तसेच शेतीला विविध साधनांचा पुरवठा करणाऱ्या उद्योगांना कृषी उद्योग असे म्हटले जाते. श्शेती आणि संबंधीत व्यवसायांचे उत्पादन कच्चा माल म्हणून प्रत्यक्षपणे प्रक्रियेच्या पहिल्या अवस्थेत जे उद्योग वापरतात आणि ज्यांच्या कार्यामुळे ग्रामीण क्षेत्राच्या विकासाला महत्वपूर्ण हातभार लागतो तसेच जे उद्योग शेतीला लागणारी साधने प्रत्यक्षपणे पुरवितात त्यांना कृषी उद्योग असे म्हणता येईल, असे विजय कविमंडन म्हणतात.एखादया वस्तूला उपभोक्त्याच्या उपभोगासाठी योग्य रूप देऊन अधिक टिकाऊ करण्यासाठी वेगळे रूप देणे याला श्प्रक्रिया असे म्हणता येईल. शेतीमधील उत्पादनाचे स्वरूप जर पाहिले तर बहुतेक मालाला कमी–अधिक प्रमाणात प्रक्रियेची गरज असते असे दिसून येईल. ग्राहकाला तेल मिळण्यासाठी तेलबीयांवर प्रक्रिया करावी लागते. उसावर प्रक्रिया केल्याशिवाय गुळ किंवा साखर मिळत नाही. कापसाची रूई व गाठी केल्यानंतरच तो गिरण्यांमध्ये जाऊन सूत व कापड तयार होते. धानावर प्रक्रिया करून तांदूळ निर्माण होतो. ही सर्व उदाहरणे दाखवितात की मूळ वस्तुला उपभोग्य स्वरूप येण्यासाठी प्रक्रिया आवश्यक असते. दुसऱ्या प्रकारामध्ये, नाशीवंत माल अधिक टिकविण्यासाठी त्यावर प्रक्रिया आवश्यक ठरते. केळावर प्रक्रिया करून पावडर करणे, संत्र्यांचा रस, आंब्याचा रस तसेच वाटाण्यांवर प्रक्रिया करून त्यांना बारमाही उपयोगिता प्रदान करणे इत्यादी गोष्टी वस्तुच्या टिकाऊपणातील वाढ दर्शवितात. म्हणजे प्रक्रिया केल्यामुळे त्या वस्तुची उपयोगिता वाढले.

भारतासारख्या अर्थव्यवस्थेत जेथे ७० टक्के लोकसंख्या ग्रामीण आहे तेथे ओद्योगिकरण ही महत्वाची आवश्यकता आहे. शेतमाल मुळ रूपात विकण्यापेक्षा प्रक्रिया करून विकल्यामुळे अधिक किंमत मिळते. प्रक्रिया करणारे उद्योजक त्यांच्या सेवेच्या मोबदल्यापेक्षा कितीतरी अधिक पटीने नफा कमावितात.

जसे – बटाटे, ठोक बाजारात विकल्यास फारशी किंमत प्राप्त होत नाही परंतु त्यापासून तयार होणारे वेफर्स मात्र कितीतरी पट महाग असतात. बटाटयावर केलेल्या प्रक्रियेमुळे हा नफा होत असतो. उदा. साखर कारखाना, दुध उत्पादने, ब्रेड, बिस्किट ही सर्व प्रक्रिया उत्पादने अधिक नफा व रोजगार मिळवुन देतात.

कृषी क्षेत्राच्या विकासाला चालना देण्याच्या दृष्टिने अशा प्रक्रिया उद्योगांची स्थापना करण्यासाठी श्शासनाने विविध उपाय योजना आखल्या आहेत. या योजनांच्या माध्यमातून कृषि क्षेत्राचा विकास व्हावा हा उद्देश आहे. श्सध्याच्या शेतीची अवस्था पाहता श्शेतीला पूरक उद्योगाची जोड देणे अपरिहार्य आहे.शेती विकास आणि ग्रामीण अर्थ व्यवहारात गतिमानता निर्माण करण्याचे सामर्थ्य कृषीशी निगडीत उद्योगामध्ये आहे.

विकसनशील देशांच्या विकास प्रक्रियेत विशेषत: ग्रामीण विकासाच्या संदर्भात, कृषी उद्योगांची भूमिका अतिशय महत्वाची आहे. विशेषत: ग्रामीण भागात हे उद्योग सुरू होऊ शकतात. भांडवलाची कमतरता, संघटनांचा अभाव, कौशल्याचा अभाव, श्रम शक्तीचा ज्यादा पुरवठा इत्यादी घटकांमुळे आधुनिक मोठे उद्योग ग्रामीण क्षेत्रात जाण्याबाबत उदासीन असतात. परंतु कृषी उद्योग मात्र हे अडथळे पार करून विकसित होऊ शकतात.

१श्शेती विकास :

श्शेतीच्या उत्पादन तंत्रातील सुधारणांमुळे तिचे व्यापारीकरण होण्याची प्रवृत्ती वाढली आहे. परिणामत: शेतमालावर आधारित प्रक्रिया उद्योगांना अधिक वाव मिळाला आहे. आणि महत्वाचे असे की, जेथे कृषी उद्योग स्थापन झाले तेथे शेतीच्या लागवडीची परंपरागत पध्दती जाऊन आधुनिकीकरणाला सुरूवात झाली. निर्वाह शेतीचे रूपांतर व्यापारी शेतीत करणे व ग्रामीण क्षेत्राचा विकास साध्य करणे, कृषी उद्योगामुळे शक्य झाले.

२ ग्रामीण भागात रोजगाराची निर्मिती :

कृषी उद्योगामुळे ग्रामीण बेकारीच्या समस्येचे गांभीर्य निश्चितपणे कमी होऊ शकते.

३ कच्च्या मालाचा पुरवठा :

कृषी उद्योगांचा फायदा म्हणजे कच्चा मालाच्या ठिकाणाजवळ उत्पादन सुरू केले जाऊ शकते. कापूस, तेलबीया, कडधान्य, धान, ऊस इत्यादी पिकांवर प्रक्रिया करणारे उद्योग ग्रामीण क्षेत्रात सुरू करणे शक्य होते. जर असे उद्योग स्थापन झाले तर त्यांचा चांगला परिणाम शेतीच्या उत्पादकतेवर होतो.

४ खेडयांचे अस्तित्व टिकविणे :

वाढत्या औद्योगिकरणाबरोबर शहरीकरणात वाढ होते व त्यामुळे काही गंभीर प्रश्न निर्माण होतात. आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या एका अभ्यासात म्हटले आहे की, श्ग्रामीणांचीश्शहरांकडील धाव अशीच सुरू राहिली तर खेडयांच्या अस्तित्वाला धोका निर्माण होईल. काँक्रीटची जंगले वाढविणाऱ्या शहरांपेक्षा खेडयांना स्वत:ची अशी निश्चित प्रतिमा आहे व ती जपण्याचे आवश्यक काम कृषी–उद्योग करू शकतात.श

५ इतर फायदे :

कृषी उद्योगासाठी कमी भांडवल लागते आणि भांडवलाची कमतरता असणाऱ्या विकसनशील देशांना कृषी उद्योग हे वरदान ठरतात. कौशल्य व उत्पादन तंत्राची फारशी उच्च पातळी नसलेल्या भागातही ते सुरू करता येतात. अशा उद्योगांच्या निर्मितीकरिता अद्ययावत तंत्रज्ञानाची फारशी आवश्यकता नाही म्हणून आयातीचा खर्चही करावा लागत नाही. चवथ्या पंचवार्शिक योजनेपुर्वी कृषी उद्योगांचा समावेश ग्रामोद्योग व लघुउद्योगांच्या गटात करण्यात आला होता. पुढे मात्र त्यांना स्वतंत्रस्थान देण्यात आले. व त्यांच्या विकासासाठी विशेष धोरण ठरविण्यात आले. श्प्राचीन काळात हिंदूस्थानचा जो उच्च दर्जाचा आर्थिक विकास झाला तो मुख्यत: कुटीरउद्योगामुळे झाला, असे इतिहासाचा दाखला दर्शवितो. १९७९–८० मध्ये सहा प्रमुख मोठया कृषी उद्योगांमध्ये गुंतविलेले भांडवल एकूण भांडवलाच्या केवळ १६ टक्के होते, परंतु त्यांचा एकूण उत्पादनातील हिस्सा ३१ टक्के, तर ओद्योगिक रोजगारातील हिस्सा ४३ टक्के होता. कृषी उद्योगाच्या उन्नतीचा प्रभाव हा देशाच्या उत्पादन वृध्दीवर होतो. यावरून त्याचे महत्व विशद होते.

चंद्रपूर जिल्ह्यामध्ये कृषि प्रक्रिया उद्योगांची संख्या १९९० मध्ये ६१६५ इतकी असून त्यात १९९८ मध्ये ६६ टक्के वाढझालेली आहे. जिल्ह्यातील एकूण कृषी प्रक्रिया उद्योगांपैकी १९९० मध्ये ग्रामीण भागातील उद्योग ९४ प्रतिशत परंतु १९९८ मध्ये ९२ प्रतिशत आढळतात आणि नागरी भागातील हे प्रमाण अनुक्रमे ६ टक्के व ८ टक्के इतके आहे. तुलनात्मकदृष्टया नागरी भागातील कृषी उद्योगाचे प्रमाण १९९० च्या तुलनेत १९९८ मध्ये वाढलेले आहे जिल्ह्यातील कृषी प्रक्रिया उद्योगात १९९० मध्ये एकूण ८४०३ कामगार होते. त्यात १९९८ मध्ये ७९ टक्के वाढझाली एकूण कामगारापैकी ग्रामीण भागातील कामगाराचे प्रमाण १९९० मध्ये ९३ टक्के होते ते १९९८ मध्येसुध्दा तितकेच आहे त्याचप्रमाणे नागरी भागातदेखील १९९० व १९९८ या दोन्ही वर्षी कामगाराचे प्रमाण ७ टक्के आढळते

प्राचिन काळी ब्रिटिशांची सत्ता प्रस्तापित झाल्यानंतर काही वर्ष भारतामध्ये लघु व कुटिर उद्योगांचे अस्तित्व आढळते. ब्रिटिश कालखंडात ते उद्योग मोडकळीस आलेत. १९२५ नंतर मात्र विशेषत: टॅरिफ कमिशनच्या शिफारशीनंतर नविन उद्योग ब्रिटिशांनी स्थापन करण्याचा अल्पसा प्रयत्न केला. श्स्वराज्याच्या चतु:सुत्रीत बहिष्कार व स्वदेशी या दोन कार्यक्रमांचा त्यांनी अंतर्भाव केला. परदेशी माल न वापरता लोकांनी स्वदेशी माल वापरावा म्हणजे देशात नवनवे कारखाने निघू लागतील व पर्यायाने देशाची आर्थिक स्थिती सुधारेल अशी लोकमान्य टिळकांची भुमीका होती.

तक्ता क्रमांक १

जिल्ह्यातील प्रमुख उद्योग गटानुसार नियमित काम करणाऱ्या कामगारांच्या संख्येतील बदलाचे प्रमाण

अ.क्र.	वर्गिकरण		१९९०	१९९८
१	कृषी	ग्रामीण	१००	१७९.२७
		नागरी	१००	१७९.४४
		एकूण	१००	१७९.२८
		ग्रामीण	१००	२३७.३६

(शेकडा प्रमाण)

	२	**खाणकाम**	**नागरी**	१००	९८.०८
			एकूण	१००	११०.१८
	३	**वस्तुनिर्माण**	**ग्रामीण**	१००	८९.१७
			नागरी	१००	५७.७२
			एकूण	१००	७५.९८

तक्ता क्रमांक २

जिल्ह्यातील प्रमुख उद्योग गटानुसार उद्योग परिमाण

अ.क्र.	वर्गिकरण		१९९०	१९९८
१	कृषी प्रक्रिया उद्योग	ग्रामीण	५८०० **(९४.०८)**	९४२२ **(९२.१०)**
		नागरी	३६५ **(५.९२)**	८०८ **(७.९०)**
		एकूण	६१६५ **(१००)**	१०२३० **(१००)**
२	खाणकाम व खनिज उत्पादन	ग्रामीण	५६ (३२.९४)	६२ (७९.४९)
		नागरी	११४ (६७.०६)	१६ (२०.५१)
		एकूण	१७० (१००)	७८ (१००)
३	वस्तुनिर्माण	ग्रामीण	८४१९ (८१.४८)	६३४९ (७४.९४)
		नगरी	१९१४ (१८.५२)	२१२३ (२५.०६)
		एकूण	१०३३३ (१००)	८४७२ (१००)

आधार :– अर्थ व सांख्यिकी संचलनालय, महाराष्ट्र शासन मुंबई

सामाजिक व आर्थिक समालोचन, चंद्रपूर जिल्हा १९९०–९१ ते २००४–०५ व २००५–०६

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 4.374
UGC Approved Journal Sr. No.48455

ISSN No. 2394-8426
Mar – 2018
Issue–I, Volume–VII

डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि जल धोरण

प्रा. डॉ. किशोर भारत कुडे
फुले आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क,
गडचिरोली

प्रस्तावना :

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सुरुवातीपासुन अर्थशास्त्राचे अभ्यासक व चिंतक राहीले आहेत. १९२० च्या दशकात ईस्ट इंडिया कंपनीचे व्यवस्थापन आणी वित्त,ब्रिटिश भारतातील प्रशासन व वित्तव्यवस्थापन, भारतातील जमिन धारणा व उपाय आणि रुपयाची समस्या या विषयावरचे प्रबंध लिहुन अर्थशास्त्राच्या क्षेत्रात उल्लेखणीय सहभाग डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी नोंदविला त्यांच्या अर्थशास्त्रीय विचारांचा केंद्रियबिंदु सामान्य माणुसच राहीला आहे. सता.संपत्ती,प्रतिष्ठा नसलेल्या दलित, गरीब सामान्य माणसांचे हीत त्यांच्या चिंतेचा विषय होता.म्हणुन ते म्हणतात,'गरीब माणसांचे हित जोपासण्यासाठी केवळ बाजार यंत्रणेवर अवलंबुन राहु नये. बाजार यंत्रणेबरोबरच अर्थव्यवस्थेत शासनाचा हस्तक्षेप हवा.' त्यासाठी त्यांचा आग्रह हाता, कल्याणबारी राज्यव्यवस्थेत सामान्य जनतेसाठी शिक्षण, आरोग्य व सार्वजनिक सेवा पुरविण्याची जबाबदारी शासनाने स्वीकारली पाहिजे यावर त्यांचा भर होता. म्हणूनच की, काय व्हाईसरॉयच्या मंत्रीमंडळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडे श्रम खाते होते. ऊर्जा व सिंचन खाते जोडीला होते. म्हणून १९९३ साली जल आयोगाने 'आंबेडकरांचा जलविकासातील सहभाग' नावाचा गौरवगंथ काढला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मंत्री असतांना जल आयेग, विद्युत आयोग, श्रम आयोग स्थापन झालेत. भारतातील सामान्य माणसाच्या हिताच्या दृष्टीने शेती, पाणी, विद्युत व वाहतुकीची चिंता त्यांनी वाहिली. १९४–४६ च्या दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आणि नदीखोरे नियोजनाचा विचार मांडला होता. १९४५ साली जलमार्ग, जलसिंचन, नौकानयन आयोग स्थापित करण्यात आला होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील नदीखोऱ्यात प्रादेशिक विकासासाठी जनलसंपत्तीचा बहुउद्देशीय वापर हाच नवीन जलनितीचा प्रमुख उद्देश असायला पाहिजे, असे आंबेडकरांनी दि. २३ ऑगस्ट १९४५ ला झालेल्या दामोदरखोरे विकासाच्या कलकत्त्यातील दुसऱ्या परिषदेत सांगितले होते.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या परिषदेत दोन गोष्टी मांडल्यात, जलसिंचन आणि विद्युत निर्मिती. जलसिंचनामुळे दुष्काळावर मात करता येईल आणि विद्युत निर्मितीमुळे औद्योगिक विकास होईल, असे त्यांचे ठाम मत होते. यावरून लक्षात येते की, दामोदरखोरे विकासाच्या पायाभरणीत त्याचा सहभाग किती मोठा आहे.

दामोदर खोर, महानदी खोरे, सोननदी आदी खोऱ्यात विकास नियोजनातही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा फार मोठा सहभाग आहे दि. ८ नोव्हेंबर १९४५ ला झालेल्या ओरीसा राज्यातील हिराकुंड प्रकल्पाच्या परिषदेचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यक्ष होते. नदीच्या पाण्याचे संरक्षण करायचे, तर नदी किनाऱ्यावर भर घालून चालणार नाही. पाण्यो साठे निर्माण करून कालव्याद्वारे शेतीला पाणी पोहचविले पाहिजे, असे त्यांचे मत होते.

डॉ. आंबेडकरांनी नदीखोरे नियोजन, जैवविविधता, पाणलोट, पर्यावरण, शती विकास पुढे ठेवून धरणाचा विचार केला होता. धरणाच्या सोबतच ज्या धरण प्रकल्पात ज्यांची शती, घरे, जातात, ज्यांची वित्त व संपत्ती विषयक हानी होते. त्यांच्या पुनर्वसनाचा विचारही डॉ. बाबासाहेब पुरनियंत्रणाला व शेतीच्या विकासाला आणि औद्योगिक विकासाला चालना मिळाली; परंतु सभोवतालची खेडी नष्ठ होतील. फायदा बंगालला होईल आणि नुकसान बिहारराज्याचे होईल. निव्वळ नुकसान भरपाई देणे एवढीच जबाबदारी धरण बांधणाऱ्या संस्थेची असून नये, असे त्यांचे मत होते. दि. २२ एप्रिल १९४६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत पुनर्वसनावर चर्चा करण्यात आली होती. टेनेसेखोरे प्राधिकरण मंडळाने धरणग्रस्तांसाठी जी पुनर्वसनाची योजना आखली होती. त्या धर्तीवर पुनर्वसन झाले पाहिजे, असे डॉ. आंबेडकरांनी सभेत सुचविले होते. प्रकल्पग्रस्तांना उपजिविकेचे साधन म्हणून शेतजमीन देणे आवश्यक आहे. शेतजमीन खरेदी करण्यासाठी वित्तीय सहाय्यता देण्याची शिफारस डॉ. आंबेडकरांनी केली होती. धरणग्रस्तांच्या मुलांचे शिक्षण, निवारा व चांगले वातावरण बहाल

करण्याचे नियोजन आखण्यावर डॉ. आंबेडकरांचा कटाक्ष होता. आज प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नावर देशभर जी चर्चा होत आहे. ती आंबेडकरांनी स्वतंत्र्यापूर्वी केली होती. हे शासनाने व भारतीय समाजाने लक्षात घेण्याची गरज आहे.

१९३५ च्या काळात आंतरराज्य विषयाबाबत अंमलबजावणी करण्याची तरतूद नव्हती. केंद्रसरकारला जल धोरणाबाबत व्यवस्थेंली कोणताच अधिकार दिला नव्हता. यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर फार नाराज होते. दि. २१ फेब्रुवारी १९४८ रोजी संविधानाचा मसुदा सादर करण्यात आला तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतं. जलधोरण ठरविण्यावर भर दिला होता. आंतरराज्य नद्यांच्य विकासाबाबत आंबेडकरांनी नदीखोरे निहाय विकासाची संकल्पना मांडली होती. नदी खोरे प्राधिकरणाची स्थाना स्वतंत्र भारताच्या संविधानात त्यामुळे दिसुन येते. रेल्वे वाहतुक सव जलवाहतुकीचे ते समानपातळीवर पुरस्कर्ते होते. शेती, पाणी, जलवाहतुक, मस्यव्यवसा व पर्यावरणीय दृष्टीकोण ठेवूण पाणी नियोजनाचा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला होता. त्यासाठी संघर्षही केला. भारत शासनाने भारताच्या विकासासाठी नदी खोऱ्यांच्या विकासावर भर द्यावा एवढेच सांगावेसे वाटते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जमीनीवर राहुन परिवर्तनाचे स्वप्न बघत होते. त्यांनी सामाजिक प्रश्नासाठी जसे अनेक संघर्ष केले. तसेच शासन प्रशासनात संधी मिळाली तेव्हा प्रशासकीय जबाबदाऱ्याही सांभाळलेल्या आहेत. ब्रिटीश व्हाईसरॉयच्या सल्लागार मंडळात बाबासाहेब आंबेडकरांकडे श्रम. जलसिंचन, ऊर्जा खात्याची जबाबदारी सोपविण्यात आली होती. त्यांनी जल संवर्धनाचे धोरण विकसित केले. नदीखोऱ्यात विकास करण्यासाठी नदीखोरे प्राधिकरण व महामंडळाची निर्मिती झाली. जलस्त्रोताचा विकास संचन आणि भूसूधारणा यासाठी व्हावा. शेती आणि उद्योग मागास अर्थव्यवस्थेला बाहेर काढण्यासाठी मोलाची भुमिका वठवू शकतात. म्हणून त्यांनाही जलस्त्रोताचा लाभ असावा. देशातील विद्युत पुरवठ्यास जलविद्युत निर्मितीच मोठा हातभार लागेल. अशीही त्यांची कल्पना होती. ग्रामीण आणि किनारपट्टीवरील वाहतुक व दळणवळण सेवा नदीजोड प्रकल्पातुन विकसित होईल, अशीही त्यांची कल्पना होती. त्यांच्या या कल्पनाविश्वात कुठेही पाण्याला क्रयवस्तु मानुन त्याचे हक्क कॉर्पोरेट कंपन्यांना विकण्याचे सूत्र नव्हते.

जलसिंचनआणि बहुउद्देशीय नदी घाट योजनेवरील योगदान :

१९४२ च्या जुलैमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व्हाईसराय कौन्सीलमध्ये श्रम विभागाचा कार्यभाग सांळाळला, त्यांच्याकडे श्रम खात्याव्यतिरिक्त आणखी बरीच खाती होती. त्यात कोळसाखाणा, पाणीपुरवठा, वीज इत्यादी महत्वाची खाती श्रम मंत्रालयाला जोडली होती. २६ जुलै १९४३ या दिवशी 'स्टेटमध्ये' मध्ये फार मोठी बातमी आली, दामोदर नदीला महापूर आला. या पुरामुळे अपरिमित नुकसान झाले. ७० खेडी आणि जवळपास १८,००० घरांचे नुकसान या महापुरामुळे झाले या भागात होते.

टेनिसी नदीवर बांध आणि वीजनिर्मिती जलसिंचन असा (मल्टीपरपज प्रोजेक्ट) प्रथम जगात अमेरिकेने तयाार केला. त्यातून जल वाहतुक, वीज उत्पादन, पूर नियंत्रण जससाठा तयार करून अमेरिकेने निर्माण केलेल्या नदीघाटी योजना जगाासमोर आल्या. त्यातून दामोदर व्हॅली कॉरपोरेशन, नॅशलन इंडस्ट्रियल डेव्हलपमेट, कॉरपोरेशन, फर्टिलायझर कॉर्पोरेशन सिड कॉर्पोरेशन अशा संस्था भारतात उदयास आल्या. अर्थात या सर्व संस्था मंजूर मंत्रालयात उभारण्यात आल्या, ज्यांचे मुख्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. तसेच सेन्ट्रल वाटरवे इरिगेशन, नेव्हीगेशन कमीशनसुध्दा निर्माण करण्यात आले. (सी. डब्ल्यु. आय. एन. सी.) १९४५ र्पयत ही महान कामगिरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केली. ओरीसाचे एक महान नेते डॉ. हरेकृष्ण मेहता यांनी जेलमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पत्र पाठविले आणि विनंती केली., की दामोदर नदी प्रमाणेच महानदीवरसुध्दा अशाच प्रकारचे धरण बांधावे. या संबंधीचा विचार करण्यासाठी ओरीसातील कटक येथे एका सभेचे आयोजन केले होते. डॉ. बाबासाहेबांनी जास्तीतजास्त भर जलसिंचन, जलमार्गावर दिल्याचे आढळते. तसेच पुरनियंत्रणावर अणुशक्तीद्वारे कसे नियंत्रण करता येईल यावरही मुलभूत विचार मांडले आहेत. आहेत. १९५२ मध्ये लोकसभेत चर्चा होत असतांना भारतात बहुउद्देशीय नदीघाटी योजनेचे श्रेय पंडित नेहरूंना देण्याचा प्रयत्न झाला; परंतु डॉ. मेघनाथ शहा यांनी स्पष्टपणे सभागृहात सांगितले, सांगितले, की भारतात बहुउद्देशीय नदीघाटी योजनांची मुहूर्तमेढ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रोवली आहे; तेव्हा संपूर्ण सभागृहाला डॉ. आंबेडकरांच्या योगदानाची कल्पना आली.

जमीन सुधारातील जल व्यवस्थापन :

जागतिकीकरणाच्या झपाट्यामध्ये जमीन ही संकल्पना हद्दपार केल्याचे अनेक संकेत व निरीक्षणे मिळतात. तरी स्वातंत्र्यातंरच्या चाळीस वर्षांमध्ये ही संकल्पना ग्रामीण क्षेत्रातील आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृमिक उपथापालथ घडवून आणणारी एक परिणामकारक घटक म्हणून कृतिशील होती. आंबेडकरांनी या ग्रामीण क्षेत्रातील वसाहतीयुक्त खेड्यांना 'असमानतांची गटारे' असे संबोधलेले दिसुन येते. त्यातही आर्थिक असमानतांचा विचार केल्यास असे आढळते, की या भारतीय खेड्यांमध्ये उत्पादनाची साधने मोठ्या जीमनदारांकडे पुर्णपणे केंद्रीकृत झाली होती व सर्वहारा शोषित–वंचित –बहिष्कृत समाज हा पूर्णपणे साधनहीन होता. हे चित्र आजही फारसे बदलले असल्याचे आणवत नाही, हे सत्य आहे.

सविधानाच्या दृष्टिक्षेपातील 'जमीन सुधार' हा देशातील ग्रामीण क्षेत्रातील सर्व प्रकाच्या विषमता व विशेष करून सामाजिक व आर्थिक असमानता संपुष्ठात आणण्याच्या उद्देशाने प्रेरीत होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या जमीन सुधारांचे सुतोवाच आपल्या राज्य समाजवादाच्या बहुचर्चित संकल्पनेत पूर्वीच करून ठेवले. या जमीन सुधारण्याचे उद्दिष्ट केवळ ग्रामिणच नव्हे, तर ग्रामीण व शहरी या दोन्ही भागातील असमानतेची प्रचंड दरी कालबध्द कार्यक्रमातून हळूहळू का होईना, कमी होऊन ती नष्ट व्हावी असेही असणे गैरलागू नव्हते. हे त्यावेळी कठीण व स्वप्नसत वाटत असले, तरी ते अशक्य नव्हते याची जाणीव डॉ. आंबेडकर यांच्यासारख्या द्रष्टया अर्थतज्ञांना होती. म्हणूनच त्यांची जमीन सुधाराचा आग्रह कायमस्वरूपी दिसून येतो.

देशात जमिण सुधार हा जमीन वितररणापर्यनच मार्यादित ठेवला गेला ही वस्तुथिती आहे. जमीन वितरणाच्या मर्यादित ठेवला गेला ही वस्तुस्थिती आहे. जीमन वितरणाच्या कुळ कायदे, कमाल भूधारणा (सिंलींग), भूदान व जबरनजोत या चारही माध्यमांमध्ये जमीन वितरण ही प्रथम कृती असल्यामुळे तिला प्राधान्य दिले गेले व ते एका मर्यादेपर्यंत संयुक्तिक होते. मात्र जमिनीसंदर्भातील इतर सुध्दा कार्यक्रमाचा विचार यावेळी केला गेला नाही ही वस्तुस्थिती आहे. एक समाजभिमुख अर्थतज्ञ म्हणून आंबेडकरांचा जीमन सुधाराबाबत दृष्टीकोन व पार्श्वभूमी म्हणून समजून घेणे आवश्यक ठरते.

त्यांच्या मतानुसार शेती ही राष्ट्रीय उद्योग म्हणून स्थापित होण्याची गरज आहे. म्हणजेच जमितीची मालकी ही सरकारची असावी आणि जे लोक शेतीत काम करण्याची इच्छूक असतील सामुहिक, सामुदायिक किंवा गटशेती पध्दतीने जमीन करावी, जेणेकरूण ग्रामीण क्षेत्रामध्ये जमीनदार; सीमात शेतकरी व शेतमजूरांच्या स्वरूपात असलेल्या प्रचेड उतरंड व त्यातून निर्माण झालेली भीषण असमानता कायमस्वरूपी नष्ठ होईल. ज्यांना शेती करायची असेल त्यांना जमीन वितरण वरील शेती पध्दती अंतर्गत करण्यात शासनाने पुढाकार ध्यावा. यादृष्टीने सर्वप्रथम त्यांच्या जमिनी जिथे असतील तिथेच त्यांच्या मिश्र वसाहती बसवाव्यात, जेणेकरून ग्रामीण क्षेत्रामध्ये अस्तित्वात असलेल्या जातिव्यवस्थेचे उच्चाटन करण्याच्या दृष्टीने भारतीय समाजाचे पाऊन पडेल. ज्यांना शेती करायची असेल त्यांना शेती–प्रशिक्षण, पैसा उभा करण्याचे व तो टिकवून ठेवण्याचे व्यपहारिक शिक्षण सरकारने द्यावे. त्यांना किमान तीन वर्षे पुरेल इतका (शेती कसण्यासाठी व कुटुंब पोसण्यासाठी) पैसा शासनाने द्यावा. शेतीसाठी लागणारी उत्पादन साधने–बियाणे, खते, सिंचनसुविधा, दळणवळण, बाजार, प्रत्यक्ष (कर्जे) शेती प्रक्रियांवर आधारित छोटे उद्योग– धंदे, व्यवसाय व ग्रामीण, शतेतळी, गावतळी, जोडरस्ते, पांदणरस्त्यांची निर्मिती, शेतीवर आधिरित कौशल्य–तंत्रज्ञान विकसित करणाऱ्या संस्था, ग्रामीण रोजगार क्षमता वाढवण्यावर प्राधान्य, हया सगळया शेती क्षेत्रातील आधारभूत संरचना निर्माण करण्याची नैतिक व संवैधानिक जबाबदारी शासनाचीच आहे, असे स्पष्ठ संकेत आंबेडकरांची दिले होते. आजे याप्रमाणेच जमीनसुधार देशात झाला व तो अद्यापही सुरूच आहे, अशा प्रकारची भूमिका अनेक तज्ञ व राजकीय नेतृत्व घेत असेल, तरी ते अर्धसत्यच प्रदर्शित करणारी भूमिका ठरते. कारण या सगळया सुधाराचा एक कालबध्द कालावधी असला पाहिजे तरच तो परिणामकारक व फलदायी ठरणारा असू शेकतो, असे आंबेडकरांना वाटत होते. जमीन वितरणानंतरचे असे अत्यावश्यक सुधार कालबध्द पध्दतीने देशात येऊ शकले नाहीत म्हणूनच हा कृतिकार्यक्रम प्रभावी ठरण्याऐवजी निष्प्रभ व म्हणूनच अयशस्वी ठरल्याचे निष्कर्ष पुढे येतात.

शेती क्षेत्रामध्ये सिंचनसुविधा हा अत्यंत प्रभावी व परिणमकारक घटक मानला जातो. या घटकामुळे शेतीची उत्पादकता किमान अडीच ते तीनपट वाढण्याच्या शक्यता निर्माण होतात. आंबेडकरांचे या संदर्भातले चिंतन लक्षत घेता असे दिसते की, आंबेडकरांनी १९४२ ते १९४६ या काळात केंद्रामध्ये श्रम, जल व विद्युत विकासासाठी धोरण ठरविले, केंद्रात प्रशासकीय

यंत्रणा निर्माण केली, विद्युत पुरवठा विभाग केला. महत्वाचे म्हणजे दामोदर, हिराकुंड व सोन नद्यांवरील धरणे बांधण्याची प्रक्रिया सुरू केली. त्या काळी कोणत्याही, क्षेत्रांमध्ये काम करणारी स्वीकारणारी व्यक्ती ही त्या क्षेत्रातली सखोल तज्ञ असावी ही इग्रजी सरकारची आवश्यक अट होती; म्हणजेच आताच्यासारखी राजकीय पार्श्वभूमी ही अहर्ता म्हणून वापरण्याची इंग्रज सरकारची वृत्ती नव्हती, हे वेगळे सांगण्याची खेरे तर गरज नाही. यावरून बाबासाहेबांची योग्यता व मूनलभूत कार्य लक्षात येते. आंबेडकरांचे देशातील बहुउद्देशीय जल प्रकल्पात इतके योगदान असूनही त्यांचे विशाल जल प्रकल्प ही पहिली आवड नव्हती, हे लक्षात घेणे आव्हश्यक आहे. त्यांनी ग्रामीण क्षेत्रातील सिंचसुविधेचासुध्दा विचार करतांना जलमार्गाचा विकास हया दोन बाबी केद्रस्थानी मानल्या होत्या. त्यांच्या या चिंतनातून भारतीय ग्रामीण क्षेत्राला शेततळी, गावतळी, छोटया, मध्यम, मोठया नद्यांजोड प्रकल्प, सौरऊर्जा अशा अनेक शेतकऱ्यांसाठी संजिवनी ठरू पाहणाऱ्या योजना उदयास येण्याची क्षमता आहे आणि हे सगळे जमीन सुधार ज्या परिक्षेत्रात समाविष्ठ करायचे पाहिजे अशी त्यांची आग्रही भूमिका दिसुन येते. अर्थातच अशा जमीन सुधारांकडे शासनाचे समाजाचे व नेतृत्वाचेसुध्दा प्रचंड दुर्लक्ष होत आहे. अशी निरीक्षणे दृष्टीक्षेपात येतात. डॉ. अमर्त्य सेन यांनी या दुर्लक्ष होत आहे. अशी निरीक्षणे दृष्टीक्षेपात येतात. डॉ. अमर्त्य सेन यांनी तर जमीन सुधरांकडे अक्षम्य दुर्लक्ष असे निरिक्षण नोंदवल्याचे दिसून येते. त्यांनी या दुर्लक्षाचा प्रत्यक्ष संबंध दारिद्रयाशी जोडला आहे. आंबेडकरांनी सुध्दा ग्रामिण क्षेत्रातील दारिद्रय निर्मुलनावर एकमात्र उपाय म्हणून अशा 'जमीन सुधारांकडे' पहिले होते. असा 'जमीन सुधार' स्वातंत्र्यानंतरच्या साठ वर्षातसुध्दा जन्म घेऊ शकत नाही. दु:खद वस्तुस्थिती जाणून घेणे म्हणूनच महत्वाचे आहे.

जमिन सुधाराकरिता बरेच अनुकून मुद्दे अस्तित्वात आहेत, उदा. पर्याप्त कृषी पर्जन्य स्थिती, राजकीय स्थिती, शक्तीशाली उपभोक्त्यांचा आधार इत्यादी दुसरीकडे प्रतिकुल मुद्यांचीसुध्दा कमतरता नाही, उदा. कमजोर व प्रभावीत पुरवठा, प्रभावी श्रृंखला, उपभोक्यांच्या उत्पादनाचा अभाव, सिंचन व उर्जेसारख्या पायाभूत उद्योगांचा न झालेला विकास, किंमत वाढीची कमी पातळी, पीक कापणीमधील हानी, अशिक्षित–अप्रशिक्षित मजूरवर्ग प्रभावी सुधाराकरिता या दोन्ही प्रकारच्या मुद्यांवर चिंतन करण्याची गरज आहे.

भारतातील सिंचनातील दुरवस्था निश्चिताच गंभीर स्वरूपाची आहे. अजुनही देशात ग्रामीण क्षेत्रातील ४० प्रतिशत लोकांना पिण्याचे पाणी पर्याप्त प्रमाणात मिळत नाही. म्हणजेच पिण्याच्या शुध्द पाण्याचा प्रश्न आपण अजूनही निर्णायकपणे सोडवू शकलो नाही. २००४ पर्यत अनेक अस्तित्वात असलेल्या योजनांदृवारे हा प्रश्न निकालात काढू असे आमचे उद्दिष्ठ होत; मात्र अनुनही ८ प्रतिशत पाण्याचे घरगुती स्त्रोत आच्छदित नाहित. पुर्वी जलस्त्रोत माथ्यांकडून सखल भागाकडे बंधाऱ्यादृवारे अडवून धरणाची लोकनिती हाती. ती आता जवळपास उलटया दिशेने म्हणजे उताराकडून माथ्यांकडे नेण्याचे शासकीय धोरण आहे. त्यामुळे देशातीजल शहरी क्षेत्राला, त्यातील उद्योगाला पाणीपुरठा करण्यासाठी व त्या उर्जेची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठीच मोठमोठी धरणे आम्ही बांधत आहोत. ग्रामीण क्षेत्राला पाणीपुरवठा करण्यासाठी व शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी याचा उपयोग अगदी नाममात्र किंवा कागदोपत्री स्वरूपाचा आहे. असे दिसते. त्याचप्रमाणे सिंचन क्षेत्रातील भूक्षरीत हात असलेली भूमी, पाण्याचा वाढता उत्पादनखर्च, भूजलपातळीतील पाण्याच्या स्त्रोताचे वाढते दोहन, पाण्यात मिसळत असलेली रासायनिक खते, औषधे व मानवी मलमूत्र तथा जनावरांचे मलमूत्र असे आरोग्याला व पर्यावरणाला अत्यंत हानीकारक अशा पदार्थाचे मिसळन हीआमच्यासमोरील मोठी आव्हाने सतत वाढत आहेत,असेच निष्कर्ष काढले जाऊ शकतात.त्यामुळे ग्रामीण क्षेत्रातील असंतोष आता सुप्त अवस्थेत असला, तरी जलसिंचणातील सूविधाअभावी शेतीतील उत्पादकता मोठया प्रमाणात प्रभावित होत आहे.याविषयीची जाणीव–जागृती पूढे निर्णायक ठरणार आहे. ग्रामिण क्षेत्रात ना पाणि, ना जमिन,ना उर्जा अशा अत्यंत भयावह अवस्थेत हा ग्रामिण समाज असंख्य असमानतांसह जीवन जगत आहे,हे समजुन घेणे आवश्यक आहे.

आज जमीन सुधारातील जलव्यवस्थापन व इतर मुद्देसुध्दा शेती विकासात समाविष्ठ असल्याची ग्वाही दिली जत असली; तरी मुळात जमीन सुधार व शेती विकास ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, हेसुध्दा लक्षातघ्यावे लागते. शेती विकास हा स्थिती व ध्येयधोरण निर्देशित करतो तर 'जमीन सुधार' हा ग्रामीण क्षेत्रातील कृतिकार्यक्रम स्पष्ठ करतो. अशावेळी तो

या क्षेत्रात अत्यावश्यक असणाऱ्या जल व्यवस्थापनासह प्रभावी व यशस्वी करायचा असेल तर खालील बाबी लक्षात ठेवाव्या लागतील.

- डॉ. आंबेडकरांच्या याविषयाचा चिंतनाचा विशेष करून ग्रामीण समाजामध्ये प्रसार करावा.
- 'गाव तिथे तळी' हा मुलाधार घेऊन प्रत्यक खेड्यात पिण्याची पाण्यासाठी व शेती, पशुधन, ऊर्जा यासारख्या विविध उपयोगांसाठी असे किमान दोन तळे निर्माण करण्यावरभर द्यावा लागेल जेणेकरून देशातील अंदाजित साडेपाच लाख गांवांमध्ये किमान अकरा लाख तळे निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवावे लागेल.
- छोट्या–छोट्या नाल्या नद्यांचे पाणी लहान बंधाऱ्यांद्वारे अडवून पावसाच्या पाण्याचा एक विशेष्स स्त्रोत निर्माण करण्यावर लक्ष द्यावे जेणे करून भूजलपातळी टिकून राहील.
- उंच भागाकडून सखल भागाकडे वाहणाऱ्या नद्यांवर विशाल धरण बांधण्याऐवजी बंधारे बांधून ठिकठिकाणी पाणी अडविण्याची व ते जिरवण्याच्या योजनांचा आग्रह धरावा लागेल.
- विहिरींसोबतच निदान पाच–सहा शेत मिळून मध्यम शेततळे उभारणक जेणेकरून भूजलपातळी, शेतीला पाणीपुरवठा व मत्सशेतीला (जोडधंदा) पोषक असे कृषी वातावरण निर्माण करणे.
- पर्यावरणाच्या संतुलनासाठी व शेतकऱ्याला अधिकचे उत्पन्न जोडण्याच्या तेसेच जलसंवर्धनाच्याही दृष्टीने वृक्षारोपन व संवर्धनाच्या योजनांचा आग्रह धरणे.
- जमीन सुधार व जल व्यवस्थापनादद्दल जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टिने ग्रामीण भागासोबतच शहरी भागातील नवी पिढी जोडून घेणे, जेणेकरून ही लोकचळवळ होऊ शकेल.
- ग्रामीण क्षेत्रामध्ये श्रमावर आधारित कार्यसंस्कृतीला स्थापित करण्याचे निरंतर प्रयास करावे लागतील.
- शेतीवर आधारित जोडधंदे, प्रक्रिया उद्योग–व्यवसाय या दृष्टिने एक व्यवसायिक व उत्पादक म्हणून नवीन पिढीला प्रोत्साहित करणे.

जलविकास परिषद घोषणापत्र :

पाणी माणसाच्या आयुष्यासाठी लागणारी मूलभूत गरज आहे. सनू २००२ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या परिषदेने अधिकार असल्याची घोषणा केली. संयुक्त राष्ट्र संघाच्या परिषदेने पाण्यावर मूलभूत अधिकार असल्याची घोषणा केली. आज आपण दिनांक २२ सप्टेंबर २०१२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जल विकास परिषदेच्या निमित्ताने एकत्रित झाले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वचित समाज घटकांना एकत्र करूण संघर्ष केला आणि त्यांना हक्क मिळवून दिला. १९३३ पासून भारतीय राज्यघटनेचे सामाजीक, आर्थिक, राजकिय अधिकारांचे मुलभूत अधिकार मांडून महत्व पुर्ण योगदान दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९४२ ते १९४६ मध्ये श्रम, जलसिंचन आणि उर्जा खात्याचे कॅबिनेट मत्री म्हणुन पाणी अधिकार आणि नियोजनावर भरीव योगदान दिले. आज या परिषदेच्या निमित्याने या जलविकास परिषदेच्या घोषणापत्राचा ठराव पारित करीत आहोत.

निष्कर्ष :

१) गावचे तलाव, माणुस, मवेशी आणि माती यांचा विकास आणि त्यांच्या मुलभूत अधिकाराच्या नियोजनाकरीता.

२) प्रत्येक गावात, डोंगरापासुन समुद्रापर्यत–पाण्याचे पायाभुत नियोजन करण्यासाठी गरजेनुसार पाणी अडवा पाणी जिरवा कार्यक्रम राबवणे.

३) पाण्यावर सर्व नागरीकांचा समान हक्क असायला हवा.

४) पाणी विकास व नियोजनासंदर्भात महिलांची भागीदारी निश्चित करणे.

५) सुपिक जमिणी व वणे पाण्याखाली दाबून पाण्याचे साठे करण्यास बंदि व विरोध करणे.

६) माथा ते पायथा पाण्याचे व्यवस्थापन करून जमिनीची झिज थांबविणे व नियोजन करणे.

७) औद्योगिकरण, शहरीकरण, खनिकर्म किंवा अविचारी विकासासाठरी

८) ग्रमिण भागात सौर उर्जेचे स्त्रोत निर्माण करणे आणि त्यांचे उपयोजन करणे.

९) जमिन, जंगल, खनिज व मोठया प्रमाणात मानवी विस्थापन, जैवविविधता नष्ट करणाऱ्या मोठया धरण प्रकल्पाचा परिषद विरोध करीत आहे.

१०) देशात तपमानावरील होणाऱ्या बदलांवर उपाय म्हणुन स्वच्छ विकास सुधारित तंत्रज्ञानाच्या नावाखाली (Clean Devlopment mechanism) थांबविणे, सामाान्य नागरीकांचे सामूहिक अधिकार मारणाऱ्या व आर्थिक नुकसान करणाऱ्या पनवचक्की, टाकाउ पदार्थावर उभारणाऱ्या जाणाऱ्या विज प्रकलांना विरोध करणे.

११) फक्त आर्थिक नफा लक्षात घेऊन केले जाणारे खनिजाचे दोहोन थांबवून ते खनिज देशाच्या विकासासाठी वापरले जावे.

१२) मोठया प्रमाणावर इंधन वाया घालवणाऱ्या खाजगी वाहनाच्या उपयोगावर मर्यादा घालून सार्वजनिक वाहतुकिवर भर दिला जावा.

संदर्भ :–

डॉ. भदन्त आनन्द कौसल्यायन, यदी बाबा ना होते, प्रकाशक काशिनाथ प्रकाशन नागपुर,१९९४

सुहास पळशीकर, जात व महाराष्टातील सत्ताकारण, प्रकाशक उषा वाघ पुणे, २००३

डॉ. योगेंद्र मेश्राम, लॉगमार्च, प्रकाशक श्री मंगेश प्रकाशन, नागपुर २००३

संतोष पवार, फुले, शाहु, आंबेडकर आणि आदिवासी पारधी समाज, प्रकाशक मिलींद प्रकाशन वर्धा, २००८

बी. व्ही. जोंधळे, औरंगाबादेत बाबासाहेब, प्रकाशक साकेत बाबा भांड औंरगाबाद, २००८

चांगदेव भवानराव खैरमोडे, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, प्रकाशक सुगावा प्रकाशन पुणे, २००३

सुखदेव थोरात, बाबासाहेब आंबेडकर नियाजन, जल व विद्युत विकास भूमिका व योगदान, प्रकाशक सुगावा प्रकाशन, पुणे, २०१०

प्रा. राम बिलकर, प्रा. झुंबरलाल कांबळे, महाडचा मुक्तिसंग्राम, प्रकाशक दिलीप माजगावकर राजहंस प्रकाशन पुणे, १९९६

भोंगाडे, विलास गोसीखुर्द प्रकल्प व प्रकल्पग्रस्तांच्या समस्या, वनराई नगर मानेवाडा, नागपूर, प्रकाषक जगदीष गाढवे, सोमेष्वर भुरे, गोसीखुर्द प्रकल्पग्रस्तसंघर्ष समिती (२०१२)

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 4.374
UGC Approved Journal Sr. No.48455

ISSN No. 2394-8426
Mar – 2018
Issue–I, Volume–VII

डिजिटल ग्रंथालयासमोरील आव्हाणे

DIGITAL LIBRARY AND IT`S CHALLEANGES

प्रा. देसाई शशिकांत भैरू.
ग्रंथपाल,
तुकाराम कृष्णाजी कोलेकर
कला आणि वाणिज्य महाविद्यालय,
नेसरी. ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

❖ **ABSTRACT सार :–**

ग्रंथालये पुरातन आणि पारंपारीक रूप पालटून आज घडीला डिजिटल हे नवीन रूप धारण करीत आहे. या स्पर्धेच्या युगात संशोधक व वापरकर्त्याला माहितीच्या परिस्पोटातून नेमकी माहिती शोधने भयंकर जिकरीचे होवून बसलेले आहे. माहितीच्या विविधतेतून वापरकर्त्याला हव्या त्या वेळी नेमकी माहिती प्राप्त करणे साठी डिजिटल ग्रंथालये अत्यंत उपयुक्त ठरणारी आहेत. असे असले तरीही या डिजिटल ग्रंथालयासमोर डिजियटायझेशन,शोध सुविधा,कॉपीराइट,आर्थिक समस्या इत्यादी आव्हाणे उभी आहेत.

❖ **प्रस्तावणा :–**

मानवाने निर्माण केलेले दस्त ऐवज संग्रह करून ठेवणे, त्याचे जतन करणे व सुरक्षीत पणे इतरांना ते हाताळण्यास देणे ही प्राथमिक ग्रंथालयाची कार्ये होती. कालांतराने लिपीतील सुधारणा, छापखाने शोध इत्यादी मूळे माहिती निर्मितीला वेग प्राप्त झाला. छापखाण्यामुळे एका साहित्याच्या अनेक प्रती निर्माण करणे शक्य झाले. आणि ग्रंथालयाच्या विकासाला सुरवात झाली. पारंपारिक ग्रंथालयापासून संकरीत, व्हर्च्यूअल ते डिजिटल ग्रंथालयापर्यंत ग्रंथालाची प्रगती होत गेलेली आहे. डिजिटल ग्रंथालयामध्ये वापरकर्त्याला हवी असणारी माहिती हव्या त्या स्वरूपात व हव्या त्या प्रमाणात प्राप्त होवू लागलेली आहे.पण या ग्रंथालयांनाही अनेक आव्हाणांना सामोरे जावे लागत आहे.

❖ **ग्रंथालयाचा इतिहास :–**

ग्रंथालयांचे अस्तित्व इ.स. पूर्व पासून असल्याचे पुरवे आहेत. चीन मध्ये चित्र लिपीद्वारे दगडावर कोरलेल्या साहित्याचा संग्रह पहावयास मिळतो. जस जसा लिपींचा शोध व विकास होत गेला तस तसा ग्रंथनिर्मितीही सुरू झाली. पुराण काळात एखाद्या ग्रंथाची एक प्रत तयार करण्यासाठी लेखकाला आपल्या आयुष्याची बरीच वर्षे खर्च करावी लागत असत. त्यामुळे हे साहित्य वापरण्यापेक्षा त्यांच्या जतन व संरक्षणाला अधिक महत्व द्यावे लागे. पुराण कालामध्ये उच्च शिक्षित, राजे रजवाडे व सरदार उमराव यांच्या कडे ग्रंथ खजिना असायचा काही ठराविक लोकानांच या दालनामध्ये प्रेवश व ग्रंथ वापरण्याची परवानगी मिळे.

मध्ययुगीन काळात अनेक विद्यापीठे निर्माण झाली. या विद्यापीठामध्ये विद्यापीठ ग्रंथालये होती पण या प्रत्येक ग्रंथांना साखळीन बांधलेले (Chained Books) असायचे त्या मूळे वापरकर्त्याला प्रत्यक्ष जागेवरच ग्रंथाचे अध्ययन करवे लागे. पुढे छापखाण्यांचा शोध लागल्यामुळे एका ग्रंथाच्या अनेक प्रती तयार करणे शक्य झाले. 19व्या शतकामध्ये सार्वजनिक ग्रंथालय चहवळ सुरू झाली. 20व्या शतकात ग्रंथालयामध्ये मुक्त द्वार पध्दत (Open Access) सुरू होवून सर्व नागरीकांना वाचन साहित्याचा मुक्त पणे वापर करणे सुलभ झाले.

❖ **माहितीचा परिस्फोट :–**

सद्याचे युग हे माहितीचे युग समजले जावू लागले आहे. जगाच्या काना कोपऱ्यात प्रत्येक क्षेत्रामध्ये नवनविन माहितीची मिर्मिती होत आहे. काल परवा नविन वाटणारी माहिती आज जूनी वाटून आज त्या माहितीमध्ये नविनच भर पडून नव नविन विद्याशाखा उगम पावत आहेत.

❖ **तंत्रज्ञानातील विकास :–**

विज्ञानाच्या प्रगतीमूळे नव नविन तंत्रज्ञान विकसित होत आहे. या तंत्रज्ञाने माहिती क्षेत्रामध्येही अमुलाग्र बदल घडवून आनला आहे. पूर्वी फक्त प्रिंट स्वरूपात उपलब्द होणारी माहिती आज माहितीच्या तंत्रज्ञानामुळे अमुद्रित स्वरूपात म्हणजेच मायक्रोग्राफी, चुंबकीय प्रकाशीय माध्यमे या स्वरूपात उपलब्द होत आहेत. ग्रंथालयातील रजिस्टर व कार्ड स्वरूपात असणाऱ्या तालिकेने मायक्रोफॉर्म, संगणकीय तालीका, OPAC रूप धारण केलेले आहे.

❖ **ग्रंथालयांचा बदलता चेहरा :–**

इंटरनेटचा शोध हा माहिती क्षेत्रातील क्रांती ठरलेली आहे. जगाच्या कानाकोपऱ्यातील माहिती काही क्षणात इंटरनेटमूळे आज आपल्याला जागेवर उपलब्द होवू लागलेली आहे. आपणाला हवी असणारी माहिती आज ई स्वरूपात प्राप्त होऊ लागलेली आहे. पारंपारीक मुद्रित ग्रंथालयांना इलेक्टीक साहित्याची जोड मिळाल्यामुळे ही ग्रंथालये संकरीत स्वरूपात आपले कार्य करीत आहेत. ग्रंथालयाच्या तालिका इंट्रोनेट, इंटरनेट स्वरूपात वाचकांना उपलब्द होत आहेत. पारंपारीक रूपातून परिवर्तन होत आज संकरीत, इलेक्ट्रीक, Virtual पासून ते पेपर लेस व डिजिटल स्वरूपातपर्यंत ग्रंथालयांनी मजल मारलेली आहे. छापिल साहित्यावर व अमुद्रित साहित्यावर डिजिटल प्रक्रिया करून डिजिटल ग्रंथालये उदयाला येत आहेत. सर्व वाचक व संशोधकांना हवी असणारी नेमकी माहिती त्यांना हव्या असणाऱ्या वेळी हव्या त्या स्वरूपात डिजिटल ग्रंथालयामुळे प्राप्त होवू लागलेली आहे. Greenstone, Dspeace इत्यादी डिजिटल गंथालयाच्या अज्ञावली आहेत.

❖ **डिजिटल ग्रंथालय संकल्पना व अर्थ :–**

Digital म्हणजे अंकीय, पण, शब्दशा अर्थ न घेता डिजिटल ग्रंथालय म्हणजे आज्ञावली द्वारे शास्त्रीय पध्दतीने डिजिटल स्वरूपात माहितीचे संग्रह व जतन केलेल, अनेक माहिती स्त्रोत जोडलेले व नेमकी माहती नेमक्या स्वरूवात सुलभ रीतीने उपलब्द करून देणारे ग्रंथालय होय.

❖ **डिजिटल ग्रंथालय व्याख्या :–**

अनेक तज्ञांनी डिजिटल ग्रंथालयाच्या व्याख्या दिलेल्या आहेत. या पैकी एक परीपूर्ण म्हणून टेरेन्स स्मिथ यांनी पुढील प्रमाणे व्याख्या सांगितली आहे.

"Controlled collections of information being objects that are in digital form those may be organised accessed, evaluated and used by means of heterogeneous and extensive set of distributed services that are supported by digital technology."

-Terence R. Smith (टेरेन्स स्मिथ)

(शास्त्रशुध्द पध्दतीने तयार केलेले व डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून त्याची व्यवस्थित मांडणी करून ते वापरण्यासाठी विविध पध्दतीचे व विविध अंगानी वापरण्याजोग्या मार्गासहित उपलब्द डिजिटल साहित्य संग्रह.)

❖ **संगणके आणि संगणकीय माध्यमे :–**

स्मृतीत संग्रहीत केलेल्या सुचनावरून डाटावर प्रक्रिया करणाऱ्या इलेक्ट्रॉनिक उपकरणास संगणक म्हटले जाते. संगणकाचा विकास पुढील प्रमाणे होत गेला. सन 1617 मध्ये जॉन नेपियर (स्कॉटलंड) ने 'लॉगॅरीदम', सन 1642 मध्ये ब्लेझ पास्कल (फ्रेंच) यांत्रिक गणक उपकरण, सन 1671 मध्ये गॉटफ्रेड (जर्मन) ने स्टेपड रेकनर, सन 1822 मध्ये चार्लस बॅबेज (ब्रिटीश) डीफरेन्शील इंजिन व यानेच सन 1833 मध्ये ॲनालीकल इंजिन, 1944 मध्ये हावर्ड आयकेनने प्रथम स्वयंचलीत डिजिटल संगणक तयार केले. यानंतर MARK I, MARK II, ENTAC (Electronic Numerical Integrator and calculator),

EDVAC (Electronic Discrete Variable Automatic computer), SEAC (Standard Estern Automatic computer), MARK III, MARK IV, UNIVAC (Universal Automatic computer-I) या प्रमाणे संगणकाचा विकास होत चाललेला आहे संगणका बरोबर संगणकीय माध्यमे, संगणकाच परिभाषा, आज्ञावली ऑपरेटिंग व ॲप्लिकेशन सॉफटवेअर, मल्टिमिडीया, सीडी तंत्रज्ञान, डेटाबेस–रचना–निर्मिती, संघटन, व्यवस्थापन व संवर्धन यामध्ये अमुलाग्र बदल व विकास होत चालले आहेत. संगणकाच्या दिवसेंदिवस होत चाललेल्या प्रगतीला साथीला घेवून माहिती तंत्रज्ञाच्या विकासाने आज डिजिटल ग्रंथालये ही अद्यावत माहिती केंद्रे आकराला येत आहेत.

❖ **डिजिटल ग्रंथालयांची गरज :–**

माहितीची प्रचंड विपुलता, स्पर्धेच्या युगात वापरकत्याला नेमकया माहितीचा अचूक वेळी शोध घेणे ई. साहित्य व मुद्रीत साहित्यांच्या मर्यादा, वेळाचा अपव्यय इत्यादी अनेक कारणामुळे सद्या डिजिटल ग्रंथालयांची गरज भासत आहे.

1) **दुर्मिळ व मुद्रीत साहित्याच्या मर्यादा** :– कालांतराने कागद हा जीर्ण होत असतो व हे साहित्य नष्ट होण्याची भीती असते. Out of Printझालेले साहित्य व दुर्मिळ ग्रंथ यांचे जर डिजिटल स्वरूपात परिवर्तन केले तर भविष्यातील वाचकांना कायमस्वरूपी हे साहित्य उपलब्द होवू शकेल.

2) **अनेक भाषेतील माहिती वापरण्याची एकत्र सोय** :– जगामध्ये वेगवेगळया भाषेमध्ये अनेक विषयांत अदयावत साहित्याची निर्मिती होत असते. डिजिटल ग्रंथालयामध्ये या साहित्यावर डिजिटायझेशन तंत्रज्ञान वापरून आपणाला अवगत नसलेल्या भाषेमधील आपल्या विषयावरील माहिती आपल्या भाषेमध्ये मिळाविण्याची सोय उपलब्द होते. त्यामुळे संशोधकाला त्याच्या संशोधनामधील झालेली अद्यावत माहिती मिळणे डिजिटल ग्रंथालयामुळे सुलभ होते.

3) **सर्व स्वरूपातील साहित्याचे जतन**:– छापिल स्वरूपातील साहित्य – ग्रंथ, नियतकालिके, संदर्भ ग्रंथ याच बरोबर वस्तुसंग्रहालये, दप्तरखाने इत्यादी मधील साहित्य वापरामूळे व त्याच्या वय मर्यादेमूळे कायम स्वरूपी टिकविणे शक्य नसते त्याच प्रमाणे अमुद्रित ग्रंथेतर साहित्य – ध्वनिमूद्रिका, चलचित्र, व्हिडिओ चित्रफीत इत्यादी साहित्य टिकविण्यासाठी ग्रंथालयांना अनेक प्रक्रिया करून ही शक्य नसते. डिजिटल ग्रंथालय निर्मितीमूळे हे असे साहित्य जतन करणे, साठविणे व भविष्यामध्ये वापरकर्त्याला उपलब्द करून देणे शक्य होणार आहे.

4) **इंटरनेट वरील माहिती वापरण्यातील तांत्रिक अडचणी** :– इंटरनेटवर ई स्वरूपातील विविध विषयावर माहिती प्रसारीत होत असते. यातील बरीच माहिती व्यापारी तत्वावर अनेक अटींच्या द्वारे उपलब्द होत असते. अनेक तांत्रिक अडचणी व नेटवर्किंगच्या छोटयाशा बिघाडाने हे प्रसारणे केव्हा बंद होईल याची शक्यता नसते. यावर मात करण्याचा एकच उपाय म्हणजे या माहितीचा डिजिटल ग्रंथालयाद्वारे जतन संरक्षण व प्रसारण करणे होय.

5) **तालिकेची व्याप्ती वाढविणे** :– पारंपारीक तालिकेमध्ये ग्रंथांचे नेमके स्थान समजते पण डिजिटल ग्रंथालयामध्ये या तालिकेची व्याप्ती वाढविली जाते. या मध्ये ग्रंथाच्या सुचिबध्द माहिती बरोबरच ग्रंथाचे प्रत्यक्ष मुखपृष्ठ चित्र, अनुक्रमणिका, प्रस्तावणा, विषयसूची इत्यादी बदल माहिती प्राप्त होते. यामुळे वाचकाला साहित्याबदलची निश्चित माहिती होवून त्याची निवड करणे सुलभ होईल.

6) **स्थानिक पातळीवरील साहित्य निर्मितीस प्रोत्साहन** :– प्रत्येक ग्रंथालयांना आर्थिक समस्यांना तोंड देवून आपला साहित्य संग्रह करावा लागतो अपुऱ्या आर्थिक उपलब्दतेमुळे महागडी नियतकालिके, ई जर्नल विकत घेणे अशक्य असते. अशावेळी स्थानिक पातळीवर निर्माण होणारे साहित्य–क्लासनोट, कॉम्प्यूटर प्रोग्रॅम्स, प्रॉब्लेम व सोल्यूशन, व्याख्याने, अभ्यासक्रम, प्रश्न पत्रिका, भिंतीपत्रिका, या साहित्यांचा डिजिटल

तंत्रज्ञानाचा वापर करून त्यांचा संग्रह करून वाचकाला उपलब्द करून दिल्यास स्थानिक पातळीवरील साहित्य निर्मितीस प्रोत्साहन मिळून वाचकांच्या माहितीची गरज भागविणे ही शक्य होणार आहे.

वरील कारणा बरोबरच वेळेची बचत, जागेची कमतरता, योग्य माहितीची निवड इत्यादी अनेक कारणामुळे भविष्यामध्ये डिजिटल ग्रंथालयांना पर्याय राहणार नाही विज्ञान प्रगती मध्ये व स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी सर्वांनी डिजिटल ग्रंथालयाचे स्वागत करणे आवश्यक आहे.

डिजिटल ग्रंथालयासमोरील आव्हाणे

1)आज्ञावलीची निवड:–डिजिटल ग्रंथालयासाठी आज्ञावलीची निवड करताना ती वापरण्यास सुलभ,उत्तम शोध प्रक्रिया असणारी असली पाहिजे.ग्रीनस्टांन,डी स्पेस या डिजिटल ग्रंथालयाच्या आज्ञावली आहेत.

2)डिजिटायझेषन,सादरीकरण व शोध सुविधा :–डिजिटल ग्रथालयाच्या निर्मिती मधील महत्वाचा टप्पा म्हणजे उपलब्द पण आवश्यक असलेल्या साहित्याचे डिजिटल माध्यमामध्ये परिपर्तन करणे आवश्यक माहिती निवडताना वापरकर्त्याच्या उपयोगाची माहिती नजरेतून सुटनार नाही याची काळजी घेतली पाहिजे.

डिजिटायझेशन प्रक्रिया करताना स्कॅनिंग,ओ.सी.आर,अक्वीझेशन,क्लीनअप,पेज अनालिसिस,रेककनेशन,चेकिंग,सेवींग या पायऱ्या उत्तम आणि यशस्वी रितीने पार पाडने आवश्यक आहे.

3)उपलब्द वाचण साहित्याचे परिपर्तन:– ग्रंथालयामध्ये उपलब्द असलेल्या साहित्यामधून निवडक पण आवश्यक परिपुर्ण साहित्याची निवड करुन त्याचे डिजिटल मध्ये रुपांतर करणे ग्रंथपाला समोर एक मोठे आव्हाण आहे.

4)नव साहित्य निर्मिती मधील समस्या:–डिजिटल ग्रंथालयामध्ये नव साहित्य निर्मितीला प्रात्साहन देणेत येते.या साहित्यामूळे वाचकोची सोय होते.पण या साहित्याची अदयावतता व विश्वासनियता तपासणे गरजेचे असते.

5)इंटरनेट वरील माहिती समाविष्ट करणे:–इंटरनेटवरप्रत्येक विषयावर असंख्य स्वरुपात माहिती प्रसारीत होत असते.या माहितीच्या मायाजालातून माहितीची निवड करुन ती डिजिटल स्वरुपात उपलब्द करुन देणे जिकरीचे काम आहे.

6) कॉपीराइट/मालकी हक्क समस्या:–डिजिटल ग्रंथालयामध्ये साहित्याची निवड व निर्मिती करत असताना ज्ञात/अज्ञातपणे कॉपीराइट / मालकीहक्क यांचे उल्लघण होणार नाही याची दक्षता घेणे व त्या बाबत जागरुक असणे आवश्यक आहे.

7)वेळ,श्रम व पैसाची समस्या:–डिजिटल प्रकिया राबविण्यासाठी वेळेचे बंधन पाळून चालत नाही. त्याच प्रमाणे या योजनेसाठी कुशल कामगारांची/तंत्रज्ञांची आवश्यकता असते.तसेच संगणक,स्वॉफ्टवेअर,हार्डवेअर,अज्ञावली स्कॅनर झेरॉक्स इत्यादी उपकरणे व साधणे मुबलक प्रमाणात उपलब्द असणे आवश्यक आहे.या साठी मोठा खर्च अपेक्षित आहे.

डिजिटल ग्रथालय निर्मिती करताना वाचन साहित्यांची निवड,व्यवस्थापन,प्रशासन,नियोजन,लायसन्स इत्यादी आव्हाणांना सामोरे जावे लागते.

समारोप :–

ग्रंथालये आज माहितीकेंद्र म्हणून मान्यता पावत आहे. माहितीच्या प्रचंड निर्मितीमुळे वापरकर्ता आज गोंधळून जात आहे त्याला हवी असणारी नेमकी माहिती शोधने कठीण बनत चाललेले असतानां डिजिटल ग्रंथालयाच्या उगमाने सर्व अडचणीवर मात करणे शक्य झाले आहे. डिजिटल ग्रंथालयामध्ये मुद्रीत व अमुद्रित साहित्याबरोबरच ई साहित्य ही डिजिटायझेशन प्रक्रियेमूळे उपभोकत्याला प्राप्त होणे सुलभ झाले आहे.

भविष्यामध्ये डिजिटल ग्रंथालयांची गरज प्रकर्षाने जानवत राहणार असली तरी या समोरील जी आव्हाणे आहेत त्यांचा विचार होणे आवश्यक आहे.

❖ **संदर्भ :–**

1) वियज, देवधर 'ग्रंथालय व माहितीशास्त्र परिभाषा कोश' युनिव्हर्सल प्रकाशन पुणे, 2010.
2) कर्णिक प्रदीप ' ग्रंथपुण्यसंपती' नवचैतन्य प्रकाशन, मुंबई, 2010.
3) खेरडे, मोहन 'ग्रंथालय संगणकीकरणाची मूलतत्वे' सुयोग प्रकाशन, अमरावती, 1999.
4) फडके, द. ना. 'ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण' युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे, 2007.
5) Chopra, R.N. 'Dictionary of Library Science', Anmol Publication, New Delhi, 1990.
6) Kumar, Sunil 'Digital Library Development' Rajat Publications, New Delhi, 2009.
7) Panda, B. D. 'History of Library Development', Anmol Publication, New Delhi, 2009.
8) Wikipedia:http://en/Wikipedia.org/wiki/digital/library.

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 4.374
UGC Approved Journal Sr. No.48455

ISSN No. 2394-8426
Mar – 2018
Issue–I, Volume–VII

भारतीय संविधानातील मार्गदर्शक तत्वे : हीच राज्यव्यवस्थेची आचारसंहिता

प्रा.डॉ.एच्.एस्.कुचेकर
तु. कृ. कोलेकर कला आणि
वाणिज्य महाविद्यालय, नेसरी,
ता. गडहिंग्लज.

भारतीय संविधानाच्या सरनाम्यात भारतीय जनतेला स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय प्राप्त करून देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. या संबंधीच्या तरतुदी राज्यघटनेच्या भाग 3 व भाग 4 मध्ये विस्ताराने समाविष्ट करण्यात आल्या आहेत. भारतीय संविधानाचा सरनामा, मुलभूत अधिकार आणि मार्गदर्शक तत्वे यात संविधानाचे राजकीय तत्वज्ञान ग्रंथीत करण्यात आलेले आहे. समाजपरिवर्तन घटनात्मक मार्गाने घडवून आणणे हा आपल्या घटनाकारांचा उद्देश होता, म्हणूनच नागरिकांच्या मूलभूत अधिकारांच्या सनदी बरोबरच त्यात मार्गदर्शक तत्वांचा समावेश करण्यात आला आहे.

राजकीय लोकशाहीची यशस्वीता ही सामाजिक व आर्थिक लोकशाहीवर अवलंबून असते, मार्गदर्शक तत्वांचे पालन करून आर्थिक–सामाजिक लोकशाहीची रचना केली जावू शकते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शब्दात सांगायचे झाल्यास, ''हा जो भाग मुद्दाम घालण्यात आला आहे, तो आमच्या मते असलेली आदर्श आर्थिक लोकशाही कशी आहे, याची कल्पना देण्याकरिता घातलेला आहे.'' आम्हाला निव्वळ प्रौढ मतदान देवून राजकीय लोकशाहीच केवळ साधायची नाही.तर कोणत्याही पक्षाचे सरकार जरी अधिकारावर आले तरी त्याला भारताची एकंदर रचना कशी असावी हे या भागावरून कळून येईल.

उद्दिष्टे :

1. मार्गदर्शक तत्वांचा अभ्यास करणे.
2. मार्गदर्शक तत्वांचे वर्गीकरण अभ्यासणे.

देशासाठी आवश्यक परंतू तत्कालिन परिस्थितीत अवघड असल्यामुळे मुलभूत अधिकारात समाविष्ट न होवू शकणारी तत्वे घटनेच्या चौथ्या प्रकरणात मार्गदर्शनपर म्हणून टाकली आहेत. एक प्रकारे इच्छा असूनदेखील घटनाकारांनी स्वीकारलेली ही तडजोडच म्हणावी लागेल. घटनेच्या 37 व्या कलमात या तत्वाचे स्पष्टीकरण दिले आहे. ''देशातील कोणत्याही न्यायालयाकडून राज्याच्या मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी होणार नाही पण देशाची व्यवस्था चालविताना ही तत्वे मूलभूत समजून कायदे करताना त्यांना प्राधान्य देणे शासनाचे कर्तव्य राहील.'' अशी मार्गदर्शक तत्वे राज्यव्यवस्थेची आचारसंहिताच! 1935 च्या कायद्यात गव्हर्नर जनरलला कार्य करण्यासाठी सूचनापत्रके दिली होती, भारतात कल्याणकारी राज्याच्या निर्मितीच्या उद्देशाने त्या आधारे मार्गदर्शक तत्वे निर्माण करण्यात आल्याचे स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले होते.

भारतीय संविधानातील मार्गदर्शक तत्वे राज्याने आपल्या धोरणांची आखणी करित असताना डोळयासमोर ठेवावीत असे घटनाकारांचे मत होते. ऑस्टिनने असे म्हटले आहे की मार्गदर्शक तत्वामध्येच भारतीय संविधानाचे अंतःकरण प्रकट झाले आहे. मार्गदर्शक तत्वांचे अभ्यासाच्या सोयीकरिता पुढील विभागात **वर्गीकरण** करण्यात आले आहे.

1. सामाजिक तत्वे (Social Principles):

समाजव्यवस्था सुव्यवस्थित व्हावी आणि समाज सुधारणा व्हावी हा उद्देश साध्य करण्यासाठी मागासलेल्या, निरक्षर, परंपरांनी गांजलेल्या समाजाला आर्थिक, राजकीय अधिकारांचा उपयोग करून घेता यावा म्हणून सामाजिक स्थिती बदलू शकणारी तत्वे सांगितली आहेत. यात पुढील विषयांचा समावेश केला आहे –

1. 14 वर्षांच्या आतील सर्व मुला–मुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची योजना सरकारने घटना अंमलात आल्यापासून 10 वर्षात करावी.
2. दुर्बल, मागास जाती–जमातींना विशेष सोयी सवलती पुरवून त्यांचे आर्थिक व शैक्षणिक हितसंबंध संवर्धनासाठी राज्याने काळजी घ्यावी.
3. नागरिकांचे आरोग्य सुधारावे यासाठी सरकारने पौष्टीक अन्न पुरवावे, नागरिकांच्या आरोग्याला हानीकारक असणारी मादक पेये आणि आमली पदार्थ हयांना औषधाच्या उपयोगाशिवाय सेवन करण्यास बंदी करण्याचा प्रयत्न करील.
4. राष्ट्रीय स्मारके, स्थाने व वस्तूंचे रक्षण करणे संसदेने कायदा करून अथवा संसदेच्या कायद्याने राष्ट्रीय आणि ऐतिहासिक महत्वाच्या स्थलांचे, कलाकृतींचे, स्मारकांचे, वस्तूंचे मोडतोड, विकृती हयापासून रक्षण करणे ही जबाबदारी राज्याची आहे.
5. 42 व्या घटनादुरूस्तीने पर्यावरणाचे संरक्षण; सुधारणा तसेच जंगले व वन्य प्राण्यांच्या जीवन सुरक्षेचा शासनाने प्रयत्न करावा.

2. आर्थिक तत्वे (Economical Principles):

आर्थिक समता निर्माण व्हावी व आर्थिक लोकशाही खऱ्या अर्थाने प्रस्थापित व्हावीया उद्देशाने पुढील विषय समाविष्ट केले आहेत.

1. प्रत्येक नागरिकाला उपजीविकेची साधने प्राप्त होतील अशी व्यवस्था सरकारने निर्माण करावी. त्यासाठी स्त्री–पुरूष असा भेद केला जाणार नाही.
2. समाज हित लक्षात घेवून उत्पादन साधनांची मालकी व नियंत्रण असावे.
3. सर्व स्त्री–पुरूषांना त्यांच्या समान कार्यासाठी समान वेतन दिले जावे.
4. नागरिकाला योग्य वेतन, विश्रांती व सामाजिक–सांस्कृतिक कार्य करण्याची समान संधी उपलब्ध करून देण्यात यावी.
5. मजूरी करणारा पुरूष आणि स्त्री यांचे आरोग्य आणि शक्ती; लहान मुलांचे कोमल शरीर यांच्यावर विपरित परिणाम होईल असे मेहनतीचे काम करण्यास त्यांना भाग पाडू नये.

3. राजकीय तत्वे (Political Principles) :

केंद्र सरकार आणि घटकराज्य सरकार यांनी राज्यकारभाराबाबत कोणती धोरणेस्वीकारावीत हया बाबींचे स्पष्टीकरण या तत्वामध्ये केलेले आहे.

1. घटनेच्या 40 व्या कलमाने असे स्पष्ट केले की, राज्यसरकार ग्राम पंचायत स्थापण्याची योजना करेल, त्यांना स्वराज्याचे घटक म्हणून काम करण्यास आवश्यक असे अधिकार व सत्ता देण्यात येईल.
2. देशातील सर्व नागरिकांसाठी एकच समान नागरी कायदा अस्तित्वात आणण्याची व्यवस्था सरकार करेल, स्वातंत्र्योत्तर भारतात लोकांमध्ये ऐक्य वाढीस लागावे व कायद्यातील विषमता नष्ट व्हावी हया हेतूने भारतातील सर्व नागरिकांना एकच कायदा लागू होईल अशी व्यवस्था करणे.
3. न्याय विभाग हा शासकीय विभागापासून वेगळा करावा, ब्रिटीश भारतात जिल्हाधिकारी हा जिल्हा न्यायाधिश म्हणून काम करित असे. न्यायालयाचे स्वातंत्र्य व सत्तेच्या विभाजनाचे तत्व येथे अंमलात आले आहे.

4. आंतरराष्ट्रीय तत्वे (International Principles) :

भारताने परराष्ट्रांशी कसा संबंध ठेवावा हया विषयीचे मार्गदर्शन तत्वे घटनेच्या नव्याकलमात दिली आहेत. ती पुढीलप्रमाणे –

1. शासनाने अशा प्रकारचे परराष्ट्रीय धोरण स्वीकारावे की ज्याद्वारे जागतिक शांतता, सुरक्षितता आणि सुव्यवस्था कायम राहील.
2. राष्ट्राराष्ट्रामध्ये न्याय आणि सन्माननीय संबंध प्रस्थापित करण्याचा शासनाने प्रयत्न करावा.
3. आंतरराष्ट्रीय व्यवहार आणि संबंध ठेवताना व वागताना आंतराष्ट्रीय कायदा आणि तहनाम्यातील जबाबदाऱ्या हयांचे संबंधी आदर वाढविण्यात शासनाने प्रयत्न करावा.
4. राष्ट्राराष्ट्रातील कलहाचा निकाल परस्पर समजूतीने अथवा लवादामार्फत सोडविण्याचा प्रयत्न करावा.

वरिलप्रमाणे मार्गदर्शक तत्वांचे वर्गीकरण पाहिल्यास आपणास असे जाणवते की या मार्गदर्शक तत्वातून सर्व भारतीय नागरिकांना समान काम, समान वेतन, रोजगारांचा हक्क मिळण्याविषयीची तरतुद करण्यात आलेली आहे. त्याचा थोडक्यात परामर्श पुढीलप्रमाणे घेता येईल.

1) रोजगाराचा हक्क :

सर्वांना रोजगार मिळविण्याचा हक्क या मार्गदर्शक तत्वामध्ये करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र सरकारची रोजगार हमी योजना व राजीव गांधी यांनी सुरू केलेली जवाहर रोजगार योजना. या योजनेमुळे ग्रामीण भागात किमान वेतनावर रोजगार देण्याची सोय काही प्रमाणात करण्यात आली. तसेच कलम 47 प्रमाणे ग्रामीण जनतेचे राहणीमान उंचाविण्यासाठी सामुदायिक विकास योजना, एकात्मिक ग्रामीण विकास योजना, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम सुरू करण्यात आले. दारूबंदीबाबत सध्या ग्रामीण भागात थोडीशी प्रगती झालेली आहे. आंध्रप्रदेशात ग्रामीण महिलांच्या आंदोलनामुळे दारू बंदी झालेली दिसून येते. पर्यावरणाच्या संरक्षणाबाबत न्यायालयाने राज्य सरकारांना आदेश दिले आहेत. त्यामुळे प्रदूषणामुळे पर्यावरणास जो धोका पोहोचत होता, त्या संदर्भात न्यायालयाने सक्रियता दाखवून आदेश दिलेले दिसून येतात. तसेच 1973 साली केंद्रसरकारने क्रिमिनल प्रोसिजर कोड संमत करून न्यायालयीन दंडाधिकारी हे न्यायव्यवस्थेचा भाग असल्यामुळे न्यायालयीन खटले आता न्यायालयीन दंडाधिकाऱ्यापुढेच चालविले जावेत अशी तरतुद केली आहे.

2. समान काम समान वेतन :

राज्याने दर्जा, सुविधा व संधी या बाबतीत असलेली विषमता नष्ट करण्याचा प्रयत्न करावा. आर्थिक व सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी उपजीविकेचे साधन मिळण्याचा प्रयत्न करावा, संपत्तीचा व उत्पादनांच्या साधनांचा एकाच ठिकाणी संचय होवू नये यासाठी लक्ष द्यावे, लहान मुलांचे शोषणापासून व भौतिक गरजांच्या उपदेशापसून संरक्षण व्हावे, स्त्री–पुरूषांना समान कामाबद्दल समान वेतन मिळावे अशी तरतूद केली. समान न्याय, कायदेविषयक मोफत सल्ला, शिक्षणाचा, ग्रामपंचायती स्थापन, कामगारांकरिता निर्वाह वेतन उद्योगधंद्याच्या व्यवस्थापनात कामगारांचा सहभाग असावा अशी तरतुद मार्गदर्शक तत्वामध्ये करण्यात आली आहे. तसेच मार्गदर्शक तत्वांच्या स्थानाबाबत जर घटनात्मक प्रश्न निर्माण झाल्यास सर आयव्हर जेनिंग्न, के.सी. व्हीअर या घटनातज्ञांनी या तत्वांना न्यायालयीन संरक्षण नसल्यामुळे त्यांचा गंभीरपणे विचार करता येणार नाही असे म्हटले आहे. कारण संविधानाने मुलभूत अधिकारांना न्यायालयीन संरक्षण दिले आहे. तसे मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी झाली नाही तर नागरिकांना न्यायालयात दाद मागता येत नाही. कारण मार्गदर्शक तत्वांचे स्वरूपच असे आहे की त्यांची अंमलबजावणी सरकारने करावी, असा आदेश न्यायालय देवू शकत नाही.

मार्गदर्शक तत्वांमागील अधिबलने (सॅक्शन्स) :

मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करण्याची सक्ती राज्यसत्तेवर केली जावू शकत नाही. परंतू राज्यकारभार करताना त्यांची अंमलबजावणी होईल हे पाहणे राज्यसत्तेचे कर्तव्य असेल अशी तरतुद कलम 37 मध्ये केली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मार्गदर्शक तत्वे हे भारतीय संविधानाचे आगळेवेगळे वैशिष्टय ठरवले होते. ऑस्टिनच्या मते मार्गदर्शक नावाच्या अंमलबजावणीद्वारे देशातील सामाजिक क्रांतीची उद्दिष्टये

साध्य होतील. राज्यसत्तेवर सकारात्मक जबाबदाऱ्या सोपवून घटनाकरांनी भारताच्या भावी राज्यकर्त्यांना व्यक्तीगत स्वातंत्र्य आणि सार्वजनिक हित, मुठभरांचे विशेषाधिकार आणि अनेकानेकांसाठी कल्याण सुविधा या दोन टोकामधला सुवर्णमध्य साधून सर्व व्यक्तींना सम प्रमाणात स्वतंत्र करण्याचे आणि सामुदायिक कल्याणात योगदान करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे.

मार्गदर्शक तत्वे हा संविधानाचा अविभाज्य भाग असल्यामुळे राज्यसरकारांना त्या तत्वांची अंमलबजावणी करायला सांगणे हे केंद्रसरकारचे कर्तव्यच ठरले आहे. तसे न करणाऱ्या घटकराज्याविरूद्ध कारवाई करण्याचाही अधिकार संविधानाने केंद्रसरकारला दिला आहे. मार्गदर्शक तत्वांकडे कानाडोळा करणाऱ्या राज्यकर्त्यांना मतदार निवडणूकामध्ये धडा शिकवल्याखेरीज राहणर नाहीत आणि विरोधी पक्षही त्यांच्या विरूद्ध प्रचार करताना त्यांच्या या अपयशाचे नक्कीच भांडवल करतील असा विश्वास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व्यक्त केला होता. मार्गदर्शक तत्वे ही लोकमताचा आरसा असून त्यातून व्यक्त झालेल्या जनतेच्या आशा आकांक्षांची उपेक्षा कोणतेही प्रातिनिधी सरकार कधीच करू शकत नाही.

मार्गदर्शक तत्वासंदर्भात न्यायालयीन निर्णय :

1980 साली मिनर्व्हा मिल खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने घटनेच्या मूलभूत चौकटीच्या सिद्धांतास पाठिंबा दिला. यात न्यायालयाने म्हटले की मार्गदर्शक तत्वांना न्यायालयीन पुनर्विलोकन लागू होते. सर्वच मार्गदर्शक तत्वे मुलभूत अधिकारापेक्षा श्रेष्ठ नाहीत. कलम 14 आणि 19 यांच्या ते विरोधात जातात म्हणून रद्द करू नयेत असा न्यायालयाने या खटल्यात निर्णय दिला. सर्वोच्च न्यायालयाने मिनर्व्हा मिलच्या आपल्या निर्णयाद्वारे मुलभूत अधिकार आणि मार्गदर्शक तत्वे यांच्यात एक प्रकारचा समतोल प्रस्थापित केला. याबाबत न्यायमुर्ती चंद्रचूड यांनी असे मत व्यक्त केले की, ''मूलभूत अधिकार व मार्गदर्शक तत्वे भारतीय राज्यघटनेचा सद्सद्विवेक असून त्यातून आमची सामाजिक क्रांतीबाबतची बांधिलकी स्पष्ट होते. भारतीय संविधानाने दोन्ही भागांना समान महत्व दिले असून त्यापैकी एकाला जास्त महत्व देणे योग्य होणार नाही. मानवी स्वातंत्र्य आणि नागरिकांचे मूलभूत अधिकार यांचा सन्मान राखीत सामाजिक न्यायाचे व आर्थिक आणि सामाजिक समतेचे प्रश्न सोडवले पाहिजेत. अधिकार हे जर साधन असेल तर मार्गदर्शक तत्वे साध्य व उद्दिष्टांची पूर्ती करतात. म्हणून ते अभेद आहे असे चंद्रचूडचे मत होते.''

1986 च्या शहाबानो खटल्यात निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने राज्यसत्तेवर मार्गदर्शक तत्वांकडे कानाडोळा केल्याचा ठपका ठेवला होता तर 1995 च्या आणखी एका खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने समान नागरी कायदा करण्यात राज्यकर्त्यांनी चालढकल करू नये असा कडक इशारा दिला होता. अनेक निवाड्यामधून सर्वोच्च न्यायालयाने मूलभूत हक्कांची व्याप्ती विस्तारताना मार्गदर्शक तत्वांचा आधार घेतलेलाही दिसून येतो. अशाप्रकारे न्यायालयीन कामकाजातून मार्गदर्शक तत्वांचे महत्व अधोरेखित होणे आणि त्यांच्या अंमलबजावणीला चालना मिळणे हे संविधानाच्या गाभ्याशी सुसंगतच म्हणावे लागते.

मार्गदर्शक तत्वावरील टीका :

1. टिकाकारांच्या मते मार्गदर्शक तत्वे कायद्याच्या दृष्टीने शून्य मोलाचे आहेत. शासन ती पाळण्यास बांधील नाही. त्यामुळे त्या केवळ राजकीय घोषणा आहेत. घटनाकारांच्या सदिच्छांचा व आकांक्षांचा तो केवळ एक संग्रह ठरतो. के.टी. शहा म्हणतात, ''मार्गदर्शक तत्वे म्हणजे एक असा धनादेश आहे की जो वटविला जायचा की नाही हे बॅकेच्या ऐपतीवर अवलंबून आहे.''
2. शासनावर पालन करण्याचे बंधन नाही. त्यामुळे निवडणूकीच्या वेळेस भरपूर आश्वासने देवून भोळयाभाबडया व श्रद्धाळू भारतीय जनतेची मते प्राप्त करण्याचा तो उत्कृष्ट मार्ग आहे.
3. मार्गदर्शक तत्वे अव्यवहार्य आणि ती संदीग्ध आणि अतार्किक स्वरूपाची आहेत. टीकाकार म्हणतात, मार्गदर्शक तत्वाचे केलेले वर्गीकरण तर्कसंगत नाही काही वेळा एकाच गोष्टीची पुनरावृत्ती केली, पण बेकारी, आजारपण, वार्धक्य हया महत्वाच्या गोष्टींचा उल्लेख या तत्वामध्ये केलेला नाही

4. मार्गदर्शक तत्वे ही असंगत व चूकीची कालगणना करणारी आहेत. त्याचप्रमाणे सार्वभौम कल्पनेला देखील ती बाधक आहेत. त्यामुळे ही तत्वे अनाठाई आहेत.असेटिकाकारांचे मत असले तरी मार्गदर्शक तत्वे पूर्णतः निरूपयोगी नाहीत.

निष्कर्ष :

मार्गदर्शक तत्वांवर टीका केली जात असली तरी त्यामुळे मार्गदर्शक तत्वांचे महत्व कमी होत नाही. आजचे राज्यकर्ते त्याचा स्वार्थासाठी उपयोग करीत असतील. मार्गदर्शक तत्वांच्या अनुरोधाने शासनाने आखलेल्या धोरणाचा प्रत्यय जनतेपर्यंत पोचत नसेल. त्यामुळे मार्गदर्शकतत्वे घटनेतून काढून टाकावीत असे म्हणणे योग्य होणार नाही. म्हणून के.सी. व्हीअर म्हणतात त्याप्रमाणे मार्गदर्शक तत्वांचा घटनेत करण्यात आलेला समावेश अप्रस्तुत नव्हता. कारण धोरणे ठरवीत असताना राज्याने या मार्गदर्शक तत्वांचा स्वीकार करावा असे घटना सांगते. राज्याने धोरणे ठरवीत असताना मार्गदर्शक तत्वांचा विचार करावा असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मत होते. मार्गदर्शक तत्वांचे महत्व लक्षात घेवूनच 42 व्या व 44 व्या घटनादुरूस्त्यामध्ये दुरूस्ती करण्यात आली. मार्गदर्शक तत्वे घटनेतील 'मृत अक्षर' राहिली नाहीत तर गेल्या पन्नास वर्षात देशात सामाजिक आणि राजकीय परिवर्तन घडवून आणण्यात त्यांनी महत्वाची कामगिरी बजावली.

ज्याप्रमाणे मूलभूत अधिकारांना घटनात्मक संरक्षण देण्यात आलेले आहे त्याप्रमाणे मार्गदर्शक तत्वातदेखील व्यक्तीच्या अधिकारांचा समावेश करण्यात आला आहे. पण त्यांना न्यायालयीन संरक्षण नाही. तथापि या तत्वांची अंमलबजावणी करण्यासाठी सरकार योग्य असे कायदे बनवू शकते. मार्गदर्शक तत्वांचे एकदा कायद्यात रूपांतर केल्यानंतर सरकार त्यांची अंमलबजावणी करू शकते.

स्वातंत्र्योत्तर काळात अनेक महत्वपूर्ण निर्णय मार्गदर्शक तत्वांच्या आदर्शांचा मागोवा घेवूनच घेण्यात आले आहेत. 1950 साली घेतलेला 'कल्याणकारी राज्याबद्दलचा निर्णय', 1955 चा मिश्र अर्थव्यवस्थेचा व समाजवादी समाजरचनेबद्दलचा निर्णय हे जनइच्छांना प्रतिबिंबित करतात अशा प्रकारे जवळपास सगळीच मार्गदर्शक तत्वे प्रत्यक्षात आणण्याचे थोडेफार प्रयत्न शासनाकडून झाले आहेत असे म्हणावे लागते.

संदर्भ ग्रंथ :

1. भोळे भा.ल., भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.
2. प्राचार्य देवरे व इतर, भारतीय लोकशाही गणराज्य, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव.
3. कुलकर्णी एम. ए., भारतीय संविधन आणि राजकारण, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
4. भोळे भा. ल., भारतीय राज्यव्यवस्था, पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.
5. पाटील बी. बी., भारतीय शासन आणि राजकारण.
6. डॉ. कसबे रावसाहेब, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना.
7. साधना मासिक.

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 4.374
UGC Approved Journal Sr. No.48455

ISSN No. 2394-8426
Mar – 2018
Issue–I, Volume–VII

लोकमत घडविण्यात वर्तमानपत्रांची भूमिका

डॉ. शिरीन अघोर
सहाय्यक अध्यापक,
राज्यशास्त्र विभाग,
एल. ए. डी. महाविद्यालय, नागपूर.

सरांश :–आधुनिक युग हे लोकशाहीकरणाचे युग आहे. लोकशाही व लोकशाहीकरण या दोन शब्दप्रयोगात अंतर आहे. लोकशाही ही शासनपध्दती व राजकीय व्यवस्थेचा एक प्रकार आहे व लोकशाहीकरण ही एक प्रक्रिया आहे. आधुनिक काळात राजकिय व्यवस्थेला लोकांचे समर्थन प्राप्त झाल्याशिवाय ती स्थिर बनू शकत नाही. लोकशाहीकरणाच्या प्रक्रियेतूनच लोकांचा सहभाग, विचारांचे आदान – प्रदान, मागण्यांचे अभिव्यक्तीकरण होत असते त्यामुळे लोकशाहीत लोकमताला महत्व प्राप्त झालेले आहे. लोकशाही असा एकमेव शासन प्रकार आहे की ज्यात लोकांना आपले विचार मांडण्याचे स्वातंत्र्य असते. लोकमताच्या आधारे आपण शासनाच्या दैनंदिन कार्यक्रमावर, धोरणांवर, प्रशासनावर नियंत्रण ठेवू शकतो आणि लोकमत व्यक्त करण्याचे महत्वाचे माध्यम म्हणून वर्तमानपत्रांना अत्यंत महत्वाची भूमिका बजावावी लागते. कारण सर्वसामान्य जनतेच्या विचारांची अभिव्यक्ती करण्याचे ते एक महत्वपूर्ण साधन आहे. वर्तमानपत्रांच्या साहयानेच समाजातील, विश्वातील घडामोडी अल्पखर्चात व अल्पवेळात जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचत असतात. वर्तमानपत्र हे लोकशिक्षणाचे कार्य करून लोकांना विविध गोष्टीं बद्दल जागृत करून लोकमत घडवित असतात. वर्तमानपत्र ही एक दुधारी शस्त्र म्हणून काम करत असते. ते शासन व जनता यांना जोडणारा दुवा म्हणूनही कार्य करीत असतात. प्रस्तुत शोध निबंधात आपण वर्तमानपत्रांची लोकमत घडविण्यात काय भूमिका आहे हे पाहणार आहोत.

उद्देश : – जनमाणसावर प्रभाव टाकणाऱ्या वर्तमानपत्रांची भूमिका कशी आहे व ते आपल्या भूमिकेच्या आधारावर समाजात लोकमत कसे घडवितात. या बाबींचा अभ्यास व त्याचे मुल्यमापन करणे हाच या शोध निबंधाचा उद्देश आहे. लोकशाहीत वर्तमानपत्र खरच स्वतंत्र आहे काय ?

KEY WORDS – वर्तमानपत्र, लोकमत, लोकशाही

प्रस्तावना :– आज वर्तमानपत्रांच व समाज जीवनाच नात अत्यंत अतुट आहे. वर्तमान पत्र हे लोक शिक्षणाच कार्य करीत असतात. वर्तमानपत्राच समाजात लोकमत घडवित असतात. त्यामुळे लोकमत घडविण्यात वर्तमानपत्रांची भुमिका स्वातंत्रकाळात व स्वातंत्र्या नंतर काय आहे हे आपल्याला पाहावे लागेल. वर्तमानपत्रांचा इतिहास पाहिला तर स्वातंत्र्याच्या पुर्वी वर्तमापनपत्र हे गुलामित असलेल्या भारत भुमिला स्वतंत्र करण्याच्या उद्देशाने प्रेरित व कार्यरत होती आणि तेच त्यांचे ध्येय होते. भारत गुलामगिरीत असल्यामुळे वर्तमानपत्रांवर अनेक प्रकारची बंधने होती. पण त्या काळात वर्तमानपत्रांनी अनेक लेख लिहून इंग्रजांचे धोरण भारतीय जनते करिता कसे घातक आहे हे सांगुन राष्ट्रीय चळवळ भारतात निर्माण केली. देशातील जनतेत राष्ट्राभिमान जागृत केला. जाती, धर्माच्या पलीकडे जावून देशाच्या हितासाठी विचार करावा लागेल हे सत्य मांडले. त्यातुनच संघटीत जनमत भारतात निर्माण होवून आपण आपल्या भारत भुमिला स्वतंत्र करू शकलो. पण भारत स्वतंत्र झाल्यानंतर वर्तमानपत्रांच्या उद्देशात, त्यांच्या भुमिकेत बदल झाला. स्वतंत्र भारतात वर्तमानपत्रांना स्वाय्यतता मिळाल्यामुळे वर्तमानपत्रांच्या स्वरूपात बदल झाला. आजची वर्तमानपत्रे ही व्यक्तीनिरपेक्ष होत आहेत. आज ती जनतेची प्रतिनिधी संस्था आहे. म्हणुनच तीला चौथी सत्ता म्हटंल्या जाते. लोकशिक्षणाच्या सदभावनेतूनच वर्तमापनत्रांचा जन्म झाला आहे. वृत्तपत्रांचा उद्देश संपूर्ण समाजात नवसंचार, सजीवता, जागरण, नवस्फुर्ती सक्रीयता ,गतिमानता निर्माण करणे हा आहे. त्यामुळे वर्तमानपत्रांनी भुमिकेत बदल केला आहे. आज वर्तमानपत्रे जनतेशी संवाद साधुन लोकांमध्ये सुसंवाद प्रस्थापित करतात. संवादातुनच माणसा माणसात विचारांची देवाण – घेवाण होवून लोकमत तयार होते व त्यातुनच मानवी संबंध, नाती निर्माण होवून समाज खऱ्या अर्थाने कृतीशील बनतो. म्हणुनच वर्तमानपत्रांची गती दिवसेन दिवस तीव्र होत चाललेली आहे. वृत्तपत्रच जन – भावनांची अभिव्यक्ती, सदभावनांची अनुभूती, संस्कृती, सभ्यता, नैतिकता स्वतंत्रता यांची वाणी आहे. ते लोकशाहीचे बायबल आहे. जनता व सरकार यांना जोडणारा महत्वाचा दुवा वर्तमानपत्र आहे. व्यक्तीच्या भावनांना जागृत करण्यात वर्तमानपत्रांची भुमिका अत्यंत महत्वपूर्ण असते. समाजातील सार्वजनिक समस्या, प्रश्न निडरपणे लोकांसमोर आणण्याचे महत्वपूर्ण कार्य विविध भाषिक वर्तमानपत्र करतात कारण भारतात विविध भाषा विविध संस्कृतीचे, धर्माचे लोक राहतात. त्यांच्या पर्यंत बातम्या पोहचविण्याचे कार्य वर्तमानपत्र करतात व त्यातुन जनमत तयार होते. भारतातील अनिष्ट प्रथा, परंपरा, स्त्री शिक्षण, स्त्री समस्या, यांना वाचा फोडण्याचे कार्य वर्तमानपत्रांनीच केले आहे. त्यामुळे वर्तमानपत्रांचे लोकशिक्षणाचे, समाजसुधारणेचे कार्य अजुनही संपले नाही. कारण नवीन समाजात नवीन समस्या, समाजकारण, राजकारण घडत असते व त्याला दिशा देण्याचे कार्य वर्तमानपत्रांनाच करायच आहे. वर्तमानपत्रच लोकांच्या स्वतंत्र भावनांना नवे चैतन्य देतात. म्हणुनच लोकमत जागृत करणे, ते व्यक्त करणे सार्वजनिक प्रश्नांची चर्चा करणे, त्यातुन समाजोपयोगी मार्ग दाखवणे व त्यावर लोकांचा विश्वास बसेल असे विचार मांडणे हीच आदर्श वर्तमानपत्रांची भूमिका असते.

वर्तमानपत्रांची जडणघडण वाचकांच्या बुध्दीवर, प्रवृत्तीवर, कार्यावर परिणाम करणारी असावी. त्यासाठी वर्तमानपत्रांची वैचारिक भूमिका स्पष्ट असली पाहिजे. राजकिय, आर्थिक, सामाजिक या गोष्टीची सरमिसळ त्यांनी करू नये. वर्तमान पत्रांनी केवळ भावनात्मक भूमिका न ठेवता समाजातील वास्तविक परिस्थिती लोकांसमोर आणायला पाहिजे. नाहीतर लोकांची दिशा भूल होवू शकते. वर्तमानपत्र समाजाचे प्रश्न जेवढ्या व्यापकपणे हाती घेतील तेवढ्या प्रमाणात ते लोकांच्या अंतःकरणाला भिडुन सकारात्मक लोकमत निर्माण होईल. अनेक राजकिय विचारवंतांना जनमत जागृत करण्यासाठी वर्तमान पत्रांचा आधार घेतलेला दिसतो.

भारतानी स्वतंत्र झाल्यानंतर लोकशाही शासन पध्दतीचा स्विकार केला त्यात आपण प्रौढ मताधिकार पध्दतीचा अवलंब केल्यामुळे सामान्य माणसाला महत्व प्राप्त झाले आणि त्याचमुळे सामान्य माणसाच्या मताचा विचारांचा प्रभाव शासनावर पडू लागला व त्यातूनच लोकमताला महत्व प्राप्त झाले आणि लोकमत निर्मितीचे प्रभावी साधन म्हणून वर्तमानपत्रांना महत्व प्राप्त झाले. लिप्सेट यांनी 'वर्तमानपत्रांना लोकशाहीचे बायबल म्हटले आहे.' कारण वर्तमानपत्र हे सामान्य माणसांपर्यंत पोहोचणारे, त्यांच्यावर प्रभाव, परिणाम करणारे लोकांना विचार – प्रवृत्त करणारे असे माध्यम असल्यामुळे लोकशाहीत वर्तमानपत्रांना अत्यंत महत्व प्राप्त झालेले आहे. वर्तमानपत्रांच कार्य हे प्रादेशिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर दिवसेंदिवस व्यापक होत आहे. याच कार्यातून समाज लोकमत प्रभावी होत असताना दिसते. वर्तमान पत्रांचा इतिहास हा अत्यंत प्राचिन आहे. पण इंग्रज जेव्हा भारतात आले तेव्हापासून वर्तमानपत्रांचा खरा विकास व्हायला सुवात झाली. आजच्या काळात सुध्दा समाजप्रबोधनाची व जनजागृतीची गरज संपलेली नाही म्हणूनच वर्तमानपत्रांना आपल लोकजागृतीचे, लोकशिक्षणाच कार्य निरंतर चालूच ठेवाव लागत. नव्या परिस्थितीत नवीन प्रश्न,समस्या निर्माण होत असतात आणि हे प्रश्न सोडविण्यासाठी वर्तमानपत्रांना एक सकारात्मक भूमिका पार पाडावी लागते. वर्तमानपत्र हे आपल्या जीवनाचा आरसा आहे. ते आपल्या जीवनात साखरे सारखे मिसळून गेलेले आहे. आपण आपल्या दिवसाची सुरूवात

वर्तमानपत्रापासूनच करत असतो. वर्तमानपत्रातून संपूर्ण विश्वाची माहिती आपल्याला मिळत असते व त्या माहितीच्या, बातमीच्या आधारे आपण आपल त्या गोष्टीबद्दलच सकारात्मक किंवा नकारात्मक मत बनवित असतो यालाच लोकमत असे म्हणता येईल.

लोकशाही शासन व्यवस्थेत स्थिरता आणण्यासाठी लोकांच्या अपेक्षा व मागण्यांची दखल व्यवस्थेला घ्यावी लागते. केलेल्या कार्याची माहिती जनतेला दयावी लागते आणि घेतलेल्या निर्णयांना लोकांचे समर्थन मिळेल असा प्रयत्न करावा लागतो. विसाव्या शतकातील जुलूमशाहीच्या इतिहासाचे अध्ययन केले तर असे दिसुन आले की जागृत झालेल्या जनतेच्या तीव्र विरोधामुळे परकीय सत्तांचे उच्चाटन झालेले आहे. अनेक ठिकाणी हुकूमशाहीचे पतन झाले आहे. म्हणूनच हयुम म्हणतो की सर्वच प्रकारच्या शासनपद्धतींना, त्या कितीही वाईट असल्या तरी स्वतःच्या सत्तेसाठी लोकमतावर अवलंबून रहावे लागते. लोकशाही शासन व्यवस्थेत लोकमताला अनन्य साधारण महत्व आहे. कारण लोकशाही शासन व्यवस्थेत सरकार जनतेला जबाबदार असते आणि शासनाच्या यशापयशावर लोक निर्णय देतात. त्यात बदल करतात व लोकमताद्वारे दैनंदिन प्रशासनावर व धोरणांवर नियंत्रण ठेवतात. लोकमताचा अनादर करणारे व सत्तेचा गैरवापर करणारे शासन लोकशाहीत सत्तेवर राहू शकत नाही. याचा प्रत्यय भारतात अंतर्गत आणिबाणी झालेल्या 1977 च्या सार्वत्रिक निवडणूकीत सर्वांनी अनुभवलेला आहे. त्यामुळे लोकशाही व लोकमत या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहे.

लोकमताची व्याख्या :– 1) रौबर्ट लेन व डेव्हिड सिअर्स यांच्या मते विशिष्ट परिस्थितीत एखाद्या प्रश्नावर दिलेले उत्तर म्हणजे मत होय.

2) ब्राईसच्या मते समाजहिताच्या किंवा त्यावर परिणाम करणाऱ्या प्रश्नावर व्यक्त होणाऱ्या प्रश्नावर व्यक्त होणारे लोकांचे मत म्हणजे लोकमत होय. लोकांची स्वतःच्या हिताबद्दल असलेली भूमिका लोकमत व्यक्त करीत असते. लॉवेल यांनी लोकमतासाठी लोककल्याणाची भावना हा आवश्यक घटक मानला आहे. बदलत्या परिस्थितीनुसार लोकांचे अनुभव विश्व जसे बदलत जाईल. त्यात माहिती व विचारांचे आदान – प्रदान ज्या प्रमाणात होईल त्यानुसार लोकमत निर्माण होत असते. त्यामुळे ती एक सतत गतिमान असणारी, सर्व लोकांच्या अनुभवविश्वाला सामावून टाकण्याची व्यापक क्षमता बाळगणारी व त्यांच्या भूमिका अभिव्यक्त करणारी स्वयंचलित प्रक्रिया आहे. लोकमताच्या निर्मितीची प्रक्रिया अतिशय गुंतागुंतीची असते. ती मानवी समुहाच्या बौद्धीक व भावनात्मक विश्वाशी निगडीत असणारी सामुहिक प्रक्रिया असल्यामुळे तिचे सर्वच पैलू आणि स्वरूप नेहमीच स्पष्ट राहत नाही. कारण प्रत्येक समाजातील व्यक्तीच्या व्यक्तीगत भावना व सामुहीक भावना वेगवेगळया प्रकारच्या असतात. तसेच त्यांचे अनुभव व आकलन शक्ती वेगवेगळी असते. यातूनच लोकमताची प्रक्रीया समाजात चालते. लोकमतही एक द्विस्तरीय आदान – प्रदान प्रक्रिया असुन त्या विचारांचे (संदेशाचे) ग्रहण व प्रक्षेपण हे आदान असून त्यावर मिळणार प्रतिसाद म्हणजे प्रदान असते. आधुनिक काळात औद्योगिकरण, शहरीकरण, संसुचन क्षेत्रातील तंत्रवैज्ञानिक क्रांतीमुळे लोकमत निर्मितीच्या प्रक्रियेला जास्त गतिमानता, व्यापकता प्राप्त झालेली आहे. त्यामुळे लोकमत ही आधुनिक काळातील अत्यंत प्रभावशाली शक्ती ठरली आहे. शासक, सत्ताधारी वर्ग, राजकीय पक्ष विविध गट व सामान्य जनता, या सर्वांसाठी ती महत्वाची शक्ती आहे. त्यामुळेच या प्रक्रियेत सर्व स्तरावरील व्यक्तीचा सहभाग आधुनिक काळात सतत वाढत असलेला दिसुन येतो. लोकमत अभिव्यक्त करणारी जी प्रमुख साधन आहे त्यात वर्तमानपत्रांची भुमिका अत्यंत महत्वाची आहे. वृत्तपत्रे, मासिके, प्रचार पत्रके, ग्रंथ इत्यादी विविध प्रकाशनाद्वारे लोकमत व्यक्त होत असत. अल्पखर्चात व अल्पवेळात जास्ती जास्त लोकांपर्यंत पोहोचण्याची क्षमता वर्तमानपत्रात असते. दैनंदिन वार्तापत्र, समस्यांची चर्चा व समीक्षण करणे हेच वृत्तपत्रांचे मुख कार्य असते. माहितीचे संकलन संस्करण व प्रसारण करणे शासनाच्या धोरणांचे व कार्याचे स्पष्टीकरण व मुल्यमापन करणे, सार्वजनिक विषयांवर चर्चा करणे, लोकशिक्षण करणे, आणि लोकमताचे प्रतिबिंब स्पष्ट करणे हे कार्य वर्तमानपत्र सतत करून लोकमत घडवित असतात. पण वृत्तपत्र ही एक दुधारी तलवार आहे. तीचा जसा सकारात्मक प्रभाव समाजावर पडतो तसा नकारात्मक प्रभाव पण पडू शकतो. जसे भ्रष्ट व हीन अभिरूची असलेली, स्वार्थी, बेजबाबदार वृत्तपत्रे तसेच विशिष्ट दृष्टीकोनाशी व विचारसरणीशी बांधिलकी राखणारी वृत्तपत्रे हा लोकमत व लोकशाहीला शाप असतो. म्हणूनच स्वतंत्र, निर्भिड व निःपक्ष प्रामाणिक वृत्तपत्रे हा लोकशाहीचा मापदंड मानला जातो. साक्षरता प्रसार, वाढती राजकिय जिज्ञासा आणि वृत्तपत्रनिर्मिती व वितरण यात तंत्रज्ञानामुळे शक्य झालेली गतिमानता या गोष्टीमुळे वृत्तपत्रांना लोकमतनिर्मिती व अविष्करण यांच्या संदर्भात अभूतपूर्व महत्व आज प्राप्त झाले आहे. आपल्या आवडत्या वर्तमानपत्रातील बातम्या आणि दृष्टीकोन प्रमाण समजून स्विकारण्याकडे व्यक्तीचा कल असतो. फारच थोडे जाणकार वाचक संपादक – लेखकांचे पूर्वग्रह व परिबद्धता आणि वृत्तपत्र मालकांचे स्वार्थ व हितसंबंध यांच्या अनुषंगाने वृत्तपत्रातील लेखनाची डोळसपणे चिकित्सा करून आणि अनेक वृत्तपत्रातील मजकुरांचा तौलानिक अभ्यास करून स्वतःचा निर्णय स्वतंत्रपणे घेऊ शकतात. बहुसंख्य लोक मात्र विचार न करताच वृत्तपत्रीय भूमिका स्विकारतात. ज्या देशात वृत्तपत्रे सरकार नियंत्रित असतात तिथे तर सरकार धार्जिणेच लेखन वृत्तपत्रात प्रकाशित होते, लोकशाहीत तर विधिनिर्माण प्रक्रिया ही संपूर्णपणे लोकमतावरच आधारित असते. विधिमंडळात लोकमताच्या सर्व छटा आविष्कृत होतात. वादविवाद व चर्चा घडतात व लोकमताचे वारे कोणत्या दिशेने वाहत आहे हे शासकांना समजते. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत जे लोकमत व्यक्त झाले त्यातून महाराष्ट्रातील लोकांना मुंबई ही राजधानी असलेले मराठी भाषीकांचे राज्य पाहिजे होते हे स्पष्ट झाले. शासकीय धोरणांच्या बाबतीत वर्तमानपत्रांची भूमिका ही दुटप्पी असते. इ स. 1953 पूर्वी भाषावार प्रांतरचनेबाबत जनमत विशेष जागृत नव्हते पण ' आंध्र प्रदेश ' या पहिल्या भाषाधिष्ठीत राजाच्या निर्मितीनंतर या प्रश्नावर जनमत खऱ्या अर्थाने जागृत झाले व त्यातून महाराष्ट्र व गुजरात राज्यांची निर्मिती झाली .वर्तमानपत्र हे लोकांना राजकिय दृष्टीकोनातून जागृत करतात तसेच सामाजिकदृष्ट्या लोकांना जागृत करण्याचे पण कार्य करतात. समाजातील अनिष्ट प्रथा, परंपरांबद्दल लोकांमध्ये लेखनाद्वारे जनजागरण करतात. सर्व संप्रदायातील लोकांना एकत्र आणून देशात एकात्मता प्रस्थापित करण्याच्या कार्यात वर्तमानपत्रांची भूमिका अत्यंत महत्वपूर्ण आहे. ते जन–भावनांचे प्रतिनिधीत्व करणारे असतात त्यामुळे लोकांच्या भावनांची अभिव्यक्ती वर्तमानपत्रांच्या माध्यमातूनच होते. रानडयांनी सामाजिक सुधारणांसाठी जनमत जागृत करण्यात वर्तमानपत्रांचा उपयोग केला होता व समाजात उच्च कोटीची मुल्य व आदर्श प्रस्थापित केली. स्त्रीयांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडून स्त्रीला जागृत करण्यात वर्तमानपत्रांची भुमिका अत्यतं महत्वपूर्ण आहे. त्याचाच परिणाम आजच्या काळातील स्त्रीया जागृत झालेल्या आहेत.

विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या या समस्येवर वर्तमानपत्रातून प्रकाश टाकून विदर्भातील शेतकऱ्यांच्या परिस्थिती कशी दैनिय आहे हे सरकारला दाखवून दिले. त्यांचे कर्ज माफ व्हावे यासाठी प्रयत्न केले. वेगळया विदर्भाच्या प्रश्नाला वृत्तपत्रातून वाचा फोडली. विदर्भातील जनतेवर कसे अन्याय होतात. सरकारी धोरण विदर्भाला कसे वाळीत टाकतात यावर लेख लिहून विदर्भातील जनमत जागृत केले.

जनलोकपाल विधेयका संबंधी अण्णा हजारे यांनी आपली भूमिका वर्तमानपत्रांच्या साहयाने मांडून सरकारला यावर विचार करण्यास भाग पाडले व भारतीय जनतेला जागृत करून भ्रष्टाचाराला आळा घातल्याशिवाय देशाचा विकास होणर नाही हे जनतेला दाखवून दिले.

दहशतवाद, भ्रष्टाचार, देशात चाललेले घोटाळे संसदेवरील अतिरेक्यांचे हल्ले, 26 – 11 चा ताज ओबेरॉय वरील हल्ला, कारगिल युद्ध, काश्मीरचा प्रश्न, नैसर्गिक आपत्ती, मुस्लीम महिलांच्या तिहेरी तलाक मुद्दांवर, कुलभुषण जाधव यांच्या बद्दल पाकच खोट धोरण, कोरेगाव भीमा येथील हिंसाचाराची घटना त्यावर सरकारच धोरणया सर्व प्रश्नात जनतेला खरी माहिती देवून त्यांचे मनोबल वाढविणे हे वृत्तपत्रांनी आपले सामाजिक कर्तव्य मानले. जनतेला आव्हान करून येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी मदतीचा हात मागितला. कारगिल युद्धाच्या वेळी, दहशतवादी हल्ल्यात सैनिकांना, बंदीना त्यांच्या घराची व घरच्यांचा संदेश त्यांच्यापर्यंत पोहोचविण्याची साहसी कार्ये वर्तमानपत्रांनी केले. म्हणूनच लोकमत घडविण्यात वर्तमानपत्रांची भमिका अत्यंत महत्वाची आहे.

निष्कर्ष :–

1 वर्तमानपत्र विचारांची देवाण – घेवाण करण्याच महत्वपूर्ण व योग्य माध्यम आहे.
2 वर्तमानपत्र अग्रलेख, बातम्या, समीक्षा, यांच्या द्वारे स्वस्थ जनमत जागृत करतात.
3 आर्थिक, सामाजिक, राजकिय, सांस्कृतिक विकासाकरिता योग्य दिशा दाखवितात.
4 राष्ट्राची सुरक्षितता, समाजात राष्ट्रीय एकता प्रस्थापित करण्यासाठी लोकांना / समाजाला प्रोत्साहित करतात.
5 वर्तमानपत्रांनी आपले कार्य निःपक्षपणे, निर्भिडपणे केले तर सरकार मधील भ्रष्टाचारावर त्यांना अंकुश ठेवता येतो.
6 सामाजिक सुधारणा, जनजागृती, लोकशिक्षण, यात वर्तमानपत्रांची भुमिका अत्यंत मोलाची असते. ते प्रबोधनाचे एक महत्वपूर्ण साधन आहे.
7 वर्तमानपत्र समाज घडविण्याचे कार्य करतात.
8 उच्चमुल्य, आदर्श प्रस्थापित करतात.

पण वर्तमानपत्रांना आपली भूमिका मांडतांना विचारांचे पूर्ण स्वतंत्र असायला पाहिजे. त्यांच्यावर कोणाचेही दडपण असता कामा नये. स्वातंत्र्यपूर्वीच्या काळात वर्तमानपत्रांची भुमिका ही प्रामुख्याने सामाजिक विचार परिवर्तनाची व राजकिय स्वातंत्र्यसंग्रामाची होती. पण आधुनिक काळात ही भुमिका बदललेली दिसते. कारण स्वातंत्र्या नंतर समाजकारण , राजकारण, अर्थकारण यात बदल झाला. त्यामुळे वर्तमानपत्रांनी समाजजीवनाकडे नव्या दृष्टीने पहायला सुरवात केली. पण आजही त्यांनी आपल समाजपरिवर्तनाच, लोक शिक्षणाच कार्य सोडलेले नाही. पण आज वर्तमानपत्रांवर राजकिय पक्ष, शासनाचा दबाव असल्यामुळे त्याच्या ध्येयात व भूमिकेत बदल झाला आहे. आज अनेक वर्तमानपत्र राजकीय पक्षांशी संबंधीत असल्यामुळे त्या पक्षाला पोषक अशीच विचारधारा वर्तमानपत्रातून मांडतात. इतर विचारधारांबद्दल त्यांचा संकुचित दृष्टीकोन दिसुन येतो. पण खरतर वर्तमानपत्रांनी आपल कार्य निःपक्ष व निर्भिडपणेच केले पाहिजे. कोणाच्याही दबावात राहून कार्य करू नये. कारण ते समाजाचा आरसा असतात. लोकमत घडविण्यात वर्तमानपत्रांची भुमिका ही सकारात्मकच असायला पाहिजे. तरच ते देशाला, समाजाला योग्य दिशेने नेवू शकतील. वर्तमान पत्रांनी बातमी सत्य परिस्थितीवर व वास्तविकतेला धरूनच दिली पाहिजे. लोकांच्या भावनांचा विचार करूनच संवाद साधला पाहिजे. मला अस वाटत की आपल्या देशात लोकशाही असल्यामुळे लोकमत घडविण्यात वर्तमानपत्रांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. वर्तमानपत्र जनसामान्यांच्या अभिव्यक्तीचे महत्वाचे माध्यम असल्यामुळे त्यांनी अगदी स्वतंत्र, निर्भिड व निःपक्षपणे आपली भूमिका मांडली पाहिजे. वर्तमानपत्र ही लोकशाहिकरिता ज्योतिस्तभाचे कार्य करतात म्हणूनच निःपक्ष , स्वतंत्र, न्यायपूर्ण पत्रकारिता ही कोणत्याही देशाकरिता सर्वात मोठे वरदान आहे. आज मुद्रणकलेतील क्रांतीमुळे, इलेक्ट्रॉनिक मिडियामुळे वर्तमानपत्रांच्या स्वरूपात, भुमिकेत बदल होत आहे. पण 21 व्या शतकात पण त्यांचे लोकशिक्षणाचे, जनजागृतीचे कार्य संपलेले नाही. हे कार्य त्यांना निरंतर करावयाचे आहे म्हणून त्यांनी कोणत्याही प्रलोभनांना बळी न पडता आपले समाजप्रबोधनाचे उद्दीष्ट पूर्ण केले पाहिजे. लोकमत घडविण्यात वर्तमानपत्राची भूमिका ही सकारात्मक असायला पाहिजे म्हणजेच योग्य जनमत तयार होईल. म्हणूनच अस म्हणता येईल की वर्तमानपत्र ही एक महान न्यायालय आहे जीथे सर्व समस्या ऐकल्या जातात व सर्व गोष्टींवर खुली व निःपक्षपातीपणे चर्चा केली जाते व त्यातून नवा मार्ग काढल्या जातो. त्यासाठी आज लोकांनी जागृत व्हायला पाहिजे व आपले समर्थन सत्य गोष्टींना दिले पाहिजे. तरच लोकमत घडविण्यात वर्तमानपत्र यशस्वी होऊ शकतील.

संदर्भ ग्रंथ सुची

क्र.	पुस्तकाचे नाव	लेखक	प्रकाशक
1	राजकिय सिद्धांत आणि राजकिय विश्लेषण	डॉ. दिवाण चंद्रशेखर	विद्या प्रकाशन नागपूर द्वितीय आवृत्ती 1989
2	राजनितीशास्त्र मार्गदर्शिका	प्रा. सत्यकेतू	भाग्यश्री प्रकाशन नागपूर
3	पत्रकारिता और समाज	डॉ. गुप्ता यु. सी	अर्जुन पब्लिशिंग हाऊस पृ. क्र. 16, 22
4	युगप्रवर्तक बालशास्त्री जांभेकर काळ आणि कर्तृत्व	उपाध्ये नीला	श्री विद्या प्रकाशन 250, शनिवार पेठ, पुणे पृ. क्र. 73,74
5	राजकिय सिद्धांत आणि विश्लेषण	डॉ. भोळे भा. ल.	पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर पृ.क्र. 174, 175

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 4.374
UGC Approved Journal Sr. No.48455

ISSN No. 2394-8426
Mar – 2018
Issue–I, Volume–VII

शालेय पोषण आहार योजनेच्या अहमदनगर जिहयातील प्रथमिक शाळेतील विद्यार्थावर होणाऱ्या परिणामाचा चिकित्सक अभ्यास

नावः- श्रीमती सुजाता विक्रम सानप
राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय, जालना

सारांशः-

भारतीय संस्कृतीत आहाराला अत्यंत महत्तवाचे स्थान दिलेले आहे. जेवणाला सुरूवात करण्यापूर्वी वदनी कवल घेता नाम घ्या श्रीहरीचे. सहज हवन होते नाम घेता फुकाचे. जीवन करी जीवित्वा अन्न हे पुर्ण ब्रम्हा. उदरभवन नोहे जाणिजे यज्ञकर्म हा श्लोक म्हणतात. अनेक साधू संतानी आहाराबाबतच्या ओव्या लिहिलेल्या आहेत श्री ज्ञानेश्वर महाराजांनी आहाराबाबत पुढील ओव्या रचलेल्या आहेत

धरावा तैसा संगु । जेणे पोखवे सात्विक जागू ।
सत्व वृत्तीचा भागू । आहार घेणे ॥
ए-हावी तरी पाही । स्वभाव वृत्तीचा ठायी ॥
आहारावाचुणी नाही । बळी हेतू ॥

अन्न ही माणसाला परमेश्वराने दिलेली एक देणगी आहे आणि त्याची जाणीव राहण्यासाठी राहण्यासाठी जेवणास जेवण्यास सुरूवात करण्यासपुर्वी श्लोक म्हणण्याची प्रथा परंपरा आहे.

जीवनाच्या दृष्टिकोनातुन विचार केल्यास हवा. पाणी. अन्न असा गरजांचा वास्तविक क्रम लागतो. मा.त्र नेहमीच्या जीवनात अन्न, पाणी व नंतर हवा असा क्रम लागतो मापवाच्या प्राथमिक गरजातदेखील अन्नाला प्रथम महत्त्व दिले आहे अन्न ही माणसाची प्रमूख गरज आहे माणसाचे जीवन अन्नावर अवलंबून असते. योग्य आहारामुळे माणसात उत्साह आरोग्य, मानसिक स्वास्थ लाभते. आरोग्यसंपन्न जीवन जगण्यासाठी अन्न सेवन करावे. खाण्यासाठी जगणे हा दृष्ठीकोन नसावा. माणूस कशाप्रकराचे जीवन जगणार आहे हे आहारावरच आलंबुन असते. व्यक्तीचे आरोग्य आणि आहार याचा अतिशय निकट संबंध आहे.

अन्नः-;Food)

अन्न आणि पोषणाची संकल्पना जाणून घेण्यासाठी अन्न म्हणजे काय 1 हे अगोदर जाणून घेउ या. अगदी साधा सोप्या शब्दात आपण जे खातो त्याला 'अन्न ' म्हणतात,

आहारः-;Diet)

जे पदार्थ द्रव किंवा घण स्वरूपात मुखाद्वारे मापवाकडून सेवन केले जातात, ज्याचे पचन शोषण होउन मावनी शरीराच्या वाढीवर व आरोग्यावर परिणाम होतो अशा अन्नपदार्थांना मिळून आहार असे म्हणतात

प्राथमिक शिक्षण हे प्रत्येकाला मिळाले पाहिजे म्हणजेच प्रथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण केले पाहिजे. भारतामध्ये वाढत्या वयाच्या मूलांमध्ये कुपोषणाची समस्या आढळते याचां परिणाम प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकणासावर होत असल्यामूळे भारत सरकारने राष्ट्रीय शालेय पोषण आहार योजना सर्व राज्यांसाठी टप्याटप्याने कार्यान्वित केले आहे

महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनामधील एक महत्त्वाची योजना म्हणजे प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यासाठी सुरु करण्यात आलेली पोषण आहार योजना होय. विद्यार्थ्याचे शिक्षणात सातत्य राहावे व गळतीचे प्रमाण कमी राहावे या हेतूने शासनाने ही योजना राबविण्यात येत आहे

उद्दिष्टे :-

1) शालेय पोषण आहार योजणेमूळे विद्यार्थ्याच्या शैक्षणिक कार्यावर होणारा परिणाम अभ्यासणे.
2) शालेय पोषण आहार योजनेमुळे विद्यार्थ्याच्या शैक्षणिक गुणवत्तेवर होणारा परिणाम अभ्यासणे.
3) शालेय पोषण आहार योजनेमूळे विद्यार्थ्याच्या शैक्षणिक उपस्थितीवर होणारा परिणाम अभ्यासणे.

<u>संशोधनाची ग्रहितके</u>

(1) महाराष्ट्र शासनामार्फत सर्व शाळांमध्ये शालेय पोषण आहार योजना राबविली जात आहे.
(2) शालेय पोषण आहार योजनेमुळे शिक्षकांच्या उपस्थितीवर होणारा परिणाम अभ्यासणे.

<u>मर्यादा :-</u>

(1) संशोधन अहमदनगर जिहया पूरतेच मर्यादित आहे.

(1) सदरील संशोनधनासाठी प्राथमिक शाळेतील100 विद्यार्थीची निवड करण्यात आली मूलाखत व प्रश्नावली या तंत्राच्या साहयाने संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती जमा करण्यासाठी पोषण आहार योजनेत केद्रीय अनुदानाचा समावेश.

ष्शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत अनुज्ञेय ष्शाळांतील इयत्ता 1 ली ते 5वी च्या विद्यार्थ्यांना अन्न शिजवून देण्यासाठी राज्य ष्शासन प्रतिदिन प्रतिविद्यार्थ्यी रु- 0.50 या दराने अनुदान ऑगस्ट 2004 पर्यत उपलब्ध करुन देत होते तथापि केंद्र ष्शासनाकडील अर्धशासकीय पत्र क्र -11-1-2004 एम डी एम दिनांक 6-10-2004 अन्वये अन्न शिजवुन देण्यासाठी केंद्र शासनाने सप्टेबर 2004 पासून रु 1 प्रतिदिन प्रतिविद्यार्थ्यी अनुदान देण्याचा निर्णय पारित केला त्याप्रमाणे दिनांक 31-3-2005 च्या ष्शासन निर्यायान नमूद किल्याप्रमाणे अन्न शिजवून देण्यासाठी केद्र व राज्य शासनाकडून अनुक्रमे रु 1 आणि रु 0.50 पैसे प्रतिदिन प्रतिविद्यार्थ्यी असे एकूण रु 1.50 अनूदान दिले जात होते.

अन्न देण्यासाठी शिजविण्यात येणाऱ्या अन्नपदार्थामध्ये असलेल्या अन्नघटकांचा तक्ता

<u>(ब) मानधन</u>

(1) प्राथमिक शाळा स्तरावर शालेय पोषण आहार योजनेच्या आनुषगिक बाबीचे काम करणाऱ्या मुख्याध्यापक संबधित शिक्षक या दोघेपैंकी एकास प्रतिमध खलील दराने मानधन दिले जाते.

अ क्र.	पटसंख्या	प्रतिमध मानधन प्रमाण
(1)	500 पेक्षा जास्त	रुपये 200
(2)	500 पेक्षा कमी	रुपये 100

(2) विद्यार्थ्यांना स्वच्छतेच्या सवयी लावणे आरोग्यम सर्व साधनम

उत्तम आरोग्य हे उत्तम व यशस्वी जीवनाचा पाया असते. आरोग्य संपन्न व्यक्तीच्या अंगी अनेक गुण वास करत असतात. तसेच लहाणपणी लावलेल्या सवयी या कायमस्वरुपी राहतात. म्हणुनच शालेय जीवनातच मुलांना आरोग्यदायक सवयी लावणे ष्शक्य आहे न्यात पुढील सवयीचा समावेश करता येईल.

(1) रोज सकाळी उठल्याबरोबर सौचास जाणे
(2) रोज दात स्वच्छ घासणे
(3) रोज स्वच्छ अंघोळ करणे
(4) रोज स्वच्छ कपडे घालणे
(5) नियमितपणे तेल लावणे
(6) आठड्यातून एकदा हाताची व पायाची नखे काढणे
(7) रोज शाळेतून आल्यावर व खेळून आल्यावर हात-पाय स्वच्छ धुणे
(8) बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ न खाणे

<u>साहित्य आणि कार्यपध्दती</u>

अध्ययन क्षेत्रः-

हे अहमदनगर जिल्हयातील प्राथमिक शाळेतील शालेय पोषण आहारमुळे विद्यार्थीच्या अध्ययनावर विनरीत परिणामाचा चिक्तिसक अभ्यास हा अहमदनगर जिल्हयातपुरताच मर्यादित होता यासाठी प्राथमिक शाळेतील 100 विद्यार्थ्याची नमूना म्हणून निवड करण्यात आली.

नमूना निवड पध्दती :-

कोणत्याही विषयाचा अभ्यास करावयाचा असल्यास नमूना निवड करणे अत्यंत महत्त्वाचे असते. नमूना निवड पध्दतीत पुढील बाबींचा समावेश करण्यात आला.

(1) सोबत या अहमदनगर प्राथमिक शाळेतील 100 विद्यार्थी नमुना म्हणून निवडण्यात आले.
(2) ही माहिती जमा करण्यासाठी याद्रच्छीक नमुना निवड या पध्दतीचा वापर करण्यात आला
(3) ही माहिती प्रत्यक्षात विद्यार्थ्याकिडे जाउन समोर बसून भरुन घेतली आहे.

विद्यार्थीकडून प्राप्त माहितीचे विश्लेषण व अर्थनिद्रचन

संशोधन कर्त्यास असे अभिप्रेत आहे. की महाराष्ट्र शासनाची शालेय पोषण आहार योजना शाळेमध्ये ज्या विद्यार्थ्यासाठी राबविली जाते त्या विद्यार्थ्याच्या इच्छा अपेक्षाचा विचार यात करणे आवश्यक आहे. करीता जालना जिल्हयातील प्राथमिक ष्शाळेतील विद्यार्थ्याची शालेय पोषण आहार योजनेच्या प्रश्नावलीतील प्रश्न क्र 1 ते 4 विद्यार्थ्याची सामान्य माहिती मिळवण्यासाठी विचारण्यात आले होते. करिता संशोधन कर्त्याने खलील प्रमाणे प्रश्नांचा अंतर्भाव केला आहे.

तक्ता क्र. 1

विद्यार्थ्याच्या मते शाळेतून दिल्या जाणाऱ्या आहाराची गरज दर्शविणारा तक्ता.

अ.क्र	प्रतिसाद	टक्केवारी	
1	होय	65	
2	नाही	35	
	ऐकूण	100	

निष्कर्षः-

65 टक्के विद्यार्थ्याच्या मते शाळेतुन दिल्या जाणाऱ्या शालेय पोषण आहाराची गरज आहे शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत विद्यार्थ्याच्या मते कोणते पदार्थ असावेत हे दर्शविणारा **तक्ता.क्र.2**

अ क्र.	प्रतिसाद	टक्केवारी
1	खिचडी	8
2	दुध अंडी	4
3	फळ आहार	28
4	संपुर्ण जेवण;(चपाती -भाजी;)	60
	ऐकूण	100

निष्कर्षः- 60 टक्के विद्यार्थ्याच्या मते शाळेतुन दिल्या जाणाऱ्या आहारात संपूर्ण जेवणाचा (चपाती-भाजी) समावेश नाही.

तक्ता क्र 3

विद्यार्थ्याच्या मते शाळेतून दिल्या जाणाऱ्या पोषण आहाराची गरज नाही याचे कारण दर्शविणारा तक्ता

अ. क्र.	प्रतिसाद	टक्केवारी
1	घेउन जेवून येत असल्याने	44
2	पालक आहार घेण्यास मनाई करित असल्याने	56
	ऐकुण	100

निष्कर्षः- 56 टक्के विद्यार्थ्याच्या मते पालक आहार घेण्यास मनाई करत असल्याने शाळेतून दिल्या जाणारा शालेय पाषण आहाराची गरज नाही.

तक्ता क्र.4
विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारातर्गत दिल्या जाणाऱ्या आहाराचा दर्जा दर्शविणारा तक्ता.

अ.क्र.	प्रतिसाद	टक्केवारी
1	उतकृष्ट	05
2	चांगला	10
3	सर्वसाधारण	25
4	निकृष्ट	40
	एकूण	100

निष्कर्ष :-
बहुसंख्य विद्यार्थ्यांच्या मते शालेतून दिल्या जाणाऱ्या आहाराचा दर्जा निकृष्ट आहे.

तक्ता क्र.5
विद्यार्थ्यांना दररोज आहार दिला जातो की, नाही यांची माहिती दर्शविणारा तक्ता.

अ.क्र.	प्रतिसाद	टक्केवारी
1	होय	45
2	नाही	55
3	एकूण	100

तक्ता.क्र.6
उत्तर नही असल्यास त्याचे कारण काय आहे.
विद्यार्थी दररोज पोषण आहार न देण्याचे कारण दर्शविणारा तक्ता

अ.क्र.	प्रतिसाद	टक्केवारी
1	होय	45
2	नही	55
3	एकूण	100

तक्ता क्र.7
उत्तर नाही असल्यास त्याचे कारण काय आहे.

अ.क्र.	प्रतिसाद	टक्केवारी
1	शाळेला सुटटी असल्याने	75
2	अर्धवेळ शाळा असल्यास	25
3	एकूण	100

निषर्ष्कर्ष :-
75 टक्के विद्यार्थ्यांच्या मतेशाळेला सुटटी असल्याने आहार दिला जात नही.

तक्ता क्र.8
विद्यार्थ्यांना पालक अआहार खाउ देतात किंवा नाही हे दर्शविणारा तक्ता.

अ.क्र.	प्रतिसाद	टक्केवारी
1	होय	85
2	नाही	15
3	एकूण	100

निषर्ष्कर्ष :- 85 टक्के विद्यार्थ्यांचे पालक शाळेतील आहार खाण्यासाठी मनाई करतात.

विद्यार्थ्यांना पालक पोषण आहार खाउ न देण्याचे कारण दर्शविणारा तक्ता.

तक्ता. 9

विद्यार्थ्यांना पालक पोषण आहार खाउ न देण्याचे कारण दर्शविणारा तक्ता.

अ.क्र.	प्रतिसाद	टक्केवारी
1	होय	95
2	नाही	05
3	एकूण	100

निषर्ष्क :–

95 टक्के विद्यार्थ्यांच्या मते शाळेततील आहार वेळेवर मिळत नाही.

तक्ता.10

शाळेतील दिला जाणारा आहार वेळेवर न मिळाल्यास विद्यार्थी काय करतात हे दर्शविणारा तक्ता.

अ.क्र.	प्रतिसाद	टक्केवारी
1	जेवण करत नाही	03
2	दुस–यांच्या डब्बातील जेवण	12
3	शिक्षकांना सांगतो	30
4	जेवण मिळण्याचे वाट पाहणे	55
	एकूण	100

निषर्ष्क :–

55 टक्के विद्यार्थ्यांच्या मते शालेय पोषण आहार केव्हा मिळतो याची वाट पाहतो.

संदर्भ सुची :–

1) आगलावे प्रदिप – संशोधन पध्दती शास्त्र व तंत्र विद्या प्रकाशन नागपुर, प्रथम आवृत्ती
2) बन्सी बिहारी पंडीत – शिक्षणातील संशोधन (संकल्पणात्मक परिचय) नुतन प्रकाशन प्रकाशन पुणे
3) बेस्ट जे डब्लू 1998 रिसर्च इन एज्युकेशन नवी दिल्ली सातवी आवृत्ती.
4) बेलिंग हॉम जॉन – 1997 डिक्शनरी ऑफ एज्युकेशन ऑक्यडमीक इंडीया पब्लीश नवी दिल्ली.
5) ब्रु– बेकर जॉन अनुवादक– म.बा. कुडले 2001 शैक्षणिक संमस्यांचा इतिहास.महाराष्ट्र विद्यापिठ ग्रंथ निर्मिती मंडळ
6) दांडेकर बा.ना शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र श्रीविद्या प्रकाशन शनिवार पेठ पुणे.

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 4.374
UGC Approved Journal Sr. No.48455

ISSN No. 2394-8426
Mar – 2018
Issue–I, Volume–VII

वस्तु व सेवा कर २०१७

Goods and Service Tax 2017

डॉ. सपना आर. वेगीनवार
वाणिज्य विभाग
सरदार पटेल महाविद्यालय चंद्रपूर
dr.srweginwar@gmail.com

वस्तु व सेवा कर भारतातील अप्रत्यक्ष कराच्या क्षेत्रातील सुधारणांचे लक्षणीय पाऊल आहे. केंद्र व राज्य सरकारच्या अनेक करांचे एकत्रीकरणामुळे दुहेरी कर आकारणीचा होणारा दुष्परीणाम कमी होऊन संपुर्ण देशभरात एकत्रीत कर पध्दतीचा मार्ग मोकळा झाला आहे.

वस्तु व सेवा कराची संकल्पना पहिल्यांदा तत्कालीन केंद्रिय वित्तमंत्री मा. पी. चिदंबरम यांनी त्यांचा सन २००६–२००७ च्या संकल्पीय भाषणात मांडली. वस्तु व सेवा कराबाबतच्या विविध पैलुबाबत विचा करण्या करीता केंद्र व राज्य सरकारच्या प्रतिनिधींच्या संयुक्त कार्य गट स्थापन करण्यात आला व अहवाल तयार करण्यात आला. वस्तुवरील कर सेवांवरील कर व आंतरराज्यीय पुरवठयावरील कर या अहवालावर आधारीत २००९ मध्ये प्रथम चर्चा पत्रीका प्रसिध्द केली गेली. त्यांच्या जोडीला राज्याच्या अर्थमंत्र्याची एक समिती नेमून विचारविनीमय करण्यात आले. २०११ ला विधेयक प्रथम मांडण्यात आला. संसदीय स्थायी समितीकडे पाठविण्यात आला. २०१३ संसदिय समितीचा अहवाल आला. २०१४ मध्ये नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले व त्यांनी या विधेयकाला राष्ट्रहिताचा सांगुण त्यांचा पाठपुरावा केला. २०१५ मध्ये भाजपा सरकारचे लोकसभेतील संख्या जास्त असल्यामुळे तो संमत करण्यात आला तत्कालीन केंद्रीय वित्तमंत्री मा. अरूण जेटलीच्या कार्यकालात तो संमत करण्यात आला.

वस्तु व सेवा कर (GST) ची अंमलबजावणी १ जुलै २०१७ पासून केली गेली आहे. त्यामुळे केंद्राच्या ७ तर राज्य सरकारच्या ११ प्रकारच्या करांची जागा GST घेईल. सध्या केंद्र व राज्य अशा दोन्ही सरकारतर्फे कर वसुली केली जाते. केंद्र सरकारचा सेंट्रल जीएसटी (GST) राज्याचा स्टेट जीएसटी (SGST) अशा दोन कराखेरीज एका राज्यातुन दुसऱ्या राज्यात मालाची विक्री करणाऱ्यांसाठी इंटिग्रेटेड जीएसटी (IGST) व संघराज्यातील (UTGST) अशा प्रकारे करांची वसुली केली जाणार आहे.

CGST : केंद्रीय वस्तु व सेवा कर विधेयक २०१७
IGST : एकीकृत वस्तु व सेवा कर विधेयक २०१७
UTGST : संघराज्य क्षेत्र वस्तु व सेवाकर विधेयक २०१७
GST : राज्यांना नुकसान भरपाई विधेयक २०१७

या वस्तु व सेवा कर कायद्यामध्ये केंद्रीय आणि राज्यांच्या कायदे विलीन झाले आहेत त्यापैकी

१. केंद्रिय अबकारी शुल्क (Central Excise Duty)
२. अतिरीक्त अबकारी शुल्क
३. सेवाकर
४. अतिरीक्त आयात शुल्क म्हणजेच काऊंटर व्हेलिंग डयुटी
५. विशेष अतिरीक्त आयात शुल्क

राज्यपातळीवरील विलीन झालेले कायदे

१. व्हॅट (विक्रीकर)
२. करमणूक दर केंद्रीय विक्रीकर
३. ऑक्ट्राय आणि प्रवेशकर

४. खरेदीकर
५. सुखसोयी विषयक कर
६. लॉटरी, सट्टा आणि जुगारावरचे कर

उद्देश :–

१. वस्तु व सेवा कर कायद्याचा मुख्य उद्देश सर्व देशभरात एकत्रीत करप्रणाली आणने.
२. कर भरण्याच्या आकारण्याच्या पध्दतीत सहजता व सुलभता आणने.
३. देशभरात जीएसजीच्या नोंदणीपासून तर कर भरण्यापर्यंतचे जीएसटीशी संबंधीत इतरही कार्य करण्यासाठी संगणक प्रणाली विकसीत करणे.

वस्तु व सेवा कराची ठळक वैशिष्टये :–

१. सध्या अस्तित्वात असलेल्या उत्पादित माल आणि त्याची विक्री व पूरविण्यात येणाऱ्या सेवा यावरील कर या संकल्पने एवजी मालाच्या आणि सेवांच्या पुरवठयावर कर लागू करणे अशी पध्दती वस्तू व सेवा कराखाली अवलंबविण्यात येणार आहे.
२. वस्तु व सेवा कर हा दुहेरी म्हणजे केंद्र आणि राज्यात एकाच वेळी समान कराच्या आधारे अवलंबिला जाणार आहे.
३. तंबाखू(मादक पदार्थाची उत्पादने वस्तु व सेवा कराच्या अधिन राहतील तसेच केंद्र सरकार या उत्पादनावार केंद्रीय अबकारी कर हा लावू शकेल.
४. या करपध्दतीच्या अमलबजाबणीची संपूर्ण यंत्रणा ही ऑनलाईन असेल.
५. महिती तंत्रज्ञानाची पायाभूत यंत्रणा म्हणून वस्तू व सेवा कर नेटवर्क (GSTN) ची स्थापना करण्यात आलेली आहे. याव्दारे कर ऑनलाईन भरले जाईल.
६. (एच एस एन) संज्ञासूचीची स्थरमेळ पध्दती वस्तूंचे वर्गिकरण करण्यासाठी वस्तू व सेवा कर प्रणालीमध्ये वापरले जाणार आहे. उदा. ज्या करदात्याची उलाढाल रू १५ कोटी पेक्ष जास्त परंतू ५ कोटीपेक्षा कमी असेल त्यांची २ अंकी कोड वापरावे आणि ज्या करदात्याची उलाढाल ५ कोटी आणि त्यावर असेल तर त्यांनी ४ अंकी कोड वापरावेत असे प्रमाणीत करण्यात आले आहे ज्या करदात्यांची उलाढाल रू १.५ कोटीपेक्षा कमी असेल त्यांच्या देयकामध्ये कोड देण्याची आवश्यकता नाही.
७. एकात्मीक वस्तु व सेवा कर आंतराज्यीय वस्तु व सेवांचा पूरवठयावर वस्तू व सेवा कर आकारला व गोळा केला जाईल.
८. वस्तू व सेवांची आयात ही आंतर राज्य पूरवठा म्हणून धरण्यात येईल आणि त्यावर एकात्मीक वस्तु व सेवा कर आकारण्यात येईल. सीमा शुल्कासहित एकात्मीक वस्तु व सेवा कराखाली भरलेल्या करांचा निविष्ट कराची जमा म्हणून पुढील पुरवठयासाठी कर भरणा करण्यासाठी उपयोग करता येईल.
९. करदात्याने कच्च्यामालावर भरलेल्या कराची जमा निविष्ट कराची जमा उत्पादन कर भरतांना वापरली तरी अनुज्ञेय असेल तसेच केंद्रिय वस्तू व सेवांवरील करामुळे असलेली निविष्ट कराच्या जमेचे उपाययोजन राज्य वस्तू व सेवांवरील कर भरविण्या करीता करण्यात येणार आहे. एकात्मिक कराची जमा मात्र केंद्रीय वस्तू व सेवा कर आणि वस्तू व सेवाच्या भरण्यासाठी उपायोजीत केला तरी चालेल.
१०. विद्यमान प्रचलित विविध करांसाठी नोंदणीकृत उद्योग किंवा व्यापारी संस्थांना वेगळी नोंदणी करण्याची आवश्यकता राहणार नाही त्यांची माहिती जी.एस.टी यंत्रणेत स्थलांतरीत करण्यात येणार आहे. नव्याने अर्ज करणा–यांना ऑनलाईन अर्ज करून स्वत:ची नोंदणी करावी लागेल.
११. निर्यातीस शुन्य दर पूरवठा म्हणून गणले जाईल, वस्तू व सेवांचा निर्यातीवर कर देय असणार नाही. परंतू सेवांच्याबाबत निवीष्ट कराची जमा अनुज्ञेय राहील आणि त्याबाबत ते परताव्याचा दावा करू शकतील.

वस्तु व सेवा कराचे महत्व :–

जीएसटी भारताच्या अप्रत्यक्ष कर सुधारणा क्षेत्रातील महत्वपुर्ण पाऊल आहे. केंद्र आणि राज्य शासनांच्या अनेक करांचे एकत्रीकरण फक्त एकेरी करात केल्याने आणि पुर्व टप्प्यावरील करांच्या समायोजनाला अनुमती दिल्याने वाढीव कराचा अहितकारक प्रभाव कमी होईल आणि समान राष्ट्रीय बाजारपेठ निर्माण करता येईल.

उपभोक्त्यांसाठी सर्वात मोठा फायदा म्हणजे उपभोग वस्तुंवरील सांप्रत २५टक्के ते ३०टक्के असलेल्या करांच्या ओझ्यात घट होईल जीएसटी मुळे राष्ट्रीय आणि आंतराष्ट्रीय बाजारपेठेतील स्पर्धेला समोरे जाण्यात आपली उत्पादने सक्षम होतील करदात्यांची व्याप्ती विस्तृत झाल्याने व्यापार वृध्दींगत झाल्याने व सुधारीत कर अनुपालन पध्दतीमुळे केंद्रशासन व राज्यशासनाच्या महसुलात वाढ होईल

वस्तु व सेवा कराचे फायदे :–

१. कर भरणे सरल होईल कर भरण्याच्या आकारण्याच्या पध्दतीत सहजता आणि सुलभता येईल.
२. देशाच्या जीडीपी मध्ये वाढ होईल व त्यामुळे देशाच्या विकास होईल.
३. कराची चोरी किंवा कर न भरणे कमी होईल.
४. सपुर्ण देशात सामान खरेदी करण्यासाठी एकच कर आणि एकच एक दराने कर द्यावा लागेल संपुर्ण देशात एकाच किंमतीला एक प्रकारचे सामान खरेदी करता येईल.
५. सगळे व्यवहार इलेक्ट्रॉनीक व संगणीकृत पध्दतीने ऑनलाईन होणार असल्यामुळे पारदर्शक व्यवहार जलद गतीने होईल.
६. जीएसटी अंतर्गत विविध प्रकारच्या वस्तुंचे वर्गिकरण सोपे आणि साधे वर्गीकरण केले आहे. त्यामुळे कर लावण्यासाठी कोणत्याही वस्तुंचे वादग्रस्त ठरणार नाही.
७. जीएसटी हा कर वस्तु आणि सेवा या दोन्हीवर लावला जाईल म्हणजे वस्तुवर वेगळे कर आणि सेवेवर वेगळे कर लावण्यात येणार नाही.
८. कर वाचविण्यासाठी कंपन्या आपली उत्पादने राज्यातल्या राज्यात विकत असत राज्याबाहेर उत्पादने विकल्याने केंद्रिय विक्रय कर आणि प्रवेश कर लागत असे कारण हे कर उत्पादनाच्या वेळेस किंवा ट्रेडिंगच्या वेळेला लावले जात नाही चांगली उत्पादने जी देशाच्या एका भागात मिळतात ती देशात सर्वत्र मिळायला लागतील त्यामुळे कंपन्याचे मार्केटही सर्वत्र वाढेल तसेच ग्राहकांना वस्तुंची निवड करायला अधिक पर्याय उपलब्ध होतील.
९. वस्तु व सेवा ज्यावेळेस एकत्र पूरवल्या जातात त्यासाठी एकच जीएसटी लावला जाईल म्हणजे वस्तुची विक्री की सेवा हा वाद मिटेल.
१०. रिटेल सेक्टरसाठी लिझ (Lease) रेंटल आणि इन्व्हेंटरी खर्च कमी होईल,
११. वेळोवेळी भरलेल्या जीएसटीसाठी सप्लाय चेन मधील घटकांना क्रेडीट देणे सोपे होईल.

मर्यादा :–

१. जीएसटी मध्ये जर एखादा व्यक्ती वेगवेगळया राज्यात व्यवसाय करीत असेल तर त्याला प्रत्येक राज्यात नोंदणी करावी लागते. जर एखादी कंपनी वेगवेगळया प्रकारचे व्यवसाय करीत असेल तर प्रत्येक व्यवसायासाठी वेगळी नोंदणी करावी लागते हा फार मोठा तोटा जीएसटीचा आहे.
२. जीएसटी कायद्यानुसार जर एखादी कंपनी आपल्या कोणत्याही शाखेला किंवा युनीटला माल किंवा सेवा पाठवत असेल तर त्यावरही कर द्यावा लागतो.
३. जीएसटी कायद्यानुसार सप्लायरने सरकारला टॅक्स नाही दिला तर या सेवेचा किंवा कच्च्या मालाचा उपयोग करणारा निर्माता टॅक्स क्रेडीटचा दावा करू शकणार नाही.
४. ई. बिल ची मर्यादा ५०,०००/– रू ची मर्यादा खूप कमी आहे ती वाढविण्याची गरज आहे.

५. जीएसटी वस्तू व सेवांवर लागतो पण समस्या अशी आहे की, वस्तू कोणाला म्हणायच आणि सेवा कुणाला म्हणायच? त्यातही काही उत्पादन वस्तू व सेवा यांचे संयुक्त रूप असते म्हणजेच त्यांना वेगळ करता येत नाही याबाबत लोकांमध्ये संभ्रम आहे.

६. संयुक्त कर योजनेअंतर्गत नोंदणीकृत व्यक्तीला इनपूट टॅक्स क्रेडीटसाठी दावा करता येत नाही.

निष्कर्ष :–

वस्तु व सेवा कर एक अप्रत्यक्ष कर कायदा आहे जीएसटी १९४७ नंतरचे सर्वात महत्वाचे करसुधारणा विधेयक म्हणून बघितले जाते ही भारताच्या कर संरचनेत सुधारणेची एक मोठी क्रांती आहे. वस्तू व सेवा यांच्या उपभोगावरील कर आहे यामध्ये निर्मीती किंवा उत्पादनापासून ते अंतिम उपभोगापर्यंत प्रत्येक टप्प्यावर कर आकारणी करण्याचे प्रस्तावित केले आहे मागील टप्प्यावर अदा केलेल्या कराची जमा रक्कम समायोजीत करता येईल केवळ वर्धित मुल्यावर कर आकारला जाईल आणि उपभोक्ता किंवा ग्राहकाला कराचे ओझे सहन करावे लागेल.

संदर्भ ग्रंथ :–

१. वस्तू व सेवा कर कायदा एक परीचय (साईज्योती प्रकाशन) प्रा. प्रविण कामये
प्रा. मेघना पाटील.
२. केंद्रिय उत्पादन व सीमा शुल्क मंडळ. www.cbec.gov.in

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 4.374
UGC Approved Journal Sr. No.48455
ISSN No. 2394-8426
Mar – 2018
Issue–I, Volume–VII

नियोजनाच्या अभावाने गडचिरोली जिल्हयात अनुसूचित जाती उपयोजनेला अपेक्षित यश नाही

प्रा. डॉ. दिलीप बारसागडे
सहाय्यक अधिव्याख्याता (वरिष्ठ श्रेणी)
फुले –आंबेडकर कॉलेज ऑफ सोशलवर्क, गडचिरोली

प्रस्तावना

विशेष घटक योजनेची संकल्पना अनुसूचित जातीच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक विकासासाठी व मुलभूत गरजांच्या पुर्ततेसाठी पहिल्यांदाच सन 1979 ला उदयास आली व प्रजासत्ताकानंतर तब्बल 5 पंचवार्षीक योजना लोटल्यानंतर 1980–85 च्या 6 व्या पचवार्षीक योजनेपासून ही योजना सुरू झाली. अनुसूचित जाती च्या विकासावर भर देणारी ही पहिली योजना आहे. यापूर्वी मात्र यासंदर्भात फारसा गांर्भीयाने विचार झाल्याचे दिसून येत नाही. अनुसूचित जाती उपयोजनेतंर्गत दलित वस्ती सुधारणा योजना ही प्रमूख योजना असुन या बाबीसाठी उपयोजनेत सर्वाधिक तरतुद केलेली असते, मात्र या योजनेसाठी केलेली प्रचंड तरतुद व अजुनही बंकाल अवस्थेत असलेल्या दलित वस्त्या यातील विसंगती पाहून एवढा मोठा खर्च कुठे गेला हाच प्रश्न पडतो. अनुसुचित जाती उपयोजनेचे संदर्भात मार्गदर्शक तत्वे नियोजन आयोगाने 2006 जा जारी केले आहे. जाधव टास्कफोर्स ने काही सुचना केल्या आहेत. योजनाची अंमलबजावणी संनियत्रण व मुल्यमापन इत्यादी साठी तालुका/जिल्हा/विभाग/ राज्य स्तरावर समित्या नेमण्याचे निर्देश आहेत. अशा अनेक उपयुक्त सुचना नियोजन आयोगाने केल्या असल्या तरी, त्याचा पुरेपूर अंमल होत नसल्याचे चित्र सगळीकडे आहे.

अनुसूचित जाती उपयोजना स्वरूप व व्याप्ती

भारताच्या संविधानातील अनुच्छेद 46 अन्वये "राज्य हे दुर्बलतर जनवर्ग आणि विशेषतः अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती यांचे विशेष काळजीपुर्वक शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन करील आणि सामाजिक अन्याय आणि सर्व प्रकारचे शोषण यापासुन त्याचे संरक्षण करील" अशी स्पष्ट तरतुद आहे. भारतीय संविधानाने अनु–38 अन्वये असे नितिनिर्देश दिले की, "ज्या समाजव्यवस्थेमध्ये सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय हा राष्ट्रीय जीवनाच्या सर्व संस्थांना प्राणभूत होईल अशी समाजव्यवस्था निर्माण हाईल तितक्या परिणामकारक रितीने प्राप्त करून देउन व तिचे संरक्षण करून लोककल्याणाचे संवर्धन करण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील". संविधानाच्या मार्गदर्शक तत्वांचे अनुपालन करण्यासाठी व भारतातील कोटयावधी अनुसूचित जातींच्या विकासासाठी भारत सरकारने विशेष घटक योजना कार्यान्वित केली. याच योजनेला अनुसूचित जाती उप–योजना असे म्हणतात.

विशेष घटक योजनेची संकल्पना अनुसूचित जातीच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक विकासासाठी व मुलभूत गरजांच्या पुर्ततेसाठी पहिल्यांदाच सन 1979 ला उदयास आली व प्रजासत्ताकानंतर तब्बल 5 पंचवार्षीक योजना लोटल्यानंतर 1980–85 च्या 6 व्या पचवार्षीक योजनेपासून ही योजना सुरू झाली. अनुसूचित जाती च्या विकासावर भर देणारी ही पहिली योजना आहे. यापूर्वी मात्र यासंदर्भात फारसा गांर्भीयाने विचार झाल्याचे दिसून येत नाही.

अनुसूचित जातीच्या विकासावर भर का? याचे उत्तर म्हणजे नियोजन आयोग म्हणतो, "संविधानात्मक दिशानिर्देश व विविध कायदे तसेच, शासनाव्दारा कार्यात्मक उपाय–योजना करून सुध्दा 6 व्या पंचवार्षीक

योजनेपर्यंत अनुसूचित जातीच्या स्थितीत सुधारणा घडून आली नाही. त्याचे प्रमुख कारण म्हणजे आर्थिक सहाय्याचा अभाव होय."

विशेष घटक योजना ही पंचवार्षीक योजनेची व वार्षिक योजनेची उप–योजना आहे. या योजनेचा मुख्य उद्देश अनुसूचित जाती च्या आर्थिक विकासासाठी रोजगार निर्मिती व उत्पन्न वाढीची साधने उपलब्ध करून देउन दारिद्रय निर्मुलन करणे असे आहे. केंद्र सरकार/राज्य सरकार व केंद्रशासीत प्रदेशांव्दारा या योजनेची अंमलबजावणी करण्यात येते. अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात तरतुद उपलब्ध करून देउन त्यांना वैयक्तिक व कौटूंबिक थेट लाभ देणारी ही योजना आहे. दलित वस्त्यांच्या विकास करणे जसे मुलभूत सुविधा, पिण्याचे पाणी, पोषक आहार, आरोग्य, घर बांधणी, नाला–रस्ते बांधणी, विद्युतीकरण, समाज मंदिर इ. विकासात्मक कामे या योजनेतून केली जातात. तसेच, शेती व शेतीशी निगडीत विकास कार्यक्रम जसे पशुसंवर्धन, दुग्ध विकास व्यावसायिक प्रशिक्षण इ. योजनेच्या माध्यमातुन अनुसूचित जाती च्या लोकांना जीवननिर्वाहाची साधने उपलब्ध करून देणे याबाबत योजनेअंतर्गत तरतुद केली जाते.

अनुसूचित जातींच्या लोकांचे मानव विकास करण्याचे लक्ष्य असणारी ही योजना असुन, सन 2005–06 मध्ये विशेष घटक योजना हे नाव बदलुन अनुसूचित जाती उप–योजना (Scheduled Caste Sub-Plan) असे नामकरण करण्यात आले. संविधानाच्या मार्गदर्शक तत्वानुसार सर्व प्रकारचे शोषण आणि अन्यायाचे संदर्भात भौतिक व आर्थिक सुरक्षेची तरतुद करणे हे या योजनेचे महत्वपुर्ण कार्य आहे. अनुसूचित जाती उप–योजना महाराष्ट्र राज्यात सन 1980–81 पासून सुरू झाली. आणि 1996 ला नियोजन विभागाकडून सामाजिक न्याय विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आली. सामाजिक न्याय विभाग या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी नोडल एजन्सी म्हणून कार्य करतो आहे.

योजनेच्या अंमलबजावणीसाठी नियोजन आयोगाने व शासनाने स्पष्ट मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या आहेत. मात्र त्याची अंमलबजावणी कशी होते. हा महत्वाचा प्रश्न आहे. अनुसूचित जातीच्या लोकांना वैयक्तिक, कौटूंबिक सामुहिक थेट लाभ देणारी ही योजना आहे. म्हणून अंमलबजावणी करतांना योजनेचा लाभ फक्त अनुसूचित जातीच्याच लोकांना होईल याची विशेष काळजी घेण्यात यावी. असे स्पष्ट निर्देश आहेत. ज्या योजनेंमध्ये अनुसूचित जातीचा सहभाग नाही अशा योजना जसे रोजगार हमी योजना, मोठे व मध्यम सिंचन प्रकल्प सामान्य आर्थिक सेवा याचा समावेश अनुसूचित जाती उप–योजनेत करू नये. हे सुध्दा स्पष्ट करण्यात आले. अनुसूचित जाती उप–योजनेत चा विधी वळता न होणारा आहे. हे आपण ध्यानात घेणे गरजेचे आहे. दि. 27 जून 2005 ला झालेल्या 51 व्या राष्ट्रिय विकास परिषदेत मा. पंतप्रधान महोदयांनी येत्या 10 वर्षात अनुसूचित जातीच्या आर्थिक व सामाजिक स्थितीतील उणीवा दुर करण्यावर मुख्य भर दिला.

<u>महाराष्ट्र राज्यात अनुसूचित जाती उप–योजनेची सद्यस्थिती</u>

केंद्रशासनानुसार सन 1989 पासून सदरची योजना विशेष घटक योजना म्हणून राज्य शासनामार्फत राबविण्यात येवू लागली, महाराष्ट्र शासनाने सन 1980–81 पासून ही योजना अमलात आणली. या योजनेचा मुख्य उद्देश अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांची शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक सर्वागीण उन्नती साधणे.

प्रमुख वैशिष्टये

- राज्याच्या अर्थसंकल्पात अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आर्थिक तरतुदीची उपलब्धी.

- लाभार्थ्यांसाठी वैयक्तिक लाभाच्या योजनांच्या माध्यमातुन त्यांना आर्थिक स्थैर्य प्राप्त करून देण.
- दलित वस्त्यांमध्ये पायाभुत सुविधा उदा. पिण्याचे पाणी, जोड रस्ते, गृहनिर्माण इ. सुविधा उपलब्ध करून देणे.
- शैक्षणिक आणि सामाजिक विकासाच्या सुविधा उपलब्ध करून देणे, उदा. प्राथमिक शिक्षण, प्राथमिक आरोग्यकेंद्राची स्थापना, व्यावसायिक शिक्षण सार्वजनिक सांस्कृतिक सभागृहे आणि स्त्रियांसाठी कामकाजाचे ठिकाणी निवारा इ.

महाराष्ट्र राज्यात अनुसूचित जाती उप–योजनेअंतर्गत जिल्हा व राज्य स्तरावर दिडशे चे वर योजना आहेत. जिल्हास्तरीय योजना, जिल्हा नियोजना समितीमार्फत तर राज्यस्तरीय योजना सामाजिक न्याय विभागामार्फत कार्यान्वीत केल्या जातात. मात्र SCSP च्या अंमलबजावणीची संपूर्ण जबाबदारी विभागाकडेच आहे. राज्यातील अनुसूचित जाती उपयोजनेकडे डोळसपणे पाहिल्यास असे दिसुन येते की, सन 2010–11 मध्ये राज्याचा एकुण नियतव्यय 37,916 कोटी रू. होता. त्यापैकी अनुसूचित जाती उप–योजनेसाठी 3,867 कोटी म्हणजेच 10.20 टक्के एवढा जरी असला तरी जिल्हा आणि राज्य पातळीवर त्याचे वाटप असमतोल असल्याचे दिसुन येते. जिल्हयाच्या नियतव्यय 650 कोटी म्हणजेच 16.81 टक्के तर, राज्यपातळवरील नियतव्यय 3,217 कोटी म्हणजेच 83.19 टक्के होता. वर्ष 2011–12 चा एकूण नियतव्यय 41,500 कोटी व SCSP चा नियतव्यय 4,233 कोटी त्यापैकी जिल्हास्तरीय योजनेसाठी 802 कोटी (18.95 टक्के) तर राज्यस्तरीय योजनेसाठी 3,431 कोटी (81.05 टक्के) ची तरतुदी करण्यात आली. वर्ष 2008–09 पुर्वीची आकडेवारी पाहील्यास असे लक्षात येते की, जिल्हास्तरीय योजनांसाठी SCSP निधी वाटपाचे प्रमाण सर्वसाधारणपणे 50 टक्केचे वरच होते. मात्र 2009–10 पासुन जिल्हयासाठी अतिशय कमी निधी दिला जात आहे. जिल्हास्तरीय योजना व्यक्तीगत लाभाच्या असल्यामुळे जिल्हयात मोठया प्रमाणात निधी देण्याची आवश्यकता आहे. कारण त्यामुळे अधिक लाभार्थिना फायदा मिळण्याची संधी आहे. तेंव्हा निधी वाटपाचे प्रमाणे जिल्हा/राज्यस्तरावर किमान 50:50 टक्के असावे. हा मुद्दा तुर्त बाजुला ठेवला तर, नियतव्ययानुसार निधी उपलब्ध होतो कां व उपलब्ध झालेला निधी पुर्णपणे खर्च होतो? या बाबीचा सखोल अभ्यास केल्यास अनुसुचित जाती उपयोजनेच्या अंमलबजावणीचे वास्तव व खरे स्वरुप समोर येईल. ज्यांच्या साठी योजना आहेत. त्यांना योजनेची माहीती व त्यंचा सहभाग हा सुध्द SCSP अंमलबजाणीचा महत्वाचा मुद्दा ठरतो.

सहाव्या पंचवार्षिक योजनेपासुन SCSP योजना सुरु झाली. तरी इतक्या वर्षानंतरही या योजनेला लोकसंख्यानुसार निधी दिला जात नाही. व दिलेला निधी खर्च होत नाही ही वस्तुस्थिती लक्षात घेवुन सन 2010 मध्ये भारतीय आयोगाने अनुसुचित जाती उप–योजना/आदिवासी उप–योजनेच्या मार्गदर्शिकेचा आढावा घेवुन त्यांचे पुर्नपरिक्षण करुन त्यात करण्यासाठी जाधव आस्कफोर्स गठीत केला. त्यांनी अशी शिफारस केली आहे. की, "केंद्र शासनाच्या दारिद्रय निर्मुलन व वैयक्तीक लाभाच्याच्या योजना आहेत. जसे, योजना आहेत तसे महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना, इंदिरा आवास योजना, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन, स्वर्णजंयती शहरी रोजगार योजना या योजनासांठी अनुसुचित जाती उपयोजना/आदिवासी उप–योजनाअंतर्गत निधी उपलब्ध असावा व या निधीचा खर्च अनुसुचित जातीजमाती यांच्यावरच करण्यात यावा".

अनुसूचित जाती उपयोजना ही एकुण 9 गटात राबविली जाते त्यातील 4 गट गाभा क्षेत्रात (Core Group) येतात तर 5 गट बिगर –गाभा क्षेत्रात (Non Core Group) मध्ये येतात.

गाभा क्षेत्र (Core Group)–

1) कृषि व संलग्न सेवा
2) ग्राम विकास
3) सामाजिक व सामुहिक सेवा
4) सामान्य आर्थिक सेवा

बिगर गाभा क्षेत्र (Non Core Group)–

1) विद्युत विकास (उर्जा)
2) उद्योग व खाणकाम
3) परिवहन व दळणवळण
4) पाटबंधारे व पुरनियंत्रण
5) सामान्य सेवा

गडचिरोली जिल्हयात अनुसूचित जाती उपयोजनेची सद्यस्थिती

अनुसूचित जातीची जिल्हयातील लोकसंख्या लक्षात घेउन विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी कार्यालय संबंधीत जिल्हयासाठी अनुसूचित जाती उपयोजनेचा वार्षिक अर्थसंकल्प तयार करून तो मान्यतेसाठी जिल्हा नियोजन विकास समितीकडे पाठविण्यात येतो. राज्याचे सामाजिक न्याय मंत्रालय मंजुर नियतव्ययाप्रमाणे संबंधीत अंमलबजावणी यंत्रणेला निधी वितरीत करतात. 2015–2016 व 2016–2017 या 2 आर्थिक वर्षात गडचिरोली जिल्हयात अनुसूचित जाती उपयोजने अंतर्गत 52 कोटी 93 लक्ष 28 हजार रूपये खर्च झाले आहेत. त्याचे वर्षनिहाय विवरण खालील प्रमाणे आहे.

गडचिरोली जिल्हयात अनुसूचित जाती उपयोजने अंतर्गतझालेल्या खर्चाचे विवरण

अ. क्र.	विकासाचे मुख्य शिर्ष	झालेला खर्च ;आकडे लाखात दर्शविले आहेतद्ध	
		2015–16	2016–17
1	कृषि व संलग्न सेवा	335.01	335.01
2	ग्राम विकास	165.04	462.89
3	पाटबंधारे व पुरनियंत्रण	00.00	00.00
4	विद्युत विकास (उर्जा)	60.00	301.25
5	उद्योग व खाणकाम	17.00	19.50
6	परिवहन व दळणवळण	00.00	00.00
7	सामान्य आर्थिक सेवा	00.00	00.00
8	सामाजिक व सामुहिक सेवा	1766.00	1831.35
9	सामान्य सेवा	00.00	00.00
एकुण		2343.28	2950.00
2015–16 व 2016–17 या 2 वर्षातील रक्कम		52 कोटी 93 लक्ष 28 हजार रूपये	

विशेष जिल्हा समाजकल्याण त्यांचे या योजनेवर प्रत्यक्ष नियंत्रण नसते. संबंधीत अंमलबजावणी यंत्रणेला राज्य शासनाकडुन थेट निधी मिळाल्याने या योजनेअंतर्गत झालेल्या कामाचे मुल्यमापन करण्याची कोणतीही यंत्रणा जिल्हयात नसते. झालेला खर्चाचा अहवाल देणे अथवा पुरवणी मागणी करणे एवढया पुरताच समाजकल्याण विभागाचा संबंध येत असल्याने योजनेच्या अंमलबजावणीत उत्तरदायीत्वाची भावना कमी असल्याचे दिसते.

गडचिरोली जिल्हयाच्या 2015.16च्या अनुसूचित जाती उपयोजनेच्या आराखडयात पाणी पुरवठा व स्वच्छता विभागासाठी 1 कोटी 14 लक्ष 70 हजार रूपयांची तरतुद केली होती. मात्र मार्च अखेरपर्यत या विभागाला एकही रूपया उपलब्ध करून देण्यात आला नाही. यात अनुसूचित जातीच्या व्यक्तीना विहीरींची व बोअरवेलची उपलब्धता व नळाने पाणीपुरवठा करण्या सारख्या महत्वाच्या योजनांचा समावेश आहे. उद्योग व खाणकाम या बाबी अंतर्गत 17 लक्ष रूपये उपलब्ध करून देण्यात आले मात्र यातील 14 लक्ष रूपये उद्योजकता प्रशिक्षणावर खर्च झाले तर प्रत्यक्षात सुशिक्षित बेरोजगारांसाठी बिज भांडवल व छोटया उद्योगांसाठी कर्ज यासाठी केवळ 1 लक्ष 50 हजार रूपयांची तरतुद करण्यात आली. एवढया किरकोळ रक्कमेत गडचिरोली जिल्हयातील अनुसूचित जातीमध्ये उद्योग उभारण्यासाठी कोणती मदत शासन करू इच्छिते हाच प्रश्न पडतो.

2016.17 या आर्थिक वर्षासाठी अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत गडचिरोली जिल्हयाला 29 कोटी 50 हजार रूपयांचा नियतव्यय मंजूर केला आहे. ग्रामविकास या अनुसूचित जातीशी प्रत्यक्ष संबंध नसलेल्या बाबीवर मागील वर्षी 1 कोटी 42 लक्ष रूपये मंजूर होते. यावर्षी ते तब्बल 4 कोटी 62 लक्ष 89 हजार करण्यात आले आहेत. अनुसूचित जाती व नवबौध्द शेतकऱ्यांना दारिद्रयरेषेच्या वर आणण्यासाठी कृषी विभागाव्दारे राबविल्या जाणाऱ्या योजनांसाठी मागील वर्षी 3 कोटी 35 लक्ष 45 हजार रूपयांची तरतुद असलेल्या शिक्षण विभागाला यावेळी केवळ 9 लक्ष रूपये देण्यात आले आहेत. विविध प्रकारच्या शिष्यवृत्त्यांसह मागासवर्गीय कल्याणासाठी मागील वर्षी 13 कोटी 56 लाखांचा नियतव्यय मंजूर होता. यावर्षी मात्र या अतिशय महत्वाच्या बाबीवर 9 कोटी 52 लक्ष 22 हजार एवढाच निधी मंजूर केला आहे. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व लेखन साहित्य पुरविणे ही बाब यावर्षीच्या आराखडयात वगळण्यात आली आहे तर ग्रामीण भागातील दलीत वस्ती सुधारणा योजनेचा निधी मागीलवर्षीच्या तुलनेत 3 कोटी रूपयांनी कमी करण्यात आला आहे. शैक्षणिक संस्थांच्या पदाधिकाऱ्यांचे उखळ पांढरे करणारी क्रिडांगण व व्यायामशाळा अनुदान या योजनेसाठी यावर्षी 55 लक्ष रूपयांची भरीव तरतुद करण्यात आली आहे.

सारांश

महाराष्ट्र राज्यात 1981 पासून अनुसूचित जाती उपयोजना सुरू झाली. प्रारंभी ही योजना राज्याच्या नियोजन विभागाव्दारे राबविली जात होती. 1996 ला नियोजन विभागाकडून सामाजिक न्याय विभागाकडे ही योजना हस्तांतरीत झाली. आजमितीस सामाजिक न्याय विभाग हा या योजनेसाठी 'नोडल एजन्सी' म्हणुन काम करतो. या योजनेअंतर्गत विविध विभागांना देण्यात येणारा प्रचंड मोठया निधीवर या विभागाचे प्रत्यक्ष असे काहिच नियंत्रण नसते. निधीची उपलब्धता असुनही प्रामाणिक अंमलबजावणीचा अभाव व योजना राबविण्याचे शासनाचे सदोष धोरण यामुळे अनुसूचित जाती उपयोजना संविधानात्मक निती निर्देशांना पायदळी तुडवित असल्याचे निर्दशनास येते.

संदर्भ ग्रंथ सुची

इ. झेड. खोब्रागडे भा.प्र.से. : सामाजिक व आर्थीक न्यायासाठी अनुसूचित जाती उपयोजना

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग :वाटचाल सामाजिक न्यायाच्या दिशेने

आयुक्त : अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत समाजकल्याण महाराष्ट्र राज्य पूणे प्रस्तावित नियतव्य सन 2012–013 व पंचवार्षीक योजना 2012–017

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 4.374
UGC Approved Journal Sr. No.48455

ISSN No. 2394-8426
Mar – 2018
Issue–I, Volume–VII

प्रादेशिक नियोजनाचे आयाम

प्रा. राजेश एस. डोंगरे
गुरुकुल कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नांदा
ता. कोरपना, जि. चंद्रपुर

गोषवारा :–

भारतात नियोजनाच्या प्रारंभापासुनच मागासलेल्या प्रदेशांचे महत्व मान्य केले असले तरी त्या दिशेने झालेली प्रगती प्रत्यक्षात फारशी नव्हती अभ्यासकांच्या निष्कर्षानुसार तर मागील तिन दशकात भारतातील प्रादेशीक विषमता वाढतच गेली. याचाच अर्थ राजकीय पातळीवरुन केले जाणारे श्रेत्रीय स्वरुपाचे नियोजन हे प्रादेशिक विषमता कमी करण्यास तसेच छोट्या प्रदेशातील लोकापर्यंत पोहचण्यास अपुरे पडले आहे. यातुनच तळागळातुन नियोजनाची संकल्पना पुढे आली. त्याला Grass Root Planning असे म्हटले जाते. या अंतर्गत डोंगरी विभाग, दुष्काळी विभाग,आदिवासी विभाग अशा प्रदेशांच्या विकासासाठी खास कार्यक्रम अमलात आणले गेले. परंतु असे कार्यक्रम देखील खास समस्या असलेल्या काही प्रदेशापुरते मर्यादित होते. व्यापक स्वरुपावर प्रादेशिक नियोजनाच्या तत्वाचा स्विकार व त्याची अमलबजावणी ही अलीकडे स्विकारण्यात आलेल्या '' जिल्हा नियोजन'' या संकल्पनेत आढळते.

प्रस्तावना :–

प्रदेश हि संकल्पना कोणत्याही देशाच्या एका विशिष्ट भौगोलीक क्षेत्राचा विचार करुन केलेली संकल्पना होय. एकाच देशातील विविध भौगोलीक क्षेत्राची परिस्थीती काही सारखी नसते काही भाग मागासलेला, काही भाग मध्यम तर काही भाग बराच सुधारलेला असतो. यात समातोल साधने हाच प्रादेशिक नियोजनाचा मुख्य उद्देश होय. एका प्रदेशातील विविध विभागात बरीच तफावत असते मराठी मध्ये एक म्हण आहे की बारा कोसावर भाषा बदलते, भाषा एकच असली तरी त्या भाषेचा टोन, शब्द, हेल यामुळे त्या भाषेचे सौदर्य बदलते. याच प्रमाणे खानपान,राहणीमाणाच्या सवयी, रुढी परंपरा या सर्वामुळेच विविधता निर्माण झालेली असते. याकरीताच एका प्रदेशातुनही विभागवार नियोजन आवश्यक असते. याकरीताच त्या–त्या पातळीवर जिल्हा नियोजन,तालुका नियोजन,पंचायत समिती स्तरावर ग्रामपंचायत वगैरे असे प्रादेशीक नियोजनाला देखील विविध भागात वर्गीकृत केले जाते आणि त्या–त्या स्तरावर विकासाच्या योजना आखल्या जातात. एखादा प्रदेश मागासलेला आहे असे संबोधुन त्याला विकसीत प्रदेशाच्या बरोबर आनण्यापुर्वी एकाच प्रदेशातील विविध भागांनादेखील समपातळीवर आणणे गरजेचे असते. या करीताच प्रादेशिक नियोजनाला महत्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. या पार्श्वभुमीवर प्रादेशिक नियोजना करीता असलेली आवश्यक परिस्थिती हा महत्वाचा मुद्दा होय. प्रादेशिक नियोजन विशिष्ट परिस्थितीच्या संदर्भात केले तरच ते यशस्वी होईल. या करीताच प्रादेशीक नियोजनाला विविध आयाम निर्माण होतात.

बिज शब्द :– आर्थीक विकास,संतुलीत विकास,औद्योगीक विकास,संसाधनाचा उपयोग आणि राजकीय नेतृत्व

प्रादेशिक नियोजनाची उदिष्टये :–

जिल्हा नियोजन संकल्पनेत भारतीय प्रादेशिक नियोजनाची उदिष्टये पुढील प्रमाणे आहेत.

- विविध प्रदेशातील विषमता कमी करुन समतोल विकासाची स्थिती निर्माण करणे.
- समतोल विकासाकरीता सुक्ष्म स्तरावर आर्थिक नियोजन करणे.
- त्या विशिष्ट प्रदेशातील नैसर्गीक व मानवी संसाधनाचा परिपुर्ण वापर करुन त्या प्रदेशाला विकासाची संधी मिळवुन देणे.
- प्रदेशाच्या विकासासाठी योजनेअंतर्गत प्रकल्पाच्या योग्य स्थान निश्चितीचा विचार करणे.
- अशा नियोजनात योजनेच्या सर्व टप्यावर लोकांचा सहभाग प्राप्त करणे.

वरील उदिष्टये साध्य करण्याकरीता विविध प्रकारच्या स्तरावर आर्थिक–सामाजिक–भौगोलीक स्वरुपाचे अध्ययन करुन त्या प्रदेशाचे प्रश्न व स्वरुप समजुन घेऊन, त्या आधारे शास्त्रशुध्द अशा योजना आखने व त्याची सुयोग्य अशी अंमलबजावणी करणे यावरच प्रादेशिक नियोजनाची यशस्विता अवलंबुन आहे.

प्रादेशिक नियोजनाचे आयाम :–

प्रादेशिक नियोजनाचे विविध आयाम निर्माण होतात ते पुढील प्रमाणे –

➢ ***आर्थीक विकासाचा आयाम :–***

एकाच देशातील विविध क्षेत्रात असामान्य अशी विषमता दिसुन येते. हि विषमता दुर करण्यासाठी प्रादेशिक नियोजनाची आवश्यकता असते. आर्थिक दुष्ट्या मागासलेल्या क्षेत्रात नियोजन पुर्वक आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत आणल्यास तो इतर विकसीत प्रदेशाच्या बरोबर येऊ शकतो.

➢ ***सामाजिक आयाम :–***

एकाच देशाच्या विस्तारलेल्या भौगोलीक क्षेत्रातील सामाजिक परीस्थिती भिन्न स्वरूपाची असते. काही क्षेत्र हे उच्च सामाजिक दर्जाचे असतात काही इतके सामाजिक दृष्ट्या मागासलेले असतात की समाजाचया मुख्य प्रवाहाचा त्यांना मागमुसही नसतो अशा लोकांना समाजाच्या मुख्यप्रवाहात आणण्याकरीता प्रादेशीक नियोजन गरजेचे असते.

➢ ***भौतिक आयाम :–***

देशाच्या विविध प्रातांत किंवा प्रदेशात विविध भौतिक वैशिटये आढळतात काही प्रदेशात उत्तम शेती पिकते तर काही प्रदेशात मात्र सारखीच मशागत केल्या नंतरही अत्यल्प असे पिक येते. समतोल कृषी विकास हा प्रादेशिक नियोजनाचा आधार होय.

➢ ***औद्योगीक आयाम :–***

कोणत्याही भागाचा आर्थिक विकास हा प्रदेशातील उद्योगधंद्यावर अवलंबुन असतो. भारतात तर असे उद्योगधंदे काही विशिट्य भु–भागात एकवटलेले आहे परिणामी उद्योगाच्या बाबतीत देखील प्रदेशांमध्ये विषमता निर्माण झालेली आहे ती दुर करण्याकरीताच औद्योगीक आयामांच्या बाजुनेच विचार करुन प्रादेशीक नियोजन हे महत्वाचे ठरते.

➢ ***संसाधनाचा आयाम –***

भारतातील काही प्रदेश साधन सामग्रीच्या दृष्टीने संपन्न असुन विकासाच्या बाबतीत मागासलेले आहेत यात विदर्भ प्रदेशाचा अग्रकमाने उल्लेख करता येतो. विदर्भात साधन सामग्रची रेलचेल असुनही अजूनही विकासाच्या बाबतीत फारशी प्रगती साधलेली नाही. अशा प्रदेशाचा विकास घडवुन आणण्याकीता प्रादेशिक नियोजन आवश्यक आहे.

➢ ***राजकिय आयाम :–***

प्रादेशिक विषमता या मुद्दयाचा राजकीय दृष्टया विचार केल्यास निश्चितच असे म्हणता येईल ज्या प्रदेशाला सुयोग्य असे राजकीय नेतृत्व लाभले तो प्रदेश विकासाच्या प्रवाहात येतो. त्यामुळे प्रादेशिक विषमता दुर करावयाची असल्यास राजकीय आयाम देखील महत्वाचा ठरतो. सर्वच प्रदेशातुन प्रामुख्याने मागासलेल्या प्रदेशातुन नेतृत्वाला संधी मिळाल्यास तोही प्रदेश विकासाच्या प्रवाहात येऊ शकतो.

निष्कर्ष :–

प्रादेशिक नियोजनाच्या वरील सर्व आयामाचा गांर्भीयाने विचार करुन नियोजन आखने आणी त्याची अंमलबजावणी करणे फार महत्वाचे ठरते. असे केल्यासच देशातील सर्वच प्रदेशाचा समतोल असा विकास होऊन विकासाच्या केंद्रीकरणाला लगाम बसेल, स्थलांतरणाचे प्रमाण देखील कमी होईल. अविकसीत भागातील लोकांना रोजी रोटीच्या शोधात बरेचदा आपले गाव सोडावे लागते या नंतर कधी जिल्हा,कधि राज्य तर कधी देशच सोडुन जाण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. कित्येक गावे तर केवळ स्थलांतरनामध्ये ओस पडलेले आहे. यावर आळा घालणे अत्यंत आवश्यकक आहे कारण यामुळे काही भाग ओसाळ होत जातो तर काही भागावर अतिरीक्त भार पडतो. नियोजनाच्या विविध आयामावर दृष्टीक्षेप टाकल्यानंतर या सर्व बाबी अधिक स्पष्ट झालेले आहे. त्या–त्या भागाचा विकास झाल्यास एकुणच त्या प्रदेशाचा विकास होऊन प्रत्येक प्रदेशात रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील त्यातुन सामाजीक दर्जा व आर्थिक दर्जा देखील वाढीला लागेल.

संदर्भ :–

1) A.N. Agrawal , Indian Economy : Problems of Development & Planning , New Age International.
2) D.R. Gadgil , The Indian Economy : Problems & prospects.
3) Misra & Puri , Indian Economy : Himalaya Publishing House Pvt.Ltd.
4) Rashi Arora , Indian Economic , Mumbai .
5) Bikramaditya Choudhary ,Regional Development & Planning in India.

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 4.374
UGC Approved Journal Sr. No.48455

ISSN No. 2394-8426
Mar – 2018
Issue–I, Volume–VII

आधुनिक समाजव्यवस्थेतील महिलांचा दर्जा व भूमिका

डॉ. ज्योती षेषराव दिघाडे
समाजषास्त्र विभाग
रात्रकालिन महाविद्यालय, अमरावती.

प्रस्तावना

वर्तमान भारतीय समाजव्यवस्था अतिशय जटील व गुंतागुंतीची झाली आहे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात जसे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक व राजकीय अशा सर्वच ठिकाणी वेगळेपणा जाणवतो. या सर्वामध्ये परंपरागतेबरोबर आधुनिकता प्रचंड प्रमाणात वाढली असून भारतीय समाजव्यवस्था पूर्णपणे ठवळून निघाली आहे. अर्थात हे सर्व बदल स्थळ, काळ व परिस्थितीनुसार वेगवेगळे असले तरी बदल हा निसर्गाचा नियमच आहे. सर्वच क्षेत्रात कमी अधिक प्रमाणात बदल जाणवतो. यानुसार समाज व्यवस्थेचा स्त्री पुरूष हे महत्वाचे घटक असून त्यांच्यातील संबंधात आमुलाग्र परिवर्तन आले आहे. परंपरागत दृष्टीने स्त्रीचा दर्जा व भूमिका कनिष्ठ वा दुय्यम प्रतीची होती. त्यांना सर्वच क्षेत्रात पुरूषापेक्षा कमी लेखले जात होते. यासंबंधी तुकडोजी महाराज म्हणतात,

स्त्री पुरूष ही दोन चाके | जरी परस्पर सहाय्यके |
तरीच संसार रथ चाले कौतुके, ग्राम होई आदर्श || (3).

महिला हया समाजव्यवस्थेचा अर्धा व महत्त्वाचा भाग असतांनाही पुरूषाच्या बरोबरीने हक्क व अधिकार नव्हते. तत्कालीन जातीय धार्मिक बंधने पाहता महिलांना दुय्यम वागणूक मिळत होती. परंतु वर्तमान काळात विशेषतः स्वातंत्र्यानंतर महिलांच्या स्थानात बदल झाला. अर्थात ही सुरूवात ब्रिटीशाच्या कार्यकाळात सुरू झाली. तिला स्वतंत्र्य मिळाल्यानंतर अधिक चालना मिळाली. भारतीय संविधानाने महिलांना पुरूषाबरोबरीने हक्क व अधिकार दिले व तिला समान पातळीवर जीवन जगण्यास योग्यतेचे बनविले. आज ती पुरूषाच्या खांद्याला खांद्या लावून यशस्वीपणे व समर्थपणे कार्य करीत आहे.

महिलांकडे पाहतांना परंपरागत व आधुनिक अशा दोन्ही पातळीवर विचार करावा लागतो. एकीकडे पुरूषप्रधान संस्कृतीने दुय्यम वा दुर्लक्षित केले तर दुसऱ्या बाजुने विकास प्रक्रियेत अग्रेसर राहणे या दोन्ही बाबी पाहता महिलांना अनेक अडीअडचणींना सामोरे जावे लागते. त्यांच्या जबाबदाऱ्या पार पाडतांना तारेवरची कसरत करीत जीवन जगावे लागते. एकूनच आधुनिक काळातील महिलांचा दर्जा व भूमिका समाज व्यवस्थेत महत्वाची असून त्या संबंधीचे अध्ययन होय.

अध्ययनाचे उद्देष

या अध्ययनातील उद्देश खालीलप्रमाणे –

1. आधुनिक समाज व्यवस्थेतील महिलांचा दर्जा व भूमिकांचे अध्ययन करणे.
2. विकास प्रक्रियेतील महिलांचे योगदानाचे विश्लेषण करणे.
3. वर्तमान स्थितीत महिलांच्या बदलत्या जीवनशैलीचे विश्लेषण करणे.

वरील उद्देशाला अनुसरून महिलाचे दर्जा व भूमिका त्यानुसार वर्तन व्यवहार, समाजातील स्थान, पोषक वातावरण, जीवनशैली, पुरूषाचे वर्चस्व, महिलांच्या समस्या व उपाय अशा विविध मुद्यांचे विश्लेषण केले आहे.

महिलांचे समाजव्यवस्थेतील स्थान

महिला हया समाजरूपी रथाचे महत्वाचे चाक होय. असे असले तरी स्थळ, काळ व परिस्थितीनुसार महिलांवर अन्याय अत्याचार झालेले असून जातीय, धार्मिक बंधनातून त्यांना कायमच दुय्यमत्व दिल्याचे आढळते. त्यामध्ये काही बाबींचे विश्लेषण पुढीलप्रमाणे आहे.

डॉ. मोहिनी कडु यांनी आपल्या भारतीय राजकारणातील स्त्रिया (चरित्र आत्मचरित्रे) या ग्रंथात विविध काळखंडातील महिलांच्या कार्याचे विश्लेषण केले आहे. (1) **प्राचीन काळखंड** : उपनिषद काळात गार्गी, मैत्रेयी यांचे नामोल्लेख आढळतात. आयुष्यभर अभ्यास करणाऱ्या ब्रम्हवादिनी, स्त्रियाबाबत वाचायला मिळते. पुरातन काळात कैकयी, मंथरा, राजनितीशीसंबंधीत होत्या तर द्रौपदी, कुंती महाभारतातील राजनीतीच्या केंद्रस्थान होत्या. (कडु 2008 : 1).

(2) **मध्ययुगीन काळखंड** : हा कालखंड 1206 ते 1526 असून यामध्ये रझिया अल्तमरा, पदमिनी, जालिला उर्फ हालिला, चॉद बीवी सुल्ताना

(3) **मोगल काळखंडः**(1526–1761) यामध्ये राणी दुर्गावती, नूरजहॉ, तर मराठा कालखंडातील राणी ताराबाई, येसूबाई, अहिल्याबाई, पेशवेकालीन स्त्रियामध्ये आनंदीबाई, गोपिकाबाई या महिलाही यशस्वीपणे कार्य केले आहे. (कडू 2008:1–4) तर ब्रिटीश काळखंडात राणी चेन्नमा (कर्नाटक, राणी जिंदला कौर (पंजाब) अझिजान (कानपूर), झाशीची राणी, मोतीबाई, ललिताबाई बक्षी, एवढेच नव्हे तर दिल्लीची बेगम झीनत महाल, तुळजापूरची राणी, रायगडची गोंडराणी, अहिरीची गोंड राणी लक्ष्मीबाई ग्वालेहरची बायजाबाई शिंदे, कोल्हापूरची ताईबाई, नरगुंदची राजमाता यमुनाबाई अलापलीची नागाबाई इत्यादी स्त्रियांची नावे 1857 च्या स्वातंत्र लढयातील आहेत. (कडू 2008:7)

स्वातंत्र पूर्व काळातही अनेक महिलांनी यशस्वीपणे कार्य केले त्यामध्ये तर श्री. स.बा. झांबरे यांनी महान क्रांतीकारक या ग्रंथात महिला क्रांतीकारकाचे सविस्तर विश्लेषण केले आहे. त्यामध्ये राणी चेन्नमा, राणी जिन्दाल कौर, कुमारी मैना, नर्तकी जीजन, राणी लक्ष्मीबाई, विरांगणा झलकारी भीमाबाई, राणी बेनी माधी सिंह, बेगम हजरत महाल, राणी अवंतिकाबाई लोधी व राणी लपस्विनी इत्यादी होते. (झांबरे 2007: 43–273) स्वातंत्र्य चळवळीमध्ये कित्येक कित्येक स्त्रियांनी आपला ठसा उमटविला नव्हे त्या सक्रीय सहभागी होत्या. महात्मा गांधीनी आपल्या चळवळीत अनेक महिलांना सहभागी करून घेतले होते. यासंबंधी मधू किश्वर लिहितात की, ...गांधीजींनी स्त्रियांच्या कार्यासाठी दिलेला सर्वात मोलाची भर म्हणजे या कामाला त्यांनी नैतिक कायदेशीरपणा दिला. अशी एक परंपरा आणि सामाजिक, राजकीय वातावरण निर्माण करण्यासाठी मदत केली की, ज्यामध्ये आज सुध्दा क्वचितच कोणी सार्वजनिकरित्या उभा राहून म्हणेल किंवा स्त्रियांच्या मुलभूत हक्काचा विरोध करेल किंवा त्यांच्या राजकारणातील सहभागाचा विरोध करेल.... समाज जीवनामध्ये स्त्रियांना सन्मान राखणे, त्यांच्या सामाजिक आणि राजकीय जीवनात भाग घेण्या विरूध्द ते पूर्वग्रह नष्ट करणे हया गांधीजींच्या कृती त्यांचे स्वतःचे दृष्टीकोन आणि स्त्रियांचे समाजातील स्थान आणि स्त्रियांची भूमिका हया संबंधाने प्रकटन हयाच्या पार पलिकडे जातात. (शहा 2008: 122–123) महात्मा गांधीजींच्या स्त्रियासंबंधी वेगळी विचारधारा आढळत असली तरी स्वातंत्र आंदोलनात अनेक महिलांनी आपले योगदान दिले हे नाकारता येत नाही. माता तपस्विनी मादाम कामा, सरला देवी, शांती घोष, स्मृती चौधरी, बीना दास, प्रीतीलता वाडेकर, बनलतादास गुप्ता, कमला देवी चटोपाध्याय, सरोजिनी नायडू, कस्तुरबा गांधी इत्यादींनीचे कार्य केले आहे.

"स्वातंत्र्याच्या चळवळीत स्त्रियांच्या सहभागाने भिन्न वळण घेतले आणि तो सहभाग नेहमी सुसंघटीत आणि सुसंबध्द नव्हता". उदा. पश्चिम भारतात महाराष्ट्र आणि गुजरातमॉ स्वातंत्रलढयाच्या वेळी देशभक्तीची भावना जागवण्यासाठी प्रभात फेरी निघत असे. सगळया भारतभर असंख्य स्त्रिया निर्वासित आणि भूमिगत व्यक्तींना अन्न पुरवत असत. राजकीय कैद्यांना भेटत असत. सर्व बाहय गोष्टीपासून सुरक्षित असलेल्या घराच्या बाबतीत नवीन आणि बाहय उत्तेजनाशी सामना करत असत. स्त्रियांच्या चळवळीत बहुतेक सहभाग हा अशाच स्वरूपाचा समाज आणि घर यांच्यावर आधारित होता. (शहा 2008:131) असे असले तरी कमलादेवी चटटोपाध्याय (1858), अपर्णा वसू (1976, 1984), मनमोहन कौर (1980), रजनी अलेक्झांडर

(1984), उमाराव अली मीरादेवी (1984) (शहा 2008:130) या व अशा शेकडो महिला देशाच्या विकास प्रक्रियेत मोलाचा सहभाग दिला आहे.

स्वातंत्र्यानंतर महिलांचा दर्जा व भूमिका

स्वातंत्र्यानंतर महिलांचा दर्जा व भूमिकामध्ये आमुलाग्र बदल झाला. संविधानाचे सुरक्षा कवच मिळाल्यामुळे पुरूष प्रमाणे समान हक्क व अधिकार मिळाला संविधानाच्या कलम 14, 15, 16, 19, 21, 23, 243 नुसार (भारतीय संविधान) महिलांना पुरूषासारखे जीवन जगण्याची संधी मिळाली आणि आज त्या शासन प्रशाासनात सन्मानाने व समर्थपणे कार्य करतांना दिसतात. सुरूवातीच्या 1970–80 पर्यंत फारशा महिला पुढे झाल्या नव्हत्या. परंतु 1990–91 च्या नंतर महिला सर्वच क्षेत्रात आपला प्रभाव दाखवित आहेत नव्हे पुरूषापेक्षाही पुढे असल्याचे चित्र आहे. राजकीय क्षेत्रात विविध महिला अग्रस्थानी राहिल्या आहेत. उदा. श्रीमती इंदिरा गांधी, भूतपूर्व पंतप्रधान, श्रीमती प्रतिभाताई पाटील, भूतपूर्व राष्ट्रपती याबरोबर श्रीमती सोनिया गांधी कॉग्रेसच्या माजी अध्यक्षा, मीरा कुमार, माजी लोकसभा अध्यक्षा, सुषमा स्वराज, श्रृती इरानी, मेनका गांधी, निर्मला सितारामन या केंद्रीय मंत्री तर विविध राज्याच्या मुख्यमंत्री जसे मायावती, जयललिता, ममता बॅनर्जी, शीला दिक्षीत, आंनदीबेन पटेल, इत्यादी आणि बऱ्याच आमदार, खासदार व स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये विविध पदावर यशस्वीपणे कार्य करतांना आढळतात. अर्थात यामध्ये अनेक संस्था, संघटना भरीव कार्य केले आहे. त्यामध्ये आर्य समाज, ब्राम्हो समाज, प्रार्थना समाज, वनिता समाज, सत्यशोधक समाज, गजराती स्त्री मंडळ, अहमदाबाद, महिला सेवा समाज म्हैसूर, सेवासदन महाराष्ट्र यांचा उल्लेख करावा लागेल. या काळात म्हणावा तसा महिलांचा विकास झाला नसला तरी प्रारंभ झाला असे म्हणावे लागेल. याबरोबर मेघा पाटकर, (नर्मदा बचाव आंदोलन), अरूणा राय (भ्रष्टाचार पारदर्शिका), किरण बेदी (माजी पोलीस महासंचालक), अरूंधती रॉय (लेखक), इरॉम षरमीला (अनिपूर), मानसी प्रधान (कवी, लेखक), प्रमिला नेसरगी (महिला हक्क कार्यकर्ती), अमान एकनेनी (चित्रपट अभिनेती), लक्ष्मी अग्रवाल (ॲसिड हल्ला विरोधी) शाहीन मिस्त्री (संस्थापक आकांक्षा) (वेबसाईट वरून) या बरोबरच कित्येक महिला अन्याय, अत्याचाराचे विरोधात लढा देत आहे.

एकीकडे हया महिला देशाच्या जडणघडणीत आपले सक्रीय योगदान देत असल्या तरी त्यांची संख्या अतिशय कमी आहे. परंतु हया प्रवाहाबाहेर कोटयावधी महिला आजही अज्ञान, अंधकाराचे जीवन जगत आहेत ही वास्तविकता नाकारता येत नाही. त्यांना चूल आणि मूल, उपभोगाची वस्तू वा पती हाच परमेश्वर मानून. कुटूंबाची सेवा करण्यात मुकाटपणे जीवन जगावे लागते. कितीही संविधानात्मक हक्क व अधिकार मिळाले असले तरीही त्यांना समान पातळीवर जीवन जगता येत नाही अशी परिस्थिती आहे. वर्तमान स्थितीचा विचार करता दर दिवशी वृत्तपत्रात महिलावरील अन्याय अत्याचाराच्या घटना आढळतात. जसे छेडखानी, विनयभंग, बलात्कार, मारपीट, जाळणे, हुंडाबळी, कौटुंबिक हिंसाचार, याचबरोबर कुटूंबातील अपमान व कनिष्ठतेची वागणूक ही नित्याचीच बाब होय. एकीकडे विकासात्मक परिस्थिती तर दुसरीकडे महिलांवरील अत्याचार सातत्याने वाढतांना दिसून येत आहे.

सारांश

आधुनिक काळात महिलांचा दर्जा व भूमिका यामध्ये बदल होत असला तरीही संवैधानिक हक्क व अधिकारापासून कोसो दूर असणाऱ्या कोटयावधी महिला मुख्य प्रवाहापासून दूर आहेत हे मान्यच करावे लागेल. एका बाजुला महिला उन्नती व प्रगती दिसत असली तरी दुसऱ्या बाजुला महिलावरील अन्याय अत्याचार आजही कमी होत नाही. त्यांना पुरूषाच्या अधिपत्याखाली जीवन जगावे लागते ही वास्तविकता आहे. या दोन्ही परस्पर विचारप्रवाह असले तरी काही महिलांच्या दर्जा व भूमिकेत बदल होत असून त्या समाजाच्या मुख्य प्रवाहात येवून देश विकासास व राष्ट्र निर्माणामध्ये महत्वपूर्ण योगदान देत आहेत.

संदर्भ

1. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज (1994) : ग्रामगीता श्री गुरूदेव ग्रामगीता प्रतिष्ठान गुरूकुंज मोझरी अमरावती पृ. 190.
2. कडू मोहिनी (2008) : भारतीय राजकारणातील स्त्रिया (चरित्रे व आत्मचरित्रे) विजय प्रकाशन नागपूर–440012 प्रथम आवृत्ती 15 जुलै पृ.1
3. कित्ता पृ.1–4
4. कित्ता पृ.7
5. झााबरे स.ध. (2007) : महान भारतीय क्रांतीकारक, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, प्रथम वर्ष 1770–1900, प्रथमावृत्ती पृ.43–273.
6. शहा घनश्याम (2008) : भारतातील सामाजिक चळवळी (अनु. प्राची चिकटे) डायमंड पब्लिकेशन पुणे, प्रथमावृत्ती 122–123.
7. कित्ता पृ.130

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 4.374
UGC Approved Journal Sr. No.48455

ISSN No. 2394-8426
Mar – 2018
Issue–I, Volume–VII

विर्दभाच्या विकासात पर्यटनाचे महत्त्व

डॉ. किशोर उत्तमराव राऊत
समाजशास्त्र विभाग
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
अमरावती.

प्रस्तावना

आधुनिक काळातील सार्वजनिक सेवा क्षेत्र कमी कमी होत असून खाजगी क्षेत्रातील सहकारी संस्था झपाटयाने वाढत आहे. केंद्र व राज्य सरकारे सार्वजनिक क्षेत्रातील आपली जबाबदारी टाळून खाजगी क्षेत्राला सर्वाधिक महत्व देत आहे. अर्थातच यामध्ये विविध उद्योगपती व्यापारी, श्रीमंत व्यक्ती अर्थव्यवस्थेत वर्चस्व स्थापित करीत आहेत. पर्यायाने सेवा क्षेत्र आपल्या ताब्यात घेत आहेत. मुळातच अलिकडच्या 'खाऊजा' (खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण) या धोरणामुळे सरकारी नोकऱ्यांचे क्षेत्र कमी कमी होत असून खाजगीकरणाला प्रोत्साहन दिल्या जात आहे. सार्वजनिक जबाबदारीतून सरकार बाहेर पडत आहे. त्यामुळे सार्वजनिक क्षेत्रातील नोकऱ्यांचे प्रमाण कमी–कमी आहे. दुसरे असे की, खाजगी क्षेत्रात रोजगार निर्मिती होत असली तरी तिची मर्यादा कायमच राहते. याचे कारण असे की, सर्वच ठिकाणी मोठया प्रमाणात तंत्रज्ञान वाढत असून मनुष्यबळ कमी लागत आहे. अर्थात ते कुशल असो की, अकुषल या दोघाचीही संख्या कमी असून यंत्र, तंत्र माहिती तंत्रज्ञान याला सर्वाधिक प्राधान्य दिल्या जाते. दुसरे असे की, ज्या लोकांचे उद्योग, कारखाने, कंपन्या आहेत. ते भांडवलदार स्वतःच फायदा पाहणारच. त्यामुळे कामगारांच्या हिताकडे साहजिकच दुर्लक्ष होणार. त्यांच्या कामाचे स्वरूप पाहता मिळणारे वेतन अतिशय कमी. त्यामुळे मोठया महानगरात त्याच्या जीवनावश्यक गरजाही पूर्ण होत नाहीत अशी स्थिती आहे. दुसरे असे की, वर्तमानकाळात सुशिक्षितांची वाढत्या संख्येमुळे कारखाने, कंपन्या करीता बेरोजगार, पदवीधारक मोठया प्रमाणावर मिळतात. या प्रचंड वाढत्या संख्येमुळे हे तरूण मिळेल ती कामे व मिळेल त्या वेतनावर करायला तयार होतात. एकीकडे सरकारी नोकऱ्यांचे प्रमाण कमी तर दुसऱ्या बाजुला खाजगी क्षेत्रात रोजगाराच्या संधी मिळत असली तरी त्यामध्ये अकुशल कामगारापेक्षा कुशल कामगारांना अधिक महत्व आहे. पर्यायाने सामान्यांना कठीण व अधिक शारीरिक श्रमाची कामे करावी लागतात. अशा वेळी रोजगार व स्वयंरोजगार प्रश्न महत्वाचा ठरतो.

या शोध निबंधात विदर्भातील पर्यटन स्थळे, त्यातून निर्माण होणाऱ्या रोजगाराची संधी, राज्यकर्त्यांची भूमिका, सुशिक्षितांचा दृष्टीकोन, रोजगारांची संधी पर्यटन क्षेत्र व त्याचे महत्व इत्यादी मुद्याचे विश्लेषण केले आहे.

पर्यटन क्षेत्र

Tour हा Torchया हिब्रू शब्दापासून तयार झाला. अर्थात अभ्यास करणे, शिकणे, ज्ञानार्जन करणे, Tour पासून Tourism पर्यटन म्हटले जाते आणि हा शब्द शब्दकोषात अलिकडे 1976 मध्ये वापरण्यात आला.

'पर्यटन' (Tourism) *हा अत्यंत लोकप्रिय आणि जिव्हाळयाचा विषय आहे. आपल्या देशातीलच नव्हे तर जगभरात पर्यटनाला विशेष महत्व आहे. पर्यटन हा स्वतंत्र व्यवसाय असून रोजगाराच्या प्रचंड संधी आहेत. त्या संबंधी विविध रोजगाराभिमुख अभ्यासक्रमाला प्राधान्य देवून त्या दिशेने नेता येईल. कृतीशील आणि आव्हाने स्वीकारणाऱ्या ध्ययेवादी तरूणाकरीता पर्यटन हा आशेचा किरण आहे. यामध्ये करीयर ची पुरेपुर संधी उपलब्ध होते. पर्यटनाच्या माध्यमातून तरूणाला चांगले जीवन जगण्याबरोबर संघटनात्मक नेतृत्वाचा विकास होतो. जोडीला रोजगार व स्वयंरोजगार म्हणूनही आर्थिक स्वयंपूर्णता मिळविता येते. यातून आर्थिक उत्पन्नात वाढ होवून दारिद्रय कमी होण्यास मदत होते. या दृष्टीकोनातून जगभरातील तरूण या व्यवसायाकडे आकर्षित होत आहेत. विदर्भातील सुशिक्षित बेरोजगार या दिशेने पुढे येवून यशस्वी जीवनाला हातभार लावता येईल.*

उद्दिष्टये

1. विदर्भातील पर्यटन स्थळांचे विश्लेषण करणे.
2. पर्यटन व विकास यांच्यातील परस्पर संबंधाचे अध्ययन करणे.
3. पर्यटनात निर्माण होणाऱ्या रोजगार व स्वयंरोजगाराचे अध्ययन करणे.
4. विदर्भातील पर्यटन क्षेत्राच्या महत्त्व स्पष्ट करणे.

वरील उद्देषाला *अनुसरून विदर्भातील पर्यटन क्षेत्र व त्याला तरूणांना मिळणारे रोजगार याचे विश्लेषणात्मक मांडणी केली आहे.*

महाराष्ट्र राज्याची निर्मिती 1 मे 1960 ला झाली असून प्रशासन व महसुलाच्या दृष्टीने एकुण सहा विभाग पडली आहेत. 1) कोकण विभाग, *2)* नाशिक विभाग, *3)* पुणे विभाग, *4)* औरंगाबाद विभाग, *5)* नागपूर विभाग, *6)* अमरावती विभाग या सर्व विभागात कमी अधिक प्रमाणात पर्यटनाचे क्षेत्र असून त्याला विकासाच्या दृष्टीने गती दिल्यास हजारो तरूणांना रोजगार सहजपणे उपलब्ध शकतो.

महाराष्ट्रातील पर्यटन क्षेत्र

महाराष्ट्राला निसर्गाची मोठी देणगी मिळाली असून अरबी महासागर तर कोकण किनारपट्टीची निसर्गरम्य परिसर आहे. या बरोबर महाराष्ट्राच्या सर्वच जिल्हयात कमी अधिक प्रमाणात पर्यटनाची क्षेत्रे उपलब्ध आहेत. ज्याच्या भरोशावर हजारो तरूणांना रोजगार उपलब्ध करून देता येतो. मुंबई क्षेत्रातील गेट वे ऑफ इंडिया, ऐसेल वर्ल्ड, काव्हेरी गुहा, महात्मा ज्योतीबा फुले मंडई, जिजामाता उद्यान, पगोडा, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, हॅगींग गार्डन, भावन धरण इ. पुणे क्षेत्रातील लोहगड, कारला गुहा, आगाखान पॅलेस, मालशेज घाट, सिध्दीविनायक मंदीर, राजीव गांधी प्राणी संग्रहालय, पाताळेश्वर इ. तसेच अजिंठा वेरूळ व दौलताबाद औरंगाबाद, महाबळेश्वर, प्रतापगड, शिवनेरी जुन्नर, महालक्ष्मी कोल्हापूर, पूरंदर किल्ला इ.अलिबाग, रागयड, मालवन, अबोली, गणपतीमुळे, दापोली, याचबरोबर महाबळेश्वर, पाचगणी, जंजीरा किल्ला, सिंहगड, लोणावळा, मराठवाडयातील अजिंठा, वेरूळ, विदर्भातील

लोणार सरोवर, पवनार, सेवाग्राम (वर्धा) मार्कंडा (गडचिरोली) अशा विविध ठिकाणचा विकास केल्यास रोजगाराची संधी उपलब्ध होईल.

विदभातील पर्यटन क्षेत्र

विदर्भ हा महाराष्ट्रातील एक प्रवेश परंतु राजकारणापासून दुर्लक्षित होय. याबरोबर विकास प्रक्रियेपासून काहीसा दूर आहे. एकुण अकरा जिल्हयाचा विस्तीर्ण प्रदेश असून यामध्ये विदर्भातील नागपूर क्षेत्रात एकूण सहा जिल्हयाचा समावेश होतो. त्यामध्ये नागरधन किल्ला, सिताबर्डी किल्ला, अंबाझरी उद्यान, वस्तुसंग्रहालय, सेमिनरी हिल्स, ड्रगन पॅलेस, गणेश टेकडी, दिक्षाभूमी, *नवेगांव धरण, पवनीचे जगन्नाथ स्तुप, चांडकापूर स्तुप, उत्खनन, अंबागड किल्ला,* (तुमसर), *सातगडी किल्ला* (साकोली) *गोसी खूर्द प्रकल्प , वर्धा जिल्हयातील सेवाग्राम, पवनार बोरधरण, केळझर तर गडचिरोली मधील लोक बिरादारी प्रकल्प, हेमलकसा* (भामरागड), मार्कंडा (चामोर्शी), चंद्रपूरमध्ये ताडोबा प्रकल्प, कुष्ठरोगी आश्रम (वरोरा) तर अमरावती विभागात संत गाडगेबाबाचे जन्मगांव (शेंडगाव, अमरावती) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज (मोझरी), संत गुलाबराव महाराज (माधान), तपोवन कुष्ठरोग आश्रम (अमरावती), रूख्मिनीचे माहेरघर (कौंडण्यपूर), अवधुत महाराज (विठोबा सावंगा), जैनाची मुक्तागिरी, चिखलदऱ्याचा गावीलगड किल्ला, अचलपूरचा परकोट, अकोटचा नरसाळा किल्ला, बुलडाण्याचे लोणार सरोवर, शेगावचे संत गजानन महाराज देवस्थान, वाशिमचे बालाजी मंदीर, शिरपूरचे जैन मंदीर, इसापूरचे धरण (पुसद), अप्परवर्धा धरण (अमरावती) त्याचबरोबर इतरही लहान मोठी क्षेत्र आहेत की ज्याचा विकास केला तर अनेकांना रोजगार व स्वयंरोजगार मिळू शकतो. डॉ॰ फडणवीस यांनी आपल्या विदर्भ पर्यटन व सुवर्ण आशा या पुस्तकात लिहितात की, वाशिम 64, नागपूर 123, अमरावती 61, गडचिरोली 20, अकोला 15, बुलढाणा 90, गोंदिया 95, वर्धा 23, चंद्रपूर 27, (फडणवीस 2013 :15).

पर्यटन क्षेत्र बेरोजगार समस्येवर उपाय

पर्यटनातून हजारो तरूणांना रोजगार सहजपणे उपलब्ध करता येवू शकतो. याकरीता स्थानिक पातळीवर विद्यापीठाना त्याप्रकारे रोजगाराभिमूख पदवी वा प्रमाणपत्रे प्रषिक्षण दिल्यास या क्षेत्रात अनेकांना रोजगार मिळवून ते यशस्वी जीवन जगू शकतील. एका बाजुला दरवर्षी सुशिक्षित बेरोजगारांची प्रचंड संख्या पदव्या घेवून बाहेर निघत आहे. त्यांच्या हाताला काम नाही, व जे रिकामे आहेत त्यांना काही प्रमाणात का होईना काम देता येवू शकेल. याबरोबर स्थानिकाना आपल्या क्षेत्रात रोजगाराची संधी उपलब्ध झाल्यास पूणे, मुंबई, औरंगाबाद, नागपूर अषा मोठया शहराचा भारही कमी करता येईल. या शहराकडे होणारे स्थानांतरणही कमी करता येवू शकेल. पर्यायाने विदर्भाचा विकासास हातभार लावता येवू शकेल.

विदर्भाचा विचार करता शेती व शेतीशी संबंधीत व्यवसाय मोठया प्रमाणात आहे. येथे फारसे उद्योगधंदे, कंपन्या, कारखाने नाहीत. असले तरी नागपूर, अमरावती व जिल्हयाच्या ठिकाणीच ते आहेत. त्यामुळे ग्रामीण व आदिवासी व्यक्ती शहरात जाईल कसा? स्थायिक होईल कसा? रोजगाराचे काय? शैक्षणिक पात्रता, त्याची क्षमता हे पाहता सामान्य व्यक्ती कसा जगू

शकेल हा मोठा प्रश्न आहे त्यामुळे विदर्भातील सुशिक्षित तरूण मुंबई, पुणे, अशा मोठया शहराकडे स्थालांतरीत होतात. पर्यटन क्षेत्राचा विकास केला तर रोजगाराच्या संधीबरोबर स्थानिक जनतेच्या सोई सुविधा वाढतील असा दुहेरी फायदा होईल. एकुण विकासाच्या दृष्टीने पर्यटन महत्त्वाचे ठरणारे आहे.

सारांष

विदर्भातील पर्यटन क्षेत्र, त्याचा विकास, सुशिक्षित बेरोजगार, रोजगार व स्वयंरोजगाराची संख्या पर्यटन निर्माण होणाऱ्या संधी, त्यातील उत्पन्न, उदरनिर्वाह, स्थानिकाचा विकास, अशा विविध बाबी एक दुसऱ्यावर अवलंबून आहेत. विदर्भात अशी कित्येक पर्यटन क्षेत्रे आहेत की, ज्यातून या तरूणाच्या हातांना काम देता येईल. रोजगार देता येवून उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडविता येवू शकेल आणि शहरातील सततचा वाढणारा भार कमी करता येईल व बेरोजगार समस्येवर काही प्रमाणात आळा घालता येईल.

संदर्भ ग्रंथ

1. फडणवीस मृणालीनी (2013) : विदर्भ पर्यटन : सुवर्ण आशा, रेणुका प्रकाशन नागपूर, पृ. 15.
2. कित्ता पृ. 19.
3. http://www.tourismofindia.com
4. http:// www.tourismofmaharashtra.com
5. http:// www.tourismofvidarbha.com

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 4.374
UGC Approved Journal Sr. No.48455

ISSN No. 2394-8426
Mar – 2018
Issue–I, Volume–VII

चंद्रपूर जिल्ह्यातील उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा पर्यावरणीय अभिवृत्तीचा चिकित्सक अभ्यास

डॉ.एस.एम.सातपुते
सहाय्यक प्राध्यापक
जनता शिक्षण महाविद्यालय,चंद्रपूर

पृथ्वीच्या निर्मितीपासूनच्या काळाचा विचार केला तर मानवाचे अस्तित्व अगदीच अलीकडच्या काळात झालेले दिसते. पण मानव इतर सर्व सजीवापेक्षा वेगळा असल्याने त्याच्या आगमनानंतर पृथ्वीच्या पृष्ठभागावर, सागरावर आणि काही प्रमाणात अंतरंगामध्ये देखील त्याने बदल घडविण्यास सुरुवात केली.

मानवाच्या अतिसुखाच्या हव्यासापोटी पृथ्वीच्या निर्मितीपासून निसर्गाचा जो समतोल होता तो धोक्यात येऊ लागला आहे. घरबांधणी, उद्योगधंद्याची वाढ, शहरीकरण यामुळे प्रचंड प्रमाणात जंगलतोड होऊ लागली. त्यामुळे जंगलातील प्राण्यांचे जीवन धोक्यात आले. जमिनीची धूप होऊ लागली. कारखान्यातील सांडपाण्यामुळे पाणी प्रदूषण होऊ लागले. वेगवान वाहतुकीची साधने आणि प्रचंड यंत्रे यामुळे ध्वनिप्रदुषण वाढू लागले आणि या सर्वांचा परिणाम म्हणजे ज्या सुखासाठी मानवाची धडपड चालू होती, ते मानवी जीवनच धोक्यात येऊ लागले. निसर्ग नियमांना डावलून केलेली सुधारणा मानवाच्या जीवनावरच आघात करु लागली. त्यामुळे सर्व देशामध्ये 'पर्यावरणाचा तोल कसा सावरता येईल?' यासंबंधी विचार होऊ लागला आणि त्या मधूनच पर्यावरणशास्त्र या नवीन शास्त्राची निर्मिती झाली.

पर्यावरण अभिवृत्ती :

पर्यावरणाविषयी जाणणे किंवा विशिष्ट वर्तणूक करण्याची प्रवृत्ती म्हणजे अभिवृत्ती होय. अभिवृत्ती ही अनुभवातून निर्माण होत असते. मानवाने काळाच्या ओघात स्वत:च्या गरजा पूर्ण करण्यासाठी पर्यावरणाचा वाटेल तसा उपयोग केला. परंतु यांच्यात बदल करण्याची व शाश्वत विकास घडवून आणण्याची अशी उचित अभिवृत्ती पर्यावरणाविषयी निर्माण झाली नाही. आज पर्यावरणाविषयी योग्य ती विकासात्मक वर्तणूक करण्याची गरज आहे. चांगले पर्यावरण, उत्तम आरोग्य, संतुलित व आर्थिक समृद्ध समाज, योग्य न्याय, निर्मल समाज व्यवस्था जेथे आहे तेथे वर्तमान व भविष्यकालीन पर्यावरणीय शाश्वत विकास निश्चितपणे घडून येतो. हीच आपली पुढील काळासाठी पर्यावरणीय अभिवृत्ती असणे गरजेचे आहे.

संशोधन समस्येचा उगम :

आजचे युग पर्यावरणाच्या समस्यांचे युग आहे. पर्यावरण हा पृथ्वीवरील सजीव सृष्टीचा एक अविभाज्य घटक आहे. मानव आणि पर्यावरण यांचा संबंध मानवाच्या पृथ्वीवरील अस्तित्वापासून आहे. पर्यावरणाचा मानवावर जसा प्रभाव पडतो तद्वतच मानवाचा पर्यावरणावरही प्रभाव पडतो, म्हणून मानव आणि पर्यावरण यांचे नाते अनन्यसाधारण असे आहे. मानव आपल्या बुद्धी चातुर्याच्या आधारे पर्यावरणावर विजय मिळविण्यासाठी जेंव्हापासून प्रयत्न करु लागला तेव्हापासून पर्यावरणाचे अस्तित्व धोक्यात येऊ लागले.

उच्च माध्यमिक विद्यार्थ्यामध्ये पर्यावरण शिक्षणातून जाणीव जागृती निर्माण करुन पर्यावरणाची घसरण थांबविता येईल. निसर्ग, झाडे, झुडपे, प्राणी या विषयी ओढ व प्रेम निर्माण करता येईल. यातूनच पर्यावरणाविषयी आवड, जिव्हाळा, अभिरुची व अभिवृत्ती निर्माण करता येईल.

आजच्या युगात जर खऱ्या अर्थाने विद्यार्थी घडवायचा असेल व भावी नागरीकांची जर का आपण अपेक्षा करीत आहोत, तर मग अशा परिस्थितीत महाविद्यालयीन विद्याार्थ्यांना पर्यावरणाविषयी शिक्षण देण्याची आवश्यकता आहे.

संशोधनाची आवश्यकता व महत्व :

अन्न, वस्त्र आणि निवारा यासोबत पर्यावरण विषयक जागरुकता ही सुद्धा हल्लीच्या काळातील जीवनावश्यक गरज ठरलेली आहे. केवळ सद्याच्या मानवी पिढीचे नव्हे तर पुढच्या पिढीचे जीवन हलाखीचे होण्याची लक्षणे जाणवू लागलेली आहेत. पर्यावरण रक्षणाचा संबंध केवळ आपल्याला होणाऱ्या प्रदुषणाचा त्रास किंवा साधन संपत्तीचा तुटवडा यासारख्या समस्यांपुरता मर्यादित नाही. पुढील पिढ्यांच्या जीवनाशी त्याचा जवळचा संबंध आहे. पर्यावरण रक्षण आणि संवर्धनासाठी संपूर्ण जगभर पोटतिडकीने सुरु असलेल्या प्रयत्नामागील हेच महत्वाचे कारण आहे. पर्यावरण विषयी संवेदनशीलता, आवश्यक बदल किंवा सुधारणा यांचा विचार करण्याची क्षमता आणि त्यासाठी स्वत: पुढाकार घेऊन कृतिशील होण्याची मनोवृत्ती याशिवाय पर्यावरण विषयक जागरुकता अशक्य आहे. म्हणूनच बालवयापासून पर्यावरण शिक्षणाची काळाची गरज आहे.

प्रस्तूत संशोधनासाठी "चंद्रपूर जिल्ह्यातील उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा पर्यावरण अभिवृत्तीचा चिकित्सक अभ्यास" ह्या विषयाची निवड करीत असतांना संशोधकाच्या मनात जिज्ञासा होती की, शहरी तसेच ग्रामीण भागातील कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विकासाला चालना देण्याकरिता, भविष्यातील पर्यावरण संवर्धनाकरिता तसेच त्यांच्यामध्ये पर्यावरण अभिवृत्ती या कौशल्यांचा विकास करण्याकरिता संशोधन व्हावे त्यादृष्टिने हा विषय निवडला आहे.

समस्या :

"चंद्रपूर जिल्ह्यातील उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा पर्यावरणीय अभिवृत्तीचा चिकित्सक अभ्यास"

संशोधन उद्दिष्टये :

१. चंद्रपूर जिल्ह्यातील उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा पर्यावरणीय अभिवृत्तीचा अभ्यास करणे.
२. चंद्रपूर जिल्ह्यातील उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या (मूले) पर्यावरणीय अभिवृत्तीचा अभ्यास करणे.
३. चंद्रपूर जिल्ह्यातील उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थिनींच्या पर्यावरण अभिवृत्तीचा अभ्यास करणे.
४. चंद्रपूर जिल्ह्यातील उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या पर्यावरण अभिवृत्तीची तुलना करणे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

व्याप्ती :

१. सदर संशोधन चंद्रपूर जिल्ह्यातील उच्च माध्यमिक शाळेतील इयत्ता ११ वी च्या विद्यार्थ्यांबाबत आहे.
२. सदर संशोधन हे जिल्ह्यातील उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमधील पर्यावरण अभिवृत्ती व पर्यावरण अभ्यासण्याबाबत आहे.

परिमर्यादा :

१. प्रस्तूत संशोधन हे उच्च माध्यमिक शाळेतील इयत्ता ११ वी च्या विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित करण्यात आले आहे.

२. प्रस्तूत संशोधन हे उच्च माध्यमिक शाळेतील पर्यावरण विषयामधून अभिवृत्ती पुरतेच मर्यादित करण्यात आले आहे.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

न्यादर्श :

न्यादर्शमध्ये चंद्रपूर शहरातील दोन ग्रामीण उच्च माध्यमिक शाळेतील व दोन शहरी उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा यादृच्छिक पद्धतीने निवड करुन समावेश करण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधनाकरिता ६० ग्रामीण उच्च माध्यमिक शाळेतील (३० मुले आणि ३० मुली) व शहरी उच्च माध्यमिक शाळेतील ६० विद्यार्थ्यांचा (३० मुले व ३० मुली) यादृच्छिक पद्धतीने समावेशीत करण्यात आलेले आहे.

संशोधनाची साधने :

प्रस्तुत संशोधन करण्याकरिता संशोधनाची पद्धती ही सर्वेक्षणात्मक असल्यामुळे "डॉ. श्रीमती हसिन ताज यांनी तयार केलेली " Taj Environmental Attitude scale" या चाचणीचा वापर करण्यात आला. ही चाचणी ग्रामीण व शहरी उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना सोडविण्यासाठी देण्यात आली.

संशोधनाचे सांख्यिकीय विश्लेषण व अर्थनिर्वचन :

सारणी क्रमांक : १

ग्रामीण व शहरी उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांच्या पर्यावरण अभिवृत्तीचे मध्यमान, प्रमाण विचलन व तुलना

अ.क्र.	विवरण	विद्यार्थी संख्या	मध्यमान	प्रमाण विचलन	't' मुल्य
१	शहरी ग्रामीण	६० ६०	१७७.६३ १६१.०८	११.२९ ६.२८	९.९६
२	ग्रामीण	मुले ३० मुली ३०	१६५.८३ १५६.३३	१४.३६ १३.१३	२.६७
३	शहरी	मुले ३० मुली ३०	१७९.४० १७५.८०	१६.३० १५.९१	०.८६ *

* सार्थक फरक नाही.

विश्लेषण:

१. शहरी उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांच्या पर्यावरण अभिवृत्तीचा स्तर ग्रामीण उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांपेक्षा उच्च प्रतिचा दिसून येतो.

२. शहरी उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांची पर्यावरण अभिवृत्ती ग्रामीण उच्च माध्यमिक विद्यार्थ्यां– पेक्षा जास्त आढळते.

३. शहरी व ग्रामीण उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांच्या पर्यावरण अभिवृत्तीत सार्थक फरक आहे.

४. ग्रामीण उच्च माध्यमिक विद्यार्थी व विद्यार्थीनींच्या पर्यावरण अभिवृत्तीत सार्थक फरक आहे.

५. शहरी उच्च माध्यमिक विद्यार्थी व विद्यार्थीनींच्या पर्यावरण अभिवृत्तीत सार्थक फरक नाही.

निष्कर्ष :

१. उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थांची पर्यावरण अभिवृत्ती :

- ग्रामीण विद्यार्थां व विद्यार्थीनीमध्ये वाढविणे आवश्यक आहे.
- शहरी विद्यार्थीनीमध्ये वाढविणे गरजेचे आहे.

२. उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थांच्या पर्यावरण अभिवृत्तील फरक :

- शहरी व ग्रामीण विद्यार्थी व विद्यार्थीनीमध्ये सार्थक फरक आहे.
- ग्रामीण विद्यार्थां व विद्यार्थीनीमध्ये सार्थक फरक आहे.
- शहरी विद्यार्थां व विद्यार्थीनीमध्ये सार्थक फरक नाही.

संदर्भ ग्रंथ सूची :

१. अहिरराव कै. वार., अलिझाड, वराट, धापटे, भोस (२००५) : 'पर्यावरण विज्ञान', पुणे, निराली प्रकाशन

२. भांडारकर, के.म. (२००६) : 'पर्यावरण शिक्षण', नागपूर, नित्य नुतन प्रकाशन.

३. कुलकर्णी डी. आर. (२००७) : 'पर्यावरण शिक्षण', नागपूर, विद्या प्रकाशन.

४. ढेरे, ए.एम., पोवार, सी.व्ही., पाटील, डी.ए. (२००९) : 'पर्यावरण शिक्षण व अध्यापन पध्दती', कोल्हापूर, फडके प्रकाशन

५. घोरपडे, तुषार (२०१३) : ' पर्यावरण परिस्थितिकी', पुणे, युनिक अॅकॅडमी

६. पाटील गजानन (१९९९) : ' पर्यावरण शिक्षण', पुणे, निराली प्रकाशन

७. पारसनिस हेमलता, बहुलिकर जयश्री (२००५) : ' पर्यावरण शिक्षण' पुणे, नुतन प्रकाशन

८. सावंत प्रकाश (२०१०): ' पर्यावरण शिक्षण', कोल्हापूर, फडके प्रकाशन

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 4.374
UGC Approved Journal Sr. No.48455

ISSN No. 2394-8426
Mar – 2018
Issue–I, Volume–VII

ग्रामीण साहीत्याचे सैध्दांतीक आधार

प्रा. यादवराव रा. गहाणे
फुले — आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, गडचिरोली

ग्रामीण साहित्याची प्राचीन चित्र ''गाथासत्पशती'' या सातवाहन राजाच्या ग्रंथात दिसते. हा राजा स्वत: कवी असल्यामुळे ह्याच्या ग्रंथामधील काही ओव्यामध्ये ग्रामीण साहित्याचा उल्लेख येतो. तर 'दृष्टांत पाठ' या ग्रंथामधील काही कथामधूनही ग्रामीण साहित्याचा उल्लेख येतो.

सर्वसाधारनपणे ग्रामीण साहित्य निर्मीतीस १९२० नंतर प्रारंभ झाला असे मानले जाते. आपल्या भारतात अधिकांश जनता खेड्यात राहते. भारतीय संस्कृतीची खरी ओळख आणि जपवणूक खेड्यातच होते. ग्रामसंस्थेच्या केंद्रस्थानी असणारा शेतकरी व त्याचे जीवन हा कुतूहलचा विषय होता. खेड्याच्या विकास प्रगती आदी गोष्टींचा जीवनानुभव घेतला पाहीजे. या भावनेतूनच ग्रामीण साहित्य खेड्याकडे वळते.

ग्रामीणत्व म्हणजे काय?

प्राचीन काळापासुन झालेली खेड्यांची घडण लक्षात घेतल्यास या घडणीतूनच जीवन जगण्यासाठी एक वेगळी रीत साकारत गेली. ही रीत म्हणजेच ग्रामीणत्व असे आपणाला म्हणता येईल. रूढीप्रीयता हे ग्राम्यतेचे लक्षण व कृषीजीवन हेच ग्रामसंस्कृतीच्या केंद्रस्थानी आहे. म्हणूनच कृषी जीवनाला केंद्रस्थानी ठेऊन इथले सण, रूढी, उत्सव, परंपरा निर्माण झाल्या आहेत. कृषीकेद्रीत गावगाडा निसर्गसन्मुख आहे. म्हणजेच निसर्ग ग्रामीण साहित्याच्या केंद्रस्थानी आहे. त्यामुळेच खेड्याकडे चला हा दिलेला नारा ग्रामीण साहित्याचा प्रेरणास्त्रोत दिसतो.

ग्रामनिष्ठ जाणिव प्रकट करणे म्हणजेच ग्रामीण मानसाचे त्याच्या काळ्या आईवडील, पीकावरील, झाडावरील, पशुधनावरील, घनिष्ठ प्रेम आणि जिव्हाळा लक्षणीय असतो.

स्वांतत्र्योत्तर काळात साहित्याच्या क्षेत्रात झालेला बदल, त्याकडे बघण्याचा दृष्टीकोन कसा बदलत गेला आणि स्वातंत्रानंतरच्या १५ ते २० वर्षाच्या काळात मराठी साहित्याच्या प्रवाहात घडून आलेले बदल यांचा विचार केल असता त्यामध्ये झालेले स्थित्यंतर हे काही एकाएकी घडलेले नाही, त्यामागे वैचारिक बैठक होती. हे वैचारिक बैठक सामाजीक चळवळीतून निर्माण झालेली होती. या चळवळीच्या प्रभावाने संदेशनशील आणि सृजनशील तरून पिढी लिहू जगली. ही पिढी संस्कारीत झालेली होती. काही प्रमाणात शिक्षीतही झाली होती.

या नवशिक्षीतांना असे जगवू लागले की शिक्षण घेत असतांना आपन जे वाचतो आहोत त्यातून येणारे जीवन व प्रत्यक्षातले आपले जीवन वेगळे आहे. ते फार वरवरचे व

आपल्या समाजावर अन्याय करणारे आहे. आणि म्हणून त्यांना आपण थांबविले पाहिजे. असे त्यांना वाटु लागले. कारण ग्रामीण समाजाचे चित्रन करणारी ही बहुशंशी मंडळी समजाच्या वरच्या वर्गातून आलेली आहेत. त्यांना ग्रामीण जीवनाचे अनुभव नाहीत. आणि त्याविषयी गांभीर्याने लिहावे असे कधीही त्यांना वाटले नाही. म्हणून जाणत्या, संवेदनशील व निर्मीतीक्षम मनाला हे एक आव्हान होते. त्यांचे मन आपल्या ग्रामीण समाजाविषयी बचैन होते. याबेचैनितूनच त्यांना असे जाणवू लागले की या सर्व पार्श्वभूमीत शोषणाचा एक संदर्भ आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धाचा जर विचार केल तर एकूनच मराठी साहित्यावर तत्कालीन सुधारणा वाद्यांच्या विचारांचा परिणाम झालेल आपल्याला पहायला मिळतो. भारत हा खेड्यांचा देश आहे. आणि या देशातील जनता बहतांशी खेड्यापाड्यातुन दऱ्याखोऱ्यातून आणि रानावनात राहते. या लोकांचे प्रश्न इतर उच्चवर्णिय लोकांच्या प्रश्नापेक्षा वेगळे आहेत. कारण ते शहरी माणसापेक्षा अधिक कष्टमय, दु:खभोगी व अनेक अनेक पटिने अभावग्रस्त असे आहे. आणि म्हणून सर्वप्रथम महात्मा फुले यांनी या प्रश्नांकडे लक्ष वेधले त्यांच्या मते ग्रामीण जीवनाच्या केंद्रस्थानी शेतकरी आहे. कारण शेती हाच मुख्य व्यवसाय असून ती जर पिकली नाही तर सर्वत्र बरबादी होते. हे ग्रामजीवनाचे सुत्र आहे. अशा शेतकऱ्यांच्या शोषणाला त्यांचे अज्ञानच कारणीभूत आहे. अशी त्यांची ठाम धारणा होती त्यामुळे त्यांच्यात आत्मभान निर्माण करण्याची आवश्यकता आहे. आणि यासाठीच म. फुले यांनी ''शेतकऱ्यांचा आसूड'' हा ग्रंथ लिहीला. त्यात त्यांनी शेतकऱ्यांच्या दैनावस्थेचे, हतलि मनोवस्थेचे, वास्तवदर्शी व चित्रमयी वर्णन म. फुल्यांनी केलेले आहे. आणि यातच खऱ्या अर्थाने आधुनिक ग्रामीण साहित्याची बीज आपल्याला पहायला मिळते.

कालातंराने महाराष्ट्रात पुन्हापुन्हा येणारा दुष्काळ आणि या दुष्काळातही स्वत:च्या स्वार्थासाठी कष्टकरी शेतकऱ्यांची अमलदाराकडुन होणारी पिळवणूक व छळ याचे चित्रण केलले दिसुन येते. तसेच अज्ञानी दारिद्रय, धर्मभोळ्या, कष्टकरी ग्रामीण माणसांच्या लुबाडणूकीचे चित्रणहीकेलेले दिसून येत. परंतू या दोन्ही घटना जाणिवपूर्वक निर्माण केलेल्या नव्हत्या. तात्पर्य या काळात निर्माण झालेले साहित्य एक म. फुलेचा अपवाद वगळला तर खऱ्या अर्थाने ग्रामीणांच्या संवेदनाशी निगडीत असे साहित्य नव्हतेच. निम्म स्तरावरचे जीवन जगणारा एक मोठा समाज आहे. याकडे कोणीही लक्ष दिले नाही.

परंतू १९२० ते १९२५ च्या दरम्यान उद्याला आलेल्या ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा एकूनच मराठीसाहित्यापेक्षा वेगळ्या आहेत. किंबहूना गांधीवाद ही ग्रामीण साहित्याची प्रेरणा आहे. असा परिणाम इतर साहित्यावर दिसत नाही. भारत हा खेड्याचा देश असल्यामुळे खेड्यातील जनता कष्ट करते. हाल सोसते. व शेतीतून पीक काढते. त्यांनी पिकविलेल्या शेतीवर, शेतीच्या अनधान्यावर शहरे जगतात. खरी संस्कृती खेड्यातच आहे. आणि म्हणूनच खेड्यातील जीवनानुभव घेतला पाहिजे. या जाणिवेतून गांधीजींनी सर्वांनाच खेड्याकडे चला अशी हाक दिली. सर्वच मंडळीनी खेड्याकडे लक्ष द्यायला सुरवात

केली. ग्रामीण जीवनातील विषमता, दारिद्रय, अनिष्ठ रूढी आणि परंपरानिष्ठता, अभिमानशून्यता इ. नष्ट करून त्यांची अस्मीता जागृत करण्याचे, आत्मभान देण्याचे प्रयत्न सुरू झाले. सर्वच विचारसरणीच्या मंडळीनी आपला मोर्चा खेड्याकडे वळविल त्यामुळे एकूणच ग्रामोध्दाराचेच वातावरण निर्माण झाले.

या बदलाचा परिणाम साहित्यावर झाल, खेडे, त्यातील परिसर, निसर्ग या साहित्य सिध्दांताचे दर्शन घडवून नानिन्याचा प्रत्यय देणारा व वाचकांचे कुतूहल जगविणारा एक लेखकवर्ग निर्माण झाला. तर दुसऱ्या लेखकवर्गाने ग्रामीण जीवनासंबंधाने काही नविन अंदाज बांधून समस्या निश्चित केली. तेथील ग्रामजिवन, निसर्गरम्य वातावरण, लेखक मनाला जाणवणाऱ्या समस्या या साहित्य सिध्दांतांना घडून लेखक करावयास प्रारंभ केल.

१९२५-४० या काळात निर्माण झालेल्या ग्रामीण साहितकडे बधीतले तर १९२०-२५ च्या काळात जी साहित्य सिध्दांत दिसतात त्याचा साहित्य सिध्दांताना धरून साहित्याची निर्मीती झाल्याचे दिसते. या सुमारास जी जनपदगीते किंवा ग्रामीण गीते लिहील्या गेली ती नाविन्यापोटी लिहीली गेली. त्यात ग्रामीण जीवनाचे वस्तुनिष्ठ दर्शन घडविले आहे. तसेच ते साहित्य आत्मप्रत्ययातून व रचानुभवातून अवतरलेले होते.

१९४०-४५ या काळात नजरेत भरावी अशी ग्रामीण कविता निर्माण झाली नाही. या पूर्वीच्या लेखकांनी केवळ ग्रामीण समाजाच्या सहानुभूतीपोटी परंतू शहरी मानसांच्या चष्म्यातून ग्रामीण जीवनाकडे बघीतले होते. त्यांना खऱ्या ग्रामीन जीवनाचे आकलनच झालेले नव्हते. परंतू भारताच्या कथासंग्रहाच्या क्रांतीमुळे ग्रामीन पातळीवरचा संघर्ष, ग्रामीन माणसाचा रांगडेपणा, रानदांउगेपणा, जुलूम, जबरदस्ती, रंगेलपणा आदी साहित्यासिध्दांताचा आधार केंद्रवर्ती ठेऊन कथा लिहील्या गेल्या. हळहळू या साहित्यसिध्दांतांमध्ये आणखी काही साहित्य सिध्दांत डोळ्यासमोर ठेऊन दिघे व ठोकड यांनी निसर्गाचे वर्णन, व्यक्तिवर्णन आदीच्या अनुषंगानी साहित्याची निर्मीती केली.

याच काळात कांदबऱ्यामधूनही ग्रामीण जीवनाचे साहित्यसिध्दांच्या अनुंषंगाने चित्रन करण्यात आले आहे. या माध्यमातुन ग्रामीण जीवनाच्या विवीधांगांना स्पर्श करणारे ग्रामीण खेडून माणसाबरोबरच ठाकूर, वारली, कातकरी आदीवासी जमातीचेही चित्रन करणारे लेखन करण्यात आले. परंतू ग्रामीण साहित्य सिध्दांताच्या चौकटीत स्वप्नरंजन, तत्वज्ञान, अद्भूतता इ. च्या मुक्त वापराने कमी अधिक प्रमाणात तडा देऊन डागाळण्याचा प्रयत्न केला. तसेच काहींच्या लेखनातून ग्रामीण माणसाची होणारी उपेक्षा त्यांच्या हालअपेष्टांचे चित्रण करण्यांचा प्रयत्न केला त्यामुळे साहित्य सिध्दांताच्या स्पर्शाने लेखन केले गेले असे म्हणता येईल.

ग्रामीण साहीत्याची प्रेरणा व स्वरूप यात १९२५ च्या दरम्यानातील ग्रामीण साहीत्याच्या प्रेरणा व स्वरूपाशी साम्य दिसते. ग्रामीण जीवनातून फुलणारे, ग्रामीन वास्तवातून सादर होणारे साहित्य म्हणजेच ग्रामीन साहीत्य असे म्हणता येईल. काळ व

परिस्थिती बदली तरी आजही ८० टक्के जनता खेड्यापाड्यात म्हणजे ग्रामीण भागात राहते. तेव्हा या ग्रामीण भातून सर्व दुर परसरलेल्या समाजाची स्वत:ची अशी एक संस्कृती निर्माण झालेली दिसते. म्हणजे आज ग्रामीण भागातून एकत्र कुटूंबपध्दती मोडतांना दिसतो आहे. त्याला कारणेही तशीच आहेत. पण जातीव्यवस्था नष्ट झाली नाही तीची स्वतंत्र संस्कृती दिसते. म्हणजेच या पार्श्वभूमीवर एकूणच ग्रामीण साहित्यात परिवर्तन झालेले दिसते. जीवनातील वास्तव सूक्ष्म व विवीधांगानी मांडले जाऊ लागले. या वस्तुनिष्टतेबरोबरच अनुभवनिष्ठ विचारात घेऊन लेखन केले जाऊ लागली. मानवी मनाच्या दर्शनाला तानतणावाला भाववस्थेला महत्व देऊन निर्मीती होऊ लागल्यामुळेच अंतर्गुख व आत्मनिष्ठ, शुध्दकलवादी साहित्य निर्माण होऊ लागले. यात ग्रामीण माणसाचे मन त्याचे चालणे, बोलणे वागणे, भोवतालचा परिसर, त्याची संस्कृती या सैध्दांतीक आधारावर ग्रामीण कथा निर्माण होऊ लागली. त्यात मानवी मनाची गुंतागुत व त्यांची ग्रामीण जीवनाशी जूळलेली पदर व त्यातून त्याच्या जीवणाला प्राप्त झालेले परिणाम याचे भान व आकलन झालेले ग्रामीण साहित्य निर्माण केल्या गेले.

१९६०-१९७० सर शतकात लोकप्रीय ग्रामीण साहित्याचे दशक मानले जाते. कारण या काळात ग्रामीण वातावरणात बरेच बदल घडून आले. त्यामुळे या दशकातील लेखकांनी ग्रामीण वास्तवाबरोबरच ग्रामीण मानसाच्या मूलभूत जाणिवा व्यक्त करू लागले. याशिवाय यंत्र व विज्ञान यामुळे खेड्यात झालेल्या सुधारणा बदल, बदल व त्यातून निर्माण नविन समस्या ग्रामीण मनावर झालेल परिणाम आदी सैध्दांतीक आधारांना समोर ठेऊन ग्रामीण साहित्याची निर्मीती होऊ लागली.

काही लेखक नव्या जोमाने व विचाराने साहित्य निर्मीती करू लागले. या काळात खऱ्या अर्थाने ग्रामीण साहित्याची चळवळ सुरू झाली. ग्रामीण जीवनातील दु:ख आणि समस्या यांचे स्वरूप बदलत होते. व याच बदलचे दर्शन ग्रामीण साहित्यामध्ये होऊ लागले. म. फुले राजर्षी शाहु महाराज, वि. रा. शिदे, डॉ. आंबेडकर, कर्मविर भाऊराव पाटील इ. च्या विचारांशी ग्रामीण साहित्याची बांधीलकी असून याच बांधीलकीतून सावकार, धरणग्रस्तांचे प्रश्न, दुष्काळामुळे होणारी होरपड, शासकीय योजनामधून घडणारे अपहार आणि ग्रामीण माणसाला त्यापासून वंचीत ठेवणारी वृत्ती, शैक्षणिक संस्थामधील, गैरव्यवहार इ. चे चित्रण बदलत्या परिस्थीतीनुरूप लेखककरू लागले.

